# मागोवा

मा. गो. वैद्य



म. ग्रं. सं. ठाणें
नित
3960
REFBK-0024960

संदर्भ निबंध
३९८०
२५९९०
१५/५/८६

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचना :—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ [८] नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

11 JUN 1986
22 JUN 1986
25 JUN 1986
31 AUG 1986
19 OCT 1986
19 MAY 1990

(क्र. मा. पद्दा)
५०००–३–८४

# मा गो वा

# मा गो वा

[ निवडक लेख आणि अग्रलेख ]

लेखक :

**माधव गोविंद वैद्य**

REFBK-0024960

प्रकाशक :
प्राचार्य रा. प्र. अयाचित
कार्यवाह,
श्री. मा. गो. उपाख्य बाबुराव वैद्य
अभिनंदन समिती,
मार्ग क्र. १२
धनतोली, नागपूर ४४० ०१२

■

मुद्रक :
मधुसूदन पां. बनहट्टी
नारायण मुद्रणालय,
धनतोली, नागपूर १२

■

मुखपृष्ठ :
संजय धोतरकर
सीताबर्डी, नागपूर

■

मुखपृष्ठ मुद्रण :
मधुकर आर्टस्,
डॉ. मुंजे मार्ग
धनतोली, नागपूर १२

■

©
प्रा. मा. गो. वैद्य
मु. पोस्ट–तरोडा
मार्ग–सेवाग्राम, जि. वर्धा.

■

प्रथमावृत्ती :
७ जानेवारी १९८६

■

**मूल्य ३६ रुपये**

प्र. श्री ग्रंथ संग्रहालय ठाणे
३१६० 
ग्रा. क्र. २२०८६
विभाग ज्ञ्यापूर्वक
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)

# प्रास्ताविक

प्रा. माधव गोविंद उपाख्य बाबूराव वैद्य ह्यांचे निवडक अग्रलेख व लेख 'मागोवा' या संग्रहाद्वारे सादर करताना आम्हाला अत्यंत आनंद वाटतो. मराठी वृत्त-पत्राच्या ध्येयवादी परंपरेला अनुसरणाऱ्या 'तरुणभारत' ह्या दैनिकाचे संपादकत्व मा. बाबूरावांनी १९६६ साली स्वीकारले आणि तेव्हापासून, जवळजवळ गेल्या दीड तपात, त्यांनी विपुल लेखन केले. समाजाच्या जिव्हाळ्याच्या प्रश्नांचे तटस्थपणे चिंतन करणे व त्यावरील आपली मते साक्षेपाने व सुबोध शैलीने प्रगट करणे हे त्यांच्या सर्वच लेखनाचे वैशिष्टय आहे. प्रस्तुत संग्रहातूनही हे वैशिष्टय प्रगट झालेले दिसेल.

प्रा. वैद्य हे संस्कृतचे नामवंत प्राध्यापक होते. नाग-विदर्भाच्या सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक व राजकीय क्षेत्रातील एक क्रियाशील कार्यकर्ते म्हणूनही त्यांनी दीर्घकाळ कार्य केले आहे. समतोल विचारसरणी व सत्यशोधक दृष्टीने कोणत्याही प्रश्नाचा विचार करण्याची वृत्ती ह्यामुळे त्यांचे सर्वच लेखन मौलिक झाले आहे. 'तरुणभारता'तील त्यांचे निवडक अग्रलेख, तसेच प्रत्यक्ष नावाने व काही 'नीरद' या टोपण नावाने त्यांनी लिहिलेले लेख-अपवाद फक्त 'महाराष्ट्र टाइम्स'मधील 'तुरुंगातले दिवस' ह्या लेखाचा- प्रस्तुत संग्रहात समाविष्ट केलेले आहेत. हे सारेच लेख वाचकांना मौलिक व उद्‌बोधक वाटतील याची आम्हास खात्री वाटते.

नागपूरच्या नारायण मुद्रणालयाचे संचालक श्री. मधुसूदन बनहट्टी व त्यांचे बंधू श्री. बाळासाहेब बनहट्टी ह्यांनी अल्पावधीत ग्रंथाचे सुंदर मुद्रण करून दिले व सुप्रसिद्ध चित्रकार श्री. संजय धोतरकर ह्यांनी सुरेख मुखपृष्ठाने ग्रंथ आकर्षक होण्यास साह्य केले ह्याबद्दल, संपादक ह्या नात्याने, आम्ही त्यांचे मनःपूर्वक आभार मानतो.

दि. ७ जाने. ८६
नागपूर

-दि. भा. घुमरे
-वसंत कृ. वऱ्हाडपांडे

# अनुक्रम

## मागोवा : अग्रलेख

□ स्वतंत्रते, त्वामहं यशोयुतां वंदे : १ □ विजयाचे पर्व : ४ □ पुनश्च स्वातंत्र्य आले ! : ७ □ सर्वोदय : ११ □ पुनश्च गांधीवादाकडे : १४ □ रशियन राज्यक्रांतीची अर्धशताब्दी : १७ □ रावण लीला : २३ □ सह्याद्री पार ढासळला हो ! : २६ □ धम्मचक्रप्रवर्तनाच्या रौप्य महोत्सवाचे स्वागत : २९ □ मराठी भाषा आणि तिचे व्याकरण : ३२ □ दासनवमी : विरक्तांची सामाजिकता सांगणारे पर्व : ३८ □ श्री. अनंतराव शेवडे यांचा मृत्यू : ४१ □ वेदमहर्षींचा मृत्यू : ४४ □ ज्याँ पॉल सार्त्र यांचा मृत्यू : ४८ □ गीताईमंदिर आणि त्यांचे विरोधक : ५२ □ संस्कृतचा जयजयकार : ५५ □

## मागोवा : लेख

□ पुरोहितांशी हितगुज : ५९ □ संपादकाची कसरत : ६५ □ सरकार आणि वृत्तपत्रे : ७१ □ धर्माचरण कशाला म्हणावे ? : ७५ □ नीतिमत्ते-साठी धर्मकल्पनेची आवश्यकता आहे काय ? : ८० □ नियतीचे खेळ व भगवंताचे आश्वासन : ८५ □ आपल्याला राजा हवा आहे काय ? : ८८ □ सार्वभौम कोण ? संसद, न्यायपालिका की आणखी कोणी ? : ९२ □ चांगले राज्य, चांगल्यांचे राज्य : ९६ □ क्रांती, विकास, उन्नती : १०० □ माझ्या बहुजन–समाजासाठी : १०४ □ जातीचे कवच आणि शस्त्र : १०८ □ राजधानी, खलधानी की लोकधानी : ११२ □ अंधार न्यूयॉर्कचा आणि सभ्यतेचाही : ११६ □ फटकळ : १२० □ तुरुंगातले दिवस : १२३ □ स्नेहांकिता : १३२ □ खरेच का शिक्षणाचा खेळखंडोबा थांबवायचा आहे ? : १३७ □ यज्ञ आणि यज्ञचक्र : १४२ □ लेखक आणि समाज-परिवर्तन : १४६ □ चंद्र कवेत आला ! : १४९ □

## मागोवा : अग्रलेख

३९६० ... ग्रंथालय ठाणे
ग्रा. क. ३८९६०
विभाग उपविभाग
(स्थळ प्रत)

# स्वतंत्रते, त्वामहं यशोयुतां वंदे

गेल्या २६ वर्षांत, आजच्या स्वातंत्र्यदिनासारखा उद्विग्नतेने आणि निराशेने भरलेला स्वातंत्र्यदिवस दुसरा आला नसेल. मानवाच्या हर्षविषादांची तीव्रता कालांतराने क्षीण व्हावी, हे स्वाभाविक असले, तरी राष्ट्राच्या इतिहासात पाव शतकाचा काळ हा काही फार मोठा अवधी नव्हे. शिवाय पारतंत्र्याची आठवण कायम असलेली व ते घालविण्यासाठी हालअपेष्टा सहन केलेली पिढी अजूनही हयात आहे. स्वातंत्र्यसंग्राम सैनिकांच्या सत्काराच्या रूपाने राष्ट्राने त्यांच्याविषयी आपली कृतज्ञता व्यक्त केली आहे. स्वातंत्र्यदिनाचा आनंद मंद व्हावा, इतके काळाने किंवा प्रकृतीने आपण त्या सोहळ्याच्या पहिल्या दिनापासून अजूनतरी फार दूर गेलेलो नाही. तरी देखील आज असे काही दुर्दिनाचे मळभ आच्छादिलेले आहे की, आनंदाच्या किरणांचा प्रकाश कुठल्याकुठे लुप्त झाला आहे. निराशा आणि उद्वेग यांचेच राज्य जणू काही अवतरले आहे. आंग्ल कवि वर्डस्वर्थने—

> There was a time when meadow, grove and stream
> The earth, and every common sight
> To me did seem
> Apparell'd in celestial light
> The glory and the freshness of a dream.
> It is not now as hath been of yore :–
> Turn wheresoe'er I may
> By night or day.
> The things which I have seen I now can see no more

हे जे म्हटले आहे, ते जणू काही भारताच्या आजच्या दशेला पाहूनच तर म्हटले नाही ना असे वाटते ! स्वातंत्र्याचा स्पर्श कसा विलक्षण असतो ! शेते, राने, झरे, ही उघडी जमीन, एवढेच काय पण जे जे म्हणून दृष्टीस पडे, ते ते स्वर्गीय प्रकाशाने न्हाऊन निघालेले वाटत होते. एक भव्य, एक ताजे स्वप्न तेव्हा होते. पण आता ते काही उरले नाही. मी इकडे पाहतो, तिकडे बघतो, रात्री बघतो, दिवसा बघतो, पण जे पूर्वी बघितले होते, ते आता काही दिसत नाही. वर्डस्वर्थने वेगळ्या संदर्भात आपली कविता लिहिली. स्वातंत्र्याच्या या २६ व्या वाढदिवशी तिची आठवण व्हावी अशी आपली अवस्था झाली आहे.

कशासाठी मिळविले स्वातंत्र्य ? स्वातंत्र्याची पंचवीस वर्षे झाल्यानंतरही अन्नासाठी दाही दिशांना भीक मागण्यासाठी ? ही भारतभू विश्वंभरा, वसुंधरा म्हणून आम्ही गौरविली. पण ती आपल्याच पुत्रांचे पोट भरू शकत नाही. म्हणे विश्वंभरा–विश्वाचे भरणपोषण करणारी ! आपल्याला बरे वाटावे म्हणून आपल्या देशाला दरिद्री म्हणावयाचे नाही–अविकसित म्हणावयाचे. पण शब्द बदलविण्याने दारिद्रय जाते काय ? असे आपले दारिद्रय की, उकिरड्यावर फेकलेल्या अन्नासाठी इथे कुत्री आणि माणसे यांची लढाई होते ! उष्टे फेकलेल्या अन्नासाठी येथे लाचार मानवांच्या रांगा लागतात ! आणि ही म्हणे वसुंधरा–धन धारण करणारी ! उगीच कुणा तरी पागल माणसाने वेडाच्या भरात तर हिला विश्वंभरा, वसुंधरा म्हटले नाही ? बंकिमचंद्र म्हणाले, ही सस्यश्यामला आहे, सुजला आणि सुफला आहे. पण कुठे आहे ती ! येथे तर परदेशातून आणलेल्या सडक्या नासक्या अन्नासाठी लोक रांगा लावीत आहेत. म्हणे सस्यश्यामला ! सुजला आणि सुफला !

केवळ नैसर्गिक आपत्तींनी अशी अवकळा आपल्या लोकांवर आली असती, तर त्यातही काही दिलासा मिळाला असता. त्या संकटाचा मुकाबला करण्याकरिता धीराने आणि पराक्रमाने लोक सरसावले असते. पण ही केवळ अस्मानी आपत्ती नाही. सुलतानीचा फार मोठा भाग यात आहे. स्वातंत्र्याची सगळी कळा या सुलतानीने खरवडून काढली आहे. आपण ज्या वेळेला स्वतंत्र झालो व आपले भाग्यविधाता बनलो, त्याच वेळेला दुनियेतील आणखीही काही देश स्वतंत्र झाले. काही देश तर भीषण महायुद्धाच्या राखेत लोळत होते. काही अस्तित्वासाठी धडपडत होते. पण ते आगीतून सोने उजळून निघावे तसे उजळून निघाले. मरतात की राहतात असा ज्यांच्याविषयी संशय, ते मृत्यूवर मात करून दिमाखाने उभे ठाकले. संकटे त्यांच्यावरही आली. निसर्ग कधीकधी तेथेही कोपला, पण त्या सर्वांवर मात करून गौरवाने, ताठ मानेनें ते उभे राहिले. जगाला आव्हान देत, दिलेली आव्हाने स्वीकारीत उभे राहिले. त्यांनी वाळवंट सस्यश्यामल बनविले. राखेतून कारखाने उभविले. पराभवाचे जहर पचविले, स्मशानात पुन: मांगल्याचे मनोरे उभे केले आणि आपण एवढे कर्मदरिद्री आणि यत्नदीन की सस्यश्यामलेलाच भिकेला लावले.

स्वातंत्र्य म्हणजे स्वावलंबन ! स्वावलंबन म्हणजे पृथक्त्व नव्हे. पण सहकार्य आणि परावलंबने यांच्यातील भेदरेखाही आपण ओळखली नाही. लक्षात न येण्याइतकी ती सूक्ष्म किंवा अस्पष्ट नाही. पण स्वावलंबन खऱ्या अर्थाने आपल्या सुलतानांना सुचलेच नाही. परकीय मदतीची अशी काही भुरळ त्यांना पडली की, त्या मदतीच्या ढिगाऱ्यात आपले सगळे स्वत्व दबून गेले, तरी त्यांच्या

ते ध्यानातच आले नाही. गेल्या पंचेवीस वर्षात आर्थिक, वैज्ञानिक, लष्करी, राजनैतिक अशा राष्ट्रजीवनाच्या अत्यंत महत्त्वाच्या क्षेत्रांत निरनिराळ्या 'मदतीं'नी असे काही आपण बांधले गेलो आहोत की, आपले तंत्र म्हणून कुठे दिसतच नाही. जेथे आपले तंत्र नाही, तेथे 'स्वतंत्रता' शोधावयाची कोठे ?

या अंधारातही प्रकाशकिरणे चमकली नाहीत असे नाही. गेल्या वर्षीचा स्वातंत्र्यदिवस केवढा गौरवशाली होता ! एक विजयशाली राष्ट्र म्हणून आपण जगासमोर आलो होतो. जगात आपली शक्ती सर्वांनी मानली नसेल, पण आशियाखंडात 'भारत' एक शक्ती बनली होती. मानसिक दृष्टीने हा केवढा लाभ आपण आपल्या पराक्रमाने मिळविला होता. परंतु पुन: आपण आपल्या नेहमीच्या सुस्तीत गेलो. देशाच्या काही भागात अवर्षण पडले, तर जणू काही वर्षानुवर्षे दुष्काळाचीच ही भूमी आहे अशी आपली स्थिती झाली. आपले गेल्या वीस वर्षांचे नियोजन एवढे तकलादू होते का की, गेल्या वर्ष दोन वर्षांत जी आर्थिक आणि व्यापारी धोरणे आपल्या सरकारने आखली, त्यांचा परिणाम म्हणून ही अवकळा आपल्यावर आली ?

स्वातंत्र्य हे केवळ स्वातंत्र्यासाठीही हवेच असते. स्वराज्याची तहान सुराज्याने कधीही भागू शकत नाही. पण याचा अर्थ स्वराज्य कसेही चालावे असा थोडाच आहे. स्वातंत्र्याचे फळ म्हणून समृद्धी आली पाहिजे, गौरव वाढला पाहिजे, सुराज्य नांदले पाहिजे. म्हणजेच स्वातंत्र्य यशोयुत असले पाहिजे. ते यशोयुत होण्यासाठी जे जे बाधक असेल, त्याचा त्याग करण्यासाठी लोकांची आणि लोकनेत्यांची तयारी असली पाहिजे. कवटाळलेले सिद्धांत, आखलेली धोरणे, स्वीकारलेले कार्यक्रम समृद्धीला बाधक असतील, तर त्यांचा त्याग करण्यासाठी नेत्यांची तयारी असली पाहिजे. स्वातंत्र्यासाठी आपल्या प्राणाचे बलिदान करण्यापेक्षा आपल्या धोरणाचा त्याग करणे कठीण आहे काय ? पंचवीस वर्षांनंतर पुन: एकदा आपल्या सर्व धोरणांचा विचार करण्याची गरज उत्पन्न झाली आहे. तथाकथित समाजवादी मार्गांनी संपत्ती निर्माण होत नसेल, तर त्यांचा त्याग केला पाहिजे. विशिष्ट नीतींनी अर्थव्यवस्थेला निरर्थक ठरविणारी काळ्या पैशाची व्यवस्था निर्माण झाली असेल, तर त्या नीतींना दूर केले पाहिजे. विशिष्ट व्यवहारांनी राष्ट्रघटकांत दुरावा उत्पन्न होत असेल, दूर असणारे सदाचे दूर राहून शत्रू बनणार असतील, तर ते व्यवहार सोडले पाहिजेत. ज्या कारणांनी अराजकाचे वातावरण निर्माण होत आहे असे दिसते, ती कारणे दूर सारली पाहिजेत. थोडक्यात, प्रयत्नांची पराकाष्ठा करून स्वतंत्रतेला यशोयुत केले पाहिजे. 'स्वतंत्रते भगवति, त्वामहं यशोयुतां वंदे' असा उत्स्फूर्त, विलक्षण उत्साहाने भरलेला, आनंदाने ओतप्रोत असा उद्घोष जनसामान्यांच्या कंठांतून उमटला

पाहिजे. त्यांनी साऱ्या दिशा निनादल्या पाहिजेत. सारे स्वर्गस्थ स्वातंत्र्यवीरही त्या घोषाने पुलकित झाले पाहिजेत. दुर्दैवाने आजच्या स्वातंत्र्यदिनी असा उद्घोष करण्याचे वातावरण आपल्या देशात नाही, ही विलक्षण वेदनादायक अशी खंत आहे. हे निराशेचे मळभ लवकरात लवकर दूर होवो, आणि—

"नमामि कमलाम्, अमलाम्, अतुलाम्
सुजलाम् सुफलाम्,
श्यामलाम्, सरलाम्, सुस्मिताम्, भूषिताम्,
धरणीम्, भरणीम्" असे यथार्थतेने म्हणता येण्यासारखी आपल्या देशाची स्थिती करण्याची लोकनेत्यांना सद्बुद्धी व देशवासियांना प्रयत्नांची प्रेरणा मिळो, हीच या स्वातंत्र्यदिनी परमेश्वराला प्रार्थना.

१५-८-७३

## विजयाचे पर्व

आज विजयादशमी. विजयादशमी म्हणजे सीमोल्लंघन. विजायादशमी म्हणजे विजयाची पूजा. अनेकांना असे वाटते की, विजयाची पूजा म्हणजे हिंसेची पूजा. संहाराची पूजा. पण ही भ्रांत धारणा आहे.

जग स्थिर नाही. माणूसही स्थिर नाही. त्यामुळे माणूस आणि त्याचा समाज पुढे जाणार नाही, तर तो मागे जाईल. तो स्थिर राहूच शकत नाही. जो थांबला, तो संपला. म्हणून पुढेच गेले पाहिजे. विजय म्हणजे पुढे जाणे. प्रगती करणे.

या प्रगतीत संकटे अपरिहार्य आहेत. ती येणारच. प्रगतीचा मार्ग मखमलीवरून कधीच नसतो. तो कंटकाकीर्ण असतो. या मार्गाला तुडवीत जाण्याचे साहस निर्माण होण्यासाठी मनात विजयाची आकांक्षा पाहिजे. ज्या समाजाच्या मनात अशी आकांक्षा नसेल तो या बिकट मार्गापासून पळून जाईल. या पलायनाचेही तो आपल्या बुद्धीने एखादे तत्त्वज्ञान निर्माण करून समर्थन करील. पण पलायन ते पलायन. विजय आणि पलायन हे परस्परविरुद्ध शब्द आहेत.

आपली संस्कृती विजयाची पूजक आहे. आपले सगळेच अवतार विजयी वीर आहेत. दुष्ट हिरण्यकशिपूवर नरसिंहाने विजय मिळविला आहे. वामनाने बळीवर, परशुरामाने उद्दंड क्षत्रियांवर, रामाने रावणावर, कृष्णाने कंसावर विजय मिळविला आहे. हा विजय मिळविताना हिंसा घडली आहे, हे खरे आहे. पण ती हिंसा पाप नव्हते. कारण ती अटळ होती. ती झाली नसती तर दुष्टांचे साम्रा-

ज्यच येथे नांदले असते. ज्यांचा संहार झाला, ते दुसऱ्या कोणत्याही रीतीला मान्य करीत नव्हते. रावणाशी शिष्टाई करावयाला गेलेल्या अंगदाला यश आले नाही. हनुमंताने सीतेला सोडून देण्यासाठी रावणाला सांगितले, तर हनुमंतालाच पेटवून देण्याचा खटाटोप झाला. पाच गावांवर संधी करावयास गेलेल्या श्रीकृष्णालाच दुर्योधनाकडून अपमानित व्हावे लागले. सुईच्या अग्रावर मावेल एवढी जमीनही न देणारे हट्टाग्रही दुष्ट जेव्हा सत्ताधारी बनतात, तेव्हा त्यांचा पाडाव करणे हेच धर्म्य असते, तो विजय अशा रीतीने धर्म्य बनतो.

मानवजीवनात संघर्ष अटळ असलेला दिसतो. म्हणून या संघर्षाचे नियम केलेले असतात. या नियमांना अनुसरून जो संघर्ष चालतो, त्याला धर्मयुद्ध म्हणतात. पण 'धर्मयुद्ध' एकतर्फी होत नाही. एकाने नियम पाळावयाचे आणि दुसऱ्याने लबाडी करावयाची, असा विषम संघर्ष धर्मयुद्धालाही मान्य नाही. अशा वेळी लबाडांशी लबाडीच करावी लागते. रजपूतवीर युद्धात पराभूत झाले; कारण, ज्यांच्याशी युद्ध करावयाचा प्रसंग आला, त्यांना धर्मयुद्धाचे नियम मान्य नव्हते. शरणागताला अभय द्यावे हा धर्मयुद्धातला नियम आहे. पृथ्वीराज चव्हाणाने तो पाळला आणि महंमद घोरीला सोडून दिले. पण तो नियम घोरीला मंजूर नव्हता, म्हणून पृथ्वीराजावर पाळी आली, तेव्हा त्याचे डोळे फोडून त्याचा शिरच्छेद करण्यात आला. अल्लाउद्दीन खिलजीला या नियमांची कदर नव्हती, म्हणून सत्कार म्हणून त्याला पोचवायला गेलेल्या भीमसिंगाला त्याने कैद केले. राजपूत एकतर्फी धर्मयुद्धाचे पालन करीत होते आणि सतत पराभूत होत होते. पराक्रमी असूनही पराभूत होत होते.

त्या अधर्मांच्या विजयपर्वात, छत्रपती शिवाजी हे पहिले महापुरुष झाले, ज्यांनी धर्मयुद्ध कुणाशी खेळायचे असते, याचे तारतम्य सांभाळले. ते आधुनिक काळातील पहिले विजयी वीर होते, ज्यांनी "व्रजन्ति ते मूढधियः पराभवं, भवन्ति मायाविषु ये न मायिनः" म्हणजे जे कपटी लोकांशी कपटाने वागत नाहीत, ते मूर्खलोक पराभूत होतात– हा सिद्धांत हृदयंगम केला होता. म्हणून ते अफझलखानाला धूळ चारू शकले; म्हणून ते आग्ऱ्यावरून सुखरूप येऊ शकले. अन्यथा तेगबहादुरादि शीख गुरूंना दिल्लीच्या चौकात जसे विटंबित मरण आले, तसेच शिवाजी महाराजांनाही आले असते.

येथे कोणीही असा प्रश्न करील की, विजय मिळविण्यासाठी केलेले कपट समर्थनीय ठरते काय ? या प्रश्नाचे उत्तर, विजय कशासाठी, यावर अवलंबून आहे. विजय स्वतःच्या बडेजावासाठी, लोकांवर जुलूम करण्यासाठी, संस्कृती आणि जीवनमूल्ये यांच्या विध्वंसासाठी, मानवी जीवनात जे हेय, तिरस्कार्य म्हणून ठरविलेले आहे त्यासाठी, जो मिळवू चाहील, त्याने अवलंबिलेले कपट

केव्हाही समर्थनीय ठरणार नाही. म्हणून अल्लाउद्दीनाचे कपट यशस्वी झाले, तरी ते निंद्य आहे. रावणाचे ब्राह्मण वेषातील कपट म्हणूनच निंद्य आहे. दुसऱ्याच्या स्त्रीचा अभिलाष हे पाप आहे. ते केवळ एका व्यक्तीच्या विरुद्ध केलेले पाप नाही; तर संपूर्ण समाजाची व्यवस्थाच उखडून टाकणारे पाप आहे. अल्लाउद्दीन अदंडित राहिला, म्हणून त्यानंतरची अनेक शतके बळवंतांनी निर्बलांच्या स्त्रिया आपल्या भोगदासी समजून आपले जनानखाने सजविण्याची परंपरा सुरू झाली. या परंपरेत सारे सभ्य आणि सुसंस्कृत मानवी जीवनच उध्वस्त आणि हताश झाले. रावण दंडित झाला, म्हणून स्त्रीचे पावित्र्य टिकविले पाहिजे, हे जीवनमूल्य स्थिरपद झाले. "अश्वत्थामा मृतः" –इथे युधिष्ठिराला म्हणावयाला सांगणे हे कपटच होते. कर्ण भूमीत रुतलेले चाक काढीत असताना, त्याच्यावर बाण सोडावयाला सांगणे हा धर्मयुद्धाच्या नियमाचा भंगच होता. पण ते करणे आवश्यक होते. द्रोणाचार्यांचा विजय हा, आपल्या ज्येष्ठ बंधूच्या स्त्रीला भर सभेत विवस्त्र करण्याचे जे पाप झाले, त्या पापकर्त्यांचा विजय ठरला असता. कारण, द्रोणाचार्य पापकर्त्यांच्या बाजूने पराक्रम गाजवीत होते. द्रोणाचार्य ज्या बाजूने लढले, त्यांचे समर्थन करता येणार नाही, असे नाही पण अंतिमतः, त्यांनी पापकर्त्यांची बाजू घेतली हे त्यामुळे असिद्ध ठरत नाही. त्यांचा वध आवश्यक होता. त्यासाठीचे कपटही मग धर्म्य ठरले. कर्णाला, तर 'धर्मयुद्ध' हा शब्दही उच्चारण्याचा अधिकार नव्हता. ज्याने अभिमन्यूला एकटे गाठून ठार मारण्यात धर्मयुद्धाच्या संकेताचा भंग केला, त्याला धर्मयुद्धाच्या नियमाचे संरक्षण देणे हाच मूर्खपणा ठरला असता. म्हणून कर्णाच्या विनवणीने थबकलेल्या अर्जुनाला, श्रीकृष्णाने बाण मारावयास सांगितले. आणि "क्व ते धर्मस्तदा गतः" असा सवाल करून कर्णाला निरुत्तर केले.

म्हणून पूजनीय अशा विजयाचा संबंध केवळ विजयाशी नाही; केवळ शत्रूच्या पराभवाशी नाही. त्याचा संबंध आहे मानवी जीवनाशी, मानवी मूल्यांशी, मानवी सभ्यतेशी आणि संस्कृतीशी. जे टिकावे असे सर्वांना वाटते, जे सर्वांनी करावे असे वाटते, त्या सार्वजनीन कल्याणाच्या गोष्टींशी जो विजय संबद्ध असतो, तो विजय पूजनीय असतो. म्हणून ही मूल्ये महत्त्वाची आहेत. या मूल्यांसाठी जे संघर्ष करतात, ते थोर पुरुष ठरतात. कोणत्याही देशाचा इतिहास घ्या, सर्वत्र याच पुरुषांना वंद्य मानलेले आहे. या संघर्षात सारेच विजयी झाले असे नाही. पण त्यांचा पराभव, त्यांचे हौतात्म्य, त्यांचा जोहार—हे सारे प्रेरणादायी ठरले. पण हौतात्म्यापेक्षा विजय केव्हाही श्रेष्ठ. क्षणकाळ आकाशात चमकून जाणाऱ्या विजेच्या प्रकाशापेक्षा सतत प्रकाश देणारा दीपस्तंभ सामान्यांना अधिक उपयुक्त. हौतात्म्य हे नेत्र दिपवून टाकणाऱ्या विद्युल्लतेसारखे असते. ते चमकून तर जातेच. पण क्षणाचा तो तैजस आविष्कार समाप्त होताच, जग अंधारात

परत बुडून जाते. तो अंधार मग अधिकच भीषण वाटतो. लोकांना भयभीत करतो. हौतात्म्य असे भयभीतही करू शकते. पण विजय हा निर्भेळ प्रकाश असतो. स्थिरतेची त्यात ग्वाही असते. म्हणून विजयाची उपासना केली पाहिजे, विजयाची आकांक्षा असली पाहिजे. विजयाची कामना समाजाच्या पौरुषाला सतत जागृत ठेवीत असते. विजयाची कामना राष्ट्राच्या अस्मितेचा आधार असते. राष्ट्र थांबू नये, संपू नये, आळसात आणि अकर्मण्यतेच्या पंकात बुडू नये यासाठी विजयाकांक्षा हे मोठे औषध आहे.

अशा पूजनीय विजयाची प्रेरणा देणारा हा विजयादशमीचा पवित्र मुहूर्त आहे. पापावर पुण्याच्या विजयाचे हे पर्व आहे. असभ्यता, क्रौर्य, असंस्कृतता यावर सभ्यता, उदारता आणि संस्कृती यांच्या विजयाचे स्मरण करून देणारा हा दिवस आहे. ऐहिकाशी संबंध नसणाऱ्या तथाकथित उच्च सिद्धांतांच्या भ्रमजाळात स्वतःला वारंवार गुंतवून घेण्याची सवय असलेल्या आपल्या राष्ट्राकरिता तर या विजय दिनाचे महत्त्व निर्विवाद आहे. म्हणूनच विजयाची पूजा करावयाला ही विजयादशमी सांगत आहे. तिचा हा संदेश पाळण्यातच आपल्या राष्ट्राचे स्वातंत्र्य आणि संस्कृती यांच्या संरक्षणाची हमी आहे. विजयध्वम् । विजयध्वम् ।

२७–१२–८२

## पुनश्च स्वातंत्र्य आले !

पुनश्च स्वातंत्र्य आले ! हो पुनश्च आले ! एकदा १५ ऑगस्ट १९४७ ला आले. तेव्हा इंग्रजांचे पांढरे पाय या देशातून निघून गेले व देश स्वतंत्र झाला. स्वराज्य अवतरले. जवळजवळ चार पिढ्यांच्या त्यागाला, शौर्याला, कष्टाला आणि निष्ठेला फळ आले. सगळीकडे आनंदीआनंद झाला. तसाच आनंद याही १५ ऑगस्टला लोकांना जाणवेल. १९७५ ची पंधरा ऑगस्ट किंवा १९७६ ची पंधरा ऑगस्ट किती भेसूर होती ! तिच्या कुरूपतेचे वर्णन आतापावेतो खूप होऊन गेले आहे. एखाद्या सुंदरीचे नाक–कान कापून कोणी तिला विद्रूप करावे, तशी आपली स्वातंत्र्यसुंदरी गेल्या दोन वर्षांत विद्रूप झाली होती. तिला तिची पूर्ववत् सुंदरता अर्पण करण्याचे महान कार्य दिनांक २१ मार्च १९७७ ला घडले. आणि पुनश्च नवे तेजोवलय घेऊन स्वातंत्र्य अवतीर्ण झाले.

एका दृष्टीने विचार केला, तर ३० वर्षापूर्वीच्या स्वातंत्र्यापेक्षाही अधिक आनंदाचा हा क्षण आहे. १५ ऑगस्ट १९४७ ला, आनंदाच्या महावस्त्रात फाळणीचा आणि रक्तपाताचा एक शोकपूर्ण धागा तरी होता. या नव्या

स्वातंत्र्यात असे कुठलेही वैगुण्य नाही. २६ जून १९७५ ला, श्रीमती गांधींनी आणिबाणीची घोषणा केल्यानंतर आणि त्यांच्या पुचाट अनुयायांनी त्या अत्याचाराला मूक वा बोलकी संमती दिल्यानंतर, या देशात काळोखाची एक अखंड रात्र सुरू झाली. रावणाच्या राज्यात महामहिम देवदेवतांची जी अवस्था झाली होती, तशीच अवस्था देशाचे नेते म्हणविणाऱ्या लोकांची झाली होती. समर्थ रामदासांनी, रावणाच्या आतंकाच्या परिणामांचे सुरेख वर्णन केले आहे. समर्थ लिहितात :—

हिणासारिखे देव ते दीन जाले
नसे शक्ति ना युक्ति पोटी गळाले ।
भयाभीत ते कापती दैन्यवाणे
बहू गांजिले दुःख ते कोण जाणे ।।

नेमकी अशीच स्थिती, या देशात आणिबाणीच्या दुःशासनपर्वात घडून आली. "भयाभीत ते कापती दैन्यवाणे"—अशी मोठमोठ्यांची अवस्था झाली. राज्याचा गव्हर्नर म्हणजे केवढा मोठा माणूस ! पण एकाही गव्हर्नराने, मला ही स्थिती असह्य होत आहे म्हणून, राजीनामा दिला नाही. दोघांनी पुढे राजीनामे दिले. पण ते निवडणूक लढण्यासाठी ! आणिबाणीच्या निषेधासाठी नाही. स्वातंत्र्याच्या रक्षणासाठी नाही. एकाही न्यायाधीशाने, न्यायव्यवस्थेचे अवमूल्यन झाले म्हणून आपले पद सोडले नाही. सगळेच 'भयाभीत' होऊन गेले. त्या अवस्थेत छोटी-छोटी मुले, महिला, विद्यार्थी स्वातंत्र्याच्या प्रतिष्ठापनेसाठी पुढे आले. आपले काय होईल याचा त्यांनी विचार केला नाही. विरोधाचा एकही स्वर उमटू द्यावयाचा नाही, अशा अट्टाहासाच्या कुंद वातावरणात आणिबाणी हटविण्याच्या घोषणांनी आसमंत त्यांनी दुमदुमवून टाकला. रामदास म्हणाले, सर्व देवांच्या कथांमध्ये रामकथा श्रेष्ठ आहे. कां ?—तर त्यांचे उत्तर आहे :—

बळे तोडिला बंद त्या त्रीदशांचा
म्हणोनी कथा थोर या राघवाची ।

आपल्या शक्तीने, रामचंद्राने सर्व देवांचे बंध तोडले, म्हणून इतर सर्व देवांच्या कथांपेक्षा रामकथा श्रेष्ठ आहे. आणिबाणीची बंधने उठविण्याकरिता ज्यांनी ज्यांनी, ज्या ज्या क्षेत्रात, पुरुषार्थ गाजविला, त्यांचीही थोरवी अशीच आहे.

हे जे सारे घडून आले, त्याचे आता अनेकांना अप्रूप वाटणार नाही. परंतु 'भारत माता की जय' एवढी घोषणा दिली की, तुरुंगात उचलबांगडी होत असे, हे त्यांनी ध्यानात धरावे. नागपूरच्या 'मधुकर आर्टस्' या मुद्रणालयाने गांधी जयंतीनिमित्त स्वातंत्र्याचा गांधीजींचा संदेश छापून दिला, तर त्याच्या मालकाला

दीड वर्षे मिसाखाली तुरुंगवास घडला. 'आणिबाणी हटवा' एवढे उच्चारले की तुरुंगवास; आणि एकदा तुरुंगात गेले की, न्यायालयाची दारे बंद. सरकारी महावकील श्री. नीरेन डे यांनी सुप्रीम कोर्टात, सरकारची भूमिका स्पष्ट करताना म्हटले होते की, एखाद्या पोलीस अधिकाऱ्याने खाजगी द्वेषाने जरी एखाद्याचा प्राण घेतला, तरी त्याला न्यायालयात जाता येणार नाही. अशा स्थितीत तुरुंगात कुणाचे काय होईल, हे कोण सांगणार? स्नेहलता रेड्डी, लॉरेन्स फर्नांडिस, राजन् यांची उदाहरणे आता जनतेसमोर आली असतील. पण यातले राजन् प्रकरण सोडले, तर सौ. रेड्डी आणि फर्नांडिस यांच्यावरील अत्याचारांची कहाणी तेव्हाही, तुरुंगातील स्थानबद्धांना आणि त्यांच्या कुटुंबियांना माहीत होती. अशा प्रकारे सर्वत्र हताशता आणि भीती पसरली असताना, आशेचा कुठलाही किरण दिसत नसताना, ज्यांनी नेतृत्व करावे ते गजाआड झाले असताना, ज्यांना आणि-बाणी पसंत नव्हती ते दिङमूढ झाले असताना व दडपशाहीचा वरवंटा बेगुमानपणे फिरत असताना, ज्यांनी त्या दडपशाहीविरुद्ध परिणामांची पर्वा न करता, आवाज उठविला, त्यांचा केवढाही गौरव केला, तरी तो थोडाच आहे. निराशेत त्यांनी पहिल्यांदा आशेचा किरण प्रकट केला. संपूर्ण देशातून सुमारे एक लाख लोकांनी आणिबाणीच्या विरुद्ध सत्याग्रह केला. त्यांनीच बाहेरच्या जनतेत थोडी हिंमत निर्माण केली. वृत्तपत्रांचा आवाज दबलेला असताना, त्यांनी प्रथम स्वातंत्र्याचा उच्चार केला. त्याचा परिणाम म्हणूनच, निवडणुकीची संधी येताच, लोकांनी अत्याचारी शासन उखडून लावले आणि स्वतंत्रतेला परत सिंहासनावर बसविले.

हे जे नवे स्वातंत्र्य आले, ते केवळ जे स्वातंत्र्याकरिता लढले त्यांच्या करिताच आले असे नाही. जे अत्याचाराचे व अन्यायाचे पोशिंदे होते, त्यांच्या-करताही ते स्वातंत्र्य आहे. त्यामुळे, तेही आता सरकारवर टीका करू शकतात. ज्यांनी आणिबाणीच्या काळात, तिच्याशी झुंज देताना कष्ट सोसले, त्यांचा ते उपहास करू शकतात. हे केवळ सत्तांतरण असते, हुकूमशहा इंदिरा गांधी जाऊन हुकूमशहा मोरारजी आले असते, तर ते सत्तांतरण आणिबाणीच्या भाटांवरच उलटले असते. वैयक्तिक सत्तास्वार्थासाठी आणिबाणी लावून, तिची कुरूपता झाकण्यासाठी वीस कलमी कार्यक्रमासारख्या आर्थिक कार्यक्रमाचा मुलामा लावणे कोणालाही मुळीच कठीण नाही. वीसच्या पुढे आकडे नाहीत किंवा ते आकडे कलमांच्या मागे लागू शकत नाहीत असेही नाही. वीसच काय पन्नासही कलमे राहू शकतात. आणि त्या आकड्यांच्या कलमांचे भाट पुन: मिळूही शकतात. पण हे सत्तांतरण केवळ व्यक्तीच्या संदर्भात किंवा पक्षाच्याही संदर्भात घडलेले नाही. ते घडले आहे सामाजिक मूल्याच्या संदर्भात. ते मूल्य आहे स्वातंत्र्याचे. ते मूल्य आहे लोकशाहीचे. हा मौलिक संदर्भ घेऊन, २१

माचेला स्वातंत्र्य आले असल्यामुळेच आणिबाणीचे व हुकूमशाहीचे चाहते व खुषमस्करेही त्या स्वातंत्र्याचा उपभोग घेऊ शकतात. आणिबाणीच्या समर्थकांनी ही साधी बाबही ध्यानात न घेण्याचे करंटेपण दाखवू नये.

पंधरा ऑगस्ट या दिवशी– मग तो १९४७ मधला दिवस असो की, १९७७ मधला असो– एक विचार मनात येणे अपरिहार्य आहे. तो हा की, १४ ऑगस्ट १९४७ ला आपण स्वतंत्र नव्हतो; परतंत्र होतो. ते पारतंत्र्य कां आले, आलेले कां टिकले, याचा सर्वांनी विचार केला पाहिजे आणि पुन: तशी स्थिती येणार नाही, अशा रीतीने आपली सिद्धता केली पाहिजे. हे जे 'दुसरे' स्वातंत्र्य आले, त्याच्याशीही हाच विचार जडलेला आहे. २६ जून १९७५ ला स्वातंत्र्याचा लोप कां झाला ? गुलामी कां आली ? लोकाधिकार कां नष्ट झाले ? न्यायालये कां नि:शक्त बनली ? वृत्तपत्रांचा गळा कां दाबला गेला ? आणि मुख्य म्हणजे पावणे दोन वर्षे कां होईना, लोकांनी ही स्थिती कां सहन केली ?– या सर्वांचा, भारतातील सर्व पक्षांच्या, सर्व मनांच्या, सर्व स्तरांच्या नेत्यांनी विचार केला पाहिजे. आणिबाणीच्या काळात, आपल्या विदर्भातील एका खासदाराने एक लेख लिहून असा सवाल विचारला होता की, भाषणस्वातंत्र्य आणि विचारस्वातंत्र्य कोणाला हवे असते ? त्यांना सुचवायचे होते की, मूठभर लोकांची ही भूक आहे. असंख्य गरीब जनतेला भाकर हवी आहे; आणि तिची ती गरज एखादा हुकूमशहा भागवीत असेल, तर त्यात काही चूक नाही. श्रीमती गांधींना पर्यायाने हुकूमशहा म्हटलेले असल्यामुळे बहुधा त्यांचा लेख सेन्सॉरने प्रकाशित होऊ दिला नाही. अशा विचारसरणीचे लोक आजही असतील. परंतु, त्यांनी हे लक्षात ठेवले पाहिजे की, भाषणस्वातंत्र्याचीही आवश्यकता असंख्य गरिबांनाच नेहमी असते. धनवंतांच्या ठिकाणी कोणत्याही सत्तेशी जुळवून घेण्याचे सामर्थ्य आणि कौशल्य असते. गरिबांनाच आपल्या हक्कासाठी लढा द्यावयाचा असतो. हुकूमशहाचे नाव कोणतेही असले, तरी अशा लढ्याला त्यांची परवानगी नसते. आणिबाणीचा बडगा गरिबांवरही कसा चालला, हे आता नव्याने सांगण्याची गरज नाही. हुकूमशहा निर्भय बनले की, मग त्यांना आपला व परका हाही विवेक राहत नाही. म्हणून विनोबांच्या 'मैत्री'चे अंक जप्त करण्यात आले. आता कितीही क्षमायाचना केली आणि पश्चात्तापाचे कितीही अश्रू ढाळले, तरी आधीच्या अत्याचारातील हिडीसता लपविली जाऊ शकत नाही. म्हणून, पुनश्च नव्या तेजाने झळाळणाऱ्या या स्वातंत्र्यदिनी आपण अशी प्रतिज्ञा करू या की, देशातील सानथोर अशा असंख्य लोकांनी आपल्या त्यागाने व बलिदानाने मिळविलेले स्वातंत्र्य, आम्ही केव्हाही झाकाळू देणार नाही; 'जे जे उत्तम, उदात्त, उन्नत, महन्मधुर, ते ते' सारे त्याचे सहचारी आम्ही बनवू; भाकरीचा

लोभ दाखवून कुणी आमचे स्वातंत्र्य हिरावू पाहील तर ते आम्ही एक क्षणही सहन करणार नाही.

" श्रीस्वतंत्रते,
तुजसाठि मरण ते जनन
तुजवीण जनन ते मरण "

–अशा निर्धाराने आम्ही तुझे जतन करू.

१५–८–७७

## सर्वोदय

सर्वोदयाची चळवळ राजकारणापासून अलिप्त ठेवण्यात आल्यामुळे, ती देशातील मुख्य जीवनप्रवाहापासून अलिप्त राहिली आणि धंदेवाईक राजकारणी लोकांच्या हाती राजकारणाची सूत्रे गेली, अशा प्रकारचे परिस्थितीचे विश्लेषण करून सर्वोदयवाद्यांनी राजकारणात सक्रिय भाग घ्यावा, असे प्रतिपादन सुप्रसिद्ध सर्वोदयी कार्यकर्ते श्री. गोरा यांनी सर्वोदय समाज संमेलनाचे उद्‌घाटन करताना केले. श्री. गोरा यांनी केलेल्या विश्लेषणाचा व सुचविलेल्या उपायाचा सखोल विचार केला पाहिजे. राजकारण हे इतके सर्वंकष, सर्वगामी आणि सर्वव्यापी झाले आहे की, त्यापासून कोणी अलिप्त राहतो म्हटले तरी ते काही त्याला स्पर्श केल्यावाचून राहत नाही. वस्तुतः राजकारण हे मानवी जीवनाच्या अनेक अंगांपैकी एक अंग आहे. ते महत्त्वाचे अंग आहे. याविषयी कोणी वाद घालणार नाही. पण, त्या एका अंगाने बाकीची सारी अंगे झाकाळून टाकली आहेत, ही वस्तुस्थिती आहे. कम्युनिझममध्ये अंतिम अवस्थेत राज्यसंस्था सुकून जाईल, असे कार्ल मार्क्सचे भविष्य आहे; म्हणजे राज्यच राहणार नसल्यामुळे तेथे राजकारणही राहणार नाही. कम्युनिझमची ही स्वप्निल अवस्था जेव्हा यावयाची असेल, तेव्हा येवो; पण सध्या तरी स्वतःला कम्युनिस्ट म्हणविणाऱ्या राष्ट्रांमध्येही राज्यसंस्था ही सर्वव्यापी आणि सर्वशक्तिमान् बनली आहे. इतकी शक्तिमान् की, त्या संस्थेशी जुळवूनच सर्व मानवी क्रियाकलाप चालले पाहिजेत; साहित्य, कला, संगीत इत्यादि मानवी अंतःकरणाच्या प्रवृत्तीला मोकळीक देणाऱ्या क्षेत्रांनीही राज्यसंस्थेचे म्हणजे राजकारणाचे दास बनले पाहिजे, असा आग्रह तेथे धरण्यात येतो. राज्यसंस्था एवढी बलिष्ठ करणाऱ्यांनी, राज्यसंस्थेला सुकविण्याच्या लक्ष्याप्रत आम्ही चाललो आहोत, असे म्हणणे म्हणजे गंगाबाईच्या घाटाच्या दिशेने जात असताना आम्ही अंबाझरीला पोचणार आहोत, असे म्हणण्यासारखेच आहे. परंतु एक वेळ कम्युनिस्ट राजवटी सोडल्या, तरी लोक-

कल्याणकारी राज्याचा आदर्श ज्यांनी आपल्या समोर ठेवला आहे आणि त्या आदर्शाप्रत पोचण्याच्या वाटचालीत अनेक क्षेत्रांमध्ये ज्यांनी प्रवेश केला आहे, त्यांनीही राजकारण असेच बलिष्ठ बनविले आहे. व्यक्तीने काय शिकावे, कोणत्या भाषेतून शिकावे, कोणते आणि किती अन्न खावे, त्याला मुले किती असावीत–हे सगळे राज्याचे म्हणजे राजकारणाचे विषय झाले आहेत. अलीकडे तर कल्याणकारी राज्याच्या जोशात, न्यायालये आणि वृत्तपत्रेही 'बांधील' (Committed) असली पाहिजेत, असा आग्रह धरण्यात येऊ लागला आहे. कम्युनिस्ट राजवटीइतके नसले, तरी लोककल्याणकारी राज्यातही राजकारण हे सर्वातिशायी बनले आहे. ज्याला येथे काही करावयाचे आहे. त्याने त्याच्या सावलीत राहिले पाहिजे, त्याच्याशी जुळवून घेतले पाहिजे, अशी परिस्थिती उत्पन्न झाली आहे. त्यामुळे श्री. गोरा यांच्यासारख्या नेत्यांना, सर्वोदयवाद्यांनी राजकारणापासून अलिप्त राहण्यात चूक केली असे वाटले, तर त्यांत नवल नाही.

परंतु राजकारणाचे असे सर्वव्यापित्व आणि सर्वंकषत्व समाजाने चालू द्यावे काय ? समाजाची सर्व क्षेत्रे अशी राजकारणाकडे तोंड लावून बसलेली आपण बनवावीत काय ? त्यामुळे समाजाच्या अंगोपांगांचा विकास नीट होईल काय?– या प्रश्नांचाही विचार केला पाहिजे. धंदेवाईक राजकारण्यांच्या हाती सत्तेची सूत्रे गेल्याबद्दल श्री. गोरा यांनी दुःख व्यक्त केले आहे, ते योग्यच आहे. परंतु, असे जे घडले आहे, ते सर्वोदयी लोक राजकारणापासून अलिप्त राहिल्यामुळे घडले आहे काय ? सर्वोदयी मंडळी राजकारणात उतरली असती, तर राजकारण शुद्ध बनले असते काय ? या ठिकाणी 'सत्ता भ्रष्ट करते' (Power corrupts) या वचनाची आठवण होते आणि असा संशय येतो की, सत्तेच्या या मेनकेसमोर सर्वोदयी विश्वामित्र स्थिरचित्त राहिले असते काय ? हुकूमशाही व्यवस्थेत हुकूमशहाची पदच्युती किंवा वध हेच त्याच्या समाजविघातक राजकारणापासून मुक्ती मिळविण्याचे उपाय असतात. लोकशाहीत मात्र विरोधी पक्षाचा अंकुश असतो, असे मानले जाते. परंतु विरोधी पक्ष झाला तरी तो सत्ताकांक्षेच्या स्पर्धेतील उमेदवार असतो; त्यामुळे त्याच्या कृती आणि उक्ती या दोन्हीही सत्तालोभाने शबलित झालेल्या असल्यामुळे, त्या अंकुशाचे टोक बरेच बोथट बनते. आणि हे विरोधी लोक, सरकारने काहीही केले आणि ते कसेही वागले तरी विरोध करणारच, अशी सरकार चालविणाऱ्यांची व जनतेचीही भावना बनते. त्याऐवजी, राजकारणापासून म्हणजे सत्तेच्या राजकारणापासून अलिप्त, पण राजकारणाच्या वाटचालीकडे जागरूकपणे लक्ष असलेले, सत्तेचा मोह नसल्याबद्दल जनतेची खात्री कमाविलेले आणि म्हणून तिच्या आदराला पात्र झालेले; लोककल्याणाशिवाय दुसरा कोणताही विचार ज्यांना शिवत नाही, ज्यांचा त्याग आणि निःस्पृहता याविषयी कोणी वाद घालीत नाही, ज्यांचे व्यक्तिगत

आणि सार्वजनिक चारित्र्य निरपवाद आहे; सत्ताधाऱ्यांना, ते चुकले असताना खडसावण्यासाठी ज्यांची जीभ अडखळत नाही आणि जनतेचीही प्रसंगी कान-उघाडणी करताना ज्यांना निवडणुकीतील मतांची काळजी करावी लागत नाही, –अशा लोकांची एखादी संघटना असेल, तर ती राजकारणावर चांगला अंकुश ठेवू शकेल, की सत्तास्पर्धेच्या खेळात स्पर्धक बनून उतरणारे चागला अंकुश ठेवू शकतील, याचा विचार केला पाहिजे.

असे म्हणतात की, प्राचीनकाळी जरी सत्ता राजकेंद्रित असली, तरी ऋषिसंस्थेचा त्या सत्तेवर अंकुश होता. नव्या राजाला अभिषेक झाल्यानंतर तो 'अदण्डचोऽस्मि, अदण्डचोऽस्मि, अदडण्चोऽस्मि' म्हणजे 'मी अदण्डच आहे' असे त्रिवार म्हणावयाचा; तेव्हा, कुलगुरु असलेले ऋषि हातात पळसाचा दांडा घेऊन राजाचे पाठीवर तीन दणके देत त्याला सांगावयाचे की, 'धर्मदण्डचोऽसि, धर्मदण्डचोऽसि, धर्मदडण्चोऽसि' म्हणजे धर्माचे (अर्थात् कर्तव्याचे व नीतीचे) शासन तुला लागू आहे. लोककल्याणाच्या नावावर आपली सर्वंकष सत्ता स्थापन करू पाहणाऱ्या आणि मानवजीवनाच्या सर्व क्षेत्रांवर आक्रमण करणाऱ्या राज्य-यंत्रणेवर असे नियंत्रण तेच लोक ठेवू शकतील की, जे सत्तेच्या खेळापासून दूर राहतील. स्वातंत्र्योत्तर काळात महात्मा गांधींनी, मनात आणले असते, तर त्यांना राजसत्तेतील सर्वोच्च स्थान मिळाले असते. पण ते त्यांनी घेतले नाही. ते सत्तेपासून दूर राहिले. त्यांचे हे सत्तातीतत्व 'धर्मदण्डा'सारखे कार्य करीत होते. तरी महात्माजी केवळ एक व्यक्ती होती. महात्माजीनंतर त्यांचे स्थान सर्वोदयाने घ्यावे अशी अपेक्षा होती. पण सर्वोदयाला तो आदर प्राप्त होऊ शकला नाही. ज्यांना कोणत्या ना कोणत्या कारणाने सत्तास्थान मिळू शकले नाही किंवा जे सत्तेच्या स्पर्धेत हरले, त्यांचा भरणा सर्वोदयात झाल्यामुळे असे घडले की, ते बाह्यतः जरी सत्तास्थानापासून दूर राहिले तरी त्यांच्या अंतःकरणात सत्तेचा लोभच ठाण मांडून बसला असल्यामुळे असे घडले, याचा सर्वोदयी मंडळींनी विचार करावा. खायला मिळाले नाही म्हणून एकादशीचे व्रत करणाऱ्याला त्या व्रताचे पुण्य कसे मिळावे ? परंतु राज्यकारभाराची कोणतीही पद्धती असो, आणि सत्तारूढ झालेले लोक कितीही सत्प्रवृत्त असोत, जनकल्याण करण्याच्या त्यांच्या मर्यादा आणि त्यांच्या व्यवहारात त्यांच्या समोर येणारे भ्रष्टतेचे प्रसंग लक्षात घेतलेच पाहिजेत. ती राज्यपद्धती आणि ते सरकार नीट मार्गावर चालावयाची असतील तर सत्तेपासून अलिप्त असलेल्या पण लोकांच्या आदराला आणि विश्वासाला पात्र झालेल्या निःस्पृह, राष्ट्रभक्त, सच्चरित्र व सेवाभावी लोकांच्या संघटनेची आवश्यकता आहे. अशी संघटना जनतेच्या खऱ्या हिताचा उद्घोष करील व तिच्या पाठिंब्याने सरकारला वठणीवर आणील. असे एखाद्या संघटनेने केले, तर मग राजकारणातीत असूनही राजकारणाविषयी कां बोलता अशी

ओरड मतलबी लोक तिच्या विरुद्ध करतील; पण तिने तिकडे लक्ष देण्याचे कारण नाही. लोकांच्या समस्त कल्याणाची चिंता बाळगणाऱ्यांना राजकारण अकल्याणकारी होऊ देऊन कसे चालेल ? पण श्री. गोरा जेव्हा असे प्रतिपादन करतात की, सर्वोदयवाद्यांनी राजकारणात उतरावे, तेव्हा निवडणुकीच्या आणि सत्ताप्राप्तीच्या राजकारणात त्यांनी उतरावे, असे ते सुचवीत आहेत. याचा अर्थ असा की, राजकारणापासून अलिप्त राहून लोककल्याण करण्याची क्षमता सर्वोदयात आता राहिली नाही. तसे असेल तर, मनाने राजकारणातील लाभांचे आणि लोभांचे चिंतन करीत, पण शरीराने त्यापासून अलिप्त राहण्यापेक्षा, राजकारणात सरळ उडी घेणेच श्रेयस्कर. 'कर्मेन्द्रियाणि संयम्य य आस्ते मनसा स्मरन्। इन्द्रियार्थान् विमूढात्मा मिथ्याचार स उच्यते " हा श्रीमद्भगवद्गीतेचा अभिप्राय सर्वश्रुतच आहे. सर्वोदयवाद्यांनी असे मिथ्याचारी कशाला बनावे ?

११-५-७१

## पुनश्च गांधीवादाकडे–

सेवाग्राम येथे सर्व सेवा संघाने आयोजित केलेल्या राष्ट्रीय परिषदेत उद्घाटनाच्या पहिल्या दिवशी जी भाषणे झाली, त्यांतून पुनश्च गांधीवादाकडे जाण्याची आवश्यकता प्रतिपादन करण्यात आली आहे. गांधीवादाकडे पुनश्च जावयाचे ज्याअर्थी सांगावे लागले आहे, त्याअर्थी त्या मार्गाचा त्याग करण्यात आला आहे, हे उघड आहे. विशेष म्हणजे गांधीजींचा वारसा सांगणाऱ्यांनीच त्या मार्गाचा त्याग केला आहे. म्हणूनच सेवाग्रामला जमलेल्या विचारवंतांना, दारिद्र्य, भ्रष्टाचार, सार्वजनिक नीतिमत्तेची क्षीणता या ज्या आपल्या देशासमोर समस्या आहेत, त्यांच्या निराकरणासाठी गांधीजींची शिकवण मानणे आणि ती आचरणात आणणे, याशिवाय गत्यंतर नाही, असे सांगावे लागले आहे.

सेवाग्रामला आचार्य कृपलानी, एस्. एम्. जोशी, श्रीमन्नारायण अग्रवाल प्रभृति जी मंडळी जमली आहेत, त्यांनी गांधीजींचे जीवन प्रत्यक्ष पाहिलेले आहे. त्यांना दीर्घकाळ गांधीजींचा सहवासही लाभलेला आहे. परंतु आजची जी तरुण पिढी आहे, तिला गांधीजींचे प्रत्यक्ष दर्शन घडले नाही. त्यांचे भाषण आणि विचार ऐकण्याची संधीही मिळाली नाही. २ ऑक्टोबर रोजी गांधीजींची जयंती साजरी केली जाते. त्यावेळी काही कार्यक्रम आणि भाषणे होतात. पण ती ज्यांच्याकडून होतात, त्यांचे चरित्र आणि चारित्र्य नव्या पिढीसमोर असल्यामुळे, त्या कार्यक्रमांचा फारसा परिणाम तर होत नाहीच, पण काही तथाकथित गांधी-

भक्तांचे जीवन पाहून गांधीजीसंबंधीही गैरसमज होतात. नव्या पिढीला गांधीजींचे शब्द तेवढे माहीत आहेत, त्या शब्दाला आचरणाचा जो अर्थ गांधीजीच्या काळी होता, त्याची प्रतीती तिला नाही. अशा परिस्थितींत गांधीजींचे नाव घेऊन किंवा गांधीवादाकडे चला असे सांगून, नवी पिढी उत्साहित करता येईल की काय, याचा सेवाग्रामच्या परिषदेने विचार केला पाहिजे.

उच्च प्रतीची नीतिमत्ता, साधे जीवन, दरिद्रनारायणाची सेवा, स्वदेशीचे व्रत, वर्गकलहाऐवजी वर्गसमन्वयाची श्रेयस्करता, अहिंसा इत्यादि तत्त्वे महात्माजींनी प्रतिपादिली होती. ते केवळ शाब्दिक प्रतिपादन नव्हते, तर ती तत्त्वे ते स्वत: आचरणात आणीत होते. एवढेच नव्हे, तर अनेकांना त्यांनी तसे आचरण करण्याची प्रेरणाही दिली होती. त्यामुळे, आपल्या व्यवसायात महिन्याकाठी हजारो रुपये कमावणारे वकील, डॉक्टर, व्यापारी इत्यादींनी शानशौकीचे जीवन त्याज्य ठरवून, जाडीभरडी खादी अंगावर चढविली होती. त्यांनी चरख्यावर सूत कातावयाला प्रारंभ केला होता. विदेशी कापडाची होळी त्यांनी केली होती. पण आज या अनेक बाबींचा संदर्भ बदलला आहे. गांधीवाद म्हटला की खादी आलीच, असे मानले जाते. आता खरोखरच लोक खादी वापरावयाला लागतील काय ? शिवाय, सर्वांनी खरोखरच खादी वापरावी काय ? की, बदललेल्या संदर्भात, लोकांनी, स्वदेशी कापड वापरावे, असा उपदेश करणे योग्य ठरेल ? आपल्या देशांत शेकडो गिरण्या आहेत, त्यामध्ये लक्षावधी मजूर काम करीत आहेत; हजारो यंत्रमाग आणि हातमाग आहेत, त्यांच्यावर लक्षावधी कुटुंबांची उपजीविका चालू आहे. त्यांनी उत्पादित केलेले कापड वापरणे हे कमी देशभक्तीचे होईल काय ? आपल्या देशांत कापूस उत्पादन वाढत आहे. जादा उत्पादन देणाऱ्या नव्या नव्या जाती संशोधिल्या जाता आहेत. कापसाचे हे उत्पादन, चरखा पूर्णपणे वापरात आणू शकेल काय ? परदेशांतून लांब धाग्याच्या कापसाची आणि सिंथेटिक धाग्याची आयात करू नये, आणि केवळ आपल्या देशांतील कापसाचे ज्या तऱ्हेचे कापड तयार होईल तेच आम्ही वापरू, असा देशभक्तीला आवाहन करणारा प्रचार नव्या पिढीला आकृष्ट करील की, गांधीवादाला अनिवार्यत: अभिप्रेत समजला गेलेला खादीच्या वापराचा आग्रह आकृष्ट करील, याचा विचार केला पाहिजे. चरख्याचा संदर्भ आता बदलला आहे हेही लक्षात घेतले पाहिजे. शिवाय, चरख्यातून अभावितपणे सूचित होणारा यंत्रद्वेष कुणालाही मान्य होणे कठीण आहे. यंत्रे म्हणजे केवळ अवजड यंत्रे, बडे कारखाने, भांडवलाचा संचय आणि तज्जन्य सारे दोष हे समीकरण विजेच्या औद्योगिक वापरामुळे खोटे पडले आहे. आता छोटी यंत्रे असू शकतात व त्यांच्या आधारावर उद्योगांचे विकेंद्रीकरण होऊ शकते, हे लोकांना माहीत झाले आहे.

अहिंसेच्या बाबतीतही बदललेला संदर्भ लक्षात घ्यावयाला हवा. इंग्रज सरकारशी क्रांतिकारक ज्या पद्धतीने लढत, त्या पद्धतीच्या पार्श्वभूमीवर सर्व-सामान्य लोकांनी अहिंसेला मानले असावे, असे समजले पाहिजे. कारण, अहिंसे-सारखे उदात्त तत्त्व, नैतिक दृष्टया त्याची श्रेष्ठता आणि श्रेयस्करता पटल्यामुळे, लोकांच्या अंत:करणात बिंबिले असते, तर इंग्रज गेल्याबरोबर त्याच लोकांच्या सार्वजनिक आचरणांत हिंसेचा एवढा उद्रेक झाला नसता. गांधींच्या काळीहि जे अहिंसेचे निरपवादित्व मानीत नव्हते, ते हिंसेचे पुरस्कर्ते होते, असे नाही. आता इंग्रजांशी लढा देण्याचा संदर्भ पार बदलला आहे. आता देशरक्षणासाठी सैन्य आहे, त्याची शस्त्रे आहेत; त्यासाठी भरपूर खर्च केला जात आहे आणि त्या खर्चाला लोकांची मनापासून मान्यताही आहे. १९७१ साली सैन्याने जो पराक्रम केला, त्याने लोकांची अंत:करणे किती उचंबळून आली होती आणि अभिमानाने त्यांची छाती कशी फुगली होती, हे सर्वांनी अनुभवले आहे. तेव्हा, अहिंसेला आजच्या जगात स्थान आहे कुठे, असा प्रश्न आजच्या तरुणाने विचारणे अगदी स्वाभाविक आहे. त्याचे उत्तर, स्वकीयांच्या संबंधात अहिंसेचेच पालन केले पाहिजे; लोकशाही स्वीकारलेल्या देशाने तरी स्वजन-संबंधात हिंसेला त्याज्य मानले पाहिजे. एवढी त्या उदात्त तत्त्वाला मर्यादा घालून, द्यावी काय याचा विचार गांधीवाद्यांनी केला पाहिजे. स्वजनांच्या संबंधात अहिंसेचे पालन करावयाचे म्हणजे आपोआपच वर्गकलहाच्या सिद्धान्ताला तिलांजली द्यावी लागेल. कलहाऐवजी समन्वय हे जीवनाचे खरे तत्त्व आहे, हे मानावे लागेल. समन्वयातही भेद राहणारच. भेदच नसले, तर समन्वय कशाचा ? पण या भेदांकडे कोणत्या दृष्टीने पहावयाचे ? नष्ट करण्यासाठी कशा रीतीने प्रयत्न करावयाचा ? —या प्रश्नांनी उत्तरे समन्वयवादी वेगळ्या पद्धतीने देईल. कलहवादी वेगळ्या पद्धतीने देईल. कलहवाद्याने हिंसा वर्ज्य मानण्याचे कारण नाही. समन्वय-वाद्याने ती वर्ज्य केल्याशिवाय तो समन्वयवादी ठरूच शकणार नाही.

दरिद्री जनतेविषयी अपार करुणा हा गांधीजींच्या जीवनाचा स्थायीभाव होता. सभोवती दारिद्र्य असताना व्यक्तीने चैन भोगावी किंवा आपल्या श्रीमंतीचे प्रदर्शन करावे हा क्षुद्रपणा होय, असे ते मानीत. आज चढाओढ आपल्या श्रीमंतीच्या प्रदर्शनाची आहे. गरिबांनाही पैशाचा द्वेष नाही. कारण तेही पैशाच्या मागेच लागले आहेत, परंतु प्रश्न पैसेवाल्यांच्या संपत्तीच्या अभद्र प्रदर्शनाचा आहे. आणि मनुष्य ज्याचा द्वेष करतो त्याचे अनुकरण करण्याची सुप्त कामनाही त्याच्या मनात असते. तशी ती गरिबांच्याही मनात आहे. त्यामुळे जुगार, मटका, लॉटरी, लबाडी—जो कोणता मार्ग सापडेल, त्या मार्गाने धन गोळा करावे, त्याचे प्रदर्शन करावे, चैन भोगावी, अशा तऱ्हेचे सामाजिक वातावरण बनले आहे. वर्षातून एकदोन दिवस 'महात्मा गांधी की जय' असा उद्‌घोष केला की,

गांधीपूजन झाले, असे मानून वेडूटपणे वागणारे हे वातावरण पुष्ट करीत आहेत. परिश्रमाने धन पैदा केले पाहिजे, असे धनच राष्ट्राची समृद्धी निर्माण करते, याचा जणू काही आपल्या लोकांना विसर पडला आहे. चलाखीने किंवा जुगाराने एखादी व्यक्ती संपन्न बनू शकते, देश संपन्न बनत नाही, याची जाणीव सुटल्यासारखी झाली आहे. त्यामुळेच नीतिमत्तेतही क्षीणता आली आहे. कशाही रीतीने पैसा गोळा केला तरी तो गोळा करणाऱ्याला ज्या समाजात प्रतिष्ठा मिळते, आणि कशाही रीतीने सत्तेवर आला तरी त्या सत्ताधाऱ्यांची पूजा ज्या समाजात होते, तेथे प्रामाणिकपणे परिश्रम कोण करील ? देशातील हे वातावरण बदलावयाचे आहे. गांधींजींच्या शिकवणुकीच्या आचरणाने हे वातावरण बदलविणे अशक्य नाही. परंतु, त्या शिकवणुकीचा बदललेला संदर्भ लक्षात घेतला पाहिजे, किंवा गांधींजींचे नाव न घेताही, लोकांच्या आणि विशेषत: नव्या पिढीच्या देशभक्तीला आवाहन केले पाहिजे. हा आपला देश आहे, तो समृद्ध आणि संपन्न झाला पाहिजे, अशी तीव्र जाणीव नव्या पिढीत निर्माण होणे आवश्यक आहे. आणि देश म्हणजे केवळ डोंगर, नद्या, शेते नव्हेत, तर या देशातील लोक म्हणजे देश. देश संपन्न आणि सुखी झाला पाहिजे म्हणजे या देशातील लोक सुखी व संपन्न झाले पाहिजेत. आणि त्यासाठी परिश्रम केले पाहिजेत, प्रामाणिकपणा बाळगला पाहिजे, भ्रष्टाचार दूर केला पाहिजे, आपसातील कलह मिटविले पाहिजेत आणि माझे लोक सुखी होत नाहीत, तोपर्यंत मला चैनीचा अधिकार नाही, अशा प्रकारचे वातावरण उत्पन्न केले पाहिजे. "गांधीवादाकडे पुनश्च चला" या आवाहनापेक्षा 'खरे देशभक्त बना' हे आवाहन तरुण पिढीकरता अधिक परिणामकारक ठरेल की, बदललेला संदर्भ ध्यानात न घेता गांधीवादाचे आवाहन त्यांना आकृष्ट करील याचा विचार सेवाग्रामच्या परिषदेने करावा, अशी अपेक्षा आहे.

२०-९-७३

## रशियन राज्यक्रांतीची अर्धशताब्दी

दिनांक ७ नोव्हेंबरला रशियाच्या आक्टोबर क्रांतीला पन्नास वर्षे पूर्ण झाली असल्याने त्या घटनेचा स्मृतिसोहळा रशियाच्या राजधानीत त्या देशाचे आजचे वैभव आणि सामर्थ्य यांच्या भव्य प्रदर्शनासह धूमधडाक्याने सुरू झालेला आहे. रशियन पंचांगाच्या विचित्रपणामुळे ज्या वेळी सर्वत्र नोव्हेंबर महिना होता, त्यावेळी तेथे आक्टोबर महिना सुरू होता. त्यामुळे आक्टोबरची क्रांती

नोव्हेंबरात घडली ! आक्टोबर क्रांतीचा समारंभ नोव्हेंबरात होण्याचे कारण असे आहे.

जगांतील अन्य क्रांत्यांप्रमाणे याही क्रांतीने मानवी रक्त अश्रु आणि घाम यांचा पुरेपूर हविर्भाग घेतला. क्रांतीत हे अभिप्रेतच समजले पाहिजे. स्वातंत्र्य, समता, आणि बंधुता या महान् तत्त्वांच्या प्रतिष्ठापनेसाठी ज्या फ्रेंच क्रांतीचा श्रीगणेशा झाला, तिनेही १४ जुलै १७८९ ला बॅस्टिलचा तुरुंग फोडून क्रांतीचा उद्घोष केल्याच्या दिवसापासून २१ जानेवारी १७९३ ला १६ व्या लुईला, फासावर लटकवीपर्यंत फ्रान्सची भूमी रक्ताने कशी न्हाऊन काढली, हे फ्रेंच राज्यक्रांतीच्या इतिहासज्ञांना विदितच आहे. रशियन राज्यक्रांतीने त्याहूनही भीषण नरसंहार केला, हे खरे. पण रशियाच्या झारशाहीची दुष्टता, त्या देशाचा विस्तार आणि तेथील लोकांची वृत्ती लक्षात घेतली म्हणजे या हिंस्र नरसत्राचे आश्चर्य वाटणार नाही. फ्रेंच राज्यक्रांतीहून रशियन राज्यक्रांतीचे वैशिष्टय आणि श्रेष्ठत्व केवळ तिने केलेल्या मानवसंहारातच आहे असे नाही. तिच्या परिणामांच्या व्यापकतेतही आहे. फ्रेंच राज्यक्रांतीने उद्घोषिलेल्या तत्त्वांचा प्रभाव फक्त युरोपवरच पडला. त्या क्रांतीने केवळ युरोपांतील राजसत्ताच तेवढ्या हादरल्या. पण रशियन राज्यक्रांतीने युरोपखंड तर हादरविलाच; शिवाय साऱ्या जगातील राष्ट्रांतील राजसत्तांना-लोकशाहीनिष्ठ राजसत्तांना-सुद्धा—भयकंपित केले. परतंत्र आणि शोषित राष्ट्रांना आणि त्यांच्या पुढाऱ्यांना तर या क्रांतीने खूपच प्रभावित केले; इतके की, त्या क्रांतीतील अमानुषता आणि अत्याचार यांचा मोठमोठ्या उदारमनस्क शांतिप्रवण नेत्यांनाही विसर पडला व त्या क्रांतीने पुरस्कारिलेल्या सिद्धान्तांपासून स्फूर्ति घेऊन आपली स्वातंत्र्याची चळवळ चालविण्याची प्रेरणा त्यांच्यात उत्पन्न झाली. शांतिदूत म्हणून संपूर्ण जग ज्यांचा गौरव करते असे आपले मृदुप्रकृति ध्येयवादी पहिले पंतप्रधान पं. जवाहरलाल नेहरू यांनी जेव्हा १९२७ साली रशियन राज्यक्रांतीच्या दहाव्या वाढदिवसानिमित्त रशियाला प्रथम भेट दिली, तेव्हा त्या क्रांतीची आणि त्या क्रांतीमुळे रशियात झालेल्या बदलाची विलक्षण मोहनी त्यांच्यावर पडली. रशियातून परत आल्यानंतर त्यांनी लिहिले आहे की, "आम्हा भारतीयांकरिता रशियाचे विलक्षण आकर्षण आहे. ज्या प्रचंड शक्तींनी रशियातील जुनी व्यवस्था उलथून टाकली आणि नवा मनु उदित केला, जुनी मूल्ये फेकून दिली आणि नवे मानदंड प्रस्थापित केले, त्या शक्तींची ओळख आपल्या उद्दिष्टांच्या पूर्तीकरिता आपण करून घेतली पाहिजे. रशियाचे आम्हाला यासाठी आकर्षण वाटते की, आज जगापुढे असलेल्या अनेक समस्यांच्या सोडवणुकीचा मार्ग शोधण्यासाठी त्याची आपल्याला मदत होऊ शकेल. त्याच्याविषयी आम्हाला वाटणाऱ्या विशेष आकर्षणाचे आणखी कारण असे की, त्या देशातील परिस्थिती

आणि आमच्या देशातील परिस्थिती जवळजवळ सारखी आहे. दोन्ही देश कृषि-प्रधान आहेत व दोघांनाही गरिबी आणि निरक्षरता यांचा मुकाबला करावयाचा आहे. या प्रश्नांच्या बाबतीत रशियाला जर यशस्वी उत्तर मिळू शकले तर भारतातील आपले कार्य अधिक सुकर होईल.'' यशाने ते मिळविणाऱ्या साधनांचे अमांगल्य नाहीसे होते, ते असे !

या पन्नास वर्षात रशियाने प्रचंड प्रगती केली, हे निस्संशय. रशियांतील निरक्षरता संपलेली आहे, बेकारांची समस्या विकट राहिलेली नाही, मजुरांची मजुरी वाढलेली आहे, औद्योगिक उत्पादनाने प्रचंड वेग घेतला आहे व शास्त्रीय संशोधनात तो आघाडीवर आहे. अंतराळ–विक्रमात तर त्याचा अग्रक्रम आहे. विशाल सोव्हिएट भूमीचे जे दूरवर पसरलेले विभिन्न घटक आहेत, त्यांचे राजकीय ऐक्य त्याने साधले आहे. त्याचे सैन्यबळ आणि शस्त्रबळ शत्रूंच्या उरात धडकी भरविणारे आहे. प्रत्येक रशियन नागरिकाला अभिमान वाटावा, अशीच ही प्रगती आहे.

ही प्रचंड प्रगती, रशियन क्रांतीचे प्रवर्तक मार्क्सच्या तत्त्वज्ञानाने भारावलेले होते आणि कम्युनिझम्च्या प्रस्थापनेसाठी त्यांनी ही उलथापालथ केली म्हणून होऊ शकली, असे समजले जाणे स्वाभाविक आहे; एवढेच नव्हे, तर तसेच समजले जावे, असा प्रयत्नही आहे. 'त्यानंतर घडले म्हणून त्यामुळे घडले,' असा भोंगळ कार्यकारणभाव मानणाऱ्या भाबडया लोकांचा एक आणि त्यांची तशी समजूत करून देणाऱ्या चतुर लोकांचा दुसरा असे दोन वर्ग नेहमीच असतात. भारतात रेल्वे, सडका, मोटारी, पोस्ट, तारा, टेलिफोन इत्यादि सोयी इंग्रजांचे राज्य स्थापन झाल्यानंतर आल्या, त्यामुळे त्या राज्यामुळेच त्या आल्या असे समजणारा वर्ग भारतात पूर्वी होता आणि आताहि असेल. जणु कांही इंग्रजांचे राज्य इथे नसते तर या गोष्टी आपल्या देशात आपल्या लोकांकडून कधीहि झाल्याच नसत्या ! जणू काही जेथे इंग्रजांचे किंवा पाश्चात्यांचे पांढरे पाय लागले नव्हते अशा जपानसारख्या पौर्वात्य देशात सुधारणा झाल्याच नाहीत ! याच पद्धतीने रशियाच्या प्रचंड प्रगतीचे कौतुक करीत असताना, त्याने स्वीकारलेल्या राज्यपद्धतीमुळेच हे सारे घडून आले असे सांगण्याचा जो अट्टाहास काही शहाण्यासुरत्या लोकांकडूनही होत असतो त्याच्यातील खऱ्याखोटयाचा अंश आपण ध्यानात घेतला पाहिजे. दुसऱ्या महायुद्धानंतर राखरांगोळी झालेल्या पश्चिम जर्मनीने कशी प्रगति केली, अॅटम बॉम्बचे लक्ष्य बनलेल्या पराभूत जपानने त्या राखेतून पुन: आपले वैभव कसे उभे केले, दलदलीच्या आणि वाळवंटी प्रदेशात जिवावर उठलेल्या शत्रूंनी चोहोबाजूंनी घेरलेल्या अवस्थेत

इस्रायल कसे ताठ उभे झाले, ही व्यतिरेकी उदाहरणे ध्यानात न घेता, रशियाच्या प्रगतीचे आणि वैभवाचे, त्याच्या अंतराळविक्रमाचे आणि सामर्थ्याचे—या सगळ्यांचे निर्भेळ श्रेय, त्याने स्वीकारलेल्या राज्यपद्धतीला देणे कितपत योग्य होईल याचा विचार केला पाहिजे. उलट रशियाच्या एवढ्या वैभवशालितेतही जी वैगुण्ये जाणवतात आणि जी अन्यत्र दिसत नाहीत, त्यांची कारणे रशियाने स्वीकारलेल्या या पद्धतीत तर नाहीना असाही विचार होणे आवश्यक आहे. फ्रेंच राज्यक्रांतीतील रक्तपात आणि सहकारी सुहृदांचेच गळे कापण्याची निर्घृणता क्रांतीनंतरच्या चार–पाच वर्षांत विरली. परंतु रशियात मात्र, ज्याच्या अमानुष क्रूरतेबद्दल मेल्यानंतरही त्याच्या प्रेताला शासन करून सूड उगविण्याचा प्रसंग रशियन नेत्यांवर आला, त्या स्टॅलिनच्या काळात घडलेल्या 'शुद्धीकरण मोहिमांपर्यंतच' नव्हे, तर अगदी अलिकडे बेरियाचा काटा काढीपर्यंत चाळीस वर्षे ती चालू राहिली. इव्हान दि टेरिबल् आणि पीटर दि ग्रेट या क्रूर सत्ताधारी झारांच्या वारशाने ही आसुरी मनोवृत्ती लेनिन, स्टॅलिन, मॅलेन्कोव्ह इत्यादी त्या राष्ट्राच्या नेत्यांमध्ये आली असे म्हणावे, तर कम्युनिस्ट राज्यक्रांती घडलेल्या चीनसारख्या देशातही तसेच प्रकार घडताना कां दिसत आहेत ? तेव्हा ही क्रूरता आणि एका काळच्या जीवश्च कंठश्च मित्रांचा काटा काढण्यासाठी वापरण्यात येणारे शुद्धीकरणाच्या बहाण्याचे तंत्र कम्युनिस्ट विचारसरणीचे आणि ज़ीवनपद्धतीचे अविभाज्य अंग कोणी मानले, तर त्यात त्याची चूक होईल काय ?

कम्युनिस्ट प्रणालीत उत्पादन आणि वितरण या बाबींवर समाजाचे नियंत्रण ठेवण्याच्या निश्चयातून सरकारच्या हातात राजकीय व आर्थिक शक्तीचे केंद्रीकरण होणे आणि त्या केंद्रीकरणातून हुकूमशाहीची निर्मिती होणे अपरिहार्य आहे. ही हुकूमशाही मग समाजाला पोषक बनण्याऐवजी समाजाला शोषक ठरते. अशी हुकूमशाही आपली निरंकुश सत्ता निरंतर टिकावी म्हणून नानाप्रकारचे अत्याचार करते. या हुकूमशाहीत मनुष्याच्या विचारस्वातंत्र्याचा तर गळाच घोटला जातो. रशियात स्टॅलिनच्या काळात एकाकाळी अत्युच्च गौरव प्राप्त केलेले मोठमोठे साहित्यिकही नंतर या मुस्कटदाबीचे कसे शिकार बनले आणि ज्यांच्यामध्ये काही हिंमत होती ते त्याविरुद्ध कसे बंड करून उठले, हे लक्षात घेण्यासारखे आहे. आर्थर कोएस्लर, लुई फिशर इत्यादी एकाकाळी कम्युनिस्ट क्रांतीचे पुरस्कर्ते असलेल्यांचा कसा भ्रमनिरास झाला, हे त्यांच्या ग्रंथांतून नंतर प्रकट झाले आहेच. बोरिस पास्टरनॅकची सापेक्षतः नवीन कहाणीही सर्वश्रुतच आहे. मनुष्य जोपर्यंत हलाखीच्या स्थितीत असतो, त्याला खाण्याचीही भ्रांत असते, तो अडाणी असतो तोपर्यंत त्याचे विचारस्वातंत्र्य, आचारस्वातंत्र्य, सहवासस्वातंत्र्य

इत्यादी गोष्टींवर लक्ष जाणार नाही. परंतु एकदा का त्याची पोटाची विवंचना संपली की, त्याच्या अन्य शक्ती आणि कामना उफाळून आल्याशिवाय राहात नाहीत. कम्युनिस्ट प्रणाली माणसाला एक जड वस्तू समजून चालते. त्याच्या मानसिक आणि बौद्धिक आकांक्षांचा आणि सुखाचा, ती म्हणजे शारीरिक सुखाच्या परिपूर्णतेतून उत्पन्न होणारा आभास मात्र, याशिवाय वेगळ्या दृष्टीने विचार करीत नाही. म्हणून ती प्रणाली मानवाच्या सर्वांगीण विकासाला वरदान ठरण्याऐवजी अभिशाप ठरली आहे, असे आपल्या निदर्शनास आले आहे.

पण रशियात आता नव्या दृष्टीने विचार सुरू झाल्याची चिन्हे दिसत आहेत. या विचाराबरोबर आचरणातील ती क्रूरता आणि अमानुषता नाहीशी होत आहे असे भासत आहे. आता एका काळच्या सहकाऱ्यांना—त्यांच्याशी न पटल्याबरोबर—पक्षविरोधी, राज्यविरोधी, मार्क्सविरोधी अशी शेलकी विशेषणे पूर्वीप्रमाणेच लावण्यात येत असली तरी त्याला जगातून नाहीसे केले जात नाही. फार तर, प्रधानमंत्र्याच्या नशिबी विजेच्या कारखान्याचा व्यवस्थापक बनण्याचे किंवा परराष्ट्रमंत्र्याच्या भाग्याला प्राध्यापकाचे काम येते, इतकेच ! सुसंस्कृततेकडे झालेली ही वाटचालही खचितच उपेक्षणीय नाही. माणसाला एक जड वस्तू समजून बळजबरीने त्याच्याकडून काम करवून घेता येते, या समजुतीतही आता थोडा थोडा बदल दृग्गोचर होऊ लागला आहे. भांडवलशाही पद्धतीतील लाभाची प्रेरणा हळूहळू रशियन अर्थव्यवस्थेत शिरू लागली आहे. कारखान्यांवर सरकारचीच मालकी असली तरी त्यांच्या व्यवस्थापकांना अधिक स्वातंत्र्य मिळू लागले आहे. २८ सप्टेंबर १९६५ ला रशियन अर्थव्यवस्थेत सुधारणा करणाऱ्या ज्या नव्या योजना रशियन सरकारने जाहीर केल्या, त्यात या लाभप्रेरणेला स्थान देण्यात आले आहे. रशियन पंतप्रधान श्री. कोसिजिन यांनी रशियन नियोजनातही मूलगामी बदल केले आहेत. उत्पादनाची उद्दिष्टे पूर्ण करण्याऐवजी यापुढे कारखाने नफ्यासाठी काम करणार आहेत. मिळालेल्या नफ्याचा अधिकांश भाग आपल्या सुधारणेसाठी आणि विकासासाठी ठेवण्याची परवानगी त्यांना देण्यात आली आहे. कामगारांना आता बोनसही मिळणार आहे. मनुष्य स्वभावाची दखल घेणाऱ्या नव्या योजनेखाली १९६७ च्या एप्रिलपर्यंत रशियातील २६ टक्के औद्योगिक उत्पादन करणारे ३६०० कारखाने आणण्यात आले आहेत. याचा सुपरिणाम इतका दिसून आला आहे की, १९६८ च्या समाप्तीपर्यंत बाकीचे कारखानेही या योजनेखाली येतील, अशी शक्यता आहे.

हे खरे की, विचारस्वातंत्र्याचा मनु अजून तेथे उदयाला यावयाचा आहे. सरकारवर टीका करणारे वृत्तपत्र तेथे निघावयाचे आहे. तिथल्या तथाकथित

लोकशाहीत विरोधी पक्षाचा जन्म व्हावयाचा आहे. कम्युनिझममधील वैगुण्ये दाखवूनही मानाने जिवंत राहण्याची निश्चिती असलेल्या लेखकांचा प्रसव अजून व्हावयाचा आहे. पण ज्या पद्धतीने रशियन लोकांवर आणि नेत्यांवर जगातील अन्य विचारांचा आणि आचारांचा प्रभाव पडत आहे, ती ध्यानात घेता अशी परिस्थिती तेथे उत्पन्न होणारच नाही, असे म्हणता येणार नाही.

पन्नास वर्षांच्या अनुभवाने सोव्हिएट नेत्यांना हे कळून आले असावे की, राष्ट्राभिमान हा मार्क्सच्या तत्त्वज्ञानापेक्षा अधिक प्रभावी आहे. राष्ट्रवाद ही एक फार मोठी प्रेरणा आहे आणि ती अन्य प्रेरणांवर मातही करू शकते याचा अनुभव रशियन नेत्यांना आला असला पाहिजे. द्वितीय महायुद्धाच्या काळात रशियन जनतेने जे अद्‌भुत धैर्य आणि जो अलौकिक पराक्रम दाखविला तो 'जगांतील (जर्मनीसुद्धा) सर्व मजुरांनो एक व्हा' या घोषणेने, की मातृभूमी आणि पितृभूमीच्या श्रेष्ठतेच्या आवाहनाने, याचे खरे उत्तर ते जाणत असले पाहिजेत. साऱ्या जगाची एकता तर सोडा, पण स्वतःला जी राष्ट्रे मार्क्सवादी म्हणवितात, समाजवादाच्या क्रांतीचे पाईक समजतात ती तरी एका दिशेने तोंड करून चालत आहेत काय ? अल्बानिया, उत्तर कोरिया, रुमानिया आणि युगोस्लाव्हिया ही कम्युनिस्ट राष्ट्रे रशियाशी फटकून वागत आहेत. कम्युनिस्ट चीन तर उघड उघड विरुद्धच गेला आहे. तेव्हा संपूर्ण जगातील कम्युनिस्ट क्रांतीचे अग्रदूत बनण्याची कल्पना रशियाने सोडून देणेच इष्ट नाही काय ? ती कल्पना जर रशियाने सोडून दिली तर रशियाविषयी असलेला अविश्वास किती तरी प्रमाणात कमी होईल. भारत आणि रशिया यांचे गेल्या कित्येक वर्षांत मैत्रीचे संबंध तयार झाले आहेत. भिलाईचा पोलाद प्रकल्प हे रशियाने भारताला दिलेल्या मदतीचे एक उज्ज्वल प्रतीक म्हणून उभे आहे. रशियाकडून भारताला अन्नधान्याची आणि लष्करी साहित्याचीही मदत झाली आहे. परंतु अजूनही बहुसंख्य भारतीय जनता रशियाकडे साशंकतेनेच पाहते. आणि याचे मुख्य कारण या देशातील कम्युनिस्ट पक्ष आहे. भारतीय कम्युनिस्ट पक्ष म्हणजे रशियाचा हस्तक आहे, कम्युनिस्ट साम्राज्यशाहीचे साधन आहे, एक पंचमस्तंभ आहे असा दृढ समज भारतीय जनतेचा झाला आहे. रशियाचे भारताशी संबंध म्हणजे भारतीय कम्युनिस्ट पक्षाची प्रतिष्ठा असे समीकरण आज भारतीय जनतेच्या मनात ठसले आहे. भारत–रशियाच्या स्नेहसंबंधातील ही बाधा दूर करण्याचा रशियाकडून जितका प्रयत्न होईल; तितक्या प्रमाणात भारतीयांच्या मनातील रशियाविषयक अविश्वासाचे भाव कमी होतील. मग, हे दोन देश त्यांच्या राज्यपद्धती आणि समाजव्यवस्था भिन्न असल्या तरी, खऱ्या सौहार्दाने एकत्र येऊ शकतील आणि जगाच्या कल्याणाकरिता हातात हात घालून झटू शकतील. रशियन राज्यक्रांतीच्या पन्नासाव्या वर्षदिनाच्या निमित्ताने गतकाळातील

अनुभवांचे चिंतन होऊन, सगळे जग कम्युनिझमच्या वर्चस्वाखाली आणण्याच्या राक्षसी महत्त्वाकांक्षेचा आणि जे कम्युनिस्ट नाहीत ते आपले दुष्मन अशा नव्या अधार्मिक पाखंडाचा रशियन नेते त्याग करू शकले, तर त्यांच्या या उत्कट आनंदाच्या आणि यथार्थ अभिमानाच्या क्षणी कोटचवधी रशियन जनतेच्या कंठातून प्रस्फुटित होणाऱ्या भावोत्कट जयघोषणात आपल्याला पुढे आपलाही स्वर मिळविणे शक्य होईल. पण रशियन नेत्यांकडून हे होईल काय ?

८–११–६७

## रावण लीला

तामीळनाडूत ठरल्याप्रमाणे 'रावणलीला' साजरी करण्याचा कार्यक्रम साजरा झालेला असणार. तामीळनाडू सरकारने या कार्यक्रमावर बंदी घातली नाही. कायदा आणि सुरक्षा यांची काळजी आपण घेऊ एवढेच त्याने म्हटले. त्याचबरोबर उत्तर भारतात, 'रामलीला' बंद करावी अशी सूचना करण्यास तामीळनाडूचे मुख्यमंत्री विसरले नाहीत. यावरून त्यांची सहानुभूती कोणत्या बाजूला आहे, हे सगळे सांगावयाची गरज नाही. 'रावण लीले'च्या कार्यक्रमात राम व सीता यांच्या प्रतिमांचे दहनही ओघानेच आले. तोही कार्यक्रम यथासांग पार पडला असणार. पूर्वी मूर्ती किंवा प्रतिमा फोडण्याचे वा विटंबिण्याचे प्रकार मुसलमान करीत असत. त्या रोगाची लागण हिंदूंमध्येही होऊ लागली, असे हे प्रकार पाहून वाटते.

रावणाचे प्रेम असे एकाएकी का उचंबळून आले ? असे सांगण्यात येते की, रावण 'द्रविड' होता; व राम–रावण युद्ध हा आर्य–द्रविड संघर्ष होता. या संघर्षातील विजयी आर्य रामाचा उत्सव, त्या आर्यांचे वंशज जर साजरे करतात, तर द्रविडांच्या वंशजांनी रावणाचा उत्सव आणि पराक्रम कां साजरा करू नये– अशी ही विचारसरणी आहे. पण ती भ्रामक व इतिहासविपरीत आहे. आर्य नावाची एक जात, एक वंश होता, हा भ्रम इंग्रजी राज्यकर्त्यांनी प्रथम उत्पन्न केला. आर्य बाहेरून आले, आक्रमक म्हणून आले आणि त्यांनी येथील संस्कृती नष्ट केली, हा त्याचा मग उपसिद्धान्त निघाला. आमच्या विद्वानांनी तो डोळे मिटून मान्य केला. प्रो. मॅक्समुल्लर यांनी 'आर्यन् भाषा' असा शब्दप्रयोग केला होता. पण त्यांनी आवर्जून सांगितले की, 'माझ्या आर्यन्' शब्दाचा वंशाशी संबंध नाही. पण त्यांचा हा नकार आमच्या विद्वानांनी उपेक्षिला. हराप्पा किंवा मोहेंजोदारो येथील उत्खननात संस्कृतीच्या विकासाचे जे संकेत मिळाले, ते भूमिगत झालेले दिसले, तेव्हा ती संस्कृती आक्रमक आर्यांनी जमीनदोस्त केली,

असे ते म्हणू लागले. एकदा ही भूमिका घेतल्यानंतर मग ऋग्वेदातील मंत्रांचे, इंद्र-वृत्र युद्धाचे या भूमिकेला अनुरूप अर्थ लावण्याचे सत्कृत्य त्यांना करणे भागच पडले. या विपरीत ज्ञानांतून आर्य-द्रविड संघर्षाचे भूत उद्‌भवले आहे. असे समजू या की, हजारो, किंबहुना लक्षावधी वर्षांच्या पूर्वीचा हा इतिहास आहे. तेव्हा त्याबद्दल नक्की कसे बोलणार ? तेव्हा तो विचार विद्वान संशोधकांवरच सोडलेला बरा. पण या हजारो वर्षांच्या वाटचालीत जे कोणते विभिन्न समूह या भारतभूमीत राहात आले, त्याचे परिपूर्ण सात्म्य (Assimilation) होऊन गेले. नवे विचार आले त्यांची जुन्याशी सांगड घातली गेली. विध्वंसाऐवजी समन्वय हे धोरण राहिले आणि त्यातून आपला आजचा हिंदू समाज, त्याचे आदर्श, त्याची जीवन-पद्धती, त्याची संस्कृती परिणत झाली. 'जे द्रविड' होते, त्यांनीही यात समाविष्ट होऊन ती स्वीकारली.

ही सांस्कृतिक एकताच परकीय इंग्रज राज्यकर्त्यांना खटकली. ज्यांच्यावर राज्य केले जाते, त्यांच्यात फूट पाडून आपले आसन बळकट करणे हा सामान्यतः सर्वच राज्यकर्त्यांचा स्वभावधर्म बनतो. इंग्रज तसे वागले यात नवल नाही. त्यानुसार फुटीरतेची बीजे त्यांनी सर्वत्रच पेरण्याचा उद्योग केला. पण तामीळ-नाडूत त्यांना चांगले अंकुर आले. भारतापासून वेगळे होण्याची आकांक्षा तेथील पुढाऱ्यांमध्ये निर्माण झाली. भारतात असून, भारतापासून वेगळे होण्याची आकांक्षा निर्माण झालेले सध्या तीन प्रदेश आहेत. एक काश्मीर, दुसरा नागालँड आणि तिसरा तामीळनाडू. पहिल्या दोघांनी वेगळेपणासाठी अनुक्रमे इस्लाम व ख्रिश्चन धर्माचा आधार घेतला. तामीळनाडूने आर्यविरोधाचा आधार घेतला. 'द्रविड' वंशाचे फक्त तामीळ भाषीच लोक आहेत, असे नाही. तेलगू, कानडी, मल्याळी हेही आहेत, निदान तसे समजले जातात. पण त्यांच्या ठिकाणी फुटीरता नाही, म्हणून आर्यविरोध नाही, म्हणून रामविरोध नाही, म्हणून रावणलीला नाही, म्हणून हिंदीविरोधही नाही. तामीळनाडूला वेगळे व्हावयाचे आहे म्हणून हा सर्व विरोध आहे. भारत सरकारने, केंद्रीय संघ राज्यातून अलग होण्यासाठी चळवळ करणे हा गुन्हा ठरविल्यामुळे, तामीळनाडूतील फुटीर शक्तींना उघड उघड फुटून निघण्याचा (Secession) प्रचार करता येत नाही. म्हणून राजकीय क्षेत्रात अधिक स्वायत्ततेची मोघम भाषा त्या बोलतात आणि भारत सरकारला पेचात आणण्यासाठी रामलीलेच्या विरोधाचा व्यवहार करतात. उत्तर भारतात शेकडो वर्षांपासून 'रामलीला' चालू आहे. तामीळनाडूतील लोकांना ती अलिकडे कां खुपू लागावी ? कारण, त्यांना भारताची केंद्रीय सत्ता खुपत आहे. रामलीलेचा विरोध म्हणजे भारताच्या एकतेचा विरोध आहे. रामप्रतिमेचे दहन म्हणजे त्या एकतेचे दहन आहे. रावणाचे प्रेम या विरोधातून उचंबळले आहे. रावणाचे वर्णन असलेला पहिला ग्रंथ म्हणजे वाल्मीकी रामायण. त्यात रावण ब्राह्मण वर्णिलेला

आहे. भगवान शंकराचा भक्त सांगितलेला आहे. संस्कृतचा महापंडित म्हणून कथन केलेला आहे. आजच्या लंकेचा जर तो राजा मानला, तर आजच्या तामीळनाडूत राज्य करणाऱ्या वाली–सुग्रिवांचा शत्रु म्हणून त्याचे वर्णन आहे. पण तामीळ-नाडूतील राजकारण्यांनी हे सर्व लक्षात घेण्याचे कारण नाही. कारण, ते त्यांच्या सोयीचे नाही. उत्तरेतील रामाने आपल्या प्राचीन पूर्वजाला परास्त केल्याची बोंच निर्माण केली नाही, तर आजचे उत्तरेतील दिल्लीचे शासन आजच्या तामीळ लोकांना कसे छळीत आहे, या प्रचाराला धार चढत नाही. आणि अशी धार चढणे, काही तामिळी पुढाऱ्यांच्या राजकारणासाठी आवश्यक आहे. म्हणून रावणाचे सारे रूप विसरून रावणलीलेचा हा उपद्व्याप सुरू झालेला आहे.

आपल्या महाराष्ट्रातही दोन तीन वर्षांपूर्वी असेच रावणप्रेम उचंबळले होते. त्या रावणप्रेमिकांना, तो बुद्ध असल्याचा साक्षात्कार झाला होता. पण त्यांच्या या उचंबळीच्या मुळाशी हिंदूंचा द्वेष होता. हिंदूंचा द्वेष करणे हिंदूंनीच शिकविले असल्यामुळे, इतरांना दोष देण्यात फारसा मतलब नाही. हिंदू म्हणजे जातीय, हिंदू म्हणजे सांप्रदायिक, हिंदू म्हणजे संकुचित असे गेली पन्नास वर्षे हिंदूंचेच नेते सांगत आले आहेत. त्यामुळे हिंदूंचा आणि हिंदूंसाठी काम करणाऱ्यांचा द्वेष करणे कोणालाही परवडते. त्याला एकदम पुरोगामित्वाची किनारही लागून जाते. हेही आपण लक्षात घेत नाही की, हिंदूंच्या अवहेलनेत, आपण आपल्या देशाच्या शक्तीचा कणाच कमजोर करून टाकीत असतो. आपल्या देशाची एकता दुबळी करीत असतो. त्याच्या अस्मितेचा तेजोवध करीत असतो. परंतु तामीळनाडूतील रावणलीलेने तरी आपले डोळे उघडले पाहिजेत. आदर्श पुत्र, आदर्श बंधु, आदर्श राजा असा मर्यादा-पुरुषोत्तम राम हा आमच्याच काही बांधवांना निंदनीय वाटू लागला, त्याची प्रतिमा दहन करण्याच्या लायकीची वाटू लागली, याहून आणखी विपरीतता कोणती असू शकेल ? 'रावण' आदर्श वाटू लागावा याहून दुसरा अध:पात कोणता असू शकेल ? आमचे हितशत्रु हे पाहून गालातल्या गालात कसे हसत असतील ! आणि इंडोनेशियापासून तो मॉरिशसपर्यंतचे बहुतर भारतातील हिंदू व्यथेने आणि लाजेने किती चूर झाले असतील ! 'रावणलीले'वर बंदी घातल्याने ही विपरीतता आणि हा अध:पात थांबेल काय ? तो तात्कालिक उपाय अवश्य आहे. या पागलपणाच्या प्रसाराला त्यामुळे नक्कीच आळा बसेल. परंतु मुळापासून हे पिसे नाहीसे करण्यासाठी आपल्या सांस्कृतिक धारणा पुन: तपासून घेण्याची गरज आहे. मतांचे गणित सोडविण्यात मग्न असलेल्या राजकारण्यांकडून हे मूलभूत कार्य होण्याची आशा नाही. या गणितात गुंतलेल्या राजकारण्यांची कमजोरी ओळखूनच रावणलीलेसारखी वेडे जन्म घेत आहेत. म्हणून, एका बाजूने या वेडाचा खंबीरपणे विरोध करीत असतानाच, दुसऱ्या

बाजूने आपल्या उदात्त सांस्कृतिक मूल्यांची आणि आदर्शांची श्रेष्ठता समाजमनावर बिंबविणाऱ्या सांस्कृतिक उत्थानाच्या कार्याची गरज जननेत्यांनी ओळखली पाहिजे. आपल्या देशातील समस्त विचारवंतांनी या गरजेचा गांभीर्याने विचार केला पाहिजे. आज 'रावणलीला' क्षम्य ठरली, तर उद्या कंसलीला सुरू होईल, परवा औरंगजेबाची जयंती कुठे साजरी होईल, तर कुठे रॉबर्ट क्लाईव्हचे गौरवगान होईल. 'विवेक–भ्रष्टानां भवति विनिपात: शतमुखै:' हे सुभाषित जुने असले, तरी त्यातील सत्य सार्वकालिक आहे.

२६–१२–७४

## सह्याद्री पार ढासळला हो!

१९६२ च्या अखेरीस जेव्हा हिमालयाचे वर्फही पेटले होते, तेव्हा हिमालयाच्या मदतीला सह्याद्री धावून गेला, असे काव्यात्म वर्णन, महाराष्ट्राचे तत्कालीन मुख्य मंत्री श्री. यशवंतराव चव्हाण यांच्या दिल्लीगमनाचे करण्यात आले होते. नेहरूंच्या रूपाने उभा असलेला हिमालय खरोखरीच संकटात आला होता. चीनने, त्या हिमालयाची उंची खुजो ठरविली होती. अभेद्य समजल्या गेलेल्या हिमालयाला खिंडारे पाडण्यात आली होती. त्याला मदतीची गरज होती. संरक्षणाची आवश्यकता होती. महाराष्ट्रातला सह्याद्री, जणू आपली कणखर, टणक तटबंदी घेऊन हिमालयाच्या संरक्षणाला गेला होता. हिमालयाची उंची कोणीच नाकारीत नाही. पण उंच हिमालय ठिसूळ आहे, हे १९६२ मध्ये पहिल्यांदा जाणवले. सह्याद्री ठेंगणा आहे. पण त्याचे कातळ खूप पक्के, तप्त लाव्हारसांनी टणक केलेले आहे. त्याची संरक्षक तटबंदी फोडणे कठिण कर्म आहे. सारा हिंदुस्थान टाचेखाली घालणाऱ्या दिल्लीपतींचा अहंकार सह्याद्रीच्या काळ्या कातळाने उतरविला हा इतिहास आहे.

सह्याद्रीचे हे रूपलेणे घेऊन यशवंतराव चव्हाण दिल्लीला गेले. असे वाटले की, भीमाकाठची तट्टेच भीमपराक्रम दाखवीत पुन: एकदा अटकेला पोचली! यशवंतराव भारताचे संरक्षण मंत्री झाले, तेव्हा त्यांच्या सत्कारार्थ आयोजित करण्यात आलेल्या एका सभेची येथे आठवण होते. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी म्हणाले होते की, नेहरूनंतर कोण, हा आता प्रश्न राहिला नाही. त्याचे उत्तर मिळाले आहे. तर्कतीर्थांना मिळालेले उत्तर यशवंतराव होते. ते आपले यशवंत हे नाव सार्थ करतील, अशा अपेक्षेने महाराष्ट्रातील समस्त जनता त्यांच्याकडे कौतुकाने बघत होती.

पण उण्यापुऱ्या सात वर्षांच्या आत त्या सह्याद्रीचे ढासळणे सुरू झाले.

१९६९ साली लक्षात आले की हा सह्याद्री उंच नसू दे, पण पुरेसा टणकही नाही. याचे बहिरंग जितके कणखर वाटते, तितके अंतरंग कणखर नाही. सत्ता-लोभाचे उंदीर ते कुरतडू शकते, याची जाणीव १९६९ साली झाली. एका तपानंतर आता, त्या उंदरांनी समग्र पहाडच कुरतडून, पोखरून टाकला आणि त्याला जमीनदोस्त करून टाकले, हे लक्षात आले. सह्याद्रीच्या ठिकाणी अशा ठिसूळतेची कोणी कल्पना केली असती ?

१९६९ मध्ये श्री. संजीव रेड्डींच्या बाजूने यशवंतराव उभे राहिले. हा निर्णय चूक की बरोबर या विषयी वाद होऊ शकेल. पण यशवंतरावांना तो निर्णय बरोबर वाटला होता. स्वतःच नाव सुचवून नंतर त्यांनाच पराभूत करणारे कौटिल्य त्यांना पसंत पडले नाही आणि त्या कुटिलतेच्या विरोधात ते उभे ठाकले. आमच्या मते त्यांनी योग्य तेच केले. या निर्णयाचे परिणाम यशवंतरावांनी स्वीकारावयाला हवे होते. मुरारजींनी स्वीकारले. निजलिंगप्पांनी स्वीकारले, रेड्डींनी स्वीकारले. या मंडळीपेक्षा यशवंतरावांची दानत उणी ठरावी, याचे त्यांच्या सह्याद्रित्वाचा अभिमान बाळगणाऱ्यांना फार वाईट वाटले. सह्याद्रीने असे वाकायला नको होते.

पण सह्याद्री वाकला. दिल्लीपतींच्या समोर असे वाकणे यापूर्वीही अनेकदा घडून आले. पण हे सारे योजनाबद्ध होते. तात्पुरते होते. पुढे अधिक ताठ होण्या-साठी होते. लाचारीचे नव्हते. छत्रपती शिवराय, महाराजा जयसिंगाशी तह करून, थोडेसे वाकलेच होते. असे वाकूनच ते दिल्लीला गेले होते. पण लाचारीने दिल्लीपतींची मनसबदारी पत्करण्यासाठी त्यांची दिल्लीवारी नव्हती. तशी मनसबदारी तर पुण्याला राहूनच त्यांना मिळाली असती. त्यासाठी दिल्लीला जाऊन जीव धोक्यात घालण्याचे साहस करण्याचे कारण नव्हते. १७ व्या शतका-तील छत्रपती जीव धोक्यात घालून दिल्लीला गेले, एक मोठे राजकारण सिद्ध करण्यासाठी. ते राजकारण सिद्ध झाले नाही. उलट कैद नशिबाला आली, हा भाग वेगळा. राजकारणामध्ये असे होतच असते. सगळेच सदैवच यशस्वी ठरतात असे नाही. पण छत्रपतींनी ती कैद तोडली. पराक्रमाने पुनः भवानी तळपविली आणि नंतर स्वराज्य–साम्राज्यसंस्थापनेची घोषणा करून, त्यांनी सह्याद्रीची मान पूर्वीपेक्षाही अधिक ताठ केली.

मनस्वी आणि पराक्रमी पुरुषांची ही तऱ्हा असते. श्रीमती इंदिरा गांधी हा असाच एक पराक्रमी 'पुरुष' आहे. १९७७ साली, त्यांना केवढे पददलितत्व आले होते. पण त्या हिंमत हरल्या नाहीत. ज्यांची हिंमत परास्त झाली होती, त्यांच्यापासून त्या अलग झाल्या. त्यांनी अविचार केला असेल, पण त्या लाचार बनल्या नाहीत. आणि शेवटी विजयी झाल्यात. महाराष्ट्राच्या आधुनिक शिवाजीने

अशी काही हिंमत, असे धाडस, असे चातुर्य आणि अशी विजिगीषा केव्हा तरी दाखवायला हवी होती. पण त्यांना ते जमले नाही. त्यांचे ढासळणे सुरू झाले, ते थांबलेच नाही.

त्यांना संधी खूप आल्या. आणीबाणी एक अपरूप संधी होती. मंत्रिमंडळाचा सल्ला न घेता आणीबाणी पुकारता काय ? मला ती मंजूर नाही, असे यशवंतराव इंदिराबाईंना ठणकावून म्हणू शकले असते. ती हिंमत त्यांनी दाखविली असती तर कदाचित् काही महिने त्यांना तुरुंगवास भोगावा लागला असता. पण ठेंगणा सह्याद्री हिमालयाहूनही उंच झाला असता ! आणि त्याच्या कातळाचा टणकपणा कसा मन उत्फुल्ल करून गेला असता ! पण यशवंतरावांना ते जमलेच नाही. इंदिराबाईंच्या विरोधात अलाहाबाद उच्च न्यायालयाचा निर्णय गेला असताना त्यांनी राजीनामा दिला पाहिजे, असेही यशवंतराव म्हणू शकले असते. पण कदाचित् यांनाच पंतप्रधान व्हायचे आहे, असा आरोप त्यांच्यावर झाला असता; पण आणिबाणी पुकारण्याच्या निर्णयास विरोध त्यांनी केला असता, तर कुठल्याही आरोपाचे किटाळ त्यांच्यावर येणे शक्य नव्हते. त्यांचे सोने त्यावेळच्या भट्टीतून चमकून निघाले असते. १९६९ ते १९७५ च्या प्रारंभीचे सारे हीण जळून गेले असते. उरले असते फक्त सुवर्णाचे तेज. पण यशवंतराव आपली घसरण थांबवूच शकले नाहीत.

यशवंतराव म्हणतात, अर्स कॉंग्रेसमध्ये त्यांची मानसिक कोंडी होत होती ! ती त्यांनी का होऊ दिली ? कुठले काढले अर्स ? आणि त्यांच्या नावाने कॉंग्रेस ? यशवंतरावांच्या नावाने कां नाही ? यशवंतरावांनी हे कां सहन केले ? यशवंतराव सौजन्यशील म्हणून त्यांना आपले नाव नको असेल तर अर्स महाशयांचे नाव तरी पक्षाला का ? आणि अर्स यशवंतरावांची कोंडी करतात ? अर्स इंदिरा गांधींबरोबर अखेरअखेरपर्यंत होते. यशवंतरावांना त्यांच्यापूर्वीच शहाणपण सुचले होते. अर्स मागाहून शहाणे झाले. कानामागून येऊन तिखट झालेले अर्स यशवंतरावांना सहनच कसे झाले ? पण हा पराक्रम अर्सचा नाही. सत्तालोभाच्या उंदराचा हा पराक्रम आहे. मनातला सत्तालोभाचा उंदीर यशवंतराव फेकू शकले नाहीत, क्षणभरही दूर करू शकले नाहीत आणि त्याला त्यांनी मनसोक्त आपले सारे जीवन कुरतडू दिले. म्हणून यशवंतराव, ते ज्या कॉंग्रेसमध्ये होते, तिची बांधणी आणि उभारणी करू शकले नाहीत. तिला मजबूती देऊ शकले नाहीत. उधईने खाल्लेल्या तुळयांचे घर मजबूत कसे होणार ?

आता यशवंतराव म्हणतात की, मी स्वगृही जात आहे, मला मोकळे वाटत आहे. हे 'स्वगृह' कशाचे बनले आहे ? कॉंग्रेसचे ? श्रीमती इंदिरा गांधींचे ? नाही. ते स्वगृह आहे 'सत्तेचे'! कॉंग्रेसचे स्वगृह म्हणावे तर यशवंतराव

काँग्रेसमध्येच होते. काँग्रेसमधून अलग इंदिरा गांधी गेल्या होत्या, यशवंतराव नव्हे. ते 'स्वगृह' इंदिरा गांधींचे म्हणावे तर यशवंतरावांनी श्रीमती गांधीं-बरोबर त्यांच्या सर्व सुखदुःखात रहावयाला हवे होते. ते त्यांनी केले नाही. थोडा काळ तर चरणसिंगाच्या घरालाही त्यांनी स्वगृह मानले. कां ? त्या घरात उपपंतप्रधानांचे पद होते म्हणून ? आता यशवंतरावांनी अर्स काँग्रेसच्या प्राथमिक सदस्यत्वाचा, कार्यकारिणीच्या सदस्यत्वाचा आणि सांसदीय पक्षाच्या नेतृत्वाचा राजीनामा दिला आहे. पण लोकसभेच्या सदस्यत्वाचा दिला नाही. त्यांच्या ठिकाणी थोडाही स्वाभिमान उरला असता तर ते सदस्यत्व त्यांनी सोडले असते. पण ते सोडणार नाहीत, कारण एकच की, ते सदस्यत्व सत्तेच्या स्वगृहाच्या नजीक आहे !

यशवंतराव सत्तेच्या स्वगृहात परतत आहेत. ठीक आहे. निर्णय त्यांचा आहे. त्या निर्णयाने ते सुखी होणार असतील तर इतरांनी दुःख मानण्याचे कारण नाही. पण अशा व्यक्तीला आपण छत्रपती म्हणून गौरविले, सह्याद्रीचे रूपलेणे लावून त्याला भूषविले हा आपला केवढा प्रमाद झाला, याची वेदना लोकांना राहील. लाचाराची आणि सत्ताकांक्ष्यांची या देशात कमतरता नाही. पण ज्याला आपण सिद्धान्तनिष्ठ, पराक्रमी आणि विवेकी समजलो, त्याचे अधःपतन वेदनादायक वाटेल. दुःख 'सह्याद्री' पार ढासळला, याचे आहे. शल्य मातीच्या ढेकळाला सह्याद्री समजून पूजिण्यात जी वंचना झाली, त्याचे आहे.

२८-५-८१

## धम्मचक्रप्रवर्तनाच्या रौप्यमहोत्सवाचे स्वागत

आजच्या विजयादशमीच्या पवित्र दिवशी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी बौद्धधर्मदीक्षेचा जो अभूतपूर्व सोहळा या नागपूर शहरात घडवून आणला, आणि महात्मा गौतम बुद्धाने प्रवर्तित केलेले जे धम्मचक्र कित्येक शतके अवरुद्ध झाले होते, ते गतिमान केले, त्याला आज पंचेवीस वर्षे पूर्ण झाली आहेत. त्याचा रौप्य महोत्सव भव्य स्वरूपात साजरा होत आहे. आम्ही या महोत्सवाचे स्वागत करतो, तसेच या महोत्सवाच्या सफलतेसाठी जे लक्षावधी बौद्धबांधव नागपूर शहरात आले आहेत, त्यांचेही स्वागत करतो.

आम्ही हिंदू आहोत. चांगले हिंदू आहोत आणि त्याचा आम्हाला अभिमान आहे. आमच्यातल्या त्रुटींची आणि दोषांची आम्हाला जाणीव आहे. पण कोणत्याही धर्माचा द्वेष करू नये, आणि अंतःकरणपूर्वक कोणीही कोणत्याही प्रकारची उपासना करो, ती अखेरीस परमेश्वरालाच प्राप्त होते, अशी हिंदूंची परंपरागत

धारणा असल्यामुळे, आपल्यातले एवढे लोक बौद्धधर्माचा स्वीकार करते झाले, याचे आम्हाला वैषम्य वाटले नाही. धर्म हा मानवाच्या कल्याणाचे साधन आहे आणि प्रत्येक मानवाने आपला धर्म निवडून त्याप्रमाणे वागावे अशीच हिंदू धर्माची शिकवण आहे. पंचेवीस वर्षांपूर्वी याच शहरात केलेल्या भाषणात डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले होते, "मनुष्यमात्राच्या उत्कर्षाला धर्म ही आवश्यक वस्तू आहे. मला माहीत आहे की, कार्ल मार्क्सच्या वाचनामुळे एक पंथ निघाला आहे. त्याच्या म्हणण्याप्रमाणे धर्म म्हणजे काहीच नाही. त्यांना धर्माचे महत्त्व नाही. त्यांना सकाळी ब्रेकफास्ट मिळाला, त्यात पाव, मलई, लोणी, कोंबडीची टांगवगैरे असली, पोटभर जेवण मिळाले, निवांत झोप मिळाली की संपले. हे त्यांचे तत्त्वज्ञान. मी त्या मताचा नाही." डॉ. आंबेडकरांचे हे विचार लक्षात घेतले तर मानवजीवनात धर्माचे महत्त्व जाणणाऱ्यांनी आपल्या सर्वांगीण उत्कर्षासाठी कोणताही धर्म स्वीकारला, तरी त्याचे दुःख मानण्याचे कारण उरणार नाही.

परंतु इतिहासकाळात जी अनेक धर्मपरिवर्तने झाली, ती सारी आत्मिक उन्नतीसाठी झालेली नाहीत. राजकीय स्वार्थासाठीही झाली आहेत. त्यांची उदाहरणे नजरेसमोर असल्यामुळे धर्मपरिवर्तनाकडे संशयाने पाहिले जाते. कारण अशा प्रकारच्या परिवर्तनाने केवळ उपासनेचे, श्रद्धास्थानाचे अथवा प्रार्थना-मंदिराचे परिवर्तन होत नाही, संपूर्ण समाजाचे परिवर्तन होते. तो आपला समाज राहात नाही. परिवर्तन करणाऱ्यांचेही तेच उद्दिष्ट असते. म्हणून शिवरामनचे धर्मपरिवर्तन झाल्याबरोबर त्याचा शौकतअली केला जातो. बाबासाहेबांनी जे धर्मपरिवर्तन केले, ते या प्रकारचे नाही. परिवर्तनानंतरही 'सदानंद' सदानंदच राहिले. 'वासुदेव' वासुदेव म्हणूनच वावरले. बाबासाहेबांनी समाजपरिवर्तन केले नाही. संस्कृति–परिवर्तन केले नाही आणि म्हणूनच राष्ट्रपरिवर्तनाचा त्यात धोका नाही. १४ ऑक्टोबर १९५६ ला धम्मदीक्षेचा तो ऐतिहासिक सोहळा संपल्यानंतर, बाबासाहेबांना तरुण भारताचे त्या वेळचे संपादक कै. भाऊसाहेब माडखोलकर भेटायला गेले असताना, त्यांच्याशी वार्तालाप करताना बाबासाहेब म्हणाले, "तुम्हा हिंदूंना असे वाटत होते की, धर्मांतराची घोषणा करून मी तुमच्या धर्मावर, संस्कृतीवर आणि देशावर कुऱ्हाड घातली आहे. पण आता तुम्हाला कळून येईल की, माझे धर्मांतर हे शुद्ध भारतीय आहे आणि भारतीय संस्कृतीच्या गौरवाला ते कारण होणार आहे. १९३५ सालच्या ऑक्टोबरमध्ये मी धर्मांतराची घोषणा केली, तेव्हा लोकांनी मला शिव्या घातल्या. पण आता वीस वर्षांनी तुम्हाला कळून आले असेल की, भारतीयत्वावरील निष्ठेच्या बाबतीत मी काही तुम्हा लोकांहून कमी नाही. कदाचित जास्तच ठरेन." बाबासाहेबांच्या निखळ राष्ट्रभक्तीचा आविष्कारच या उद्‌गारातून प्रकट झाला आहे.

धम्मचक्रप्रवर्तनाची आणखी एक विधायक बाजू आहे. ती ही की, त्याने जुन्या अस्पृश्य वर्गातील न्यूनगंड समाप्त केला आहे. न्यूनगंडाने पछाडलेला कोणताही समाज अथवा लोकसमूह आपली उन्नती करू शकत नाही. बौद्धधर्माची दीक्षा घेऊन, परंपरागत समाजचौकटीत ज्यांच्या वाट्याला हीनदीन जिणे आले होते, त्या जिण्यातून त्यांनी त्यांची मुक्तता केली. म्हणून धम्मचक्रप्रवर्तनाचा रौप्यमहोत्सव म्हणजे एका मुक्तिपर्वाचाही रौप्यमहोत्सव आहे, असे आम्हाला वाटते. या मुक्तिपर्वाचे आम्ही अंतःकरणपूर्वक स्वागत करतो. साखळीची शक्ती तिच्या सर्वात कमजोर कडीवरून मापायची असते, अशा आशयाची एक इंग्रजी म्हण आहे (The strength of a chain lies in its weakest link) समाजरूपी साखळीतही कच्चे दुवे असले म्हणजे, समाजाचे शत्रू त्याच कच्च्या कड्यांवर आघात करीत असतात. म्हणून कच्च्या कड्या बलवान झाल्या, तर त्या एकूण समाजाचीच शक्ती वाढवीत असतात. धम्मचक्रप्रवर्तनाने बाबासाहेब आंबेडकरांनी एका दुबळ्या कडीला आत्मगौरवाची आणि अस्मितेची शक्ती देऊन मजबूत केले आहे, याबद्दल, कोण खरा देशभक्त दुःख मानील ?

समाजाच्या जीवनात पंचेवीस वर्षे म्हणजे काही फार मोठा कालखंड नव्हे. तथापि, आपण काय प्राप्त केले आणि आपल्याला काय मिळवायचे आहे, याचे सिंहावलोकन करण्यासाठी, एवढा कालखंड लहानही नव्हे. कै. बाबासाहेबांनी ज्या हेतूनी धम्मदीक्षा घेतली, तो हेतू कितपत साध्य झाला, याचाही या महोत्सवाच्या निमित्ताने विचार केला पाहिजे. हिंदू समाजातील केवळ महार ही एकमेव जात काही अस्पृश्य नव्हती. अन्यही जाती होत्या. बौद्धधर्माचे अंगभूत श्रेष्ठत्व त्यातील करुणा, त्यातील समता यांनी या जातींना आकृष्ट कां केले नाही, त्यांच्यापर्यंत न्यूनगंड नाहीसा करणारा, समतेची दीक्षा देणारा, स्वच्छ व शुद्ध आचरणाची प्रेरणा देणारा हा धर्म कां पोचू शकला नाही, याचा विचार समस्त बुद्धानुयायांनी केला पाहिजे. धर्माचे परिवर्तनीयत्व बाबासाहेबांना मान्य होते. त्यामुळे आपला हा नवा पंथ 'हीनयान' किंवा 'महायान' यापेक्षा वेगळा राहील असे ते म्हणाले. कै. माडखोलकरांशी झालेल्या चर्चेत त्यांनी "वाटल्यास याला 'नवयान' म्हणा" असे सुचविले होते. त्यावर माडखोलकरांनी "याला 'भीमयान' म्हणायला काय हरकत आहे ?" असे विचारले असता, बाबासाहेब म्हणाले, "तुम्हाला वाटल्यास तुम्ही म्हणा. पण मी म्हणणार नाही. मी स्वतःला भगवान बुद्धाइतका मोठा समजत नाही." बाबासाहेबांनी विनयाने हे म्हणणे ठीकच आहे. परंतु नव्या पंथाला नाव कोणतेही द्या, त्याचा कोणता तरी आचारधर्म ठरला पाहिजे. जुन्या काळातील ती सर्व व्रते आणि विधी आजच्या काळाशी सुसंगत आणि व्यवहार्य ठरतीलच असे नाही. पण काही विधी, काही उपचार, काही आचार आवश्यक ठरावेत. पंचेवीस वर्षांमध्ये या बाबतीत पुरेसा विचार

झालेला नाही. त्यामुळे बौद्धांच्या विवाहाच्या संबंधात न्यायालयात कशा भानगडी झाल्या हे सर्व जाणतातच. या रौप्यमहोत्सवाच्या निमित्ताने याचाही विचार झाला, तर ते उचितच ठरेल.

बौद्धधर्माची संचालनसूत्रे राजकीय पुढाऱ्यांच्या हाती असल्यामुळे हे घडले की काय, याचाही विचार बौद्धधर्माच्या स्वास्थ्याची चिंता बाळगणाऱ्यांनी केला पाहिजे. जेव्हा धर्म राजकारणाशी जोडला जातो, तेव्हा राजकारणाचे काय व्हावयाचे असेल ते होवो, धर्माचा मात्र विकास होत नाही. जगाच्या ज्या ज्या भागात धर्म असा राजकारणाशी निगडित आहे, तेथे धर्म परिवर्तनीय राहिला नाही. पोथीनिष्ठा बळावली आहे. रूढिवाद शिरला आहे. राजकीय पाठिंब्याने कदाचित् धर्मावलंबियांची संख्या वाढेल; त्या लोकांजवळ धनही गोळा होईल. पण धर्म विकसित होणार नाही. त्याच्या तत्त्वज्ञानाचा ठसा उमटणार नाही. एका मुलाखतीत बाबासाहेब म्हणाले, "या देशाने बौद्ध धर्माच्या रूपाने जी तत्त्वज्ञानाची अप्रतिम देणगी दिली, ती तुम्ही हिंदूंनी मूर्खपणाने झिडकारली. ती देणगी मी या देशाला पुन: मिळवून दिली याचा मला अभिमान आणि आनंद आहे." त्या अप्रतिम देणगीचे हसे होणार नाही, ती केवळ पुस्तकांमध्ये बंदिस्त राहणार नाही, भाषणांमध्ये करावयाची ती पोपटपंची ठरणार नाही, अशा आचरणाचे आदर्श जागोजागी उभे झाले पाहिजेत. राजकारणी व्यक्तीं-कडून ते होणे हा एक चमत्कारच म्हणावा लागेल.

सर्व लोक रौप्यमहोत्सवाच्या भव्यतेचा आनंद अनुभवीत असताना आणि त्याच्या देदीप्यमान यशाने त्यांची अंत:करणे पुलकित होत असताना, काही विचारवंत याही बाबींचा विचार करतील अशी आशा व्यक्त करून, या रौप्य-महोत्सवाचे आणि तो साजरा करण्याचा औचित्यपूर्ण निर्णय घेऊन तो यशस्वितेने तडीस नेल्याबद्दल श्री. रा. सू. गवई आणि त्यांचे असंख्य सहकारी यांचे आम्ही अभिनंदन करतो.

८-१०-८१

## मराठी भाषा आणि तिचे व्याकरण

भोपाळ येथे नुकत्याच पार पडलेल्या मराठी साहित्य संमेलनाच्या ४७ व्या अधिवेशनाच्या अध्यक्षपदावरून भाषण करताना नागपूर विद्यापीठाचे कुलगुरु आणि मराठीचे प्रकांड पंडित डॉ. विष्णु भिकाजी कोलते यांनी ज्या अनेक विषयांची चर्चा केली, त्यांमध्ये मराठी बोलभाषा आणि मराठीचे व्याकरण यासंबंधीची चर्चा विशेष महत्त्वाची समजली पाहिजे. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर 'एका

विशिष्ट वर्गात घोटाळणारे मराठी साहित्य हळूहळू बहुजनसमाजापर्यंत जायला लागले आहे;" आता "जीवनाची अनेक क्षेत्रे सर्वसामान्यांना उपलब्ध झाली; लोकशाही राज्यपद्धतीचा स्वीकार केल्यामुळे जनतेच्या आशा आकांक्षा उंचावल्या; शिक्षणाची इष्टता व आवश्यकता त्यांना भासू लागली; शिक्षणाची द्वारे त्यांच्यासाठी उघडण्यात आली; ते शिकू लागले, वाचू लागले, लिहू लागले, आपल्या जीवनांतील उत्कट क्षण लेखणीच्या द्वारे व्यक्त करू लागले; आपली सुखदु:खे वाणीच्या आणि लेखणीच्या माध्यमातून जनतेच्या वेशीवर टांगू लागले; त्यातून नवीन भावनांचे, नवीन आशयाचे, नवीन सामर्थ्याचे मराठी साहित्य निर्माण होऊ लागले; प्रथितयश साहित्यिकांनी आणि विचारवंतांनी निर्माण केलेल्या साहित्याप्रमाणेच हेही मौलिक साहित्य होय; किंबहुना खऱ्याखुऱ्या जनमनाचा आविष्कार त्यांतून होत असल्यामुळे हेच खऱ्या अर्थाने मराठी साहित्य होय," अशा रीतीने मराठी साहित्याच्या कक्षा जशा रुंदावत आहेत, तशाच मराठी भाषेच्याही कक्षा रुंदावत जाव्यात, असे डॉ. कोलते यांचे प्रतिपादन आहे. डॉ. कोलते यांच्या प्रतिपादनातील 'च'काराचा आग्रह बाजूला ठेवला, तर त्यांच्या प्रतिपादनाशी, साहित्य आणि समाज यांच्या जिव्हाळ्याच्या संबंधाची जाणीव असणारा कोणीही सहमत झाल्याशिवाय राहणार नाही. साहित्यामध्ये समाजातील सर्व स्तरांच्या जीवनाचे प्रतिबिंब पडले पाहिजे व साहित्यिकांची अनुभूती आणि सहानुभूती अधिक व्यापक बनली पाहिजे, या अपेक्षेला कोण आक्षेप घेणार? समाज केवळ 'तथाकथित' सुशिक्षितांचा थोडाच आहे की, ज्यामुळे सुशिक्षितांच्या विचार–विकारांचे व भाव–भावनांचे प्रतिबिंब पडलेले जे साहित्य, तेच खरे साहित्य मानले जावे आणि बाकीचे साहित्य या पदवीला पात्र ठरू नये?

परंतु साहित्याच्या कक्षा जशा रुंदावत आहेत, तशाच मराठी भाषेच्याही कक्षा रुंदावल्या पाहिजेत, अशी डॉ. कोलते यांची अपेक्षा आहे. ते म्हणतात, "जनसाधारणातून, आपल्या विचारविकारांना अभिव्यक्ती देण्यासाठी वाङ्मय निर्माण व्हायला लागल्यापासून मराठीच्या शब्दभांडारात आणि वाक्संप्रदायात अतिशय झपाट्याने भर पडत चालली आहे. मराठी जनतेच्या तोंडी हे शब्द व हे वाक्संप्रदाय प्रदीर्घ कालापासून आहेत. अजूनही त्यांचा ते उपयोग करीत असतात. प्रादेशिक वाङ्मयात देखील अजून न आलेले शब्द या जनसाधारणांच्या तोंडी रुळलेले आहेत. ते आम्हा सुशिक्षितांच्यापर्यंत पोचलेले नाहीत...ही शब्दसंपत्ती आपण गोळा केली पाहिजे. पण त्याहून महत्त्वाची गोष्ट अशी की, त्या शब्दांचा वापर मराठीत सुरू झाला पाहिजे. त्यासाठी त्यांच्यामागे शिष्टमान्यतेचे बळ उभे राहिले पाहिजे. म्हणूनच शब्दयोजनेच्या बाबतीत आमची दृष्टी बदलली पाहिजे. शुद्धाशुद्धतेच्या कल्पनांचाही विचार झाला पाहिजे...आज मराठी भाषा

एका रूढ बोलीतील व्याकरणाच्या नियमांत अडकून पडली आहे. कारण त्या बोलीच्या लेखकांनी मराठी वाङ्मय प्रथम निर्माण केले. त्या वाङ्मयातील भाषेचे व्याकरण निश्चित केले. याच व्याकरणाने बांधलेल्या भाषेतून ज्यांचे शिक्षण झाले असे शिक्षक महाराष्ट्रभर पसरले आणि त्यांच्या व्याकरणशुद्ध मराठी भाषेच्या आग्रहामुळे त्या त्या प्रदेशातील मराठी बोली बोलणारात न्यूनगंड निर्माण होऊ लागले."

डॉ. कोलते यांच्या वरील विवेचनाचा विचार सर्व मराठी भाषेच्या अभिमान्यांनी नीट केला पाहिजे. आपल्या भाषेतील शब्दसंपत्ती वृद्धिगत व्हावी, अशी कोणाचीही इच्छा असणार. ज्या जिवंत भाषा असतात, त्यांच्यात प्रयत्न न करताही, अनेक कारणास्तव नव्यानव्या शब्दांची भर पडत असते. जनसाधारणांच्या बोलीत, डॉ. कोलते म्हणतात त्याप्रमाणे, असे असंख्य शब्द असतील की, ज्यांना कोशात किंवा वाङ्मयात स्थान मिळालेले नसेल. त्या सर्व शब्दांचा संग्रह अवश्य केला पाहिजे. परंतु शुद्धाशुद्धतेच्या कल्पनांचा पुनर्विचार करावयाचा म्हणजे काय ? आणि मराठीच्या इतर बोलींचा विचार करून मराठीचे व्याकरण तयार झाले पाहिजे, याचा अर्थ काय ? डॉ. कोलते म्हणतात, "लेखन आणि बोलणे यात अधिक महत्त्व बोलण्याला मिळाले पाहिजे. आणि लेखनाने त्याचेच अनुसरण केले पाहिजे." पण उच्चारांच्या अनेक तऱ्हा असल्यामुळे कुणाचे 'बोलणे' ग्राह्य मानले पाहिजे ? कोणतेही एक ग्राह्य मानले की, बाकीच्यावर 'अशुद्धतेची लांछनमुद्रा' लागणारच. आणि सर्वांचेच ग्राह्य मानले, तर भाषेची व्यवस्था किंवा तिचे व्याकरणच संपुष्टात येणार. या शृंगापत्तीतून मार्ग कसा काढावयाचा ?—हाच खरा प्रश्न आहे.

साधा स्टेशन शब्द घ्या. त्याचे 'ठेसन' हे निदान आपल्या वऱ्हाडपुरते सर्वमान्य मराठी रूप आहे. ज्या भोपाळ नगरीत डॉ. कोलते यांनी हा भाषाविषयक प्रबंध प्रपंचिला, तेथले सर्वसामान्य रूप 'इस्टेशन' आहे. भोपाळच्या थोडे अधिक उत्तरेला गेले की, ते 'सटेशन' होते. आता यातले कोणते रूप भाषेने स्वीकारावे ? कोणत्या रूपाच्या मागे शिष्टमान्यतेचे बळ उभे करावे ? सर्वांच्या मागे ते बळ उभे करावे, असे म्हटले तर माणसागणिक नसला तरी दर बारा कोसागणिक उच्चार बदलत असल्याने त्या सर्वांना मान्यता द्यावी लागणार. बरे मूळ इंग्रजी शब्द 'स्टेशन' असल्यामुळे तोच फक्त शुद्ध समजण्यात यावा असे म्हणावे तर मराठीची 'प्रकृती' बिघडणार !

असे प्रकार इंग्रजी किंवा परकीय शब्दांच्या बाबतीतच घडतील, असेही नाही. मराठी शब्दांच्या संबंधातही ते घडू शकतात. उदाहरणार्थ—'सूनबाई, कोपऱ्यातलं सप्ट आण' असे एखाद्या जुन्या सासूबाईने नव्या सुनेला म्हटले,

तर तिला या वाक्याचा अर्थबोध होणार नाही. पण आज्ञाधारकपणे 'सप्ट' नावाच्या पदार्थासाठी ती घराचे सगळे कोपरे धुंडाळील. अशा सुशिक्षित सुनेला 'कोपरा' म्हणजे 'परात' असा अर्थबोध करवून तिची शब्दसंपत्ती वाढवावयाला हरकत नाही. पण 'कोपरा' हा शब्द सासूबाईंनी जसा उच्चारला, तसाच कां लिहावा ? मोलकरीण तर 'कोह्यपऱ्यात सप्ट ठेवल' असे म्हणणार. मग शुद्ध उच्चार कोणता समजावा ? 'कोपरा' की 'कोह्यपरा ?' केवळ संख्येचा विचार केला, तर 'कोह्यपरा' असा उच्चार करणाऱ्यांची संख्या निश्चितच जास्त राहणार ! जी गोष्ट शब्दांची, तीच वाक्यरचनेचीही. आमची आई आपल्या मुलाला म्हणते, "मी बाजारात जातो, तू येते का ?" सुलभतेचाच निकष लावून शुद्धाशुद्धता ठरविली तर स्त्री असो की पुरुष असो सर्वांनाच उपयुक्त ठरणारा 'मी जातो' आणि 'तू जाते' हा प्रयोग सर्वमान्य झाला पाहिजे. तो व्याकरण-शुद्ध समजला पाहिजे. त्यावर व्याकरणशुद्धतेची मुद्रा कां बसू नये ?

वस्तुतः, तसे काहीही नाही. पण आपण बोली (Dialect) आणि भाषा (Language) यांच्यात फरक केलाच पाहिजे. भाषा शब्द 'भाष्' म्हणजे बोलणे या धातूपासून निघाला आहे, हे सांगणे अप्रस्तुत आहे. कारण, अशा यौगिक अर्थाने काही आपण शब्दांचा प्रयोग करीत नसतो. नाहीतर, एखाद्याला 'कुशल' म्हणावयाचे असेल, तर त्याला दर्भ तोडता येतात की नाही, हे पहावे लागेल ! आणि कोणाला प्रवीण म्हणण्याकरिता त्याच्याकडून वीणा वाजवून घ्यावी लागेल ! प्रादेशिक कादंबऱ्यामध्ये किंवा नाटकांमध्ये वास्तवतेचा रंग आणण्यासाठी त्या त्या पात्राला अनुरूप अशा बोलभाषेचा उपयोग आवश्यक आणि समर्थनीय असला, तरी भाषेच्या दृष्टीने हेयाहेय, उपादेयानुपादेय यांचा मापदंड ठरविलाच पाहिजे. पतंजलीने आपल्या महाभाष्यात शब्द एक आणि अपशब्द असंख्य असे सांगितले असून, भाषा शिकविण्याकरिता शब्दांचाच उपदेश करावा, असे म्हटले आहे. सर्व भाषांची व्याकरणशास्त्रे सामान्यतः याच पद्धतीने चालतात.

एखाद्या भाषेचा विकास करावयाचा, किंवा तिच्या कक्षा विस्तारावयाच्या म्हणजे त्या भाषेतील असतील तेवढ्या सर्व बोलींना, वाग्वैचित्र्यांना आणि शब्दोच्चारांना भाषेचा दर्जा दिला पाहिजे. हा युक्तिवादही अत्यंत ठिसूळ आहे. हिंदी भाषेचा जो एवढा विकास आणि विस्तार झाला, त्याचे कारण हिंदीतील व्रज, अवधी, खडी, बुंदेलखंडी, भोजपुरी, मारवाडी इत्यादी समृद्ध आणि स्वतःचे वाङ्मय असणाऱ्या बोलींनी सुद्धा आपले महत्त्व कमी लेखून एका विशिष्ट बोलीला उचलून धरले, हे आहे. आजची ग्रांथिक हिंदी, तसे म्हटले तर कोणाचीच बोल-भाषा नाही. तरी ती भाषा आहे, आणि या विभिन्न बोलींच्या प्रदेशात ती

समजली जाते, एवढेच नव्हे तर सन्मानिलीही जाते. मराठीच्या सर्वदूरच्या विकासासाठी आणि मराठी जनतेच्या भावनात्मक ऐक्यासाठीही, मराठीचे एक समान भाषारूप असलेच पाहिजे. मराठीने एका विशिष्ट बोलीला उचलून धरले, ही गोष्ट खरी आहे. तिची ऐतिहासिक प्रक्रिया डॉ. कोलते यांनी निवेदन केलीच आहे. पण आता त्यासंबंधी असूया बाळगून किंवा कुरकुर करून कसे चालेल ? मराठीचे सध्याचे व्याकरण हे केवळ एका बोलीचे व्याकरण आहे, असा आक्रोश करून तरी काय साधेल ? 'ती बोली बोलणाऱ्या लोकांनी मराठी वाङ्मय विपुल प्रमाणात निर्माण केले आणि म्हणून त्यांच्या बोलीला मराठी वाङ्मयीन भाषेची प्रतिष्ठा प्राप्त झाली '–अशी डॉ. कोलते जी तक्रार करतात, तीत तरी काय तथ्य आहे ? त्या बोलीत त्यांनी वाङ्मय तयार केले हा काय त्यांचा दोष समजावा ? हां, कोणाला कालप्रवाहाची गती उलटीच फिरवावयाची असेल, तर त्याला कोण रोखणार ?

मराठीचे खास असे व्याकरण पाहिजे, हा डॉ. कोलते यांच्या प्रतिपादनातील एक विशेष मुद्दा आहे. सामान्यतः त्यासंबंधी आक्षेप घेण्यासारखेही काही नाही. मराठी वेगळी भाषा आहे, तर तिचे वेगळे व्याकरण असले पाहिजे हे ओघानेच आले. डॉ. कोलते यांच्यापूर्वीही श्री. दादोबा पांडुरंग, श्री. कृष्णशास्त्री चिपळूणकर, श्री. राजारामशास्त्री भागवत, इतिहासाचार्य राजवाडे, प्रा. कृ. पां. कुळकर्णी, डॉ. ना. गो. कालेलकर प्रभृति भाषाविदांनी वेगळ्या व्याकरणाची आवश्यकता आणि अपरिहार्यता प्रतिपादन केली आहे. दुसऱ्या भाषेतून येणाऱ्या शब्दांचे मराठीशी सात्म्य झाले पाहिजे, त्यांनी मराठीची प्रकृती आणि स्वभाव सांभाळून नांदले पाहिजे, याविषयीही कोणाची तक्रार राहणार नाही. मराठीसाठी आजची देवनागरी लिपी अपुरी आहे, ही गोष्टही अनेकांना जाणवते. त्या दृष्टीने लिपीत आवश्यक तो बदल करावयालाही हरकत नाही. 'गनिमी काव्यांतील' नैपुण्य 'नव काव्यातील' नैपुण्यांहून वेगळे जसे आहे, व जसे ते बोलण्यात भासते, तसे लेखनातही दृग्गोचर व्हावे. ज्यांची मराठीला गरज नाही अशा वर्णांचा निरास करावयालाही हरकत नाही. तसा तो होतही आहे. (संस्कृतातही नसलेला दीर्घ ॡकार मराठी अंकलिपीत कसा शिरला, हेही एक आम्हाला कोडेच आहे. कदाचित संस्कृतवर ताण करावयाचा तत्कालीनांचा विचार असेल ! )

परंतु डॉ. कोलते यांच्या प्रतिपादनाचे एवढेच वैशिष्टच नाही; त्यांच्या प्रतिपादनाला संस्कृत भाषेविषयीच्या असूयेची धार लागलेली दिसते. एरवी, राजकीय क्षेत्रातील एखाद्या उलथापालथवाल्याने वापरावी तशी संस्कृतच्या आक्रमणाची आणि दडपणाची व त्यापासूनच्या मुक्तीची भाषा ते बोलले नसते ! या आंधळ्या द्वेषापोटीच बहुधा मराठीचा विकास संस्कृतातून झाला आहे ही गोष्ट ते

विसरतात, आणि संस्कृत–मराठीच्या विरोधाचे काल्पनिक चित्र रेखाटू पाहतात. "ऱ्हस्वदीर्घाची उलटापालट झाल्याने 'अर्थाचा' कोणताही घोटाळा, संस्कृतमध्ये होतो, तसा मराठीत होत नाही," असे एक ढोबळ विधान करून उदाहरण म्हणून त्यांनी, सुत–सूत ही एक ऱ्हस्वदीर्घाची जोडी दिली आहे. या दोन शब्दांचे संस्कृतमध्ये तर भिन्न अर्थ आहेतच; पण मराठीतही आहेत. 'केशवसुत' यांतील 'सुत' आणि त्यांच्या यज्ञोपवीताचे 'सूत' हे एकच समजावे काय ? संस्कृतच्या नियमांनी मर्यादा सोडली, तर आपण कसे पेचात येतो याची जी उदाहरणे डॉ. कोलते यांनी दिली आहेत, तीही एकजात भ्रममूलक आणि म्हणून चूक आहेत. एखाद्या महिलेला विद्वान स्त्री म्हणावयाला कोणाची हरकत आहे ? पण यांत विद्वान हे विशेषण आहे हे ध्यानात घेतले पाहिजे. त्याचा नामासारखा उपयोग कुणाला करावासा वाटला आणि ते नाम स्त्रीवाचक वापरावयाचे असले, तर 'विदुषी' म्हणावयाला काय हरकत असावी ? की ते संस्कृतातले असल्यामुळे वापरावयाचे नाही ? आपल्या पंतप्रधान एक महिला आहेत. अनेक स्त्रिया मंत्री आहेत. संस्कृतच्या दंडुक्याच्या भीतीने पंतप्रधान शब्दाचे किंवा मंत्री शब्दाचे कोणते स्त्रीलिंगी रूप आपण वापरतो ? खरे म्हणजे अगदी मराठी व्याकरणाप्रमाणे मंत्रीण, डॉक्टरीण, हेच शुद्ध शब्द समजले जावेत. कोणत्या भाषेच्या जाचास्तव मराठीने ते शब्द बदलविले ? आचार्याचे स्त्रीलिंगी रूप 'आचार्यानि' (बहुधा हा मुद्रणदोष असावा) मराठीत आणावे, असा कोणत्या संस्कृतनिष्ठाचा अट्टाहास आहे, हे आम्हाला माहीत नाही. पण तो संस्कृतनिष्ठ जर संस्कृतज्ञही असेल, तर स्वयं आचार्य असलेल्या स्त्रीकरिता 'आचार्यानी' शब्दाची शिफारस त्याने केव्हाही केली नसती. फार तर आचार्या म्हणा असे म्हटले असते. संस्कृत नियमांचा काच लागल्यामुळे मराठीचे लेखनस्वातंत्र्य संकोचित झाल्याचा अनुभवही याच विपरीत मनोवृत्तीतून उद्‌भवलेला आहे. 'कीर्ति' हा शब्द, 'किर्ती,' 'कीर्ती' 'किर्ति' असा कसाही लिहिला जाऊ शकतो. पण या सर्वांना शुद्ध समजा, असा डॉ. कोलते यांचा जो आग्रह आहे तो अवास्तव आहे, असे म्हणणे भाग आहे. लेखनासाठी शब्दाचे कोणते तरी एकच रूप आपण स्वीकारले पाहिजे. नाहीतर गोंधळ होईल. तो शब्द जर आपण संस्कृतात आहे तसाच स्वीकारला, तर त्या शब्दाच्या भाषिक इतिहासाचेही ज्ञान आपल्याला होईल, हा जास्तीचा फायदा आहे. शब्दाच्या भाषिक इतिहासाच्या ज्ञानासाठीच इंग्रजीतही know, night अशे उच्चाराशी विसंगत असणारे लेखन चालू आहे. शिवाय, संस्कृतातील शब्द जसेच्या तसे लिहिण्याने आणि जाणण्याने अन्य भारतीय भाषांशी परिचय होण्याला सुकरता येईल, आणि डॉ. कोलते यांना अभिप्रेत असलेल्या 'भारतीय एकात्मतेच्या पोषणासाठी अन्य भारतीय भाषाच्या जाणीवपूर्वक अध्ययनालाही'

मदत होऊ शकेल. डॉ. कोलते यांनी याही दृष्टीने आपल्या आवडत्या सिद्धान्ताचा विचार करावयाला हवा असे आम्हाला वाटते.

१६–५–६७

## दासनवमी : विरक्तांची सामाजिकता सांगणारे पर्व

आज दासनवमी आहे. समर्थ रामदासस्वामींच्या स्मरणाचा आजचा दिवस आहे. गेले वर्षभर समर्थ रामदास त्रिशताब्दी महोत्सवाचे विविध कार्यक्रम महाराष्ट्रात झाले, त्यांच्या समारोपाचा आजचा दिवस आहे. त्रिशताब्दीच्या वर्षात रामदासांचे स्मरण करावे आणि नंतर त्यांना विसरून जावे, विसरून गेले तरी काही बिघड् नये, या प्रकारचे रामदासांचे कर्तृत्व नाही. त्रिशताब्दी महोत्सवाने रामदासांच्या स्मृतीस जो उजाळा दिला, त्यांच्या कार्याचे खरे महत्त्व, खरे रहस्य सर्वांसमोर प्रकट होण्याची जी संधी मिळाली तिचा परिणाम म्हणून ती स्मृती, ते महत्त्व, सदैव लोकस्मरणात राहील, त्याचे विस्मरण होणार नाही, अशी प्रेरणा लोकजीवनात सतत नांदावी अशी कल्पना आहे. रामदासांचे स्मरण सदैव जागृत राहिले तर त्यात या महोत्सवाचे साफल्य आहे.

कारण रामदास आजही संदर्भशून्य झालेले नाहीत. त्यांचा संदर्भ (relevence) कायम आहे. समाजातील बहुसंख्य लोक स्वार्थाने, भीतीने किंवा प्रेमाने स्वतःचाच विचार करीत असतात. आपले चांगले झाले की त्यांचे संपूर्ण समाधान होते. ते आजच्या भाषेत बोलायचे म्हणजे 'करिअरिस्ट' बनतात. आपण बरे, आपले बरे, या विचाराने त्यांची सारी वागणूक असते. दुसरे काही भीतीच्या दडपणाखाली वावरत असतात. तेही स्वार्थीच असतात. संकट येत असलेले दिसत असते, पण आपल्यावर आज संकट आले नाही ना, मग कशाला त्याची फिकीर करा, अशी त्यांची वृत्ती असते. 'मला काय त्याचे' या उपेक्षाबुद्धीने ते वागत असतात. संकटाला सामोरे जाऊन त्यांच्याशी टक्कर घेण्याची त्यांची इच्छा नसते. आपण वाचलो, खूप कमावले– अशी त्यांची भावना असते. तर तिसऱ्या प्रकारचे लोक लोभाने वाटेल ते करावयास प्रवृत्त होत असतात. लोभापायी दुष्मनाशी मैत्री करतात, स्वकीयांवर अत्याचार करतात. तेही स्वार्थीच असतात. पण त्यांच्यात कर्तबगारी असते. मात्र दुर्दैवाने त्यांची कर्तबगारी स्वकीयांच्या विनाशाला कारणीभूत होत असते.

या लोकांसारखेच, समाजात विरक्तही लोक असतात. त्यांना स्वार्थी म्हणता येणार नाही. कारण विरक्तीतून त्यांना स्वार्थ साधावयाचा नसतो. पण या जगाशी, ऐहिकाशी त्यांना संबंधच ठेवावासा वाटत नाही. ते एक तर कुठल्या

तरी पर्वताच्या गुहेच्या एकांतात रममाण होतात किंवा परमेश्वराच्या भक्तीत तरी गुंग होतात त्यांच्याकडे जे जातात, त्यांना ते सदुपदेश देत असतात. ऐहिकाचे भंगुरत्व पटवीत असतात. शाश्वत कल्याणाचा मार्ग सांगत असतात. अनाचार शिकविणारे ते नसतात. पण अखेरीस तेही स्वान्त:सुखातच मग्न असतात. आत्मलीन झालेले असतात सभोवतीच्या जगाचे, एक तर ते भान ठेवीत नाहीत, आणि ते भान असले तरी ते आपले कार्यक्षेत्र नव्हे अशी त्यांची समजूत असते.

रामदासस्वामी या सत्पुरुषांपेक्षा वेगळे होते. ते विरक्त होते, याविषयी तर वादच नाही. विवाहाच्या वेदीवरून पळून गेले होते. कदाचित, आत्मकल्याणासाठी, कुठे तरी दरीकंदरात जाऊन तपश्चर्या करण्याचाच विचार त्यांच्या मनात त्या वेळी आला असेल. तशी तपश्चर्याही त्यांनी केली. तीर्थाटनेही केली. पण हे करीत असताना सभोवतीच्या परिस्थितीचे जे भान त्यांना आले, त्याकडे त्यांनी दुर्लक्ष केले नाही. तीर्थाटनात समाजाच्या अवस्थेची कल्पना त्यांना आली; आणि बोहल्यावरून पळून गेलेला हा स्वामी परत लोकजीवनात आला. ऐहिकाशी आपले काही कर्तव्य आहे, हे त्याने ओळखले. लोकांना वैराग्य शिकविणारे पुष्कळच संतमहंत झाले. पण 'प्रपंच करावा नेटका' असे बजावणारे संत फार थोडे झाले आहेत. रामदास त्यातले एक आहेत. हा 'प्रपंच' स्वार्थी लोकांनी फक्त आपल्यापुरते पहावे, असा नव्हता. त्यासाठी रामदासांची गरज नव्हती. लोक तसा प्रपंच करीतच होते. पण तो रामदासांच्या दृष्टीने 'नेटका' प्रपंच नव्हता. पुरुषार्थी माणसांचा प्रपंच नव्हता. बहुसंख्य लोक संन्यासी बनत नाहीत, विरागी बनत नाहीत, याचे भान रामदासांना होते. पण विरक्तांनी आणि सांसारिकांनी संसारात राहून कसे वागावे हे रामदासांनी सांगितले. जे विरक्त असतात त्यांनाही समाजात कार्य असते हेही स्वत:च्या उदाहरणाने त्यांनी प्रकट केले. विरक्तांची सामाजिकता, हे रामदासांच्या जीवनाचे सार आहे. ते जेवढे त्या काळी महत्त्वाचे होते, तेवढेच आजही आहे. म्हणून रामदास स्वामींच्या जीवनाचा संदर्भ कायम आहे.

भगवान श्रीकृष्णांनी भगवद्गीतेत हेच सांगितले आहे. फक्त 'विरक्त' याऐवजी 'ज्ञानी' शब्द वापरला आहे. भगवद्गीतेचा ज्ञानी विरक्तच आहे. तो केवळ माहितीचे ओझे वागविणारा पंडित नाही. त्या ज्ञान्याने समाजात कसे वागावे? श्रीकृष्ण सांगतात–

सक्ता: कर्मण्यविद्वांसो यथा कुर्वन्ति भारत ।
कुर्याद् विद्वांस्तयासक्तश्चिकीर्षुर्लोकसंग्रहम् ॥

म्हणजे अज्ञजन, कर्माच्या ठिकाणी आसक्त होऊन जसे वागतात, तसेच विद्वान माणसाने आसक्त न होता वागले पाहिजे. कारण त्यांना लोकव्यवहार

नीट चालावेत अशी इच्छा असते. आणि पुढे स्वतःचेच उदाहरण देऊन ते म्हणतात–

> न मे पार्थास्ति कर्तव्यं त्रिषु लोकेषु किंचन
> नानवाप्तमवाप्तव्यं वर्त एव च कर्मणि ।

याचा अर्थ असा की, 'हे अर्जुना या तिन्ही जगात मी काही करावे, असे नाही. मला मिळाले नाही असे काही नाही, किंवा नव्याने काही मिळवावयाचे आहे, असेही नाही आणि तरी मी कार्यरत आहेच.' विरक्त माणसांच्या निष्क्रियतेचा निषेधच भगवान श्रीकृष्णांनी केला आहे. रामदासांचे सारे जीवन भगवान श्रीकृष्णाच्या उपदेशाला धरून घडले आहे.

आजही आपल्या देशात विरक्त कमी नाहीत. पण ते कुठे आश्रमात बंदिस्त आहेत, तर कुठे क्षेत्रसंन्यास घेऊन आत्मलीन होऊ पाहत आहेत. गरज रामदासांप्रमाणे संसारात उडी घेऊन लोकांचे उद्बोधन आणि संघटन करणाऱ्यांची आहे. समाजाच्या सद्यःकालीन स्थितीचे भान ज्यांना झाले असे दीक्षित संन्यासीही पुनः जगाच्या कारभारात सामील झालेले आपल्या देशाने बघितले आहेत. या जगात ते अलिप्तच असतात. 'पद्मपत्रमिवाम्भसा'प्रमाणे. पण तरीही गीतेतला 'लोकसंग्रह'आचरीत असतात. आपल्या समाजाला अशा विरक्तांची आवश्यकता आहे. असे विरक्त समाजाची मने उन्नत करीत असतात. ती उन्नत मने बांधीत असतात आणि मग अशा समाजमानसातून त्याला पुरुषार्थांची प्रेरणा देणारे नेते उत्पन्न होत असतात. छत्रपती शिवाजी समर्थांच्या कल्पनेतील आदर्श राजे होते. त्यांच्यानंतरचे संभाजी राजे वेगळ्या मार्गाने जाऊ लागले तर समर्थांनी, मला काय त्यांचे म्हणून मौन पाळले नाही. संभाजीला उपदेश केला, छत्रपती शिवाजी महाराजांचे अनुकरणीय गुण कोणते होते, ते सांगितले. विरक्ताने राज्यावर बसण्याचे कारण नाही. पण सिंहासनाधिष्ठितांनी कसे वागावयाला हवे, हे निर्भीडपणे आणि निःसंदिग्ध रीत्या सांगायला हवे. किमान तेवढी तरी त्यांच्याकडून अपेक्षा असते.

आज पेजावर मठाच्या स्वामीसारखे विरक्त संन्यासी जनमानस उन्नत करण्यासाठी, आणि ती मने बांधण्यासाठी प्रयत्नशील आहेत. आपल्या मठातून ते बाहेर पडले आहेत. स्वतः संन्यासी आणि विरक्त आहेत तरी लोकजीवनातील दुःखाशी समरस होत आहेत. जगाच्या कल्याणासाठीच धर्माची प्रतिष्ठा असल्यामुळे, ते धर्माचेच कार्य करीत आहेत. अशा समाजमनातून मग समाजाचे चांगले नेतृत्व उत्पन्न होईल. ते नेतृत्व मग रामासारखे राज्य करील. रावणासारखे वागणार नाही. समाजमनाच्या भूमीची अशी मशागत करण्याची, त्या भूमीत सद्विचारांची बीजे पेरण्याची, आणि त्या भूमीतून निष्क्रियतेची नव्हे तर

पुरुषार्थाची फळे निपजविण्याची जोपर्यंत आवश्यकता राहील, तोपर्यंत रामदास स्वामींची आपणास आठवण ठेवावीच लागेल.

१७–२–८२

## श्री. अनंतराव शेवडे यांचा मृत्यू

ज्या वार्तेवर कुणाचाही विश्वास बसू नये, अशी वार्ता परवा रात्री आमच्या कानावर आली आणि आम्ही सुन्न झालो. वार्ता आमचे ज्येष्ठ मित्र श्री. अनंतरावजी शेवडे यांच्या निधनाची होती. तिच्यावर विश्वास बसू नये, अशीच तिची आकस्मिकता होती, अकल्पितता होती. अनंतरावजींचे वय ६७ वर्षांचे होते. पण एवढे वय त्यांनी अशा लीलेने पेलले होते की, शीर्षस्थ शिरोरुहांना त्या वाढत्या वयाने केलेला स्पर्श सोडला, तर त्यांच्या त्या केतकीसमान गोऱ्या शरीरावर किंवा त्यांच्या विविध क्रियाकलापांवर या वाढत्या वयाचा यत्किंचितही परिणाम झाला नाही. नवे उपक्रम हाती घेऊन ते यशस्वी करून दाखविण्याची उमेद आणि भरारी असणे, ही जर तारुण्याची खूण असेल, तर असे तारुण्य अनंतरावजींनी जीवनभर जोपासले होते. अन्यथा वयाच्या ६८ व्या वर्षी नवे दैनिक वर्तमानपत्र काढण्याचा उद्यम कोण करते ?

अनंतरावजींचा संपूर्ण जीवनपट नजरेसमोर आणला, तर एक गोष्ट प्रकर्षाने जाणवते. ती ही की, मनुष्याचे अंतःकरण ध्येयवादाने आणि सिद्धान्तनिष्ठेने भारलेले आणि भरलेले असले की, येणाऱ्या संकटांचे पहाड, असे लीलेने कापले जातात की, जणू सुरीने लोण्याचा गोळा कापावा ! हे पहाड तोडताना शक्ती लागत नाही असे नाही. थकवा येत नसेल, असे कोण म्हणेल ? वेदना होतच नसतील असा दावा कोण करील ? पण हे सारे अशा रीतीने आणि अशा तब्येतीने सहन केले जाते की, आव्हान देणारे हे संकटांचे पहाड होते की सोबतीसाठी आवाहन करणारे गुलाबांचे गालिचे होते असा पाहणाऱ्याला संभ्रम पडावा! कवी भर्तृहरीने "मनस्वी कार्यार्थी न गणयति दुःखं न च सुखम्"–म्हणजे सुदृढ मनाचा ध्येयाकांक्षी मनुष्य दुःखाचीही पर्वा करीत नाही आणि सुखाचीही मोजदाद ठेवीत नाही असे म्हटले आहे. मनाची ही दृढता ध्येयनिष्ठेने येत असते. जीवन कशासाठी जगायचे हे ज्याने मनाशी पक्के ठरविले असते, त्याच्याच ठिकाणी ही दृढता येते. श्री. अनंतरावजींचे जीवन असे निष्ठावंत होते आणि म्हणून आलेल्या संकटांचा सामना ते मनाचा तोल ढळू न देता करू शकले. 'नागपूर टाईम्स' स्थापन झाल्यानंतर त्यांना संघर्ष सत्ताधाऱ्यांशीच घ्यावा लागला–अशा सत्ताधाऱ्यांशी की, जे एकेकाळी, परकीयांशी केलेल्या राजकीय

संघर्षात त्यांचे सहकारी होते. 'डस्क बिफोर डॉन' या त्यांच्या अलीकडील इंग्रजी कादंबरीत हाच संघर्ष त्यांनी चितारलेला आहे. आपत्तींनी न डगमगणारा, मोहाला बळी न पडणारा आणि आपल्या निष्ठांवर अविचल श्रद्धा ठेवणारा त्या कादंबरीचा नायक धनंजय म्हणजे दुसरा तिसरा कुणी नसून स्वत: अनंतराव शेवडेच होत, हे ही कादंबरी वाचताना तिच्या प्रत्येक पानातून जाणवत राहते.

अनंतरावजींचे जीवन एक प्रकारे सफल जीवन आहे. ८ सप्टेंबर १९११ ला सध्या मध्यप्रदेशात असलेल्या छिंदवाडा जिल्ह्यातील सौंसर या गावी त्यांचा जन्म झाला. नागपूर विद्यापीठाची इंग्रजी वाङमयातील एम. ए. ची पदवी, सुवर्णपदकासह त्यांनी मिळविली. अशा बुद्धिमान व्यक्तीला, त्या काळात सुखाची नोकरी दुर्लभ नव्हती. पण अनंतराव जनसेवेच्या आणि जनजागृतीच्या स्वप्नाने भारावलेले होते. १९३५ साली, त्यांनी भारताच्या स्वातंत्र्याचा पुरस्कार करणारे 'इंडिपेंडंट' हे इंग्रजी साप्ताहिक काढले. ते पुढे १९४८ मध्ये 'नागपूर टाईम्स'मध्ये विलीन झाले आणि अनंतरावजी त्या साप्ताहिकातून नव्या दैनिकात आले. महात्मा गांधी आणि गांधीजींचे तत्त्वज्ञान यावर त्यांची नितांत निष्ठा होती. पाश्चात्य जगाला गांधीविचारांची ओळख करून देणारे जे मोजके भाष्यकार झाले, त्यात अनंतरावजींचा मान पहिल्या श्रेणीत आहे. अनंतरावांची मातृभाषा मराठी, ते संपादक इंग्रजी पत्राचे पण त्यांचे, अधिकांश लेखन मात्र हिंदी भाषेतून झाले. अनंत गोपाल शेवडे, हे नाव हिंदी कादंबरीच्या क्षेत्रातील एक वैशिष्टयपूर्ण नाव आहे. त्यांच्या दहा हिंदी कादंबऱ्या आहेत. त्या कादंबऱ्यांचा अनेक भारतीय भाषांमधून अनुवाद झाला आहे. १९४२ च्या क्रांतियुद्धावर आधारलेली 'ज्वालामुखी' ही त्यांची कादंबरी तर जगभर गाजली. तिचे इंग्रजी भाषांतर अमेरिकन प्रकाशकांनी प्रसिद्ध केले. रुमानियन भाषेतही तिचा अनुवाद झाला. त्यांच्या विविध साहित्य-कृतींना सरकारी आणि वाङ्मयपरिषदांची जी पारितोषिके मिळाली, त्यांच्या नावाची लांबी जरी पाहिली, तरी त्यांच्या वाङ्मयीन महत्तेची साक्ष पटते. सफल साहित्यिक जीवन यापरते दुसरे काय असते ?

परंतु, अनंतराव कादंबरीकार असले तरी केवळ कल्पनाविलासात रमणारे नव्हते. लोकसेवा आणि लोकजागृती हे त्यांचे जीवनध्येय होते. त्या ध्येयासाठी आपले पाय वास्तवाच्या भूमीवर पक्के रोवून ते उभे होते. आपल्या ध्येयपूर्ती-साठी पत्रकारितेचे माध्यम स्वीकारून त्यांनी 'नागपूर टाईम्स' चालविला. 'नागपूर टाईम्स' यशस्वी करण्यात त्यांचाच सिंहाचा वाटा आहे. लेखक असलेली व्यक्ती व्यवस्थापनात कच्ची असते, असा समज आहे. कादंबरीकाराला आणि साहित्यिकाला जगव्यवहाराची वक्रता आणि संकुलता कळत नाही, असे लोक

मानतात. हा समज अनुभवसिद्ध असेल, तर अनंतराव त्याला अपवाद होते, असे मानावे लागेल. 'नागपूर टाईम्स 'चे संपादक म्हणून संपादनावर जशी त्यांची नजर व छाप होती, तसेच त्या दैनिकाचे व्यवस्थापन, वितरण, विज्ञापन, इत्यादी प्रशासकीय बाबींवरही त्यांचे नियंत्रण होते. या सर्व गोष्टींचे ते जाणकार होते. काही व्यक्ती संस्थेशी एकरूप होऊन जात असतात. अनंतराव नागपूर टाईम्सशी एकरूप झाले होते. वृत्तपत्र व्यवसायाच्या विविध अंगांच्या अनुभवाने संपन्न झालेली आपली क्रियाशक्ती त्यांनी, 'नागपूर टाईम्स 'चे नवे भावंड जी 'नागपूर पत्रिका' तिच्यासाठी वापरली. म्हणूनच अल्पावधीत पत्रिकेचा बोलबाला झाला. वृत्तपत्र हे लोकजागृतीचे आणि लोकसेवेचे माध्यम आहे, पत्रिकारिता हे समाजसेवेचे व्रत आहे, अशी त्यांची जी मनोधारणा होती, ती त्यांच्या वृत्तपत्रांत प्रतिबिंबित झाली. आकस, हिरीर, द्वेष, सनसनाटीपणा, अभद्रता, अतिरंजितता ही जी, काही वृत्तपत्रांची स्वतःला लोकप्रिय करण्याची शैली आहे, त्यापासून 'नागपूर टाईम्स ' व 'नागपूर पत्रिका ' ही दोन्ही वृत्तपत्रे सदैव दूर राहिली, याचे श्री. अनंतराव शेवडे यांची वैचारिक प्रगल्भता जसे एक कारण आहे, तसेच त्यांनी स्वीकारलेले वृत्तपत्र चालविण्यासंबंधीचे उच्च मानदंड हेही महत्त्वाचे कारण आहे. या मानदंडांनीच त्या वृत्तपत्रांना प्रतिष्ठा मिळवून दिली आणि त्या पत्रांनी पर्यायाने अनंतरावजींनाही प्रतिष्ठा मिळवून दिली. अखिल भारतीय संपादक परिषदेचे (ए. आय. ए. ई. सी.) ते अनेक वर्षे सक्रिय सभासद आणि स्थायी समितीचेही सभासद होते. भारतीय आणि पौरस्त्य वृत्तपत्र समिती (आय. ई. एन. एस.) ही जी वृत्तपत्रांच्या संचालकांची संस्था आहे, तिचे ते अध्यक्षही होते. याच समितीच्या सभेसाठी ते कलकत्त्याला गेले असताना, काळाने त्यांच्यावर घाला घातला. प्रेस ट्रस्टचे संचालक, महाराष्ट्र सरकारने नेमलेल्या वृत्तपत्र सल्लागार समितीचे अध्यक्ष, पहिल्या प्रेस कौन्सिलचे सदस्य इत्यादि अनेक नात्यांनी ते वृत्तपत्रविषयक वरिष्ठ समित्यांमध्ये वावरले आणि आपल्या प्रगल्भ बुद्धीचा त्यांनी त्या संस्थांना लाभ करून दिला.

१९७५ च्या जानेवारी महिन्यामध्ये नागपुरात झालेल्या पहिल्या विश्व हिंदी संमेलनाने त्यांच्या संघटनकौशल्याचीही प्रचीती आणून दिली. हिंदी भाषेवर त्यांचे कमालीचे प्रेम होते. ते त्यांच्या हिंदी साहित्यसेवेने दाखवून दिले आहेच. पण हिंदीला आपल्या राष्ट्रात आणि आपल्या देशाबाहेरही गौरवाचे स्थान प्राप्त करून देण्यासाठी त्यांनी जे प्रयत्न केले, ते अतुलनीय आहेत. एका अहिंदी भाषिकाने हिंदीच्या सेवेसाठी आणि गौरवासाठी जे परिश्रम केले, त्याबद्दल सर्व हिंदी भाषिकांनी त्यांचे सदैव ऋणी असले पाहिजे.

असे हे अनेक गुणांनी मंडित असलेले व्यक्तिमत्त्व आता काळाच्या पडद्याआड गेले आहे. वृत्तपत्रसृष्टीतील आमच्यासारख्या नवागतांचा एक विश्वस्त

आधार नाहीसा झाला आहे. त्यांच्या आकस्मिक मृत्यूने त्यांच्या पत्नी यमूताई आणि त्यांच्या दोन कन्या यांच्यावर तर दु:खशोकाचा डोंगरच कोसळला आहे. हा आघात सहन करण्याचे बळ परमेश्वराने त्यांना द्यावे, एवढीच प्रार्थना आपण करू शकतो. कारण अन्य कोणतेही मानवी सांत्वन त्यांचा शोकभार कमी करण्यास थिटेच ठरणार आहे. श्री. अनंतराव शेवडे यांच्या स्मृतीला आम्ही वंदन करून त्यांना श्रद्धांजली अर्पण करतो.

१२-१-७९

## वेदमहर्षींचा मृत्यु

वेदमहर्षी पंडित श्रीपाद दामोदर सातवळेकर यांना बुधवार दिनांक ३१ जुलैला मृत्यू आला, हे लिहिताना आम्हाला अत्यंत दु:ख होत आहे. मृत्युसमयी त्यांच्या वयाला शंभर वर्षे पूर्ण झाली होती आणि 'शतायुर्वै पुरुष:' हा आयुर्मर्यादेचा वेदोक्त आदर्श त्यांनी चरितार्थ केलेला होता. तरी पण केवळ शंभर वर्षांचे आयुष्य म्हणजे आयुष्याची परिसीमा, अशी पं. सातवळेकरांची कल्पना नव्हती. पुणे येथे दिनांक २९ एप्रिल १९६७ ला त्यांच्या शतसांवत्सरीय महोत्सवाचे जे अनेक कार्यक्रम झाले, त्यांपैकी एका कार्यक्रमात त्यांनी असे उद्‌गार काढले होते की, "केवळ जगणे हे वेदाला मान्य नाही. पुरुषार्थाने जगणे हे वेदाला अभिप्रेत आहे. आपण एकशेवीस वर्षे जगले पाहिजे. यात बाळपणीची पहिली वीस वर्षे पुरुषार्थाची तयारी करण्याची वर्षे आहेत. त्यानंतर शंभर वर्षे पुरुषार्थयुक्त कर्तृत्व गाजविणे यात जीवनाचे साफल्य आहे." 'अदीना: स्याम शरद: शतं भूयश्च शरद: शतात्' म्हणजे पराक्रमाने शंभर वर्षे किंवा त्याहूनही अधिक वर्षे आम्ही जीवन जगू, किंवा 'कुर्वन्नेवेह कर्माणि जिजीविषेत् शतं समा:' म्हणजे–या जगात कर्मे करीत शंभर वर्षे जगण्याची इच्छा करावी–हे जे वैदिक ऋषींचे जीवनविषयक आदर्श आहेत, त्यानुसार जीवन घालविण्याची आकांक्षा बाळगणाऱ्या या वेदव्रती पंडिताला एकशेवीस वर्षांची मर्यादा गाठण्यापूर्वीच मृत्यू यावा, याबद्दल कोणाला वाईट वाटणार नाही ?

परतंत्र आणि पराभूत भारतराष्ट्रात पराक्रम आणि विजिगीषा उत्पन्न करावयाची असेल, तर वेदांची कास धरल्याशिवाय गत्यंतर नाही, अशी पंडितजींची धारणा होती. अखिल हिंदूंचे आद्य धर्मग्रंथ असलेल्या वेदांसंबंधी त्या ग्रंथांना मानणाऱ्या हिंदूंमध्ये अज्ञान किंवा विपरीत ज्ञान असल्याचे त्यांना दिसून आले. हिंदु समाजाच्या वृत्ती आणि प्रवृत्ती यांचे निरीक्षण केल्यानंतर त्यांच्या हेही ध्यानात आले की, या समाजाचे मनोजीवन अनासक्ती आणि

अहिंसा यांच्या आवरणाखाली दडलेल्या नैराश्याने आणि अकर्मण्यतेने बरबटलेले आहे. हे मनोमालिन्य दूर करण्याचे सामर्थ्य वेदगंगेच्या पावन प्रवाहात आहे. तिचे स्नान समस्त भारतीयांना घडविले पाहिजे, असा निश्चय त्यांनी केला; आणि केवळ मूठभर वैदिक पुरोहितांच्या जिव्हाग्री असणाऱ्या वेदसंहिता शुद्ध स्वरूपात सामान्य जनतेपर्यंत पोचविण्याचे बिकट कार्य त्यांनी अंगीकारले. ज्या काळात त्यांनी हे कार्य स्वीकारले, त्या काळाचा विचार करता, हे फार मोठे साहस होते. परंतु पुरुषार्थाची प्रेरणा लाभलेल्या सातवळेकरांनी ते साहस करण्याचे ठरविले. हे ग्रंथ शुद्ध स्वरूपातच लोकांजवळ गेले पाहिजेत, अशी त्यांची इच्छा होती. त्यासाठी त्यांनी किती कष्ट भोगले, किती काटेकोर काळजी घेतली, हे पाहणे मोठे उद्‌बोधक ठरेल. वेदसंहितांचे शुद्ध पाठ देण्याकरिता सबंध भारतातील वेदपाठशाळा, वेदसंहिता कंठगत असलेले वेदपाठी ब्राह्मण आणि वेदार्थज्ञानाविषयी प्रसिद्ध असलेले सगळे पंडित या सगळ्यांचा त्यांनी शोध घेतला. नंतर चारही वेदांच्या संहितांची मुद्रिते काढून ती त्यांनी सर्वांकडे पाठविली. त्यासोबत पत्रे जोडली. आणि त्यांना विनंती केली की, या मुद्रितांत काही चुका असतील, तर आपण कृपा करून त्या दाखवाव्यात; आपण दाखविलेल्या प्रत्येक चुकीबद्दल आपणाला एक रुपया दक्षिणा दिली जाईल. अशा रीतीने सर्व पंडितांच्या व घनपाठी आणि जटापाठी ब्राह्मणांच्या मताने शुद्ध ठरलेल्या वेदसंहितांची छपाई करण्याचे त्यांनी निश्चित केले. पण ही छपाई सुद्धा काही सोपे कर्म नव्हे. संहिता या उदात्त, अनुदात्त, स्वरित या स्वरचिन्हांसहित छापाव्या लागतात. त्या स्वरचिन्हांकडे डोळ्यात तेल घालून लक्ष द्यावे लागते. शब्दांचे स्वर बदलले, तर अर्थाचा अनर्थ होऊ शकतो. वेदग्रंथांचे मुद्रण हे असे अत्यंत जिकीरीचे आणि कष्टाचे काम असते. पंडित सातवळेकरांनी हे सर्व कष्ट सोसून वेद संहितांची छपाई केली. पण शुद्ध स्वरूपात आपण हे ग्रंथ छापावे, आणि त्यांनी केवळ सार्वजनिक ग्रंथालयांची किंवा राजेरजवाड्यांच्या ग्रंथालयांची शोभा वाढवावी, हे सातवळेकरांना अभिप्रेत नव्हते. ते विद्वान् संशोधक तर होतेच; त्याबरोबरच ते लोकशिक्षकही होते. किंबहुना लोकशिक्षणासाठीच त्यांना वेदग्रंथ हवे होते. त्यामुळे हे ग्रंथ लोकांच्या हाती पडले पाहिजेत, ही त्यांची अभिलाषा होती. त्यासाठी स्वत:ला झीज सोसावी लागली, तरी ते अत्यंत स्वस्त किंमतीत लोकांना द्यावयाचे त्यांनी ठरविले. १० जानेवारी १९१९ रोजी, म्हणजे टिळक पंचांगाप्रमाणे मकरसंक्रमणाच्या मुहूर्तावर, त्यांनी यजुर्वेदाचा ३६ वा अध्याय अर्थासहित प्रसिद्ध केला. त्याची किंमत अवघी आठ आणे होती. पण यावरही ताण म्हणजे स्वाध्याय मंडळाकडून ज्या वेदसंहिता त्यांनी अपरिमित कष्ट सोसून शुद्ध स्वरूपात छापून प्रसिद्ध केल्या, त्या चारही वेदांच्या संहिता अवघ्या पाच रुपयात सर्वांना विकल्या. स्वस्ताईची ही परिसीमाच म्हटली पाहिजे.

पंडित सातवळेकर यांचे संपूर्ण जीवन म्हणजे पुरुषार्थसंपन्न जिजीविषेचे आदर्श उदाहरण आहे. उपजीविकेचा व्यवसाय म्हणून त्यांनी चित्रकाराचा पेशा पत्करला होता तरी, आणि त्या व्यवसायात त्यांचा जम नीट बसू लागला होता आणि लौकिक वाढू लागला होता तरी, तेवढ्याने त्यांचे समाधान होणारे नव्हते. आपल्या भाग्योदयासाठी ते भाग्यनगरात (हैद्राबादला) आले. परंतु नंतर देशाच्या भाग्योदयाच्या खटपटीत त्यांना भाग्यनगराचा त्याग करावा लागला. वयाला चाळीस वर्षे पूर्ण झाल्यानंतर ते हैद्राबादवरून गुरुकुल कांगडी येथे आले. पंडितजींच्या क्रांतिकारी कार्याला येथे स्फुरणच मिळाले. त्यामुळे पंडितजींवर सरकारी गुप्तचरखात्याची निगराणी सुरू झाली. मध्यंतरीच्या काळात 'वैदिक प्रार्थनांची तेजविस्ता' हा त्यांचा लेख छापल्याबद्दल कोल्हापूरच्या 'विश्ववृत्त' मासिकाचे संपादक प्रा. विजापूरकर, मुद्रक श्री. विनायक नारायण जोशीराव, प्रकाशक श्री. वामन मल्हार जोशी आणि लेखक पं. श्री. दा. सातवळेकर या चौघांवर सरकारने खटला भरला. परंतु लेखकाचा ठावठिकाणा माहीत नसल्यामुळे पहिल्या तिघांवरच खटला चालू झाला. आपल्या लेखामुळे आपल्या मित्रांवर आपत्ती आली, याबद्दल सातवळेकरांना अत्यंत दुःख झाले आणि आपल्या कृत्याची जबाबदारी स्वतःवर घेण्याकरिता ते कोल्हापूरला जाण्याकरिता निघाले. परंतु वाटेत अनेक मित्रांनी त्यांना सल्ला दिला की, बाहेर राहूनही आपणास फार मोठे कार्य करता येईल. त्यांचा आग्रहपूर्ण सल्ला मानून पंडितजी परत गुरुकुलात आले. परंतु नंतर पोलिसांना जेव्हा त्यांचा पत्ता लागला, तेव्हा त्यांना पकडून कोल्हापूरला पाठविण्यात आले.

कोल्हापूरच्या या खटल्यात, सेशन्सजज्जांनी खालच्या इंग्रज न्यायाधीशाने दिलेली शिक्षा रद्द करून या चौघांनाही दोषमुक्त केले. तेव्हा पंडितजींसमोर पुन्हा प्रश्न उपस्थित झाला की, आता कुठे जावे. गुरुकुलात आपण जाऊन त्या संस्थेवर संकट ओढवून घेऊ नये, असा त्यांचा विचार होता. तेव्हा स्वामी श्रद्धानंदांच्या सूचनेवरून त्यांनी लाहोर गाठले आणि तेथे 'सातवळेकर आर्ट स्टुडिओ' ची स्थापना केली. लाहोर त्यावेळी आर्यसमाजाचे शक्तिकेंद्र होते. पंडितजी आपला व्यवसाय करीत असतानाच आर्यसमाजाच्या कार्याचाही प्रचार व प्रसार करू लागले. स्वाभाविकच इंग्रज राज्यकर्त्यांच्या डोळ्यात सातवळेकरांचे हे सार्वजनिक जीवन खुपू लागले आणि त्यांच्या स्टूडिओवर गुप्त हेरांचा पहारा बसला. त्या वेळी क. ओडवायर हे पंजाबचे गव्हर्नर होते. सरकारी दमनचक्र सुरू होण्याची कुचिन्हे दिसू लागली होती. परंतु, दैववशात् पं. सातवळेकर या दमनचक्रातून वाचले. कारण, त्याच सुमारास औंध संस्थानाच्या नरेशांच्या आग्रहावरून त्यांनी औंधला आपला मुक्काम हलविला. औंध–नरेशांची त्यांच्यावर कृपा होतीच. तथापि त्यामुळे जनतेच्या हितासाठी झटण्याचे त्यांचे कार्य बंद पडले नाही. औंध

संस्थानाचा कारभार लोकाभिमुख करण्यात त्यांचा फार मोठा वाटा आहे. त्याचप्रमाणे सातारा जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष म्हणून, म. गांधी यांच्या तत्त्वानुसार, त्यांनी लोकजागृतीचेही कार्य केले. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे औंध शाखेचे संघचालक म्हणूनही त्यांनी त्या भागात संघकार्याच्या विस्तारासाठी खूपच परिश्रम घेतले. 'नृपतिजनपदानां दुर्लभः कार्यकर्ता' म्हणजे राजा व प्रजा या दोघांचे हित साधणारा कार्यकर्ता दुर्मिळ असतो, असे म्हणतात. पण पंडितजींनी आपल्या कर्तृत्वाने ते दुर्मिळ पदही प्राप्त करून घेतले. औंध येथे असतानाच त्यांच्या वेदवाङ्मयप्रचाराने खरे रूप घेतले. त्याचबरोबर संस्कृत विद्येच्या प्रसारासाठीही त्यांनी, अनेक उपक्रम सुरू केले. त्यासाठी स्वाध्याय मंडळाची स्थापनाही येथेच त्यांनी केली. परंतु महात्मा गांधी यांच्या हत्येनंतरच्या वावटळीत त्यांचा छापखाना आणि घर उध्वस्त झाले; व पंडितजींवर पुन: निर्वासित होण्याची पाळी आली. त्या वेळी पंडितजींच्या वयाची ८० वर्षे पूर्ण झाली होती. एखाद्या कचदिलाच्या माणसाची कंबरच मोडली असती. परंतु 'आसप्ततिर्यौवनम्'—म्हणजे सत्तर वर्षापर्यंत यौवन असते, या वचनानुसार त्यांचे यौवन संपून केवळ दहा वर्षे झाली होती. त्यांनी पुन: नव्या दमाने, आपल्या स्वाध्याय मंडळाचा नवा संसार सुरू केला. आणि तोही गुजराथमधील एका अपरिचित व अज्ञात ठिकाणी. सुरतजवळ पारडी या गावी अमेरिकन मिशनऱ्यांजवळून जागा खरेदी करून तेथे त्यांनी पुन: अशा उत्साहाने आपले काम सुरू केले की, जणु त्यांच्यावर कोसळलेल्या या आपत्तीतून त्यांना नवे स्फुरण चढले आहे, असे कुणालाही वाटावे. संकटांच्या उत्तान लाटांवर आरूढ होऊन मार्गक्रमणा करण्याची पंडितजींची धडाडी खरोखर कसलेल्या दर्यावर्द्यालाही विस्मयाने तोंडात बोट घालावयाला लावील !

पंडितजींनी आतापावेतो लहान मोठी चारशे दहा पुस्तके लिहिली आहेत. याशिवाय, 'पुरुषार्थ' हे मराठी मासिक, 'वेदसंदेश' व 'वसुंधरा' ही गुजराथी मासिके व 'वैदिक धर्म' हे हिन्दी मासिक ते काढीत होते. त्याच्या ग्रंथांची ही संख्या आणि महिन्याकाठी प्रसिद्ध होणाऱ्या चार मासिकांचा व्याप ही दोन्ही लक्षात घेतली म्हणजे पंडितजींच्या प्रचंड उद्यमाची कल्पना येऊ शकते. अशा या निरोगी, उद्यमशील, पुरुषार्थाची प्रेरणा देणाऱ्या व राष्ट्रसेवेचे व्रत घेतलेल्या आधुनिक वेदमहर्षींचा अंत झाल्याबद्दल भारतमातेचा कोणता पुत्र हळहळणार नाही ?

स्तुता मया वरदा वेदमाता
प्रचोदयन्तां पावमानी द्विजानाम् ।
आयु: प्राणं प्रजां पशुं कीर्तिं द्रविणं
ब्रह्मवर्चसं मह्यं दत्वा व्रजत ब्रह्मलोकम् ।

म्हणजे, द्विजांना पवित्र करणाऱ्या वरदायिनी वेदमातेची मी आराधना केली आहे. ती वेदमाता मला आयुष्य, बल, प्रजा, पशु, कीर्ति, धन आणि ब्रह्मज्ञान देऊन मोक्षपदाला पोहोचवो—अशी अथर्ववेदात एक प्रार्थना आहे. या प्रार्थने-प्रमाणे वेदमातेच्या आराधनेने पंडितजींना दीर्घायुष्य, बल, संतती, कीर्ती, धन आणि ब्रह्मज्ञान प्राप्त झालेच होते. वेदमातेच्या कृपेने यांना मोक्षपदही मिळेल. तेव्हा, अशा पूर्णकाम योग्याच्या मृत्यूबद्दल दुःख तरी कसे व्यक्त करावे? तथापि, पंडितजींच्या मृत्यूमुळे त्यांच्या कुटुंबियांवर मोठाच आघात झाला आहे. आम्ही त्यांच्या दुःखात सहभागी आहोत. पंडितजींच्या सर्व उपक्रमांत त्यांना मदत करणारे त्यांचे सुपुत्र श्री. वसंतराव सातवळेकर यांच्यावर आता जी जबाबदारी आली आहे, ती ते आपल्या गौरवशाली पित्याची उज्ज्वल परंपरा चालवून पार पाडतील, अशी अपेक्षा आहे.

पंडित सातवळेकर यांच्या स्मृतीला आमची विनम्र श्रद्धांजली.

३–८–६८

## ज्याँ पॉल सार्त्र यांचा मृत्यू

दिनांक १६ एप्रिलला सुप्रसिद्ध फ्रेंच तत्त्वज्ञ आणि साहित्यिक श्री. ज्याँ पॉल सार्त्र यांचा मृत्यू झाला आणि एक जागतिक कीर्तीचा विचारवंत आपल्यातून निघून गेला. द्वितीय महायुद्धातील भीषण संहार पाहून, मानवी जीवनाची समस्या ज्या विचारवंतांसमोर उभी झाली आणि त्या सोडवणुकीसाठी ज्यांनी मानव, त्याचे अस्तित्व, त्या अस्तित्वाचे प्रयोजन, तसेच त्याचे नियंत्रक घटक, यांचे सखोल चिंतन करून मानवाला एका नव्या स्वरूपात जगापुढे उभे केले, त्यांत श्री. सार्त्र हे अग्रगण्य होते. सार्त्रच्या तत्त्वज्ञानाला 'अस्तित्ववादा'चे (Existentialism) तत्त्वज्ञान असे संबोधिले जाते. परंतु या तत्त्वज्ञानाची बीजे आणि काही प्रमाणात त्याची मांडणी सार्त्र यांच्या पूर्वीही होती. १९३० पासूनच कोणत्या ना कोणत्या स्वरूपात 'अस्तित्ववाद' मांडला जात होता. परंतु सार्त्र यांची मांडणी, जुन्या अस्तित्ववादाहून वेगळी आणि वैशिष्ट्यपूर्ण होती आणि त्यांच्या या मांडणीनेच महायुद्धोत्तर साहित्य आणि विचार यांच्या वर अधिराज्य गाजविले. श्री. सार्त्र यांचे संपूर्ण विश्वाच्या वैचारिक क्षेत्रात म्हणूनच एक आगळे स्थान आहे.

ज्याँ पॉल सार्त्र यांचा जन्म पॅरिस या फ्रान्स देशाच्या राजधानीत २१ जून १९०५ ला झाला. ते लहान असतानाच त्यांचे वडील वारले. त्यामुळे त्यांचे बालपण त्यांच्या आईचे वडील कार्ल श्वाईट्झर यांचेकडे गेले. सुप्रसिद्ध मिशनरी आल्बर्ट श्वाईट्झर यांचे हे काका होते. १९२९ मध्ये त्यांनी 'इकोल नॉर्मल

सुपीरिअर' या प्रसिद्ध संस्थेतून पदवी प्राप्त केली. १९३१ ते १९४५ पर्यंत निरनिराळ्या शिक्षण संस्थांमध्ये त्यांनी अध्यापनाचे काम केले. याच काळात, द्वितीय महायुद्ध सुरू झाले होते आणि त्यांना सैन्यात जबरदस्तीने भरती करण्यात आले. १९४० मध्ये ते जर्मन सेनेच्या हाती लागले, पण एक वर्षानंतर त्यांची सुटका करण्यात आली.

प्रस्थापिताचा निषेध आणि विरोध हा अस्तित्ववादाचा गाभा आहे. सार्त्र या निषेधाशी प्रारंभापासूनच निष्ठेने बांधले गेले होते. विवाहसंस्था ही भांडवलशाही संस्था आहे, असे त्यांचे मत होते. त्यामुळे आपल्या विद्यार्थी दशेपासूनच सिमान द बुव्हा या महिलेशी त्यांची जी गट्टी जमली, ती रूढ यशस्वी विवाहाप्रमाणेच आजीवन टिकली असली, तरी त्यांनी लग्नाचा कोणताही विधी केला नाही किंवा दोघे वेगवेगळ्या ठिकाणी राहिले तरी त्याला त्या दोघांचीही मान्यता राहिली. त्यांच्या या प्रेयसीच्या आत्मवृत्तामध्ये, विद्यार्थीदशेपासून तो वयाची पन्नाशी गाठेपर्यंत सार्त्रच्या जीवनाचे अत्यंत मर्मस्पर्शी वर्णन आले आहे. प्रस्थापितांच्या विरोधाचे सार्त्रच्या जीवनातील आणखी एक मजेदार उदाहरण आहे. ते अध्यापक असताना, त्यांनी टाय बांधायला नकार दिला. 'नेकटाय' म्हणजे वर्गश्रेष्ठत्वाचे प्रतीक आहे, अशी त्यांची धारणा होती आणि गरीब आणि पीडित यांच्या सेवेशी आणि उन्नतीशी ज्याची बांधिलकी आहे, त्याने सामाजिक श्रेष्ठतेची प्रतीके वापरू नयेत असे त्यांचे मत होते. जणू काही नेकटायच्या परित्यागाने त्यांनी आपल्या सामाजिक दर्जाचाच त्याग केला ! याच बंडखोर वृत्तीने, १९६४ मध्ये साहित्याचे नोबेल पोरितोषिक त्यांना मिळाले असताना, त्याचाही त्यांनी स्वीकार केला नाही.

ते अध्यापनाचे कार्य करीत असतानाच त्यांची 'नॉशिया' (मळमळ) ही कादंबरी प्रसिद्ध झाली. या कादंबरीने साहित्यिकांच्या जगात ते नामवंत झाले. दैनंदिनीच्या स्वरूपात लिहिलेल्या या कादंबरीत, जगाचे विविध अनुभव घेताना रोकेन्टिन नावाच्या व्यक्तीच्या मनात जगाविषयीच केवळ नव्हे, तर स्वतःविषयी, स्वतःच्या शरीराविषयीही कशी घृणा उत्पन्न होते, त्याला कसा वैताग आणि जीवनाचा कंटाळा येतो, याचे वर्णन आहे. या संपूर्ण कादंबरीत व्यक्तिवादाचे तत्त्वज्ञान अनुस्यूत आहे. याच तत्त्वज्ञानाचा विकास सार्त्रच्या अन्य कलाकृतींतून पुढे होत गेला.

कादंबरीचे तंत्र आपल्या तत्त्वज्ञानाच्या प्रकटीकरणाकरिता तोकडे पडते, याची सार्त्र यांना पुढे जाणीव झाली असावी. म्हणून त्यांनी नाटकाचे माध्यम स्वीकारले. 'फ्लाईज्', 'इन कॅमेरा', 'डर्टी हँड्स', 'ल्युसिफर अँड द लॉर्ड', 'द कंडेम्ड ऑफ आल्टोना', ही त्यांची नावाजलेली आणि गाजलेली नाटके

आहेत. या सर्वांमधून व्यक्तिस्वातंत्र्याचा, निर्भेळ व्यक्तिस्वातंत्र्याचा पुरस्कार त्यांनी केला आहे. एक माणूस दुसऱ्या माणसाशी कसा आंधळ्या आणि अपक्व वैराने वागतो, हे या सर्व नाट्यकृतींतून त्यांनी दाखविले आहे. एका परीने या सर्व नाटकांना एक निराशेचे अस्तर लागलेले आहे. परंतु सार्त्र निराशावादी नाहीत. ते स्वातंत्र्याचे पुरस्कर्ते आहेत. स्वातंत्र्य म्हणजे काहीही करणे किंवा काहीच न करणे असा अर्थ त्यांना अभिप्रेत नाही. स्वातंत्र्य हे संघर्षाचे, गरिबांसाठी करावयाच्या संघर्षाचे साधन आहे, अशी त्यांची भूमिका आहे.

दुसऱ्या महायुद्धानंतर फ्रान्सच्या राजकीय जीवनात सार्त्रने सक्रिय भाग घेतला. मुळातच त्यांची विचारसरणी डावीकडे झुकलेली होती. ती सक्रिय राजकारणाने कडवी डावी बनली. ते स्वत: कधी कम्युनिस्ट पक्षाचे सदस्य बनले नाहीत, पण सोव्हिएट रशियाचे उत्तम प्रशंसक बनले. मात्र १९५६ मध्ये हंगेरीच्या रस्त्यावर, तेथील नागरिकांचा स्वातंत्र्याचा उद्‌घोष दडपून टाकण्यासाठी जेव्हा रशियन रणगाड्यांची फौज उतरली, तेव्हा त्यांचे सारे रशिया–प्रेम आटून गेले. हंगेरीतील रशियन हस्तक्षेपाला 'आक्रमण' संबोधून त्यांनी त्याचा अत्यंत तीव्रपणे निषेध केला आणि त्याचबरोबर मॉस्कोच्या इशाऱ्यावर चालणाऱ्या फ्रेंच कम्युनिस्ट पक्षावरही कडक कोरडे ओढले. संपूर्ण कम्युनिस्ट तत्त्वज्ञानाकडेच ते यानंतर चिकित्सक दृष्टीने बघू लागले. या चिकित्सेतूनच 'सार्त्रचा समाजवाद' या नव्या कल्पनेचा उदय झाला आणि १९६० मध्ये प्रसिद्ध झालेल्या 'प्रॉब्लेम ऑफ मेथड' या त्यांच्या पुस्तकात त्यानी आपल्या या समाजवादाच्या कल्पनेचा आविष्कारही केला. सोव्हिएट रशियात ज्या प्रकारचे मानवी जीवन आहे, त्या जीवनात मार्क्सवाद जिवंत राहूच शकत नाही असे त्यांचे ठाम मत बनले. तथापि मार्क्सवादावरील त्यांची भक्ती मात्र ढळली नाही. आजच्या जगात मार्क्सवाद हेच एकमेव उपयुक्त तत्त्वज्ञान आहे असे ते सांगत. फक्त ते तत्त्वज्ञान प्राप्त परिस्थितीशी जुळते घेणारे असले पाहिजे असे त्यांचे प्रतिपादन असे. पूर्वनिर्धारित साच्यामध्ये सारी वैशिष्टये कोंबण्याच्या ते विरुद्ध होते आणि मार्क्सवादाचे पुरस्कर्ते नेमके हेच अनिष्ट करीत आहेत, अशी त्यांची खंत होती. मार्क्सवादाचे मूलभूत आणि सर्वसामान्य सिद्धांत कोणतेही असोत, परंतु समूहा–समूहात आणि व्यक्ति–व्यक्तीत भिन्न भिन्न असणाऱ्या अस्तित्वाच्या प्रत्यक्ष परिस्थितींना मार्क्सवादाने मान्यता दिलीच पाहिजे असा त्यांचा आग्रह होता. संघर्ष व्यक्तींमध्ये असतो, वर्गामध्ये नव्हे; तसेच संघर्ष फक्त आर्थिक कारणांमुळे असतो असेही नाही, असे सार्त्र यांचे मत होते. त्यामुळे मार्क्सचा ऐतिहासिक नियतत्त्ववाद त्यांना मंजूर नव्हता. मानवी इच्छा अतार्किक असते, हे फ्राईडचे मत त्यांना मान्य होते. पण सार्त्र निवडीचा पुरस्कार करणारा असल्यामुळे त्यांना फ्राईडचा मनोनियतत्त्ववादही मान्य नव्हता.

आपले तत्त्वज्ञान केवळ पुस्तकात मांडावे आणि स्वस्थ बसावे, असे पुस्तकी पंडित सार्त्र नव्हते. म्हणूनच त्यांनी फ्रान्सच्या राजकारणात प्रत्यक्ष भाग घेतला आणि गरीब कामगार वर्गाची जवळीक साधण्याचा प्रयत्न केला. "निष्ठा कृतिशील हवी शाब्दिक नको" (Commitment is an act not a word) हे त्यांचे ब्रीद होते. त्या ब्रीदाप्रमाणे ते वागले आणि त्या वागण्याचे परिणामही ते भोगते झाले. या क्रियाशीलतेकरिता त्यांनी सडकेवरील दंग्यातही भाग घेतला; रस्त्यावर ओरडून ओरडून डाव्या विचारसरणीचे साहित्य विकले आणि 'क्रांती' घडून यावी म्हणून जे जे करणे शक्य होते ते सारे केले. परंतु या साऱ्या तत्त्वज्ञानाची शोकांतिका अशी की, त्यांनी जे लिहिले, त्याचा परिणाम मध्यमवर्गीयांवर तेवढा झाला. कामगारांना त्यांच्या लिखाणाची भाषाच कळली नाही.

सार्त्र म्हणजे निराशावादी, सार्त्र म्हणजे मानवातील रोगटपणा चित्रित करणारा लेखक, सार्त्र म्हणजे मानवाच्या ठिकाणच्या दिव्य चैतन्याचे ज्याला कधीही भान झाले नाही असा लेखक, अशी त्यांच्या लिखाणावर टीका झाली आहे. पण ही टोकाची टीका आहे. ती सार्त्रवर अन्याय करणारी आहे. मानवाचे अस्तित्व हे व्यक्तीचे अस्तित्व आहे; माझे, तुझे, त्याचे अस्तित्व आहे असे सार्त्रने सांगितले. पण त्याचबरोबर सामाजिक जबाबदारीचाही संदर्भ त्याने सोडला नाही. वडिलांच्या मृत्यूनंतर त्याने ज्या वेदना भोगल्या, महायुद्धाच्या काळात मानवाने मानवाशी केलेला जो अत्याचार त्याने पाहिला, त्यामुळे मानव हा कुणा विश्वव्यापी चैतन्याचा अंश आहे ही त्याची जाणच संपून गेली. सार्त्रला ती सारी पुस्तकी पोपटपंची वाटली. माणूस या जगात ढकलला जातो, त्यागिला जातो आणि भोवतालची परिस्थिती त्याचे सारे अभिक्रम आणि उपक्रम गतार्थ करून सोडते, असे त्याचे अनुभवांती मत बनले आणि ते त्यांनी आपल्या कलाकृतीतून व्यक्त केले. पण सार्त्र जसे निराशावादी नव्हते तसेच ते दैववादीही नव्हते जीवनात माणसासमोर विविध पर्याय उभे होत असतात, असे सार्त्रने मान्य केले आहे. या पर्यायांची निवड करणे मानवाच्या हाती नाही, परिस्थितीच्या हाती आहे असे अन्य अस्तित्ववादी मानतात. पण सार्त्रचा तो अभिप्राय नाही. सार्त्रच्या मताप्रमाणे पर्यायाची निवड माणूस करतो आणि ही निवड परिस्थितीवर परिणाम करते. पहिल्या मताप्रमाणे भूतकाळ वर्तमानाचे निर्धारण करतो; सार्त्रच्या मताप्रमाणे वर्तमानाच्या निवडीने भूतकाळाला अर्थ प्राप्त होतो.

सार्त्रची विचारसरणी सर्वांनाच मान्य होईल असे नाही. सार्त्रही तशी अपेक्षा करणार नाही. परंतु एवढे मात्र खरे की, पहिल्या महायुद्धानंतर जॉर्ज बर्नार्ड शॉच्या विचारांनी आणि साहित्याने ज्याप्रमाणे युरोपखंड भारून गेला होता, त्याचप्रमाणे द्वितीय महायुद्धानंतर ज्याँ पॉल सार्त्र यांच्या विचाराने आणि साहित्याने युरोपखंड भारला गेला. त्यांच्या साहित्याने आणि विचाराने संपूर्ण



(स्थळ प्रत)

जगाला कदाचित् मोहित केले नसेल, पण साऱ्या जगाचे विचार त्यांनी घुसळून काढले हे मान्य करावेच लागेल. असा हा थोर बुद्धिवंत, स्वातंत्र्याचा एकान्तिक पुरस्कर्ता आणि क्रियाशील तत्त्वज्ञाच्या निधनामुळे संपूर्ण विश्वाच्या वैचारिक क्षेत्रात पोकळी निर्माण झाली असे वाटले; तर त्यात अस्वाभाविक काय आहे ?

१९-४-८०

## गीताई मंदिर आणि त्याचे विरोधक

दिनांक ७ ऑक्टोबरला वर्धा येथे गीताई मंदिराच्या उद्घाटनाचा कार्यक्रम झाला. हे गीताई मंदिर बजाज कुटुंबियांनी मिळवलेल्या पैशातून उभे झाले आहे. त्याच्या उभारणीसाठी २५ की २८ लाख रुपये खर्च झाले आणि आचार्य विनोबा भावे यांनी त्यांचे उद्घाटन केले. या उद्घाटनाच्या प्रसंगी या कार्यक्रमाला विरोध म्हणून छात्र युवा संघर्ष वाहिनीच्या काही लोकांनी मूक निदर्शने केली. त्या निमित्ताने त्यांनी काही पत्रकेही वाटली. त्यातले एक पत्रक सध्या आमच्या समोर आहे.

या पत्रक-प्रकाशकांचे म्हणणे असे की, या मंदिराला सामाजिक मान्यता मिळू नये. त्यासाठी त्यांनी दोन कारणे दिली आहेत. एक असे की, त्यांची धर्मावर आणि धर्मग्रंथावर 'मुळात श्रद्धाच' नाही; गीतेतील 'कर्मविपाकाचा सिद्धांत किंवा गीतेचा स्त्रीकडे बघण्याचा दृष्टिकोण' त्यांना मंजूर नाही; म्हणून गीतेचे मंदिर उभारण्याला त्यांचा विरोध आहे. असा दृष्टिकोण बाळगण्याचा त्यांना अधिकार आहे. यापूर्वीही असा दृष्टिकोण बाळगणारे पुष्कळ होऊन गेले. त्यांच्याही या हक्काला कोणी बाधा आणली नाही. या देशात भगवद्गीतेला मानणारे बहुसंख्य असल्यामुळेच या सर्वांना प्राचीन काळी आणि आधुनिक काळातही गीतेला विरोध करण्याचा हक्क आणि संधी प्राप्त झालेली आहे. कुराणाला मानणारे बहुसंख्य असते, तर कुराणाला मंजूर नसलेला दृष्टिकोण बाळगून, त्याचा प्रचार करण्याची संधीच त्यांना मिळाली नसती. मग हिंमत होण्याची गोष्टच दूर ! सौदी अरेबियात किंवा इराणमध्ये जाऊन अशी मूक वा बोलकी निदर्शने, एतादृश मंडळींनी करून बघावी आणि त्याचे परिणाम एकदा उपभोगून घ्यावेत. "धर्मावर आणि धर्मग्रंथावर आमची मुळात श्रद्धा" नसल्याची द्वाही फिरविणाऱ्यांची विशिष्ट धर्म आणि धर्मग्रंथावर श्रद्धा नाही, आणि दुसरा धर्म आणि दुसरे धर्मग्रंथ यांच्यावर श्रद्धा आहे, असे मानणे त्यांच्या तत्त्वनिष्ठेला अन्याय करणारे होईल. म्हणून इतरही धर्मांवर आणि धर्मग्रंथांवर त्यांनी अशीच थोडीबहुत टीका किंवा त्या विरुद्ध निदर्शने करण्याची हिंमत दाखवावी. अन्य धर्माची प्रार्थनास्थळे किंवा पूजास्थाने कुठे ना कुठे स्थापन होत असतीलच ! छात्र युवा संघर्ष वाहिनीच्या त्याविरुद्धच्या 'धर्मनिरपेक्ष' चळवळीकडेही आम्ही डोळे लावून आहोत !

पण बाकीच्यांचे कशाला बोला ! गीता आणि गीताभक्त यांची या निदर्शनांकरिता मोकळीक आहे. कालही होती आणि उद्याही राहणार आहे. म्हणूनच हजारोंच्या संख्येत गीताईचे भक्त जमले असताना पाचपन्नास लोक हातात फलक घेऊन उभे राहू शकले किंवा वर्ध्याचे रस्ते निषेधाच्या घोषणांनी रंगविले जात असतानाही कोणी ते हात कलम केले नाहीत. गीता आणि गीताईचा विरोध करणाऱ्यांनी या ग्रंथांचे आणि त्यातील शिकवणुकीचे एवढे तरी ऋण मान्य करावे. मूठभर लोकांनाही आपले म्हणणे मांडण्याची–तेही विरोधी प्रकारचे म्हणणे मांडण्याची, निषेध व्यक्त करण्याची, संधी त्यांना दिल्याबद्दल, त्यांनी, खरे म्हणजे आता तरी, त्या मंदिराचे स्वागत करावयाला हवे !

पण विरोधकांच्या विरोधाचे केवळ हेच कारण नाही. "गीताई मंदिर उभारण्यासाठी बजाज कुटुंबाने २५ लाख रुपयांच्या वर उधळपट्टी करावी याला" त्यांचा 'सक्त विरोध' आहे. उधळपट्टीला विरोध करणे हे चांगले काम आहे. पण हा 'सिलेक्टिव्ह' विरोध कां ? मंत्र्यांच्या दूतावासावर काय कमी खर्च होतो ? लग्नसमारंभांवर कमी उधळपट्टी होते ? त्या पंगती ! त्या मिरवणुकी! तो थाटमाट ! ताज, ओबेराय इत्यादी हॉटेलातील तो अवाढव्य खर्च ! छात्र युवा संघर्ष वाहिनीने आपला मोर्चा तिकडे वळविला, तर काही विधायक परिणाम त्यांच्या हाती तरी लागतील. शिवाय, त्यांच्या शक्तीला हे कार्यक्रम पेलतीलही. मंदिराच्या उभारणीतील उधळपट्टी खुपावी आणि बाकीची सोसावी, हे अनारोग्याचे, 'ॲलर्जी'चे लक्षण आहे. विरोधकांना धर्माची 'ॲलर्जी' आहे, हे त्यांच्या पत्रकावरून दिसतेच आहे. तेव्हा विरोध त्या बाबीपुरताच मर्यादित करणे प्रामाणिकपणाचे ठरले असते.

बजाज कुटुंबियांनी कामगारांची पिळवणूक करून, व ग्राहकांची लूट करून संपत्ती मिळविली आणि ती या मंदिराच्या उभारणीसाठी लावली असे या पत्रकात म्हटले आहे. बजाज कुटुंबांचे आर्थिक व्यवहार कसे आहेत, हे आम्हाला माहीत नाही. बहुधा अन्य उद्योगपतींच्या सारखेच बरेवाईट असतील. या उद्योगपतींनी आपली कमाई (हराम कमाई म्हणा) कशी खर्च करावी, हे कोणी सांगायचे ? ज्यांनी सांगायला हवे आणि तसे प्रसंगी कठोर बनून त्यांच्याकडून करवून घ्यायला हवे, त्यांनी ते यच्चयावत् सर्व उद्योगपतींना सांगितले पाहिजे, सर्वांच्याकडून करवून घेतले पाहिजे. फक्त बजाज कुटुंबियांची खास निवड करण्याचे कारण नाही. समजा, बजाज कुटुंबियांनी २५ लाख रुपये खर्च करून एखादे आलिशान हॉटेल बांधले असते, तर छात्रयुवा संघर्ष वाहिनोच्या आमच्या मित्रांचा त्याला विरोध असता की नाही ? एखादा कारखाना काढला असता, तर त्यांचा नक्कीच विरोध नसता ! कां नसता ? त्या कारखान्यास लागणारा पैसाही तर हराम

कमाईतूनच आलेला असणार की नाही ? आमचे मित्र म्हणतील की तो पैसा उत्पादक कामात लागला असल्यामुळे, त्याला आमचा विरोध नाही. याचा अर्थ असा की, वाईट कामातून मिळालेला पैसा चांगल्या कामी लावायला त्यांची हरकत नाही. म्हणजे कारखाना, हॉटेल इत्यादि कामे चांगली, कारण ती लोकांची कोणती ना कोणती गरज भागवितात. आणि म्हणून त्यासाठी केलेला खर्च हा उधळपट्टीचा नाही, असा हा तर्कवाद निष्पन्न होतो.

हा तर्कवाद योग्यच आहे. पण लोकांच्या काय फक्त शारीरिकच गरजा असतात ? माणूस म्हणजे काय फक्त शरीर ? की त्याला मन, बुद्धी, आत्मा हेही असतात ? मग या मनाच्या, बुद्धीच्या, आत्म्याच्या गरजांसाठी कुणी काही केले तर ते वाईट का ठरावे ? चांगला माल तयार करणारा कारखाना उत्पादक, तर चांगली मने तयार करणारा प्रकल्प अनुत्पादक कां ? अनेकांना आपल्या जीवनाच्या गरजांसाठी गीता किंवा गीताई आवश्यक वाटते. गीतेने अनेकांना कर्मयोग्याचे जीवन शिकविले आहे. फाशीचा दोर लग्नहारासारखा सुखद मानण्याचीं किमया तिने केली आहे. पराक्रम शिकविला आहे. शुचिता सांगितली आहे आणि मुख्य म्हणजे निरपेक्ष समाजशील जीवन कसे जगावे याची प्रेरणा दिली आहे. भगवद्गीतेची शिकवण खरोखर मोठी 'उत्पादक' (productive) आहे. आणि ज्याला ही शिकवण पटत नाही, ती अनुत्पादक वाटते, त्याला तसे वाटण्याचा हक्कही तिने बहाल केला आहे. बजाज कुटुंबियांनी आपली तथाकथित हराम कमाई कॅबेरेची उत्तान नृत्ये दाखविणाऱ्या हॉटेलांच्या आणि नाईटक्लबच्या उभारणीत खर्च करण्याऐवजी तिचा अंश गीताई मंदिराच्या उभारणीला लावला, तर त्यात बिघडले कुठे ? यात कुरूपता कशी ?

अशी "हराम कमाई" या मंदिरासाठी वापरण्यामुळे मंदिर कलंकित होते अशी कुणी शंका काढू शकेल. ती शंका निर्मूल नाही. निरर्थकही नाही. पण काही वस्तू अशा असतात की, त्यांचा स्पर्श अशुद्धालाही शुद्ध करतो. हीन अग्नीत टाकले, तर अग्नी अशुद्ध होतो की तें हीन शुद्ध होते ? भवभूतीने म्हटले आहे. "तीर्थोदकं च वन्हिश्च नान्यतः शुद्धिमर्हतः" विनोबांनी या मंडळींना, डोके तपासून घ्या असा सल्ला दिला. त्याचा त्यांना क्रोध आला. आम्हाला त्यांना क्रोध आणायचा नाही. आम्ही एवढेच म्हणणार की त्यांनी स्वतःच आपली अंतःकरणे तपासून घ्यावीत म्हणजे मग त्यांनाही पटेल की,

नेणत्या कर्मनिष्ठांचा बुद्धिभेद करू नये
गोडी कर्मात लावावी समत्वे आचरूनि तीं,

यातला 'समत्वे' हा शब्द फार मोलाचा आहे, हे सुज्ञांना सांगणे नलगे ।

११-१०-८०

# संस्कृतचा जयजयकार

भारताच्या राजधानीत सध्या संस्कृतचा जयजयकार चालू आहे. दिनांक २६ मार्चपासून तेथे आंतरराष्ट्रीय संस्कृत परिषदेचे अधिवेशन सुरू झाले असून, त्यात भारतासह ३५ राष्ट्रांचे प्रतिनिधी भाग घेत आहेत. सुमारे आठवडाभर चालणाऱ्या या अधिवेशनाचे उद्‌घाटन राष्ट्रपती श्री. गिरी यांनी केले.

संस्कृत भाषेचे महत्त्व निदान भारतीयांना तरी सांगण्याची आवश्यकता नसावी. परंतु ज्ञानाचा संबंध अर्थकरी विद्येशी जोडला गेल्यापासून संस्कृत भाषेला अवनतीचे दिवस आले आहेत. संपूर्ण आग्नेय आशिया संस्कृतच्या प्रभावाने अंकित झाला आहे. कंबोडियाचे जे प्रतिनिधी या अधिवेशनात आले, त्यांचे नाव धर्मवर आहे. थायलंडच्या राजाचे नाव भूमिबल आहे. कंबोडिया, लाओस, जावा, सुमात्रा, इंडोचायना या सर्व भागांवर संस्कृत भाषेची छाप पडली आहे. संस्कृत भाषेतील ग्रंथांमधून प्रकट होणाऱ्या सांस्कृतिक जीवनाची चिन्हे ठायी ठायी तेथे दृग्गोचर होतात. तेथील शासन आणि जनता यांनी संस्कृतशी आपले नाते कायम ठेवले आहे; पुढेही कायम ठेवण्याची त्यांची इच्छा आहे. ब्रिटिशांचे राज्य भारतात प्रतिष्ठित झाले, तेव्हा ब्रिटिश लोकांनी संस्कृतचे अध्ययन केले. ब्रिटिशांव्यतिरिक्त जर्मन व फ्रेंच पंडितांनीही त्या भाषेचे सखोल अध्ययन केले. या अध्ययनांतून तौलनिक भाषाशास्त्राची निर्मिती झाली. संस्कृतच्या अध्ययनाने भाषाविषयक अनेक अनिर्णित संदिग्ध कल्पनांच्या उत्तरांचा मार्ग मोकळा झाला आणि एका नव्या संशोधनाचे युग सुरू झाले. संस्कृत भाषेच्या समृद्धतेविषयी तर बोलण्याची गरजच नाही. इतकी लवचिक, इतकी नवशब्दप्रसू, इतकी अर्थघन भाषा दुसरी क्वचितच असेल. त्या भाषेतील वाङ्मय जीवनाच्या विविध अंगांना स्पर्श करणारे आहे. ते केवळ संख्येने विशाल आहे, असे नाही; तर गुणांच्या दृष्टीनेही ते संपन्न आहे. संस्कृतातील ललित साहित्याची माधुरी अजरामर आहे. तसेच विज्ञान, तत्त्वज्ञान, कायदा, गणित, संगीत, नाट्य, साहित्यशास्त्र, ज्योतिष, वैद्यक इत्यादी अनेक विषयांवरील संस्कृत ग्रंथांतील ज्ञानही अत्यंत प्रगल्भ व आधुनिकालाही प्रेरणा देणारे आहे. या सगळ्या विविधतेतही त्यात एक सूत्र आहे. चतुर्विध पुरुषार्थप्राप्ती हे ललित साहित्य आणि कला यांचेही उद्दिष्ट राहिलेले आहे. त्यामुळे संस्कृत ही केवळ एक भाषा नाही; ती एक संस्कृती बनली आहे. राष्ट्रपती श्री. गिरी यांनी आपल्या उद्‌घाटनाच्या भाषणात "बौद्धिक प्रेरणांना जन्म देणारे हे जिवंत धन आहे." असा जो संस्कृत भाषेचा गौरव केला आहे, तो अगदी यथार्थ आहे. संस्कृत ही जगातील जनतेच्या एकात्मतेचे बंधन आहे, असे सांगून राष्ट्रपतींनी, हे बंधन

कशा रीतीने मजबूत होईल, यासाठी उपाय सुचविण्याचे आवाहन अधिवेशनात उपस्थित असलेल्या पंडितांना केले.

परंतु आपल्या देशाचे मोठमोठे पुढारी अशा रीतीने एकीकडे संस्कृतची तोंड भरून स्तुतिगीते गात असताना, आणि जगातही संस्कृतविषयी आस्था आणि तळमळ दिसत असताना, दुसरीकडे आपल्या भारतात ती भाषा आणि तिच्यातील ज्ञान याविषयी कोणती वृत्ती दिसून येते ? संस्कृत भाषेचे ज्ञान पैसा मिळवून देणारे नसल्यामुळे सामान्य पोटभरू लोक या बाबतीत पराङ्मुख असावेत यात नवल नाही. पण जीवनातील आकर्षक सुखाकडे पाठ फिरवून जे या ज्ञानाची उपासना करतात, त्यांच्याकडेही सन्मानाने पाहण्याची समाजाची वृत्ती नाही. संस्कृत पंडितांना पैसा नाही आणि प्रतिष्ठाही नाही. संस्कृत विद्यालयामध्ये तेच शिकावयाला जातात की, जे इंग्रजी विद्यालयात जाऊ शकत नाहीत. संस्कृत म्हणजे मागासलेपण, प्रतिगामित्व अशीही एक भावना समाजात रूढ होत आहे. आपल्या महाराष्ट्रात तर ही भाषा फक्त एका जातीची भाषा असे समजून तिची उपेक्षा होत आहे. संस्कृतसंबंधी हे सारे अपसमज समाजमानसातून प्रथम दूर केले पाहिजेत. संस्कृत भाषेचे शिक्षण अनिवार्य करावे, असे आम्ही म्हणत नाही. पण ज्याला ते घ्यावयाचे आहे, त्याला तशी मोकळीक असली पाहिजे. विज्ञान, वाणिज्य, गृहशास्त्र, तंत्रविज्ञान, वैद्यक या शास्त्रांच्या विद्यार्थ्यांना संस्कृत शिकता कां येऊ नये हे अनाकलनीय आहे. यापैकी अनेक शास्त्रांच्या विद्याशाखांमध्ये एक दोन भाषांचे शिक्षण विद्यार्थ्याला घ्यावे लागते. पण त्याला संस्कृत शिकता येत नाही. विज्ञान-शाखेतला विद्यार्थी इंग्रजी, मराठी, हिंदी शिकेल; पण संस्कृत शिकणार नाही. त्याची मातृभाषा मराठी किंवा हिंदी असेल, तर तो आणखी इंग्रजीचाच एक पेपर देईल, पण त्याला संस्कृत शिकण्याला वाव नाही. संस्कृत ही केवळ एक भाषा नाही,–राष्ट्रपतींनी म्हटल्याप्रमाणे ती बौद्धिक प्रेरणेचा स्रोत (a source of intellectual inspiration) आहे. आपल्या उदासीनतेने, अपसमजाने आणि प्रादेशिक भाषेच्या फाजील दुरभिमानाने आपण हा स्रोत सुकवीत तर नाहींना, याचा विचार सर्वांनी केला पाहिजे. संस्कृतच्या अध्ययनाने आमच्या सुशिक्षित पिढीचे वाग्वैभव संपन्न, अभिरुचि परिष्कृत आणि अंतःकरण संस्कारित झाले पाहिजे. आंतरराष्ट्रीय संस्कृत संमेलनाच्या अधिवेशनाने ही नवी बौद्धिक प्रेरणा आमच्या जननेत्यांमध्ये उत्पन्न व्हावी, अशी आमची इच्छा आहे.

२९–३–७२

# मागोवा : लेख

# पुरोहितांशी हितगुज

पुरोहित ही संस्था समाजात राहील असे मला वाटते. भक्त आणि परमेश्वर यांच्यात मध्यस्थ किंवा दलाल नको, हे सिद्धान्ततः खरे आहे. परंतु, सर्वसामान्य जनांना असा साक्षात् संबंध प्रथापित करणे शक्य नसते. शिवाय, मध्यस्थाची अनावश्यकता, व्यक्तिगत उपासनेच्या बाबतीत पटू शकते. जेथे समूहाच्या उपासनेचा प्रश्न येतो, तेथे कोणी तरी उपासनेचे ते कर्मकांड चालवायला हवे असते.

'कर्मकांड' या शब्दाने बावरून जाण्याचे कारण नाही. सामूहिक कार्यक्रम शिस्तीने चालवावयाचे म्हणजे कर्मकांड आले. साधे सभासंचालन म्हटले की त्याचे कर्मकांड आले. अध्यक्षपदाची सूचना, या सूचनेला अनुमोदन, प्रास्ताविक, हारसमर्पण, भाषणे, आभार, शेवटी राष्ट्रगीत—हे सारे कर्मकांडच आहे; आणि त्याचे संचालन करणारे कोणी तरी हवे असते.

सामाजिक कार्यक्रमांत्रे जसे कर्मकांड असते, तसेच धार्मिक कार्यक्रमांचेही असते. सर्व धार्मिक कार्यक्रम केवळ उपासनेचे नसतात. लग्न, मौज, वास्तू, भूमिपूजन, बारसे इत्यादी कार्यक्रमांत कमीजास्त प्रमाणात सामाजिक अंशही असतो. अशा कार्यक्रमांत तर पुरोहिताची आवश्यकता असतेच; आणि आपण ती मान्य करतो. पुरोहिताशिवाय लग्न होत नाही. मुंज होत नाही. भूमिपूजनालाही तो हवा असतो. हे फक्त आपल्या हिंदू धर्मातच आहे असे नाही. जगातील सर्व धर्मांमध्ये आहे. ज्यांना धर्माचे वावडे आहे, त्यांचा विचार करण्याचे कारण नाही. ज्यांना ते वावडे नाही, त्यांना पुरोहित हवा असतो.

असे असले तरी, पूर्वी जो पुरोहिताचा सन्मान होता, तो आता नाही. पुरोहिताकडून लग्नघटिका आपण काढून घेतो. पण त्या मुहूर्तास विवाह लागेलच याची खात्री नाही. बँडवाल्यांची वेळ मात्र बरोबर पाळली जाते ! कारण, वेळ झाली की बँडवाला निघून जातो किंवा जादा मोबदला मागतो. पुरोहित तसे काही करीत नाही. तो हवा असतो, पण त्याला कसेही वागविले तरी चालते. "भटजी, लवकर आटपा;– वरातीसाठी बँडवाले आले आहेत" असे त्याला सुनावले जाते. आणि तरी पुरोहित गप्प असतो. मुलीचा 'मेक अप' व्हायला वेळ लागतो. भटजी ताटकळत उभा असतो. आणि मुहूर्ताची वेळ जवळ आली की भटजीलाच घाई केली जाते. भटजीचा सर्व कर्मकांडावर विश्वास असतो, पण काही सोडून, काही अर्धवट करून, तो वेळ निभावून नेतो. असे वाटते की त्याची आस्था फक्त दक्षिणेपुरतीच असावी. बाकी काहीही केले तरी त्याला ते चालते.

ही जी स्थिती आली आहे, त्याला माझ्या मते अधिकांशतः पुरोहितच जबाबदार आहेत. पुरोहिताला 'भिक्षुक' हे दुसरे नाव आहे. पुरोहिताचा पुरता

'भिक्षुक' म्हणजे भिकारी झाला आहे. 'पुरोहित' या शब्दात जे अग्रेसरत्व आहे– ऋग्वेदाच्या पहिल्या ऋचेत अग्नीला पुरोहित म्हटले आहे आणि अग्नी देवांचे मुख आहे– ते भिक्षुकांच्या ध्यानीमनीही नाही. कोणताही कणा नसलेली ती एक लाचार जमात बाकी आहे. पुरोहितांनी शांत, संयमी, समाधानी असावे याविषयी वाद नाही. पण त्याच्या काही निष्ठा तरी असाव्यात की नाही ? त्याचा काही आग्रह तरी असावा की नाही ? मी चांगल्या सच्छील पुरोहिताला विचारले की, "आपण म्हणता त्या शास्त्राप्रमाणे सहोदरांच्या मुंजी एका वेळेला होऊ शकत नाहीत, मग आपण अमुक ठिकाणी कां गेलात ?" त्यांचे उत्तर असे की, "आम्ही सहोदरांच्या एकसमयावछिन्न मुंजींना शास्त्राधार नाही असे सांगू, पण कोणी करतोच म्हटले तर मुंजी लावून देऊ" या तडजोडीत कोणाची प्रतिष्ठा राहिली? त्या शास्त्राचीही प्रतिष्ठा राहिली नाही आणि पुरोहिताचीही राहिली नाही.

विशिष्ट ग्रहाचा अस्त असला की, विवाहादि मंगलकार्ये होत नाहीत, असे पुरोहित सांगतात. पण मला अस्तातील विवाहाची किती तरी निमंत्रणे येतात. त्या कार्यक्रमांना मी जातो, तर मला विवाह लावणारे पुरोहित दिसतातच. मग अस्त असताना विवाह करू नये, असे सांगण्यात काय मतलब ? सिग्रेटच्या जाहिरातीत तिच्या आस्वादमाधुर्याची प्रशंसा केली असते. आणि मग खाली बारक्या अक्षरात सिग्रेट पिणे आरोग्याला अपायकारक आहे असे लिहिले असते. कोणीही त्या सूचनेची दखल घेत नाही. अस्तात विवाह होत नाहीत, या आमच्या भट-जींच्या सूचनेचीही तशीच अवहेलना होते.

हे थांबू शकते. जे आपण आचरणात आणू शकणार नाही, त्याचा आग्रह धराच कशाला, असा एक उपाय आहे. तो सुचविला जाऊ शकतो. तो अंमलात आणला तर दांभिकतेचा तरी आरोप येणार नाही. पण याहून दुसरा चांगला उपाय आहे. तो हा की, हे तुमचे कृत्य धर्मबाह्य असल्यामुळे आम्ही त्यासाठी येणार नाही हे सांगणे. लग्न वेळेवर लागले नाही, मुहूर्त टळला, तर आम्ही चाललो, असे ठणकविणे. असा काही कणखरपणा पुरोहित दाखवतील, तेव्हा त्यांचा सन्मान उत्पन्न होईल. एवढेच नव्हे, तर सामाजिकतेचा अंश असलेल्या धार्मिक कार्यक्रमांना ते अधिक शुचिता अर्पण करू शकतील; संस्कृतीचेही जतन करू शकतील.

सर्व पुरोहितांना असे वाटते की, विवाहाच्या वेळी आपल्या संस्कृतीला आणि परंपरेला साजेसा पवित्र पोषाख नवरदेवाने घालावा. पण आपण जिकडे तिकडे बघतो ते हे की, वर सुटाबुटात जोडे घालून बोहल्यावर चढलेला असतो. पुरोहित सांगू शकतात की, विवाहाच्या वेळेला तुम्हाला धोतर नेसावे लागेल. ते पसंत नसेल तर आम्ही येणार नाही. आपण रजिस्टर्ड विवाह करू शकता. पुरोहितांनी ही भूमिका घेऊन बघावी, आणि कसे झपाटून परिवर्तन होते ते बघावे. यात

नवरदेवाचेही हाल वाचतील. भर उन्हाळयात वधूपक्षाच्या पैशाने घेतलेला गरम कपडयांचा सूट आणि नेकटाय लावून तो जो बसलेला असतो, त्याचे हाल काय विचारावयाचे ? नवरदेवाला आणि त्याच्या आईबापांना वाटत असावे की, गरम कपडयाचा सूट मिळणार असेल तर आताच मिळेल. वधूपित्याने तो घेतला नाही, तर या जन्मात तो घेण्याची त्याची अवकात नसल्यामुळे, तो त्या यातना सहन करीत असेल, तर त्याला सहन करू दे. पण पुरोहितांनी ते कां मान्य करावे ? भिक्षुक मंडळी म्हणतील की, एकटयाने ठरवून काय होणार आहे ? एकटयाने ठरवूनही पुष्कळ होत असते. पण पुरोहितांची संघटनाही आहे की, चतुःशाखीय वैदिक ब्राह्मण सभा आहे. या सभेने, किमान आचार-धर्म कां ठरवू नये ? मला स्वतःला पुरोहितांविषयी आदर आहे. त्यांनी जे वेदाध्ययन केले त्याच्याविषयी गौरवाची भावना आहे. पण हा पुरोहित काही सिद्धांत घेऊन उभा असलेला मला हवा आहे. लाचार याचक म्हणून तो नको आहे. त्यांचे बाह्य रूपही मला चांगले हवे आहे. पुरोहिताने रोज दाढी करावयाला काय हरकत आहे, हे मला काही कळत नाही. रोज आपण आंघोळ करतो ना ! शरीरशुद्धीसाठी आंघोळ आवश्यक आहे ना ! मग श्मश्रू का नको ? श्मश्रू केल्यानंतर अधिक स्वच्छ वाटते की नाही ? नापिताने घरटी येऊनच श्मश्रू केला पाहिजे असा आग्रह कां ? आता तर जातिनिहाय धंदे राहिले नाहीत. पुरोहिताच्याही घरी तेल्याच्या घरचे तेल येत नाही की चांभाराच्या घरचा जोडा येत नाही. मग न्हाव्याच्या बाबतीतच आग्रह कां ? आग्रह स्वच्छतेचा आणि शुचितेचा असला पाहिजे. रोजचे धौत वस्त्र ते परिधान करीत असतात. चांगली गोष्ट आहे. मग धोतर तेवढे रोजचे धुतलेले असले म्हणजे झाले काय ? अंगातले बनियन आणि शरीराला साक्षात् स्पर्श करणारा सदरा रोज धुतलेला कां असू नये ? इस्त्री वेगळी आणि स्वच्छता वेगळी. माझा आग्रह स्वच्छतेचा आहे, इस्त्रीचा नाही.

नागपुरातील काही पुरोहित स्वयंचलित वाहनांवर बसून जाताना मला दिसतात तेव्हा मला बरे वाटते. पुरोहितांना आर्थिक उत्पन्न बरे मिळते, याचा मला आनंद आहे. पण केवळ अर्थवत्तेने मान मिळत नाही. पुरोहितांनाच जेथे आपल्या व्यवसायाचा अभिमान नाही, तेथे इतरांना त्यांच्याविषयी मान कां वाटावा? पुरोहितालाच, आपली मुलगी पौरोहित्य करणाऱ्या तरुणाला द्यावीशी वाटत नाही, तर बाकीच्या लोकांना आपण काय म्हणणार ? तेव्हा पुरोहितांनीच आपला मान राखला पाहिजे. 'भिक्षुकी' वृत्ती सोडली पाहिजे. धार्मिक कार्यक्रमातले अग्रेसरत्व स्वीकारले पाहिजे. हे अग्रेसरत्व भीक मागून मिळावयाचे नाही. आचार शुद्ध हवा. बाह्य रूप स्वच्छ हवे. ज्ञानसंपन्नता हवी. जे आपल्याला पटलेले आहे, बुद्धीने आणि संस्काराने ग्रहण केले आहे, त्यावर निष्ठा हवी.

आणि या निष्ठेची किंमत देण्याची तयारी हवी. तसे असेल तर कोणताही धनवंत यजमान त्यांना वाकवू शकणार नाही. पुरोहितांकडून किमान एवढे अपेक्षित आहे. त्यांनी आपल्या विविध संस्कारांचे प्रयोजन कोणते ? त्यात उपयोजिलेल्या मंत्रांचे अर्थ कोणते ? आजच्या काळातही त्याची उपयुक्तता कशी ?–इत्यादि गोष्टी लोकांना समजावून सांगण्याची गरज आहे. पण ती पुढची गोष्ट झाली. शिवाय लाचारांचा उपदेश ऐकणार तरी कोण ? आणि सभ्यता म्हणून ऐकून घेतला, तर त्याचा परिणाम तरी काय होणार ?

७–३–८२

"पुरोहितांशी हितगुज" या माझ्या लेखावर प्रतिक्रिया व्यक्त करणारी बरीच पत्रे आली. त्यातून निरनिराळी मते मांडली गेली. काहींनी या विषयाला चालना दिल्याबद्दल अभिनंदन केले, तर काहींनी यजमानाकडेच दोषाचा वाटा आहे असे लिहिले. काहींनी निनावी पत्रे लिहून मला शिव्याशापही दिले. पण अशा भेकडबहादूरांच्या शिव्याशापांचा विचार करण्याचे कारण नाही.

माझ्या त्या लेखाने पुरोहित वर्गामध्ये थोडी तरी वैचारिक हालचाल झाली असेल, तर त्या लेखाचे सार्थक झाले, असे मी मानीन. तशी ती झाली असावी अशी माझी समजूत आहे. चतु:शाखीय वैदिक ब्राह्मण सभेचे अध्यक्ष वेदशास्त्रसंपन्न श्री. बाबूराव धामणकर यांचे पत्र या दृष्टीने महत्त्वाचे आहे आणि आजच्या या लेखात मुख्यत: या सभेसाठीच काही मुद्दे मांडण्याचा विचार आहे.

श्री. बाबूराव धामणकरांनी अंत:करणशुचितेला प्रधान्य आहे, असे सांगितले ते योग्यच आहे. पण स्वच्छतेच्या बाह्य प्रकटीकरणाने अंत:करणाची शुचिता बाधित होत नाही. या संदर्भात श्मश्रूचा मी उल्लेख केला. अनुष्ठान, 'निषिद्ध' दिवस इत्यादींचा या बाह्य स्वच्छतेला विरोध कां ? जेव्हा विरोध सांगितला असेल तेव्हा त्याचे प्रयोजन कोणते होते ? ती केवळ रूढी आहे की, त्यामागे काही शास्त्रीय दृष्टी आहे, वगैरे मुद्यांची चर्चा चतु:शाखीय ब्राह्मण सभेने केली पाहिजे आणि योग्य निष्कर्षाप्रत आले पाहिजे. माझी तर अशी सूचना आहे की, वेळात वेळ काढून या ब्राह्मण सभेने महिन्यातून एका निश्चित दिवशी आपली बैठक ठेवून समोर येणाऱ्या प्रश्नांचा ऊहापोह केला पाहिजे.

यजमान कसे आहेत हे सर्वांना माहीत आहे. पण पुरोहितांनी यजमानाच्या लहरीला बळी पडावयाचे की त्यांना त्यांच्या कर्तव्याची जाणीव करून द्यावयाची ? हे प्रेमानेही करता येऊ शकते आणि प्रारंभी तरी समजूतदारपणानेच सांगितले पाहिजे. पण यजमानाच्या हेकेखोरपणाशी तडजोडच करीत जावयाचे काय ? तशी सारखी तडजोड करीत असलेलेच पुरोहित अधिक संख्येत दिसले तर ते पुरोहितांविषयीचा सन्मान आणि श्रद्धा निर्माण करू शकतील काय, असा प्रश्न आहे.

विवाहाचेच उदाहरण घेऊ. यजमान पुरोहिताकडे येत असतो. त्याला मुहूर्त विचारीत असतो. विवाह–संस्कार संपादनासाठी त्याला पाचारण करीत असतो. त्याच वेळी पुरोहिताने धर्मशास्त्रदृष्टचा आणि कालसापेक्ष काय करणे आवश्यक आहे हे सांगितले पाहिजे आणि पुरेशा स्पष्टपणे सांगितले पाहिजे. जुन्या सर्व रूढी त्याने पाळल्या पाहिजेत असा आग्रह धरण्याचे कारण नाही. पण मुहूर्त सांभाळणे, संस्कृतीला साजेसा पोषाख असणे, मंगलाष्टके म्हणणे, सप्तपदी आदि विधींचा आग्रह असणे आणि सर्व नीट झाले पाहिजे याची जाणीव देणे आवश्यक नाही काय ? या संबंधीचा आग्रह नम्रपणे पण कणखरपणे सांगणे अशक्य आहे असे मला वाटत नाही. आणि चतुःशाखीय ब्राह्मण सभेने पूर्ण विचारान्ती सर्वानुमते या सर्व विधींतील किमान आवश्यकता निश्चित करून तसे सांगितले, तर संस्कारही चांगले होतील आणि यजमानही ते मान्य करतील अशी माझी कल्पना आहे.

पुरोहितवर्गाने मोठे क्रांतिकारी पाऊल उचलावे असे मला सुचवायचे नाही. ते त्यांच्या क्षमतेच्या पलीकडचे आहे. पण आपण जे विधी करतो त्यासंबंधी पुनर्विचार करण्याची गरज आहे हे त्यांनाही पटू शकेल असे वाटते. विवाहाचा मुहूर्त घटी पळासहित, तास मिनिटे सांगून ठरविला आणि कळविला जातो. हा मुहूर्त कशाचा ? मंगलाष्टके म्हणण्याचा ? की ज्या विधीने विवाहाची सांगता होते त्याचा ? मंगलाष्टकावरून आठवण झाली. मंगलाष्टके ऐकताना मला नेहमी प्रश्न पडतो की ही कसली 'मंगलाष्टके' आहेत ? "रुक्मा पुत्र वडील त्यास पुसणे, कुर्यात् सदा मंगलम्" काही अर्थ आणि प्रयोजन आहे काय या श्लोकाचे ? की शार्दूलविक्रीडित वृत्त असले की झाले, मग काहीही म्हणा; असा हा खाक्या आहे ? चांगले उपदेशपर संस्कृत किंवा मराठी श्लोक काढणे किंवा नवे तयार करणे हे चतुःशाखीय ब्राह्मण सभेला अशक्य आहे काय ? आणि मंगलाष्टके कुणी म्हणायची ? भाषेची मोडतोड करून, वृत्तातील त्रुटी स्वराचा हेल काढून पूर्ण करून, पोरीबाळींनी गायिलेल्या गाण्यांना मंगलाष्टके कां म्हणायची ? ज्यांना आपल्या पोरीबाळींचे गायनकौशल्य उपस्थितांसमोर दाखवायचे आहे, त्यांनी त्यासाठी वेगळा कार्यक्रम आखावा; पण पुरोहितांचे जे काम आहे ते त्यांनाच करू द्यावे.

चतुःशाखीय वैदिक ब्राह्मण सभा हेही ठरवू शकते की मंगलाष्टकांची जरूरी नाही. माझ्या अल्प ज्ञानाप्रमाणे महाराष्ट्रीय समाजातच ही पद्धती आहे. विवाह हा एक सामाजिक विधी असल्यामुळे उपस्थितांसमक्ष उपस्थितांच्या वतीने काही आशीर्वादात्मक मंगल पद्यांचे गायन करावयाला हरकत नाही. त्या दृष्टीने मग कुणीही मंगलाष्टक म्हणावे; त्यावेळेस पुरोहिताच्या उपस्थितीचीही आवश्यकता असण्याचे कारण नाही. तो उपस्थित असेल तर तोही मंगलाशीर्वाद

देईल. परंतु विवाहाची संस्कारमयता, शुचिता आणि सामाजिक कर्तव्यशीलता सांगणारे होम–सप्तपदी इत्यादी जे विधी आहेत आणि त्या विधींचे जे मंत्र आहेत त्यांना खरे महत्त्व दिले गेले पाहिजे. त्या वेळी बाहेरची नसली तरी घरची सर्व मंडळी हजर असली पाहिजे. हा विधी थोडा ठेवा, अर्ध्या तासाचा ठेवा, पण त्या तेवढ्या वेळासाठी सर्व कुटुंबियांच्या समक्ष त्या पवित्र आणि आशय-गर्भ मंत्रांचा उच्चार झाला पाहिजे. येथे खरे म्हणजे ध्वनिवर्धकाची आवश्यकता आहे. मंत्रांचा अर्थ या वेळी सांगितला गेला पाहिजे. कचेरीत जाणाऱ्या लोकांसाठी पाने मांडण्याच्या घाईत हा विधी बुडवून टाकला जाऊ नये. मुहूर्त हवा असेल तर या विधीसाठी मुहूर्त घ्या. परस्परांना हार समर्पण करणे आणि अभ्यागतांना पानसुपारी देणे यासाठी मंगल मुहूर्ताची आवश्यकता कोणती याचा विचार ब्राह्मण सभेने केला पाहिजे. यासाठी आवश्यकता असेल तर पुरोहितवर्गाच्या बाहेर असलेले धर्मशास्त्राचे वेत्ते आणि धर्मचिंतक यांना पाचारण करून त्यांनाही आपल्या विचारमंथनात सामील केले पाहिजे. असा आचारधर्म निश्चित करणे अशक्य आहे, असे मला वाटत नाही.

आपले धर्मशास्त्र केवळ ब्राह्मणांसाठी नाही, सर्वच हिंदूंसाठी आहे; याचेही भान ठेवावे लागेल. सप्तपदी आदि जे विधी आहेत आणि जे झाल्या-शिवाय विवाह संपन्न झाला असे शास्त्र आणि कायदा दोन्ही मानीत नाहीत ते विधी सर्व जातीजमातींमध्ये कसे होतील याचाही विचार या सभेने केला पाहिजे. ही सभा असे काही करील तर ती भोंगळ आणि अव्यवस्थित बनलेल्या आपल्या अनेक विधींना कालसापेक्ष असे शुद्ध व पवित्र स्वरूप पुनः प्राप्त करून देऊ शकेल.

काही पत्रांमध्ये दक्षिणेचा विषय मांडला गेला. विषय महत्त्वाचा आहे. पुरोहितांनाही गृहस्थधर्म आहे, संसार आहे काळानुरूप त्यांना पुरेशी दक्षिणा दिली पाहिजे. ब्राह्मणसभेने या बाबतीतही दंडक घालून द्यावेत आणि सर्व पुरोहितांनी त्यांचे पालन करावे. यात कसलाच कमीपणा नाही. तिरुपतीसारख्या तीर्थक्षेत्रीही दक्षिणेचे दर ठरविलेले आहेत त्यामुळे त्या तीर्थक्षेत्रांचे महत्त्व कमी झाले नाही. उलट व्यवस्थितपणा आला आहे. वैदिक सभेने जे किमान दर ठरविले तेवढे देण्याची कुणाची ऐपत नसेल तर पुरोहिताने ते काम निःशुल्क करण्यालाही हरकत नाही. यात त्याचा मोठेपणा गरीब यजमानाच्या मनावर अंकित होईल. पुरोहितवर्ग अंतःकरणाने शुद्ध, बाह्य दर्शनाने स्वच्छ, धार्मिक विधींचा मर्मज्ञ, नम्र पण लाचार नसलेला असावा. असा पुरोहित वर्ग स्वतःची प्रतिष्ठा तर सांभाळीलच पण धर्माचीही प्रतिष्ठा वाढवील.

२८–३–८२

# संपादकाची कसरत !

वृत्तपत्राचा आणि विशेषत: दैनिक वृत्तपत्राचा संपादक होणे ही अनेकांना स्पृहणीय बाब वाटते. संपादकाचे नाव रोज वर्तमानपत्राच्या अग्रभागी छापले जाते, याचे तर लोकांना आकर्षण वाटत नसेल, असे मला कधी कधी वाटते. आपले नाव वर्तमानपत्रात छापून येण्याचा आनंद मी अनुभवला आहे म्हणून मी वरील विधान करतो. मॅट्रिकच्या गुणवत्तायादीत आलेले माझे नाव प्रथम मी वर्तमानपत्रात वाचले, त्याचा मलाच काय पण माझ्या वडिलांना, इतर नातलगांना किती आनंद झाला म्हणून सांगू ! नंतर काही वर्षेपर्यंत दर दोन वर्षांनी माझे नाव या बाबतीत वर्तमानपत्रात येत गेले आणि मग मलाही वाटू लागले की, आपणही काही आहोत ! अगदी थोडे अपवाद सोडले, तर सगळ्यांनाच आपल्या नावाची अक्षरे वृत्तपत्रात वाचण्यात आनंद होत असावा असे मी समजतो. एखाद्याची स्मशानयात्रा निघाली असेल, तर त्या यात्रेत सामील होणाऱ्या ज्या भाग्यशाली लोकांची नावे दुसऱ्या दिवशीच्या वर्तमानपत्रात झळकतील, त्यांत आपलेही नांव असावे असे वाटणारे काही लोक नक्कीच असतात; आणि तेथे उपस्थित असलेल्या पत्रकाराच्या नजरेत भरण्यासाठी त्यांचा प्रयत्नही असतो, हे कोणीही पत्रकार सांगेल.

नुसते छापलेले नाव पाहण्याचा एवढा आनंद, तर नावाबरोबरच आपली छबी पाहण्याचा आनंद किती असेल, याचे त्रैराशिक कोणीही काढून घ्यावे. चक्क पैसे देऊनसुद्धा फोटो छापवून घेणारे असतात. पण यांत त्यांचा दोष नाही. मनुष्यस्वभाव आहे तो. रोज आपले नाव छापून येईल म्हणून तर लोकांना संपादकाची स्पृहा वाटत नसेल ? कदाचित तसे असेलही ! पण मला सांगावयाचे आहे की, बाबांनो, एवढ्याने भुलू नका. नाव छापून येण्याचा आनंद क्षणजीवी असतो त्या पदाच्या वेदनापुंजात तो कुठल्याकुठे हरवून जाईल.

संपादकाला लोक खूप मानतात, याबद्दलही या पदाचे आकर्षण असावे. आता लोक खरेच मानतात की नुसता देखावा करतात कोण जाणे ! मला स्वत:लाच भाषणाची, उद्घाटनाची, अध्यक्षपदाची किती तरी निमंत्रणे येतात. ती काय मी फक्कड वक्ता आहे म्हणून ? मी कसा भुक्कड आणि कंटाळवाणा वक्ता आहे, हे मला चांगले माहीत आहे. तरी पण लोक बोलवतातच. माझा तर्क

आहे की, संपादक कार्यक्रमाला आले म्हणजे आपल्या कार्यक्रमाची बातमी चांगली झक्कपैकी दुसरे दिवशीच्या वृत्तपत्रात येईल असे त्यांना वाटत असावे. मी हा त्यांचा डाव ओळखत नाही, असे नाही. म्हणून मला जायचे नसले म्हणजे मी म्हणतो की, "काही काळजी करू नका. आपल्या कार्यक्रमाचे वृत्त उद्या छापून येईल." अनेक लोकांचे या दिलाशाने समाधान होतेही. पण काही जण एवढे सरळ नसतात आणि आग्रहच धरतात की, "नाही, नाही; तसं काही नाही ! आपणच आले पाहिजेत ! वृत्त छापून आले नाही तरी चालेल, आपण हवेत !" आणि मग हा आग्रह आम्हा लोकांना मोडवत नाही आणि अस्मादिक कधी अध्यक्ष, कधी मुख्य पाहुणे, कधी उद्घाटक म्हणून मिरवून घेतात. या मिरविण्याचाही एक आनंद असतो. मुख्य म्हणजे गळयात एक हार पडतो. अनेकांच्या गळयात आयुष्यात फक्त एकदाच हार पडतो. पण त्यानेही ते किती हरखून जातात ! मला काही ब्रह्मचाऱ्यांची जी कधी कधी कीव येते, ती त्यांनी बिचाऱ्यांनी हाही एकमेव आनंद गमावला म्हणून ! मी खरे सांगतो, मला स्वतःला हार घातला की बरे वाटते. तो गळयातच राहू द्यावा असेही वाटते. पण आपल्याकडे हाराकडे भलत्याच तुच्छतेने पाहण्याची सार्वजनिक प्रथा आहे हार गळयात घातला की जणू काही साप गळयात घातला असे भासवून काय झटक्याने हार गळयाबाहेर काढतात ! मला हे आतून मुळीच पसंत नसते. पण करता काय ? जनरीतीपुढे मान वाकवावी आणि हारातून काढावीच लागते. या बाबतीत गोरे इंग्रज साहेब आणि कीर्तनकार यांचा मला मोठा हेवा वाटतो. कारण ते दोघेही, त्यांना हार घातला की, कार्यक्रम संपेपर्यंत कधी काढीत नाहीत.

पण मी भलतीकडेच भरकटत गेलो ! तर मुद्दा काय की, संपादकाला खूप मान मिळतो, असे लोकांना वाटते ! त्याच्या सर्वगामी विद्वत्तेबद्दल तर कोणाच्याही मनात (त्याच्या हाताखालचे संपादक सोडून) संशय नसतो. कुटुंबनियोजनापासून अद्वैतापर्यंत आणि अर्थसंकल्पापासून तो आंतरजातीय विवाहापर्यंत कोणताही विषय असो, संपादकाची चपल लेखणी अकुतोभय संचार करीत असते. रोज कसे तुम्ही लिहिता हो, कोठून सगळे संदर्भ आणता हो, काय तुमची स्मरणशक्ती हो, असे अभिप्राय ऐकले की आम्हा लोकांची छाती कशी फुगून येते ! या संबंधी काही चिकित्सक प्रश्नही विचारतात; पण आम्ही आमचे व्यवसायगुपित कधी सांगत नाही. हो, आपल्या विषयीच्या आदराच्या सिंधूतून एकही बिंदू कमी होऊ देणे आम्ही कसे सहन करू ?

संपादकाच्या जीवनाची ही रुपेरी बाजू पाहून लोकांना आपणही संपादक व्हावे, असे वाटले तर त्यात काय नवल ? तथापि, हे संपादकाच्या पदाचे "घी"

झाले; पण "बडगा" का एकदा कळला की मला नाही वाटत कोणी संपादक होण्याची इच्छा सुद्धामनात आणील.

पहिली गोष्ट म्हणजे, संपादक व्हावयाचे असेल तर शिव्या खाण्याची तयारी असली पाहिजे. संपादक "मुर्दाबाद" (अर्थात त्याचे नाव घेऊन. उदाहरणादाखल "वैद्य मुर्दाबाद" म्हणा) अशी घोषणा ऐकून तुमचा जीव खालीवर होणार नसेल, तरच मी म्हणेन या वाटेला या. साधारणतः हा उपहार मुख्य संपादकाच्या वाट्याला येतो. तुमच्या वृत्तपत्रात थोडे जरी इकडे तिकडे झाले की अलिकडे "मुर्दाबाद" सुरू झाले म्हणून समजा ! आपण मेल्याची वार्ता पसरली, तर आपले आयुष्य वाढते, असे म्हणतात. या म्हणण्यावर माझा पूर्ण विश्वास आहे. आतापर्यंत मी दोनदा मरण पावलो होतो, हे माझ्या मित्रांना, आणि माझ्या घरच्या लोकांनाही माहीत आहे. एकदा तर चक्क दुखवटा व्यक्त करण्यासाठीही लोक येऊन गेले. किरकोळ प्रकृतीच्या मला जे मरण आले नाही, ते या वार्तांनी आणि "मुर्दाबादच्या" घोषणांनी माझे आयुष्य वाढल्यामुळेच होय, असे मी समजतो. आता "मुर्दाबाद"ही जरा सौम्य वाटू लागले आहे. त्यामुळे मुर्दाबादला दगडांची फोडणी मिळू लागली आहे. 'तरुण भारता'च्या कार्यालयाची इमारत पहा ना ! एकही काच राहिली नाही ! एकदा त्यांची बातमी न आल्यामुळे रागावलेले काही तरुण माझ्याकडे आले आणि मला म्हणाले, "आमच्या बातम्या येणार नसतील, तर आम्ही मोर्चा आणू." मी त्यांना म्हणालो, "अहो, आता मोर्चासाठी एकही काच शिल्लक राहिली नाही." त्यांनाही ते कारण पटले असावे ! कारण त्यांचा मोर्चा काही आला नाही ! संपादक बनू इच्छिणाऱ्यांनो, माझा आपणास उपदेश म्हणा, संदेश म्हणा आहे की, "दगडयुक्त फोडणीचे मुर्दाबाद सहन होत असेल, तरच या वाटेला जा." !

संपादकावर खुष असणारे लोक तुम्हाला कधी सापडावयाचे नाहीत. प्रत्येकाची काही ना काही तक्रार असते. बातमी आली नाही म्हणून तक्रार, छोटी आली म्हणून तक्रार, मोठे शीर्षक दिले नाही म्हणून तक्रार, या पानावर आली नाही म्हणून तक्रार, त्या पानावर आली नाही म्हणून तक्रार. सकाळी सातच्या सुमारास मला टेलिफोन आला की, मी नक्की समजतो की, कोणाची तरी तक्रार आहे आणि माझा अंदाज बहुधा खरा ठरतो. वृत्तपत्राच्याही काही आवडी-निवडी, पसंती-नापसंती असू शकतात, हे लोक विसरूनच जातात. विरोधी लोक तर त्याच्यावर वाटेल ते आरोप करतातच; पण ज्यांना अनुकूल ते पत्र लिहिते, तेही त्याच्यावर नाराज असतात. एखाद्याचा 'आजचा कार्यक्रम' छापला गेला नाही की त्याला आपला कोणी तरी शत्रू तेथे बसला आहे, असा भास होतो. नागपुरातील किती तरी चांगल्या संस्थांच्या आदरणीय प्रमुखांनी पुरेशा गांभीर्याने मला

विचारले आहे की, काहो आमचा कोणी दुष्मन तर तुमच्या संपादकीय विभागात नाही ना ? रूडॉल्फ जेक नावाच्या जर्मन संपादकाने, संपादकाच्या दयनीय अवस्थेचे मोठे झकास वर्णन केले आहे. तो लिहितो, "आम्ही (संपादक) नेहमी बळीचे बकरे असतो. आमच्यावर कोणीच खूष नसतो. आम्ही खूप प्रयत्न करतो. नाना प्रकारची माहिती डोक्यात साठवितो. रात्री उशिरापर्यंत जागून वाचीत असतो. उथळपणाचा आरोप न येऊ देता लवकरात लवकर आपल्या वाचकांच्या नजरेसमोर हजर व्हावे, म्हणून खूप धडपडत असतो. आठ तासांचे काम हा आमचा हक्कच नाही. सायंकाळी पत्नीबरोबर फिरायला जाणे आमच्या नशीबी नाही. निर्वासितांचे पुनर्वसन कसे होईल, गव्हाचे पीक कमी कां आले, दुष्काळाला कसे तोंड द्यावे, एक ना अनेक प्रश्नांची आम्ही काळजी करतो. पण आमचे आभार मानावे, असे कोणालाही वाटत नाही. आम्ही जेव्हा स्तुती करतो, तेव्हाच आमची काही कदर होते. ती आम्ही केली नाही, तर आमचे लिखाण म्हणजे वायफळ बकवास ठरते. आम्ही आपले थोडेसे ज्ञान दाखविले, तर बढाईखोर आणि जरा हलकेफुलके लिहिले तर पोकळ लिहिणारे, हा शेरा ठरलेलाच. आम्हाला उद्धट पत्रे लिहिण्याचा वाचकांचा जन्मसिद्ध अधिकार आहे. पण आम्ही मात्र सौजन्यानेच लिहिले पाहिजे. असा हा बळीचा बकरा, साऱ्या जगाकडून धमकाविला आणि ठणकाविला गेला, तरी पुन्हा स्वतःला परिश्रमाला जुंपून घेतो. त्याला हे माहीत असते की, पुनः दुसऱ्या दिवशीही त्याचा असाच पाठलाग आणि अशीच पारध होणार आहे, तरी त्याचा उत्साह कमी होत नाही."

रूडॉल्फ जेकचे हे वर्णन पुरेसे बोलके आहे. संपादकाला केवळ वाचकांचाच छळ सोसावा लागतो, असे नाही. त्याचे वार्ताहर म्हणून जे सहकारी असतात, तेही कधीकधी त्याची गंमत करीत असतात. वार्ताहरांना त्यांचा स्वतःचा राजकीय अथवा सामाजिक रंग असतो, तो वर्तमानपत्रांनाही लागतो, वार्ताहरांचेही रागलोभ असतात. ते त्यांच्या वृत्तांत प्रकट होतात. वार्ताहरांचे त्याच्या गावच्या एखाद्या कारकुनाशी जरी भांडण झाले, तरी जणू काही भारताचा पाकिस्तानने अपमान केला, अशा थाटाचे वृत्त तो पाठवून देतो. आणि ते वृत्त नीट संपादिले गेले नाही, तर मग मजाच मजा येते. वार्ताहरांची निवडणुकीतील गुंतवण अनेकदा तापदायक ठरते. वार्ताहरांची वृत्ते ते नाराज होणार नाहीत, अशा बेताने संपादिणे, त्यांना महत्त्वाची वाटणारी वृत्ते चिल्लर असली तरी त्यांचे महत्त्व मान्य करणे, आणि पुनः आपल्या पत्राची विश्वासार्हता कमी होऊ न देणे ही तारेवरची कसरत असते. एका वार्ताहराने त्याच्या गावी शिमग्याच्या दिवशी होणारे मूर्खांचे संमेलन ही सर्वात महत्त्वाची बातमी होय म्हणून आग्रहाने संपादकाला लिहिले; आणि आम्हास त्याचा मान राखावा लागला ! एखादा वार्ताहर

स्थानिक दडपणाने एखादे वृत्त पाठवून देतो. मग त्यालाच टोचणी लागते की आपण केले ते बरोबर नाही. मग तो तारेने कळवितो की, ते वृत्त छापू नका. वर पुन: गावात तो सांगावयास मोकळा असतोच की, "मी तर तुमच्या समोर पाठविले बुवा ! संपादकांनी छापले नाही तर मी काय करू ?"

जाहिरातदारांचा सासुरवासही कधीकधी संपादकाला सोसावा लागतो. पण वर्तमानपत्र जेवढे शक्तिशाली आणि जेवढे मोठे, तेवढा यांचा त्रास संपादकाला कमी पण लहान वर्तमानपत्रांना, जेथे मालक, संपादक वगैरे एकच किंवा एकाच कुटुंबातील व्यक्ती असतात, तेव्हा हे दडपण जाणवते. आपण जाहिरात देतो म्हणजे जणू काही वर्तमानपत्रावर उपकार करतो, अशी त्यांची भावना असते. एका यात्रा कंपनीच्या सहलीविरुद्ध यात्रेकरूने दिलेला मजकूर आमच्या वर्तमानपत्रात "वाचकांच्या मनोगतात" छापून आला. लगेच जाहिरातदार आला आणि म्हणाला, "साहेब, आम्ही तुम्हाला जाहिरात देतो. आणि तुम्ही आमच्या विरुद्ध लिहिता !" मी त्यांना म्हणालो, "आमचा पेपर लोक वाचतात म्हणून तुम्ही जाहिरात देता की नाही ? की तुम्ही दान म्हणून जाहिरात देता ?" त्यांना मुद्दा पटला असावा.

याचा अर्थ आम्ही कचेरीत काम करणारे संपादक अगदी निर्लेप असतो असा नाही. वेळ पाहून बदलणे हा आमच्यापैकी अनेकांचा धर्म असतो. आपल्या देशातील उदाहरण, गैरसमज नको म्हणून देत नाही. परदेशातील आणि तेही जुन्या काळातील देतो.

१८१५ साली नेपोलियन एल्बा बेटातून सुटला. त्यावेळी नेपोलियनविरोधी सत्ता पॅरिसमध्ये राज्य करीत होती. नेपोलियन ९ मार्चला पॅरिसकडे निघाला. तेव्हापासून २२ मार्चला पॅरिसमध्ये त्याने प्रवेश करीपर्यंत "मॉनिटर" या दैनिकाने त्याच्यासंबंधी जी वृत्ते दिली, त्यांची शीर्षके अशी होती.

९ मार्च : रानटी पशूने आपली गुहा सोडली.
१० मार्च : सगळा फ्रान्स त्या राक्षसाचा तिरस्कार करतो.
११ मार्च : कॉर्सिकातील भुताने फ्रान्सच्या भूमीवर पदार्पण केले.
१३ मार्च : सैतानाने ग्रेनोबल (गांवाचे नाव) येथे रात्र घालविली.
१८ मार्च : हुकूमशाहा दिजॉनकडे कूच करीत आहे.
१९ मार्च : बोनापार्टची आकांक्षा पॅरिस जिंकण्याची आहे, पण त्याला यश मिळावयाचे नाही.
२० मार्च : बादशहा फॉन्टेनब्लू येथे पोहोचले.
२१ मार्च : मुक्तिदाता राजधानीच्या दाराशी येऊन पोहोचला.

२२ मार्च : महामहिम बादशहांनी पॅरिसमध्ये प्रवेश केला. बादशहा चिरायु होवो !

सत्ताधाऱ्यांना अर्घ्य वाहणारे जसे काही असतात, तसे त्यांचे केव्हाच काहीच चांगले नसते, असे सांगणारेही असतात. पण यांतही भगवान बुद्धाप्रमाणे "मध्यम मार्गाचा" अवलंब करणारे अधिक विश्वासार्ह मानले जातात !

संपादकीय विणीत मिस्किलपणाचा एक पदर अनेकदा असतो. गेल्या वर्षी 'एप्रिल फूलच्या' दिवशी आमच्या वृत्तपत्राने कर्तारसिंह थत्ते आणि बाइंडरकार तेंडुलकर यांची दिलजमाई झाल्याचे व तेंडुलकरांनी 'रुक्मिणी-स्वयंवरा'वर नाटक लिहिण्याचे कबूल केल्याचे वृत्त छापले. खाली 'एप्रिल फूल' सूचक वृत्तसंस्थेचे नाव दिले. पण या बातमीने अनेक लोक फसले. अनेकांची दोघांचेही अभिनंदन करणारी, तर काहींची तेंडुलकरांनी अशी शरणागती पत्करावयास नको होती, असा अभिप्राय देणारी पत्रे आली. 'न्यूयॉर्क टाईम्स'च्या एका वार्ताहराने एकदा एका धर्मगुरूची मजेदार टिंगल केली. स्वीडनमधून आलेले हे धर्मगुरू खूपच कर्मठ आणि वृत्तपत्रांविषयी तिरस्कार बाळगणारे होते. पत्रकाराला आपल्या जवळही ते फिरकू देत नसत, असा त्यांचा लौकिक होता. 'न्यूयॉर्क टाईम्स'च्या वार्ताहराने त्यांची भेट घेतली. वार्ताहराने अनेक प्रश्न विचारले, पण धर्मगुरूंचे मौन काही सुटले नाही आणि हुंकाराशिवाय दुसरा ध्वनी निघाला नाही. अखेरीस त्या वार्ताहराने, 'न्यूयॉर्कच्या आपल्या मुक्कामात आपण नाईट क्लबला भेट देणार काय ?' असा प्रश्न केला. त्यावर आपला चेहरा आश्चर्यांकित करून धर्मगुरू विचारते झाले, 'न्यूयॉर्कमध्ये नाईट क्लब आहेत ?' आपण वार्ताहराची चांगली जिरवली या आनंदात धर्मगुरू होते. पण दुसऱ्या दिवशी सकाळी त्यांनी न्यूयॉर्क टाईम्समध्ये बातमी वाचली, "अमुक अमुक स्वीडिश धर्मगुरू काल न्यूयॉर्कला आले. आल्यावर त्यांनी पहिला प्रश्न केला की, न्यूयॉर्कमध्ये नाईट क्लब आहेत काय ?" हे वृत्त वाचून त्या धर्मगुरूची काय स्थिती झाली असेल, याची कोणीही कल्पना करू शकेल.

वाचकांच्या उद्धट पत्रांचा वर उल्लेख केलाच आहे. एखादी ढोबळ चूक होऊ द्या की, तुमच्या ऑफिसात दारू पिऊन लोक काम करतात काय, असा सवाल करणारे पत्र आलेच म्हणून समजा. नाटकाचे परीक्षण नटाच्या पसंतीला आलेच पाहिजे, अशी त्याची अपेक्षा असते. एकदा एक खलनायकच घरी येऊन मला चांगलेच दटावून गेले. एका नाटकावर थोडी टीका झाली, तर लेखक बहुजनसमाजाचा म्हणून तुम्ही टीका केली, असा ठणका टेलिफोनवरून ऐकावा लागतो. कलावंतांचा क्रोध नेहमीच वरच्या पट्टीत असतो. मॅक्स रेगर नावाच्या

एका गायकाच्या गाण्यावर एका वर्तमानपत्रात खूप कडक टीका आली. दुसरे दिवशी रेगरने संपादकास पत्र लिहिले—

" प्रिय महाशय, सध्या मी माझ्या घरातल्या सर्वांत लहान खोलीत बसलो आहे. या क्षणी माझ्या गाण्यावरील आपल्या अभिप्रायाचा कागद माझ्या समोर आहे. पण लवकरच मी तो माझ्या मागे ठेवणार आहे."

असे हे संपादकाचे जीवन असते. त्याचे ताप आणि ताण पुष्कळच असतात. पण त्याची मजाही (थ्रिल) पुष्कळ असते. मजा हवी असेल तर ताप व ताण सहन करण्याची तयारी हवी. आणि त्यासाठी चांगली कसरत केली पाहिजे. ती जमली की, संपादकाला करावी लागणारी तारेवरची कसरतही जमेल. या कसरतीत एखादे वेळी तोल गेला, तर त्यात काय नवल ?

१९–५–७४

## सरकार आणि वृत्तपत्रे

नागपूरच्या आमच्या एका समव्यावसायिकाने होळीनिमित्त जी बिरुदे आणि पदव्या एकदा बहाल केल्या होत्या, त्यात मला " जनताचा मलिदा जनतालाच धत्तुरा " अशी पदवी दिली होती. होळीच्या पदव्या गांभीर्याने घ्यावयाच्या नसतात हे मला माहीत आहे. पण मौजेने का होईना, त्या दैनिकाने सत्य परिस्थितीच निवेदन केली होती. त्या पदवीचा, मी समजलो तो आशय असा की, तरुण भारताला, त्या वेळच्या जनता सरकारकडून मलिदा मिळतो आणि तरुण भारताचा संपादक मात्र जनता सरकारवरच टीका करतो. त० भा० ला जनता सरकारकडून मलिदा मिळाला की नाही, हा भाग बाजूला ठेवू; पण जनता सरकारवर त० भा० ने प्रसंगी टीका केलेली आहे, हे खरे आहे.

सरकारी मलिदा याचा अर्थ सरकारी जाहिराती असा असावा. तो मिळाला म्हणजे टीका बंद करावी काय ? सर्वसामान्य मानवव्यवहारात, जेव्हा व्यक्तीच्या गुणवत्तेपेक्षा तिला कुणाकडून अधिक वेतन मिळते किंवा इतरांवर अन्याय आणि या व्यक्तीच्या बाबतीत पक्षपात होऊन ते मिळते, तेव्हा ती व्यक्ती ' दात्याची ' लाचार बनते. पण जिला आपल्या गुणवत्तेची ग्वाही आणि विश्वास असतो ती व्यक्ती लाचार बनत नाही. कोणत्याच वृत्तपत्राने केव्हाही जाहिरातदारांचे लाचार बनू नये असे मला वाटते. मग तो जाहिरातदार सरकार का असेना ! यावर अधिक भाष्य न करणेच चांगले.

परवा विधिमंडळात महाराष्ट्राचे मुख्य मंत्री बॅ. ए. आर. अंतुले यांनी सरकारच्या जाहिरातधोरण संबधी निवेदन करताना असे विधान केले की, जी वृत्तपत्रे सर्वधर्मसमभाव आणि समाजवाद यांचा पुरस्कार करतील, त्यांनाच सरकार जाहिराती देईल. अंतुलेसाहेबांचे हे धोरण चुकीचे आहे असे मला वाटते. सर्वधर्मसमभाव आणि समाजवाद या तत्त्वांबद्दल माझा आक्षेप नाही. मी कट्टर हिंदू असल्यामुळे, सर्वधर्मसमभाव ही माझी जीवननिष्ठा आहे, राजकारणाच्या अपरिहार्यतेतून मान्य केलेली ती बाब नाही. आणि समाजवादाचे इतके अर्थ आणि इतक्या तऱ्हा आहेत की, आपल्या सोयीचा अर्थ आणि सोयीची तऱ्हा निवडून समाजवादाचा पुरस्कर्ता म्हणून घ्यायला माझी हरकत नाही. माझ्या हरकतीचा मुद्दा वेगळा आहे. जे लोक सर्वधर्मसमभाव आणि समाजवाद मानीत नाही, किंवा श्री. अंतुले म्हणतात, तसा त्यांचा पुरस्कार करीत नाहीत, त्यांच्याजवळून सरकार कर घेणार की नाही ? यांना सरकारने तयार केलेल्या सडकांवरून चालता येईल की नाही ? सरकारच्या मालकीच्या आगगाड्यांमध्ये आणि बसगाड्यांमध्ये बसता येईल की नाही ? रेशनचे धान्य आणि सरकारी डेअरीतील दूध त्यांना घेता येईल की नाही ? हे जर त्यांना करता येत असेल, आणि या सर्वांवर नागरिक म्हणून त्यांचा हक्क असेल, तर नागरिकांना माहिती पुरविणारी वृत्तपत्रे म्हणून सरकारी जाहिरातीवरही त्यांचा हक्क राहील. कारण जनतेकडून कररूपाने वसूल केलेल्या पैशातून जाहिराती दिल्या जातात, कुणाच्या खिशातून नव्हे; आणि त्या करात, सर्वधर्मसमभाव आणि समाजवाद यांचा पुरस्कार न करणाऱ्या व्यक्तीचाही वाटा असतो.

सर्वधर्मसमभाव आणि समाजवाद ही आपल्या संविधानाने मान्य केलेली तत्त्वे आहेत, हे खरे. पण त्यांचा पुरस्कार न करणे हा जोपर्यंत गुन्हा ठरविला जात नाही, तोपर्यंत व्यक्ती असो वा वृत्तपत्र, गुन्हेगार ठरत नाही. आणि म्हणून त्याला जाहिराती नाकारण्याचा दंड कोणत्याही शासनाला देता येणार नाही. एखादे शासन असा दंड ठोठावील, तर ते नैतिक आणि वैधानिक अशा दोन्ही दृष्टींनी अपराध करीत आहे असे म्हणणे भाग आहे. सरकारी जाहिरात हे आमिष असू नये. सरकारी जाहिरात हा चाबूकही असू नये. सरकार कोणत्याही पक्षाचे असो आणि ते चालविणारी मंडळी कोणीही असोत, जे चाबूक आणि / किंवा प्रलोभन म्हणून जाहिरातीचा उपयोग करतात, ते दोषार्ह आहेत याविषयी माझ्या मनात संशय नाही.

वृत्तपत्राचा मुख्य संपादक आणि त्याचे संचालक यांना राजकीय मते असतील. त्याचे प्रतिबिंब त्यांच्या वृत्तपत्रात पडणे स्वाभाविकच आहे. पण वृत्तपत्राने आपल्या मताचा राजकीय पक्ष आणि आपल्या मताच्या राजकीय पक्षांचे

सरकार असा फरक आणि विवेक केला पाहिजे, असे मला वाटते. आपल्या आवडीचा पक्ष चुकला, तर त्याची चूक सांगण्याचे कर्तव्य वृत्तपत्राने केले पाहिजे. अशी चूक दाखविली म्हणून ज्या पक्षाचा रोष त्या वृत्तपत्रावर होईल, त्या पक्षाचे स्वत:ला म्हणविणे गौरवाचे नाही असे त्या वृत्तपत्राने मानले पाहिजे. मागे विधान मंडळाचे नागपूरला अधिवेशन चालू असताना मुख्य मंत्री श्री. वसंतराव नाईक यांना विरोधी पक्षाच्या आमदारांनी विधानभवनात घेराव केला. या घेरावात, त्या वेळी मी स्वत: ज्या भारतीय जनसंघाचा सदस्य होतो, त्याच्या आमदारांनीही भाग घेतला होता. मी त्यावर 'तरुण भारता'तून टीका केली. नंतर भारतीय जनसंघाचे काही आमदार माझ्याशी चर्चा करावयाला आले. मी त्यांना सांगितले की, विधानभवनात वापरावयाची शस्त्रे वेगळी आहेत. त्यांचाच आपण वापर केला पाहिजे. 'घेराव' हे त्यातले शस्त्र नव्हे. कदाचित् बाहेर त्या शस्त्राचा उपयोग वैध ठरेल. माझी अशी समजूत आहे की त्यांना माझा दृष्टिकोण समजला असावा. कदाचित् पटलाही असेल. पण त्यांना पटो वा न पटो, असे सांगण्याचे धैर्य संपादकाच्या ठिकाणी असले पाहिजे.

सरकारसंबंधी तर अधिक काटेकोरपणे, अधिक कठोरपणे पाहणे वृत्तपत्रांना जमले पाहिजे. कारण एकतर सरकार व्यक्तिनिरपेक्ष (impersonal) असते, निदान असले पाहिजे, आणि दुसरे म्हणजे ते सर्व जनतेचे सरकार असते. आपण साध्या व्यावहारिक भाषेत, सरकार काँग्रेसचे, सरकार जनताचे, सरकार कम्युनिस्टाचे असे म्हणत असलो, तरी ते संपूर्ण जनताचे अथवा कम्युनिस्टांचे – अशी विशेषणे त्या त्या सरकारांना "प्राधान्येन व्यपदेशा:" या न्यायाने लागतात, असे आपण मानू. पण त्याचे शासन, जे काँग्रेसचे नाहीत, जे जनताचे नाहीत, जे कम्युनिस्ट नाहीत, त्यांच्यावरही चालत असते. म्हणून कोणत्याही सरकारशी ते आपल्या पक्षाचे असले तरी, वृत्तपत्रांची एकरूपता असता कामा नये. अंतुलेसाहेब सरकारी वृत्तपत्र काढणार आहेत, अशी वार्ता आहे. ते वृत्तपत्र, खऱ्या अर्थाने 'सरकारी' असेल, तर त्याला 'गॅझेट'शिवाय वेगळे मूल्य राहणार नाही आणि ते गॅझेट नसेल, तर ते पुरेसे सरकारी राहणार नाही. वृत्तपत्रांचे कर्तव्यच मुळी सरकारच्या चुका दाखविणे हे आहे. एक प्रकारचे विरोधी पक्षाचेच काम ती करीत असतात. फरक करायचा झाला तर असे म्हणता येईल की, वृत्तपत्रातील विरोध हा नित्य, अधिक विधायक आणि स्वार्थनिरपेक्ष असतो. विधिमंडळातील विरोधी पक्षाला सरकारला नामोहरम करून त्याची जागा घ्यावयाची असते. वृत्तपत्रकांना तो स्वार्थ नसतो. ती सत्ता प्राप्त करण्याच्या बाबतीत अगदी निरपेक्ष असतात. सरकार चालविणाऱ्या पक्षाची

प्रतिस्पर्धी नसतात. त्यामुळे सरकारचे चांगले पहावयाचेच नाही, ही वृत्तपत्राची नीती असू शकत नाही. पण वृत्तपत्राने त्याचे वाईट झाकण्याचेही कारण नाही. वृत्तपत्रे Critical झाली पाहिजेत पण Cynical नकोत. या अर्थाने तो विधायक विरोधाचे कार्य करीत असतात. ती सत्ताकांक्षी नसल्यामुळे, त्याच्या विरोधाला विधायकतेची बाजू असते. हे सरकारने समजून घेतले पाहिजे.

बिल मॉयर्स हा अमेरिकेच्या अध्यक्षांचा काही दिवस प्रेस सेक्रेटरी होता. नंतर त्याने स्वतःचे वृत्तपत्र काढले. सरकार आणि वृत्तपत्रे यांच्या संबंधात एका सेमिनारमध्ये त्याने केलेले भाषण मोठे मार्मिक आहे. त्याने वृत्तपत्रांनाही कान-पिचक्या दिल्या आहेत. पण सरकार कसे वागत असते हेही सांगितले आहे. तो म्हणतो, 'मी शासनाचे समर्थनच करायचे ठरविले तर न्यायाधीशाने ज्युरींना आरोपी निर्दोष आहे असे सांगण्याला बाध्य करण्यासारखे ते ठरेल. त्याचे मूळ वचन असे आहे :

If I were to defend the administration and my work at the White House, I would be in the position of the foreman of the jury charged by the judge to bring in a not guilty verdict in the case of a young man arrested for the theft of an automobile. " Your honour ", the foreman announced dutifully " we find the boy who stole that car not guilty." आपल्या अनुभवसंपन्न निवेदनाच्या शेवटी मॉयर्स लिहितो,

" Some Presidents have regarded the press as an instrument of goverment, not an independent arm of the people. Some have been eager to woo the press, others to criticize it. Some have wished to make cronies of reporters, others to make cheer leaders of them. Modern Presidents have realized that they can never govern unless they learn to reach the people through the mass media, and wise ones have discovered how to go through or over the press to the people.

What the press and the Government should seek from each other is a mutual nonpoaching agreement.

For the press and the government are not allies. They are adversaries. That should be repeated. They are adversaries. Each has a special place in our scheme of things. The President was created by the Constitution and the press is protected by the constitution–the one with the mandate to conduct the affairs of state, the other with the privilege of trying to find out all it can about what is going on–

How each performs is crucial to the working of a system that is both free and open but falliable and fragile. For it is the nature of a democracy to thrive upon conflict between press and government, without being consumed by it."

(अमेरिकेच्या काही अध्यक्षांना, वृत्तपत्रे म्हणजे लोकांची स्वतंत्र शक्ती आहेत असे वाटण्याऐवजी, ती सरकारची साधने आहेत असे वाटायचे. काही अध्यक्ष वृत्तपत्रांचा अनुनय करायचे; तर काही त्यांच्यावर टीका करायचे. काही अध्यक्ष, वृत्तपत्रांच्या रिपोर्टरांना आपले जिवलग मित्र बनविण्याचा प्रयत्न करायचे, तर काही त्यांना खुपमस्करे बनवायची कामना धरायचे. नवीन अध्यक्षांना हे जाणवले आहे की, प्रसारमाध्यमांच्याद्वारे जनतेपर्यंत पोचण्याशिवाय राज्य करणे शक्य नाही. त्यातले जे बुद्धिमान होते त्यांनी वृत्तपत्रांच्याद्वारे किंवा त्यांना बाजूला ठेवूनही जनतेपर्यंत कसे जावयाचे ते शोधून काढले. पण आज आवश्यकता अशी आहे की, वृत्तपत्रे आणि सरकार यांनी एकमेकांच्या क्षेत्रात शिरून वाटमारी करावयाची नाही असा अनाक्रमणाचा करार केला पाहिजे.

कारण, वृत्तपत्रे आणि सरकार परस्परांचे मित्र नाहीत. ते विपक्षी आहेत...मी पुन्हा सांगतो ते परस्परांचे विपक्षी आहेत. आपल्या व्यवस्थेत दोघांचेही विशेष स्थान आहे. अध्यक्षपद घटनेने तयार केले आहे, तर घटनेनेच वृत्तपत्रांनाही संरक्षण दिले आहे, एकाला राज्यकारभाराचा जनादेश मिळाला आहे, तर दुसऱ्याला हा कारभार कसा चालतो, हे जाणून घेण्याचा खास हक्क प्राप्त झाला आहे.

आपली व्यवस्था मुक्त आणि उघड स्वरूपाची आहे. तसेच ती स्खलनशील आणि नाजूकही आहे. म्हणून ती व्यवस्था नीट चालण्याच्या बाबतीत दोघांनाही महत्त्वाची भूमिका बजावायची आहे. सरकार आणि वृत्तपत्रे यांच्यातील विवादाने आणि संघर्षाने भस्मसात् न होता, उत्कर्ष करीत जाणे हा लोकशाहीचा स्वभाव आहे.) हा लोकशाही मान्य असेल, तरच सरकार व वृत्तपत्रे यांच्यातील हा संबंध मान्य होईल. लोकशाहीच्या नावाखाली ज्यांना सरंजामशाही चालवायची आहे, त्यांना हे संबंध पसंत पडायचेच नाहीत.

१२-४-८१

## धर्माचरण कशाला म्हणावे?

जगात आल्यानंतर आणि आजूबाजूला पाहिल्यानंतर चार गोष्टी आपल्याला दिसतात. पहिली गोष्ट म्हणजे 'मी'. नास्तिकातला नास्तिक माणूस

घेतला तरी तो 'मी'चे अस्तित्व नाकारीत नाही. पण जगात 'मी'च केवळ असतो, असे नाही. माझे कुटुंब असते, शेजार असतो, गाव असतो, जिल्हा असतो, प्रांत असतो, देश असतो आणि त्याच्यापुढे पृथ्वी असते. हा नुसता भूगोल नसतो. तर त्या भूगोलातील माणसे असतात. या माणसांचे म्हणजेच मानवसमाजाचे व्यक्तिजीवनाच्या संदर्भात महत्त्व कोणी भलेही नाकारो, पण त्याचे अस्तित्व कोणी नाकारीत नाही. म्हणजे दोन बिंदू पक्के झाले. (१) मी–यालाच शास्त्र व्यष्टी म्हणते आणि (२) मानवसमाज–यालाच शास्त्र समष्टी म्हणते.

पण जग येथे संपत नाही. या दोन बिंदूंच्या पलीकडे पशु आहेत, पक्षी आहेत, नद्या आहेत, पर्वत आहेत, झाडे आहेत, फळे–फुले–पाने आहेत. यांचेही अस्तित्व मान्य केले जाते. या बिंदूचे नाव आहे सृष्टी. पण विश्व येथेही पूर्ण होत नाही. आपले जे थोरपुरुष होऊन गेले, विचारवंत होऊन गेले, त्यांनी आणखी एक चौथा बिंदू मानला. त्याचे नाव आहे परमेष्टी. परमेष्टी म्हणजे चैतन्य. अशी एक वेळ येते की, जेव्हा माणसाचे सारे अवयव जागच्या जागी असतात; कान असतात, डोळे असतात, हातपाय असतात; पण कान ऐकू शकत नाहीत, डोळे पाहू शकत नाहीत. हात–पाय तो हलवू शकत नाही. लोक म्हणतात याच्यातले चैतन्य गेले. आता हा घरात ठेवण्याच्या लायकीचा राहिला नाही. याला मसणात न्या आणि जाळा, नाही तर गाडा. ज्या शरीरावर त्या व्यक्तीच्या पत्नीने म्हणा किंवा पतीने म्हणा, उत्कट प्रेम केले असते, ज्या शरीराला कवटाळिले असते, ज्या शरीराच्या सुखाचा भोग घेतलेला असतो, त्याच शरीराला ती किंवा तो आता भीत असतो. शंकराचार्यांनी म्हटले आहे, "गतवति वायौ देहापाये भार्या बिभ्यति तस्मिन् काये"–म्हणजे 'वायु' निघून गेल्यानंतर पत्नी देखील त्या शरीराला घाबरते. हे जे आपल्या शरीरात चैतन्य आहे, ते संपूर्ण विश्वात, चराचरात व्यापून असलेल्या चैतन्याचाच अंश आहे. हे सर्वव्यापी चैतन्य म्हणजे परमेष्टी.

म्हणजे चार बिंदू झाले. (१) व्यष्टी म्हणजे व्यक्ती (२) समष्टी म्हणजे समाज (३) सृष्टी–म्हणजे सभोवतालचे मानवेतर जग, आणि (४) परमेष्टी–म्हणजे या सर्वांत व्याप्त असलेले आणि तरीही त्याच्यापेक्षा जास्त असलेले चैतन्य. या प्रत्येक बिंदूचे एक वर्तुळ कल्पिले, तर असे दिसून येईल की, नंतरचे प्रत्येक वर्तुळ पूर्वीच्या वर्तुळाला अंतर्भूत करते आणि तरी त्याच्याही पलीकडे असते. म्हणजे समष्टीचे वर्तुळ व्यष्टीच्या वर्तुळाला आपल्यात समाविष्ट करते आणि त्यांच्यापलीकडे असते. सृष्टीचे वर्तुळ त्या दोन्ही वर्तुळांना आकळते आणि त्यांच्याही पलीकडे असते. परमेष्टी या तिघांनाही आकळतो आणि तरी त्यांच्याही वर असतो. या चार बिंदूंना जोडणारा पूल किंवा या चारांचे अनुसंधान ठेवणारे

सूत्र म्हणजे धर्म. 'धर्म' म्हणजे धरून ठेवणारा – तो या चार बिंदूंना धरून ठेवतो. धर्म म्हणजे धारणा करणारा – तो या चार अस्तित्वांची धारणा करतो. धर्माचरण म्हणजे या चार बिंदूंशी संबंध ठेवील असे आचरण.

आपण घरी विहीर बांधतो, आपल्याला पाणी प्यायला मिळावे म्हणून. यात फक्त व्यष्टीची आवश्यकता जागलेली असते. पण हे विहीर बांधणे म्हणजे धर्म नव्हे. कोणी सार्वजनिक स्थळी विहीर बांधतो. कारण त्याला वाटते, माझ्या विहिरीचे पाणी मला घरी मिळाले. पण इतरांनाही ते पाणी मिळाले पाहिजे. म्हणून घराच्या बाहेर तो विहीर बांधतो. ही विहीर समाजाकरिता असते, त्या विहिरीला जोडून तो एक टाके बांधतो. त्या टाक्यात पाणी भरून ठेवतो. येता जाता गाई बैल, आदी प्राणी त्यातील पाणी पितात. म्हणजे ती व्यक्ती अशा रीतीने समष्टीशी आणि सृष्टीशी आपला संबंध जोडते. म्हणून सार्वजनिक विहीर बांधणे हे धर्माचरण आहे.

माझ्या घरी मी देवपूजेसाठी एखादी खोली बांधतो. म्हणजे मी माझा परमेष्टीशी संबंध जोडण्याचा प्रयत्न करतो; पण हा धर्माचा छोटासा अंश झाला. पण त्याला वाटते, माझ्या मानवबांधवांनाही असेच एखादे पवित्र आणि स्वच्छ स्थान असले पाहिजे. तो एखादे मंदिर बांधतो. किंवा कोणी बांधीत असेल, तर फूल ना फुलाची पाकळी म्हणून आपले धन देतो किंवा श्रम देतो. तोही समष्टीशी आणि परमेष्टीशी आपला संबंध जुळवीत असतो. म्हणून मंदिर बांधणे, ते बांधण्यासाठी मदत करणे हे धर्माचरण होय.

आपण झाडे लावतो, झाडांना पाणी घालतो, त्याचे रक्षण व्हावे म्हणून त्याची काळजी घेतो. यात स्वार्थ असतो, नाही असे नाही. पण यात सृष्टीचीही काळजी असते. नदी म्हणजे काय तर केवळ पाण्याचा प्रवाह आणि पाणी म्हणजे ऑक्सिजन व हायड्रोजन या वायूंच्या संयोगाने बनलेला पदार्थ ! पण या भावनेने आपण नदीकडे पाहात नाही. नदी आपल्याला जीवनदात्री वाटते. अगदी आपल्या जन्मदात्री आईसारखी म्हणून तिला आपण लोकमाता म्हणतो. गाय म्हणजे एक पशूच. पण या पशूच्या ठिकाणी आपली आदरभावना इतकी उच्च-कोटीची होते की, आपण तिला गोमाता म्हणतो. नदीसारख्या जड पदार्थाला लोकमाता म्हणणे किंवा गाईसारख्या पशूला गोमाता म्हणणे म्हणजे 'सृष्टी' म्हणून ज्या बिंदूचा वर उल्लेख केला, त्यांच्याशी आपले घनिष्ठ नाते जोडणे होय. आणि नातेही कसे, तर माता-पुत्राचे. या नदीत आपल्याला उतरता आले पाहिजे, स्नान करता आले पाहिजे, तिचे पाणी आपल्याला मिळाले पाहिजे, म्हणून त्या नदीच्या पाण्यात उतरण्यासाठी कोणी घाट किंवा पायऱ्या बांधतो. या घाटालाच

संस्कृत भाषेत "तीर्थ" म्हणतात. आपण म्हणतो तीर्थ पवित्र असते. तीर्थस्नान करावयास गेलो, पुण्य पदरी पडले. हे असे कां?—तर आपण सृष्टीशी जिव्हाळचाचा संबंध जोडला म्हणून.

सृष्टीकडून आपण सेवा घेतो. ती केवळ आपल्या स्वतःच्या कल्याणासाठी नसते. समाजाच्या कल्याणासाठी ती सेवा असते. पण अशी सेवा घेताना आपण सृष्टीवर बलात्कार मात्र करता कामा नये. सृष्टी म्हणजे आपला शत्रू, आणि तिच्यावर आपल्याला कब्जा मिळवायचा आहे, किंवा सृष्टी म्हणजे एक परकीय वस्तू आणि तिला गुलाम करायचे आहे, आपल्या सेवेत जुंपावयाचे आहे, असे आपण मानीत नाही. मानूही नये. पाश्चात्त्य लोक 'कॉंक्वेस्ट ऑफ नेचर' (Conquest of Nature) म्हणतात. म्हणजे निसर्गावर त्यांना विजय मिळवावयाचा आहे. तो मिळाला की त्यांची छाती अभिमानाने फुलते. हा विजय कशासाठी? निसर्ग आपल्या सेवेत यावा म्हणून. आपल्याकडे या वृत्तीला 'राक्षसीपणा' म्हटला आहे. रावणाच्या घरी म्हणतात, सूर्य, चंद्र, वायू सारे नोकरीला होते. पण रावण आपला आदर्श नव्हे. आपला आदर्श सृष्टीशी नाते जोडणारा आहे. म्हणून वृक्षांची होणारी बेछूट कत्तल हा अधर्म आहे. निसर्गाला जिंकण्याच्या जोशात आपण करीत असलेले प्रदूषण हा अधर्म आहे. धर्म मानवकल्याणासाठी आहे. अधर्म मानवाच्या अहिताचा आहे. अधर्म कदाचित व्यक्तीचा तात्पुरता फायदा करूनही देईल. पण तो मानवाच्या अहिताचा असल्यामुळे अंततोगत्वा तो व्यक्तीचाही नाश करणाराच ठरेल. जे फक्त आपला विचार करतात; समाजाचा किंवा सृष्टीचा विचार करीत नाही, त्यांची आपल्या परमपवित्र भगवद्गीतेत फार कठोर शब्दात निंदा केली आहे. भगवद्गीता म्हणते, "भुंजते ते त्वघं पापा, ये पचन्त्यात्मकारणात्"—म्हणजे जे फक्त स्वतः-करिता अन्न शिजवितात, ते अन्न भक्षण करीत नाहीत; ते पाप भक्षण करतात.

म्हणून धर्माचा पहिला प्रारंभ, धर्माचरणाची पहिली पायरी, धर्माचरणाचा पहिला पाठ, समष्टीशी म्हणजे समाजाशी आपला संबंध जोडणे हा आहे. पुष्कळांना असे वाटते की एकदम परमेष्टीशीच आपला संबंध जोडावा. ते खूप लांबलचक देवपूजा करतील पण इकडे आपल्या व्यापारात, उद्योगात लोकांच्या माना मुरगाळतील. आपल्या सार्वजनिक व्यवहारात पैशाचे अपहरण करतील. चोरी करतील. अशांच्या बाबतीत आपण नक्की समजावे की ती देवपूजा धर्माचरण नव्हे. तो एक दंभाचार झाला. समाजाशी संबंध जोडूनच, त्याच्या कल्याणाची चिंता बाळगूनच धर्माचे सूत्र पुढे नेता येईल. जे हा बिंदू सोडतात किंवा तोडतात, त्यांना पुढच्या बिंदूशी संबंध जोडता येणेच शक्य नाही.

असा आपला ‘ धर्म ’ शब्दाचा अर्थ आहे. या शब्दाला जगाच्या कोणत्याही भाषेत पर्याय नाही. कोणी त्याचा अनुवाद करूच नये. विशेषनामाचे जसे भाषांतर होत नाही, एखाद्याचे नाव ‘ वसंत ’ असले म्हणजे इंग्रजीत आपण त्यांचे नाव ‘ स्प्रिंग ’ असे सांगत नाही, त्याप्रमाणे ‘ धर्माचे ’ भाषांतर होत नाही. ‘ रिलीजन ’, ‘ मजहब ’ हे धर्माचे भाषांतर नव्हे, त्याच्या एका अंगाचे, त्याच्या एका बिंदूशी संबंध जोडण्याच्या व्यवस्थेचे ते नाव आहे. ‘ धर्म ’ स्वयंभू आहे, स्वतंत्र आहे, परिपूर्ण आहे. रिलिजन, मजहब, एकांगी आहेत. या धर्माच्या तटांच्या मर्यादांमधून आपल्या कामजीवनाचा, आपल्या अर्थजीवनाचा म्हणजेच आपल्या इहलौकिक सर्व जीवनाचा, राजकीय जीवनाचा सुद्धा, वैयक्तिक आणि सार्वजनिक जीवनाचा सुद्धा, प्रवाह वाहिला पाहिजे. ‘ प्रवाह ’ मी म्हणतो आहे. म्हणजे त्यात गतिमानता आहे. ते साचलेले जल नव्हे. जुने बिंदू वाहत जाणार आहेत, नवे त्यांना मिळत राहणार आहेत. असे सातत्य आणि गतिमानता त्यात राहणार आहे. आपल्या ऐहिक जीवनाचा–सतत बदलणाऱ्या जीवनाचा–प्रवाह या धर्मतटांमधून वाहिला पाहिजे. त्यानेच आपले जीवन सुखी होईल. समाजाचे जीवन सुखी होईल. सृष्टीचे कल्याण साधेल आणि अशा रीतीने निःश्रेयसाचेही आपण धनी होऊ. म्हणून तर ‘ यतोऽभ्युदयनिःश्रेयससिद्धिः स धर्मः ’–म्हणजे ज्यापासून अभ्युदय म्हणजे ऐहिक कल्याण व निःश्रेयस् म्हणजे पारलौकिक कल्याण साधते, तो धर्म होय, अशी धर्माची व्याख्या केलेली आहे.

धर्माचा ऐहिकाशी असलेला संबंध कधीही तोडता कामा नये. महाभारतात म्हटले आहे की, ‘ लोकयात्रार्थमेव धर्मस्य नियमः कृतः ’ म्हणजे ऐहिक लोकजीवनासाठी धर्माचे नियम केलेले आहेत. आपल्या साऱ्या सामाजिक, आर्थिक व राजकीय रचना, या धर्माचे अनुसंधान ठेवून केल्या पाहिजेत. या रचना परिवर्तनीय राहतील. कालांतराने कालबाह्य ठरतील. जाचकही ठरतील. त्या बदलविल्या पाहिजेत. त्या रचनेत गोळा झालेली जाळीजळमटी काढून रचना स्वच्छ केली पाहिजे. कुठे पडझड झाली असेल तर दुरुस्ती केली पाहिजे. एखादी रचना कदाचित मुळापासूनच पाडून टाकावी लागेल, तर तीही पाडली पाहिजे. त्या रचनांना आता शिव्या देण्यात शक्तिव्यय करण्यात अर्थ नाही. ज्या काळात त्या तयार झाल्या, त्या काळात त्या उपयोगी होत्या. त्या काळात लोकांसमोर जी आव्हाने होती, त्या आव्हानांचा सामना करण्याकरिता त्यांनी त्या व्यवस्था उभ्या केल्या. त्या जुन्या झाल्या म्हणजेच त्या इतका काळ टिकल्या. त्यांच्या ठिकाणी काही उपयुक्तताच नसती, त्यांचे काही प्रयोजनच नसते, तर त्या टिकल्याच नसत्या. परंतु त्या टिकल्या म्हणून त्या आताही टिकविण्याचा आग्रह धरणे हेही गैर आहे. आता नवी परिस्थिती आहे. नवी आव्हाने आहेत. त्यांच्या

संदर्भात कुठे नवी रचना हवी आहे, कुठे दुरुस्ती हवी आहे, कुठे साफसफाई हवी आहे. परंतु पाया मात्र धर्माचा हवा. त्या धर्माचा, जो, व्यष्टीचा संबंध समष्टी, सृष्टी आणि परमेष्टी यांच्याशी ठेवतो त्या धर्माचा, आधार हवा. जो अभ्युदय आणि निःश्रेयस् यांचा साधक आहे त्या धर्माचे अधिष्ठान हवे. या पायावर केलेली कोणतीही नवी रचना हे धर्माचरणच होय.

३०-११-८०

## नीतिमत्तेसाठी धर्मकल्पनेची आवश्यकता आहे काय ?

'इहवाद, धर्म आणि नीती' या विषयावर श्री. ह. दीक्षित यांनी पुणे विद्यापीठाच्या रा. द. रानडे स्मारक व्याख्यानमालेत दिलेली व्याख्याने जशी विचाराला प्रवृत्त करणारी आहेत, तशीच ती आपल्या मनातील एतद्-विषयक धारणांना तपासून पाहण्यासाठीही उपयुक्त ठरणारी आहेत. त्यामुळे पुणे विद्यापीठाने ही व्याख्याने प्रकाशित करून, ज्यांना वेळोवेळी वैयक्तिक अथवा सामाजिक मनोधारणांचा, मुळाशी जाऊन, विचार करण्याची सवय आणि अभ्यास आहे, त्यांच्यावर उपकारच केला आहे.

इहवाद म्हणजे सेक्युलॅरिझम्. सेक्युलॅरिझम्चा भारतातील राजकीय अर्थ कसाही असला, व शब्दांना सततच्या वापराने विशिष्ट संकुचित वा विस्तृत अर्थ प्राप्त होत असले आणि तसा अर्थ सेक्युलॅरिझमला प्राप्त झालेला दिसत असला, तरी त्याचा मूळ अर्थ अद्यापि कायम आहे. इहवाद किंवा सेक्युलॅरिझम हा शब्द भारताच्या प्रचलित संदर्भात, राज्याच्या किंवा शासनाच्या स्वरूपाच्या संबंधात येतो. भारताची फाळणी झाल्यानंतर आणि ती फाळणी धर्माच्या आधारावर झाली अशी पाकिस्तानची भूमिका असल्यामुळे, पाकिस्तान हे एक सांप्रदायिक राज्य (Theocratic State) बनले. त्याने मुळातच घोषित केले की, आमचे राज्य हे इस्लामी राज्य आहे. आणि इस्लामच्या शिकवणुकीनुसार ते चालणार आहे. पाकिस्तानची ही भूमिका अद्यापि कायम आहे. अगदी पाकिस्तानच्या या वर्षीच्या स्वातंत्र्य दिनाच्या प्रसंगी सुद्धा पाकिस्तानच्या अध्यक्षांनी हेच सांगितले की, आपले राज्य इस्लामी राज्य आहे आणि इस्लामच्या आदर्शानुसार सर्वांनी वागण्याचा प्रयत्न करावा. हिंदु बहुसंख्य आणि मुसलमान बहुसंख्य अशी देशाची फाळणी झाली असली, तरी उर्वरित भारत देशातील सरकारने आपण हिंदू राज्य आहोत, असे म्हटले नाही. 'हिंदू' शब्दाच्या अर्थाची व्यापकता न कळल्यामुळे असो, अथवा पाकिस्तानहून आपले वेगळेपण दाखविण्यासाठी असो, सरकारने

आपले राज्य 'सेक्युलर' आहे, असा त्या काळी खूप गाजावाजा केला. परंतु, याचा सर्वांनी सारखाच अर्थ घेतला असे मात्र घडले नाही. 'सेक्युलर' म्हणजे सर्व धर्मांविषयी समभाव असणारे राज्य असे भाष्य त्यावर रचले गेले व ते अधिकांश लोकांना मान्य झालेले दिसत आहे. या अर्थाने ते हिंदू राज्यच आहे. कारण सर्वधर्मसमभाव हा हिंदूंचा आणि कदाचित केवळ हिंदूंचाच वैचारिक विशेष असेल.

सेक्युलॅरिझमचा दुसरा अर्थ असा केला जातो की, शासनाचा स्वत:चा असा कोणताच धर्म नसतो. कोणत्याही धार्मिक गोष्टीत शासनाने ढवळाढवळ करू नये. कोणत्याही धार्मिक रिवाजाचा शासनाने पाठपुरावा करू नये. धर्म ही व्यक्तीची खाजगी बाब समजावी. त्याला उत्तेजनही देऊ नये किंवा उपमर्दही करू नये. धर्माचा संबंध अलौकिकाशी अथवा पारलौकिकाशी असतो, आणि शासनाला त्याच्याशी काहीही कर्तव्य नसते. या अर्थाला मानणारेही आपल्या देशात पुष्कळ लोक आहेत. भारताचे सरकार आपले राज्य 'सेक्युलर' आहे असे म्हणत असले, तरी ते सेक्युलॅरिझमच्या या अर्थाप्रमाणे वागत नाही, ही हा अर्थ मानणाऱ्यांची खंत आहे. सरकारी इमारतींचे भूमिपूजन समारंभ होत असतात. सरकार पंढरपूरच्या विठोबाची पूजा करते आणि करविते. राष्ट्रपती आणि प्रधानमंत्री कधी एखाद्या फकीराच्या उरूसात, तर कधी तिरुपतीच्या बालाजीच्या दर्शनाला जातात. व्यक्तिश: जातात एवढेच नव्हे, तर आपल्या या जाण्याची जाहिरात करतात. युकॅरिस्ट कॉन्फरन्सला राष्ट्रपती समोरे जातात. हे सारे, धर्माविषयी औदासीन्य ठेवले पाहिजे, हा जो सेक्युलॅरिझमचा अर्थ जे लोक करतात, त्यांच्या दृष्टीने गैर आहे.

सेक्युलॅरिझमचा तिसराही अर्थ आहे. तो हा की, सेक्युलर राज्य धर्माच्या विरुद्धच राहील. राज्य हे केवळ ऐहिक. ईश्वर वगैरे सर्व झूट आहे. धर्म ही अफूची गोळी आहे; तिच्या मादकत्वाखाली आपल्या जनतेने येऊ नये, यासाठी शासनाने जागरूक आणि यत्नशील राहिले पाहिजे. जगातील सर्व कम्युनिस्ट 'सेक्युलॅरिझम'चा हाच अर्थ मानतात. या अर्थाने भारताचे शासन वागत नाहीं ही त्यांची खंत आहे. प्रा. दीक्षित यांनी यापैकी कोणत्याही अर्थाने राज्याशी अथवा राष्ट्रकल्पनेशी जो इहवाद जडलेला आहे, त्याचा विचार आपल्या विवेचनात केला नाही. त्यांनी इहवादाच्या किंवा सेक्युलॅरिझमच्या कल्पनेचा समाजाशी व सामाजिक नीतिमूल्यांशी जो संबंध जोडला जातो, त्याची चिकित्सा केली आहे आणि असे प्रतिपादन केले आहे की, सामजिक आणि वैयक्तिक नीतिमत्तेच्या संदर्भात ऐहिकतेचा (सेक्युलॅरिझमचा) सिद्धान्त तोकडा आहे, अनुपयुक्त आहे.

जेम्स हेस्टिंग्जने संपादित केलेल्या 'धर्म आणि नीती' या विषयावरील ज्ञानकोशात सेक्युलॅरिझमची जी व्याख्या दिली आहे किंवा सामान्य इंग्रजी शब्द-कोशात जी व्याख्या दिली असते, तिचा संदर्भ त्यांनी घेतला आहे. जेम्स हेस्टिंग्जच्या ज्ञानकोशांतील व्याख्या अशी आहे :

Secularism may be defined as a movement intentionally ethical, negatively religious, with political and philosophical antecedents—

—राजकीय व तात्त्विक पूर्वेतिहास असलेली ती बुद्धिपुरस्सरतया नैतिक, पण धर्माच्या विरुद्ध असलेली चळवळ आहे. सेक्युलॅरिझमचा ऑक्सफोर्ड डिक्शनरीतील जो अर्थ व्याख्यात्याने उद्धृत केला आहे तो असा :

The doctrine that morality should be based solely on regard to the wellbenig of mankind in the present life to the exclusion of all considerations drawn from belief in God or a future state–

—इहवाद म्हणजे असा सिद्धान्त की नीती ही माणसाच्या केवळ या जन्मीच्या कल्याणावर आधारलेली असली पाहिजे. आणि त्यासाठी ईश्वर आणि मरणोत्तर जीवन यापासून निष्पन्न होणारे सर्व विचार बाजूला ठेवले पाहिजेत.

इहवादाच्या या अर्थात इहवादाने नीतीला तिलांजली दिलेली नाही. नीती त्याला हवी आहे. इहवाद 'बुद्धिपुरस्सर नैतिक,' intentionally ethical, आहे. नीतीसाठी धर्माची, ईश्वराविषयीच्या आस्तिक्यबुद्धीची अथवा पारलौकिक जीवनाच्या अस्तित्वाला मान्यता देण्याची काहीच गरज नाही, असे त्यांचे म्हणणे आहे. श्री. दीक्षित यांनी हे म्हणणे खोडून काढून असे प्रतिपादन केले आहे की "अशा प्रकारचा इहवाद नीतीला विरोधी आहे. धर्मप्रवृत्ती अथवा धार्मिकता ही गोष्ट नीतीला पोषक आहे. नैतिक आचाराचे समर्थन करणे इहवादाला तर्कतः अशक्य आहे आणि नीतीचे तात्त्विक समर्थन आणि व्यावहारिक प्रेरणा ही दोन्हीही धर्माकडून आणि बहुधा, केवळ धर्माकडून होऊ शकतात."

नीतिशास्त्राचा संबंध व्यक्तिजीवनाशी असतो की नाही ? की तो फक्त व्यक्तीच्या सामाजिक जीवनाशी असतो ? इहवादी असे म्हणतात की व्यक्ति-जीवनातील ज्या अंगांचा संबंध इतरांच्या हिताहिताशी येत नाही, ती अंगे नीतिशास्त्राच्या कक्षेत येत नाहीत. एखादा माणूस मांसाशन करतो की नुसत्या शाकाहारावर राहतो, तो मद्यनिवृत्त आहे की त्याला मितपान चालते इत्यादी गोष्टींचा, त्याच्या आरोग्याशी आणि आर्थिक सुस्थितीशी संबंध असेल पण त्याचा

नीतीशी सुतराम संबंध नाही. त्या माणसाची नैतिक योग्यता ठरवावयाची झाल्यास असल्या गोष्टी विचारातही घेण्याचे कारण नाही." परंतु प्रा. दीक्षित ही भूमिका अमान्य करतात. " मानवी जीवनाची मूल्यात्मक चिकित्सा " असे स्थूल-मानाने नीतिशास्त्राचे स्वरूप सांगून ही चिकित्सा व्यक्तिगत असलेल्या जीवनाचीही तसेच व्यक्ति-व्यक्तीच्या संबंधाचीही होऊ शकते, असे त्याचे प्रतिपादन आहे. दांभिकता हे निश्चित असे नैतिक दूषण आहे. मनुष्य दांभिक असल्यामुळे, म्हणजे तो जसा नाही तसा आव आणीत असल्यामुळे, समाजाचे काही नुकसान होणार नाही. पण बाह्य कृती आणि त्या कृतीचे परिणाम याहूनही कृतीच्या अंतर्यामी असलेल्या हेतूला अथवा प्रेरणेलाच नैतिक चिकित्सेत महत्त्व दिले जाते, असे त्यांनी स्पष्ट केले आहे.

धर्म किंवा परमार्थवाद असे मानतो की, शुभजीवन नावाचा काही जीवन-प्रकार आहे. माझ्या विशिष्ट जीवनप्रकारामुळे इतर व्यक्तींच्या जीवनावर अन्याय होणार नसेल, तर माझा जीवनप्रकार वाईट नाही, असे इहवादी म्हणतो. धर्माला हे म्हणणे मान्य नाही. शुभ जीवनासाठी काही प्रवृत्तींचे दमन, काहींचे व्यवस्थापन आणि काहींचे उदात्तीकरण आवश्यक आहे, असे धर्माचे म्हणणे आहे. वर मांसाहाराचे आणि मद्यपानाचे उदाहरण दिले आहे. मांशाशनात इतरांच्या संबंधांवर अन्याय नसला तरी प्राणिहत्येविषयी उदासीन वृत्ती अंतर्भूत आहे. मद्यपानात, निर्माण केलेली बंधने ढिली करणे आहे. यावर जीवनाचे शुभत्व किंवा अशुभत्व अवलंबून आहे.

भारतीय परंपरेनुसार धर्मजीवन आणि ईश्वराचे अस्तित्व मानणे यांच्यात अतूट संबंध नाही. जैन, बौद्ध सांख्य, वैशेषिक, मीमांसक इत्यादींनी सांगितलेल्या धर्मात ईश्वराला स्थान नाही. तथापि, ईश्वराचे अस्तित्व मानले तरी आणि न मानले तरी, धर्माचा संबंध इहलौकिक शुभ जीवनाशी आहे. पण " ईश्वर आहे " या वाक्याचा काय अर्थ आहे ? व्याख्याते प्रा. दीक्षित म्हणतात, " ईश्वर आहे." हे वचन अस्तित्ववाची नाही, तर ते क्रियाप्रेरक किंवा विध्यर्थक आहे. " ईश्वर आहे " याचा अर्थ जगण्याची अमुक एक रीत मला प्रमाण आहे, म्हणून मी ती जगून दाखवावी, असा विध्यर्थक करावा लागतो. ईश्वरनिष्ठ नम्र असतो. अंधारातही पाप का करू नये याचे तो स्पष्टीकरण देऊ शकतो. ईश्वरनिष्ठाची जगण्याची रीत मानवी व्यवहारावर पावित्र्याचे आरोपण करीत असते. त्याच्याकरिता स्नानाची रीतही धार्मिक बनते. दिवाळीसारख्या आनंदाच्या सणी झोपेत, आळसात आनंद मानण्याऐवजी थोडा त्रास झाला तरी पहाटे उठून अभ्यंगस्नान केल्याने जीवनाला पावित्र्याची छटा येईल असे त्याला वाटत असते. व्याख्यात्याच्या मते, धार्मिक परंपरांमधून मानवी जीवनाच्या मूल्यव्यवस्थेचा एक ब्ल्यू

प्रिट आकार घेत असतो. असलेल्या व्यक्तित्वाचा परिपोष हे इहवादाचे मूल्य आहे, तर व्यक्तित्वाचा विलोप हे धर्मजीवनाचे मूल्य आहे. पण व्यक्तित्वाचा विलोप म्हणजे अहंकाराचे विसर्जन होय, जीवनाचा विनाश नव्हे.

व्याख्यात्याच्या मते धर्माचा आणि विज्ञानाचा संघर्ष होण्याचे कारण नाही. कारण विज्ञानाचा संबंध तथ्यांशी (facts) असतो. पण धर्माचा संबंध मूल्यांशी असतो. विज्ञानाची प्रगती धर्माचे पोषणही करीत नाही आणि धर्मास बाधकही ठरत नाही. कायदाही धर्माचे स्थान घेऊ शकत नाही. सुभग समाजजीवन निर्माण करण्यासाठी समाजात काही प्रमाण जीवनपद्धती (norms) रूढ व्हाव्या लागतात. अन्यथा लोक बेफाट वागू लागतील. लोकांचे बेफाट वागणे सरकार कायदा करून नियंत्रित करू शकते. पण कायदा पाळण्याची प्रेरणा सरकार निर्माण करू शकत नाही. पावित्र्याच्या कल्पनेवर धर्माची उभारणी झालेली असल्यामुळे त्याच्या ठिकाणी कृतीला प्रेरणा देण्याचे सामर्थ्य आहे. आज समाजजीवनात जी प्रमाण-शून्यता आली आहे, त्याचे कारण इहवादाचा प्रचार आहे, असे व्याख्यात्याचे प्रतिपादन आहे.

या व्याख्यानांना पुणे विद्यापीठाचे कुलगुरु प्रा. देवदत्त दाभोळकर यांची छोटीशीच पण विवेचक प्रस्तावना आहे. त्यांचे म्हणणे असे आहे की, धर्माशी नीतीचा संबंध तोडून तो इहवादाशी जोडणे शक्य आहे. एवढेच नव्हे तर ते आवश्यकही आहे. ज्या अंतिम मंगल मूल्यांच्या आधारावर धर्माच्या कल्पनेचे समर्थन करता येते, ती मूल्ये इहवादाला मान्य नाहीत, असे नाही. संकटाच्या वेळी, एखाद्या अज्ञात शक्तीवर अवलंबून राहणे धीरवृत्तीच्या लोकांना देखील आवश्यक वाटते, हे खरे असले, तरी तो मानवाच्या मनाचा कमकुवतपणा आहे. आणि कमकुवतपणाच्या आधारावर सामाजिक नीतीची रचना करणे, सामाजिक दृष्टचा विघातक आहे. आलेल्या आपत्ती अटळ आणि अपरिहार्य आहेत, असे मानून त्या शांतपणे स्वीकारल्या पाहिजेत, हे बर्ट्रेन्ड रसेलचे म्हणणे उद्धृत करून, ईश्वराच्या कल्पनेच्या आधारावर आपत्तींना तोंड देणाऱ्या माणसाच्या धैर्यापेक्षा असे धैर्य दुर्मिळ असते, म्हणूनच ते अधिक आदर्श असते, असे दाभोळकरांनी म्हटले आहे. "आपल्या व्यक्तिगत सुखाचा हव्यास न धरणे, आपली क्षणिक तृष्णांविषयीची उत्कंठा बाजूला टाकणे आणि जीवनातील चिरकालीन मूल्यां-विषयी उत्कट आर्तता असणे, याखेरीज मुक्ती काही वेगळी असू शकत नाही आणि अश्रद्धांची हीच खरी मुक्तिसाधना आहे." असे बर्ट्रेन्ड रसेल यांचे एक सुरेख वचनही त्यांनी उद्धृत केले आहे.

## सामर्थ्याचा सुकाळ करणे

तथापि ज्या मानवसमाजाचा आपण विचार करतो त्याची स्वाभाविक प्रवृत्ती बघता, "व्यक्तिगत सुखाचा हव्यास कां धरावयाचा नाही," हे इहवादाच्या तर्काने त्याला पटवून देणे अशक्य नसले, तर कठीण अवश्य आहे. अश्रद्धांचे धैर्य दुर्मिळ असण्याचे हेच कारण असावे. जीवनात "ॲब्सर्डिटी" येण्याचेही तेच कारण असावे. ज्या स्वाभाविक वृत्तीप्रवृत्तींनी मानव बनला आहे, त्याच्या ठिकाणी अशा धैर्याची दुर्मिळता कमी करण्याचे सामर्थ्य धर्माच्या कल्पनेत आहे. तसा अनुभवही आहे. समाज काही मोजक्या लोकांचा नाही. सर्वसामान्यांचा आहे. त्यांच्याकरिता जीवनपद्धती अधिक पवित्र, सुभग व मूल्याधारित करण्याची आवश्यकता आहे व त्यासाठी धर्मकल्पनेचे महत्त्व आहे. ते महत्त्व नाकारता येईल, असे वाटत नाही. धर्म ही गुंगी आणणारी अफू आहे, असे जे काही लोक म्हणतात, तेही धर्मकल्पनेचे हे सामर्थ्य पर्यायाने मान्य करीत असतात. याचा अर्थ धर्माचा अफूसारखा उपयोग करता येऊ शकतो एवढाच करता येईल. धर्म म्हणजे अफू असे समजण्याचे मात्र कारण नाही.

असो. दीक्षितांनी या व्याख्यानांमध्ये सामाजिक दृष्टचा अत्यंत महत्त्वाच्या विषयाचे अत्यंत सखोल चिंतन प्रकट केले आहे. ज्यांना ते पटणार नाही, त्यांनाही ते विचार करावयाला लावील, यात संशय नाही.

१०-९-७८

# नियतीचे खेळ व भगवंताचे आश्वासन

मी दैववादी नाही. भविष्य आदींवर माझा फारसा विश्वास नाही. त्यासंबंधी आस्थाही नाही. तरी देखील नियती आपल्या सर्व क्रियाकलापांवर प्रभाव गाजवीत असावी, असे मला वाटते. आपल्यावर आलेल्या संकटाची कारणमीमांसा करण्यास सामान्य माणसाची बुद्धी असमर्थ ठरत असल्यामुळेच तो नियतीचे कारकत्व मानीत असेल, असे म्हणता येऊ शकते. परंतु, ज्यांच्या ठिकाणी असामान्य कर्तृत्व आहे, लोककल्याणाशिवाय ज्यांच्या जीवनाला दुसरा हेतु नाही, सदाचरणाने वागणे हा ज्यांचा स्वभावधर्म आहे, अशांवरही जेव्हा जीवघेऊ संकटे येतात, तेव्हा त्याची कारणमीमांसा कशी करावयाची ? श्रीरामचंद्रांना १४ वर्षे वनवास घडला, यात त्यांचा कोणता अपराध ? राज्यपद काही त्यांनी मागितले नव्हते. ते मिळविण्यासाठी लटपटी-खटपटीही केल्या नव्हत्या. रामाचे गुण पाहून दशरथ राजाला त्याला युवराज करावेसे वाटले तर त्यात

रामाचा कोणता दोष ? वनात जावयाला न सांगता कैकेयीने भरताकरिता राज्यपद मागितले असते, तरी रामचंद्रांनी खळखळ केली नसती, असे भरताने खूप आग्रह केल्यानंतरही अयोध्येच्या सिंहासनावर ते परतले नाहीत, त्यावरून वाटते. पांडवांचा सत्पक्ष होता, अशी आपली सर्वांची समजूत आहे. भांडण तुटावे म्हणून हस्तिनापूर कौरवांना आणि खांडववन पांडवांना देण्यात आले. ते त्यांनी मान्य केले. समृद्ध राजधानीऐवजी निर्जन अरण्य दिले तरी पांडव खुष. खांडववनाचे त्यांच्या पराक्रमाने इंद्रप्रस्थ झाले. त्यांनी राजसूय यज्ञ केला, हा काय त्यांचा गुन्हा मानावा ? मग त्यांना अशा हालअपेष्टा कां सहन कराव्या लागल्या ? आपल्या पत्नीची भर सभेत विटंबना कां बघावी लागली ? वनवास, अज्ञातवास कां भोगावा लागला ? आणि एवढे सगळे सहन करून आपले सत्त्व ज्यांनी सिद्ध केले, त्यांच्या बाजूला कुरुक्षेत्रात फक्त सात अक्षौहिणी सैन्य उभे राहिले, उलट कौरवांच्या बाजूला अकरा अक्षौहिणी ! सत्पक्षाच्या बाजूला अल्पसंख्या रहावी आणि असत्पक्षाला बहुसंख्या गोळा करता यावी, हा नियतीचा खेळ आहे असे मानावे की, असत्पक्ष सत्ताधीश असल्यामुळे त्याच्या बाजूला बहुसंख्या उभी झाली असे मानावे ?

तथापि, रामचंद्राची गोष्ट काय किंवा पांडवांची गोष्ट काय–सत्तेच्या संबंधातली बाब होती. सत्तास्पर्धेत रामचंद्र उतरले नसले, तरी त्यांच्या पराक्रमाचा आणि गुणांचा धाक होता. त्यामुळे कैकेयीच्या मनात मत्सर उत्पन्न होणे शक्य होते. पांडव तर सरळ सरळ सत्तेचे वारसदारच होते. तेव्हा, सत्ताकांक्षी कौरवांना त्यांचा उत्कर्ष सहन झाला नसेल, तर तेही समजण्यासारखेच आहे. पण, जे कधी सत्तास्पर्धेत उतरले नाहीत, उतरण्याची शक्यता नाही, लोकोन्नतीशिवाय अन्य स्पृहा ज्यांच्या मनाला शिवली नाही, त्यांच्यावरही सत्ताधाऱ्यांनी संकटे कां आणावीत ? सॉक्रेटिसाचा अथेन्सच्या गादीवर डोळा असल्याचे कोठे नमूद नाही, पण तरीही त्याला विषाचा प्याला प्यावा लागला. येशू ख्रिस्ताने पॅलेस्टाईनच्या सिंहासनावर हक्क कधी सांगितला नाही, तरी देखील त्याला सुळावर चढावे लागले. सॉक्रेटिस किंवा येशू यांनी सत्तेचा असा कोणता अपराध केला होता ? तेव्हा या महापुरुषांवर आलेली संकटे हा नियतीचा खेळच नव्हे काय ?

सच्छील, सदाचरणी, सेवापरायण लोकांकरिता भगवन्ताचे तसे भरघोस आश्वासन आहे. भगवद्गीतेत भगवान् म्हणतात, "तेषां नित्याभियुक्तानां योगक्षेमं वहाम्यहम्" भगवंतांच्या या आश्वासनावर विसंबून आपले जीवन चालविणारे लोक आजच्याही काळात मला माहीत आहेत. सामान्य माणूस आपल्याला असलेली नोकरी सहसा सोडीत नाही. तिला धोका उत्पन्न होईल

असे काही करीत नाही. पण अनेक माणसे अशी आहेत की जे या गोष्टीची पर्वा करीत नाहीत. नोकरी गेली तर काय होईल या चिंतेने ते त्रस्त होत नाहीत. आपले कार्य चांगले आहे, तर परमेश्वर आपल्याला साथ देईलच, असा त्यांचा विश्वास असतो. 'तेषां नित्याभियुक्तानां योगक्षेमं वहाम्यहम्' हा त्यांचा आधार असतो. 'योगक्षेम' फार अर्थवाहक शब्द आहे. योग म्हणजे अप्राप्ताची प्राप्ती. क्षेम म्हणजे प्राप्तीचे रक्षण. म्हणजे नवी मिळकत आणि जुन्याचे रक्षण—अशी दोहोंची काळजी भगवंताने स्वीकारलेली आहे. भगवद्गीतेतील या आश्वासनाचा पुनरुच्चार अनेक संतांनीही केला आहे. ज्ञानेश्वर महाराजांनी म्हटले आहे, "ऐसे अनन्यगतिके चित्ते । चिंतितसांते माते । जे उपासती तयांते । मीचि सेवी." तुकाराम महाराज म्हणतात, "त्याचा भार वाहे माथा । करी योगक्षेम चिंता" संत एकनाथ सांगतात, "आवडीने भावे हरिनाम घेसी । तुझी चिंता त्यासी सर्व आहे." या साधुसंतांच्या वचनावर अविश्वास कोण दाखवील ? पण प्रत्यक्ष व्यवहारात पहावे तर मात्र भलतेच दिसते. बिचारे शीखगुरु आपल्या धर्माने चालत होते. त्यांचे आव्हान मोगलांच्या सत्तेला नव्हते. तरीही त्यांना हालहाल होऊन मरण पत्करावे लागले. साधे जीवनही ते जगू शकले नाहीत. योगक्षेम तर दूरच राहिला. जे अधर्माने वागणारे आहेत, पापी आहेत त्यांचा मात्र योगक्षेम नीट चाललेला दिसतो. बापाला कैदेत टाकणारा, बंधूंची हत्या करणारा औरंगजेब अनेक दशके राज्य उपभोगतो, पण छत्रपतींना मात्र राज्याभिषेकानंतर केवळ सहा वर्षांच्या आत मृत्यू येतो. हे पाहिल्यानंतर कोणाला असे वाटले की व्यर्थ आहे हे भगवंताचे आश्वासन तर त्याला दोष कसा देता येईल ?

असे म्हणता येईल की, हे आश्वासन निरपेक्ष नाही. 'त्यांचा' योगक्षेम वाहतो असे म्हटले ते कोण हे 'नित्याभियुक्त' या शब्दात जसे सांगितले आहे, तसेच ते त्या श्लोकाच्या पूर्वार्धातही सांगितले आहे. पूर्वार्ध असा आहे "अनन्याश्चिंतयन्तो मां ये जनाः पर्युपासते"—म्हणजे जे अनन्यभावाने माझे चिंतन करीत माझी उपासना करतात, त्या नित्याभियुक्त लोकांच्या योगक्षेमाची मी काळजी वाहतो. नित्याभियुक्त म्हणजे स्वार्थापासून निवृत्त होऊन जे निष्काम बुद्धीने केवळ परमार्थासाठी झटतात ते. परमेश्वराकडून योगक्षेम वाहिला जाण्याची ही एक अट आहे आणि दुसरी अट आहे, अनन्यभावाने त्याची उपासना केली पाहिजे. परमेश्वराचे आश्वासन ज्यांच्या बाबतीत पूर्ण झाले नाही, त्यांच्या भक्तीत, त्यांच्या लोकसेवेत काही न्यून तर राहिले नव्हते ? पण असे तरी कसे म्हणावे ? हरिश्चंद्राच्या भक्तीत, ज्ञानेश्वरांच्या सर्वात्मक परमेश्वराच्या अर्चनेत कसले आले आहे न्यून ? तरी या श्रेष्ठांना किती कष्ट सहन करावे लागले ? आणि समजा काही न्यून असले तरी त्यासाठी एवढी शिक्षा ?

म्हणून असे म्हणावेसे वाटते की जे नियतीचे संकेत आहेत, ते भोगावेच लागतात. आपण नीट चालत असलो तरी दुसरा आपल्याशी टक्कर घेणार नाही, असे नाही. तसेच आपण चांगले वागलो, अंत:करण साफ ठेवले, लोकसेवेशिवाय दुसरा भाव मनात आणला नाही, म्हणून कोणी आपल्यावर आघात करणार नाही असे नाही. जगात ' अकारण–वैरिण: ' असतात. आणि ते आपल्या वैराग्नीने जाळण्याचा प्रयत्न सतत करीत असतात. मत्सरग्रस्तांचा हा स्वभावच असतो, असेच समजले पाहिजे आणि सज्जनांनी त्यांच्या वैराचे चटके सहन करण्याला सिद्ध राहिले पाहिजे. कदाचित् अनन्यता–परीक्षणासाठीही ही परमेश्वरी योजना असेल. म्हणून समर्थ रामदासांनी चांगले सांगून ठेवले आहे. " सदा सर्वदा देव सन्नीध आहे, कृपाळूपणे अल्प धारिष्ट पाहे." परमेश्वर जवळच आहे. तो कृपाळूही आहे. फक्त अल्प धैर्याची तो परीक्षा घेत असतो. या ' अल्प 'ची मात्रा किती हे कोण सांगू शकेल ? परमेश्वरच ती ठरवील. तो कदाचित असे म्हणत असेल की, अरे थोडी कळ सोसा, शेवटी विजय कोणाचा होतो ते पहा. आणि खरेच अंती विजय सत्याचा झाला आहे, धर्माचा झाला आहे, सद्विचाराचा झाला आहे. रामचंद्र विजयी झाले. सात अक्षौहिणीवाल्या पांडवांनी अकरा अक्षौहिणीवाल्यांवर विजय मिळविला. येशूचे शरीर सुळावर गेले. त्याचे विचार जगभर पसरले. सॉक्रेटिसाचे शरीर विष पिऊन गतप्राण झाले, सॉक्रेटिस अमर झाला. भक्तांचा योगक्षेम वाहण्याचे परमेश्वराचे जे आश्वासन आहे ते असे तर पूर्ण होत नसेल ? तसेच होत असावे व त्यावर सज्जनांचा विश्वासही असावा. एरवी जगाच्या आरंभापासून तो आजतागायत दु:खे कोसळत असूनही लोकांनी सन्मार्गाची कास धरली नसती; फाशीच्या तक्तावर हसतमुखाने कोणी चढले नसते; कोणी सॉक्रेटिस निघाला नसतो; कोणी येशू निघाला नसता. सगळे सत्तेचे पूजक बनले असते. आणि मग ही पृथ्वी इतकी दरिद्री, इतकी भकास बनली असती की तिच्यावर मानव म्हणून जगण्याचीही काही लोकांना लाज वाटली असती. म्हणून ' कृपाळूपणे अल्प धारिष्ट पाहे ' हेच खरे. म्हटलेच आहे की, परमेश्वराच्या राज्यात " देर है, अंधेर नही."

१०–१–७५

## आपल्याला राजा हवा आहे काय ?

गेल्या महिन्यातील नागपूर–मुंबई आणि मुंबई–नागपूर अशा प्रवासयात्रेत माझी एका बंगालीभाषी सहप्रवाशाशी ओळख झाली. मी महाराष्ट्र विधिमंडळाचा सदस्य आहे असे त्याला कळल्यावर, चर्चा राजकारणाकडे वळली.

त्याचे ज्ञान अद्यावत् आणि निरीक्षण सूक्ष्म वाटले. तो म्हणाला, "आपल्या देशात लोकशाही नीट चालावयाची असेल, तर आपल्याला एक राजा हवा."

मी चकित झालो. लोकशाही अन् राजा ? किती विसंगत जोडी ! माझ्या मुद्रेवरील संशयांकित भाव पाहून तो उद्गारला, "तुम्हाला या जोडीचे आश्चर्य वाटेल. पण यात आश्चर्य काहीही नाही. इंग्लंडमध्ये लोकशाही आहे की नाही ? आणि तेथे राजघराणेही आहे की नाही ? त्यामुळेच तेथे लोकशाही नीट चालू आहे".

"अहो, पण इतिहासातील घटनाक्रमाने तेथे राजघराणे राहिले. लोकशाही नीट चालविण्यासाठी काही, त्यांनी कुठून तरी राजघराणे उचलून आणले नाही !"—माझा त्यावरील अभिप्राय.

"जरा ऐका," तो म्हणाला, "माझे म्हणणे समजावून घ्या. इंग्लंडमध्ये ती गोष्ट इतिहासक्रमाने घडली असेल, पण ती उपयुक्त ठरली आहे. तेथे राजा आहे पण त्याला अधिकार नाहीत. फक्त मान आहे. लोकशाही व्यवस्थेतही, राष्ट्राला एकत्र धरून ठेवणारा, जो वादविवादाचा विषय होणार नाही असा बिंदू हवा असतो. मानवाचे मानसशास्त्र तर आपण समजावून घ्या. आपल्या येथे पं. नेहरू, नंतर श्रीमती गांधी, नंतर संजय किंवा राजीव असा क्रम आला, तेव्हा लोकांनी उत्स्फूर्तपणे त्यांना उचलून धरलेच की नाही ? श्रीमती गांधी जेव्हा काँग्रेस पक्षाच्या अध्यक्ष झाल्या, तेव्हा त्यांच्या ठिकाणी कोणती राजकीय प्रगल्भता होती ? आणि संजय किंवा आता राजीव गांधी यांच्या ठिकाणी अशी कोणती किमया आहे की, ज्यामुळे लोकांनी त्यांचे नेतृत्व मानावे ? त्यांचे तर सोडाच. पण मेनका गांधींच्या सभांना एवढी गर्दी का असते ? ती मुलगी काय भाषाप्रभू आणि अलौकिक वक्तृत्वसंपन्न आहे ? अहो, ही सारी मंडळी एका घराण्याशी – ज्या घराण्याने राज्य केले त्या घराण्याशी – संबद्ध आहे. म्हणून लोकांना त्यांचे आकर्षण आहे. आणि लोकांना असा आकर्षणबिंदू हवा असतो."

तो आकर्षणबिंदू कसा असावा, याचे विवेचन करताना तो म्हणाला, "आता कोणीही हे मान्य करील की, हा आकर्षणबिंदू विवादास्पद नसावा. म्हणून विवादापासून त्याला अलिप्त ठेवले पाहिजे. तशी व्यवस्था केली पाहिजे. तो आकर्षणबिंदू निवडून द्यावयाचे लोकांवर सोपविले, तर वाद अपरिहार्य आहे. कारण, त्याला स्पर्धक राहणार. आणि एक स्पर्धक दुसऱ्या स्पर्धकाची उणीदुणी काढणार. एकाला सत्ता मिळाली, तर दुसरा ती काढून घेण्यासाठी धडपडणार. त्याच्या चारित्र्याच्या चिंध्या चव्हाटयावर धुतल्या जाणार. असलेले दोष फुगवून सांगितले जाणार. असलेले गुणही दोषच कसे आहेत, याची खटपट होणार. चर्चिल ॲटलीच्या विरुद्ध बोलणार. चेंबरलेनला मध्येच अधिकार सोडून द्यावा

लागणार. ग्लॅडस्टन आणि डिझरायली यांची वाग्द्वंद्वे आपल्याला रोचक वाटली, तरी ती त्यांना खोचकच होती. इंदिरा गांधी निवडणुकीला उभ्या राहात असल्यामुळे, त्यांच्यावर आरोप झालेले आहेत. भ्रष्टाचार त्यांच्या चारित्र्याला चिकटविला गेला आहे. मेनका गांधींनी म्हणे, मथाईच्या पुस्तकातील गाळलेले "शी" या शीर्षकाचे प्रकरण, जे प्रकरण श्रीमती इंदिरा गांधींविषयी आहे, छापून वितरित करावयाचे ठरविले आहे. जो आपल्या संपूर्ण देशाचा आकर्षण बिंदू आहे, तो असा वादविषय बनला, तर राष्ट्र एकत्र ठेवण्याचे त्याचे जे कार्य आहे, ते कसे साध्य होईल ? म्हणून हा बिंदू वंशपरंपरेनेच आला पाहिजे."

"इंग्लंडच्या लोकांना चालले म्हणून ते जगातील सर्व लोकांना चालेल असे आपण कां समजता ? अमेरिकेत लोकशाही आहे आणि तेथे तर कोणतेही राजघराणे नाही ?" माझा प्रश्न.

"अमेरिकेचे उदाहरण देऊ नका. तो देशच नवा आहे. त्याच्या परंपरांची मुळे अद्यापि खोल रुजावयाची आहेत. परंतु निक्सनचे वर्तन, केनेडीच्या रंगेल कथा यांनी, अमेरिकेचे राष्ट्राध्यक्षपदच कलंकित झाले आहे, हे लक्षात घ्या. वस्तुत: व्यक्ती कलंकित असते, पण ती सर्वोच्च पदावर बसल्यामुळे ते सर्वोच्च पदच अप्रतिष्ठित होत असते. शिवाय, लोकांचेही काही स्वभावधर्म असतात. तुम्हाला असे म्हणावयाचे आहे काय की, इंग्लंडमधील लोक भारतीयांपेक्षा अधिक व्यक्तिपूजक आहेत आणि म्हणून त्यांना राजा चालतो ? माझे मत तर असे आहे की, आपण भारतीय अधिक व्यक्तिपूजक आहोत. आपल्याला राजा हवाच. तो आणा आणि मग बघा देशाचे दार्ढ्य बनते की नाही ते." तो म्हणाला.

त्याची रसवंती पुढेही चालू राहिली. तो म्हणाला, "चार्लसला मुलगा झाला, याचे उगाच का कौतुक इंग्लंडमधल्या लोकांनी केले ? अडीचशे वर्षांपासून जेथे लोकशाही नांदत आहे, ज्या देशातील लोकशाहीच्या आधाराने आपण आपली लोकशाही चौकट बसविली आहे, त्या देशाचा अनुभव आपण कां त्याज्य ठरवावा ?"

मी म्हणालो, "पटले मला तुमचे म्हणणे. सांगा कुणाला राजा करावे ? श्रीमती गांधींच्या घराण्यातील मुलाला की एखाद्या माजी संस्थानिकाच्या मुलाला ?

त्याला वाटले मी थट्टेने बोललो. तो म्हणाला, "हा थट्टेचा विषय नाही. थोडी दृष्टी व्यापक करा. जरा देशाच्या सीमेबाहेरही बघा. नेपाळच्या राजाला आपण आपला राजा मानू. तो नेपाळसहित भारताचा राजा होईल. त्या राजाला हे नक्कीच आवडेल. आपल्यालाही ते फायद्याचेच राहील. एक नवीन देश

आपल्या देशात मिळेल. भूतानसारखे देशही कदाचित् मिळतील. आपला देश विशाल होईल आणि आपले काहीच जाणार नाही. कारण, त्या राजाला प्रत्यक्ष अधिकार काहीच असणार नाहीत. फार तर आपण स्वत:ला जे गणराज्य म्हणवून घेतो, ते म्हणवून घेता येणार नाही. देश मोठा व्हावा, एकसंध व्हावा, यासाठी आपल्या सिद्धान्ताला थोडीशी मुरड घालावयाला काय हरकत आहे ?"

जणू काही नेपाळनरेशाचे मनोगतच त्याला ज्ञात आहे, तसा त्याच्या बोलण्याचा थाट मला वाटला. पण मला त्याला चिडवायचे नव्हते. मी त्याचे ते सर्व बोलणे ऐकून घेतले. माझ्या मनात, त्याच्या बोलण्याने अनेक प्रश्न निर्माण केले. आपला देश व्यक्तिपूजक आहे, याविषयी शंका माझ्याही मनात नाही. प्रधानमंत्र्याला किंवा मुख्यमंत्र्याला राजा समजण्याची सामान्य लोकांमध्ये प्रवृत्ती आहे. 'जी', 'साहेब', 'मॅडम', 'सर', 'सरकार', 'हुजूर' ही आपली या मंडळींसाठी गौरवाची संबोधने आहेत. ते साधे 'मिस्टर निक्सन' किंवा 'मिस्टर रीगन' नसतातच. "मिस्टर प्राइम मिनिस्टरही" नसतात. ते 'सर' असतात. ते 'साहेब' असतात. जसे नोकरांचे ते 'सर' असतात तसेच सहकाऱ्यांचेही 'सर' असतात. बरोबरीचा दर्जा आपल्याला मान्यच नसतो. आणि ज्याचा आपण असा गौरव करतो, ते कोणत्या मातीचे असतात, हेही आपल्याला माहीत असते. तेव्हा वादविवादाचा विषय न होणारे एखादे केन्द्र असणे समाजस्वास्थ्या-साठी उपयुक्त ठरेल, असे मानण्यात काहीही गैर नाही. पण ज्याच्या हाती सत्ता नाही अशा शोभेच्या केन्द्राचा उपयोग काय, असा प्रश्न माझ्या मनात कायम राहिला.

या प्रश्नाचे उत्तर माझ्या मनात परवा, भगवद्गीता वाचता वाचता चमकून गेले, "मयाध्यक्षेण प्रकृतिः सूयते सचराचरम्" मी ही ओळ वाचली आणि जो केवळ साक्षी आहे, द्रष्टा आहे, जो निष्क्रिय आहे, तो असला की, प्रकृती सारा प्रपंच प्रसविते, हा त्या ओळीचा अर्थ ध्यानात आला. सारा पसारा प्रकृती मांडते. 'अध्यक्ष' काही करीत नाही. पण तो असावा लागतो. तो नसेल तर प्रकृती काहीच करणार नाही. सांख्य म्हणते, त्याच्या रंजनासाठी प्रकृती नाचत असते. तो बघत असतो. पण असा बघणारा हवा असतो ! आपल्या गण-राज्यातही आपण राष्ट्रपतीचे पद निर्माण केले आहे. सारा कारभार त्याच्या नावाने चालतो पण त्याला काही अधिकार नसतात. संविधान म्हणते "संघ-राज्याची शासनशक्ती राष्ट्रपतीच्या ठायी निहित असेल" "राष्ट्रपतीला साहाय्य करण्यासाठी व सल्ला देण्यासाठी प्रधानमंत्री प्रमुखपदी असलेली एक मंत्रिपरिषद असेल." पण व्यवहार सांगतो की, सारी शासनशक्ती पंतप्रधानांच्या ठायी निहित असते. प्रधान मंत्र्याचा सल्ला राष्ट्रपतीला बंधनकारक असतो. गणराज्यालाही

असा शोभेचा राष्ट्रपती हवा असतो. पण त्याची निवडणूक होत असल्यामुळे, तोही वादविषय बनतो. आपले विद्यमान राष्ट्रपती श्री. झैलसिंग यांच्या निवडणुकीच्या पूर्वी त्यांची अवमानना करणारे किती तरी लिहिले गेले. तेच आता राष्ट्रपती झाले आहेत ! त्यांच्याविषयी केव्हाही, ज्यांनी त्यांना विरोध केला, त्यांच्या मनात आदराची भावना कमीच राहणार. मग त्या बंगाली गृहस्थाने म्हटल्याप्रमाणे विवादास्पद न बनणारी व्यवस्था आपण कां स्वीकारू नये. " राजा " या शब्दाला का उगीच बिचकावे ?

१०–१०–८२

## सार्वभौम कोण ? संसद, न्यायपालिका की आणखी कोणी ?

राष्ट्रकुटुंब सांसदीय समितीच्या महाराष्ट्र शाखेच्या विद्यमाने, पदव्युत्तर वर्गात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी जो प्रशिक्षण कार्यक्रम असतो, त्याचे दि. १४ डिसेंबरला उद्‌घाटन करताना, महाराष्ट्राचे मुख्य मंत्री श्री. बाबासाहेब भोसले यांनी एक तात्त्विक मुद्दा उपस्थित केला. तो मुद्दा असा की, सार्वभौम कोण आहे ? संसद सार्वभौम आहे असे मानले, तर संसदेने पारित केलेले कायदे घटनात्मक दृष्टचा योग्य की अयोग्य हे तपासण्याचे अधिकार न्यायपालिकेला कां असावेत ? न्यायपालिकेत कोण लोक असतात ? ज्यांना एकदा नोकरी लागली की, पेन्शनशिवाय इतर कशाची फिकीर नसते, अशा व्यक्तींकडे लोकांची प्रातिनिधिक असलेल्या संसदेने पारित केलेल्या कायद्यांची तपासणी करण्याचे अधिकार देणे योग्य काय ?–असे प्रश्न मुख्य मंत्र्यांनी उपस्थित केले; आणि न्यायपालिकेला असे अधिकार देणे योग्य नव्हे हे सूचित केले. बाबासाहेबांनी, न्यायपालिकेत कार्य करणाऱ्या न्यायमूर्तींविषयी जो अभिप्राय व्यक्त केला, त्याच्याशी सहमत होणे शक्य नसले, तरी त्यांनी उपस्थित केलेला मुद्दा विचारणीय आहे, याविषयी वाद नाही. विशेषतः, आपण जे मत मांडले ते काही अंतिम सत्य नव्हे, या बाबतीत विचारमंथन व्हावे, अशी जी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली, त्यावरून या विषयाच्या चर्चेकडे विधायक दृष्टिकोणातून बघण्याची त्यांची मनोवृत्ती आहे, हेच दिसून आले. त्या विचारमंथनाच्या प्रक्रियेला थोडेबहुत साहाय्यभूत व्हावे म्हणून हा लेखनप्रपंच.

लोकशाहीत लोक सार्वभौम आहेत हे गृहीत धरले जाते. संसद लोकांची प्रातिनिधिक संस्था आहे, त्यामुळे संसद सार्वभौम आहे असा निष्कर्ष त्यातून काढला जातो. पण हा निष्कर्ष बरोबर नाही. कारण, लोकांची प्रातिनिधिक

असलेल्या संसदेसारख्या संस्थेला लोकांचे प्रतिनिधित्व जे प्राप्त होते, ते काल-मर्यादेच्या दृष्टीने विशिष्ट काळापुरते तर असतेच, पण विशिष्ट समयीच हे प्रतिनिधित्व मिळत असल्यामुळे, लोकजीवनाच्या यच्चयावत् अंगांवर सदासर्वकाळ अधिकार गाजविण्याचा या प्रतिनिधीस अधिकार मिळालेला असतो असे समजणे योग्य नाही. असे काही प्रश्न उपस्थित होऊ शकतात की जे प्रतिनिधींची निवड करण्याच्या वेळी उपस्थित नसतात. म्हणजेच त्या प्रश्नांच्या बाबतीत निर्णय घेण्याचा जनादेश प्रतिनिधींना मिळालेला नसतो. पण अनेकदा असे घडते की, लोकप्रतिनिधी तसा अधिकार आपल्याला मिळालेला आहे, असे गृहीत धरतात. तेव्हा या बाबतीत निर्णयासाठी कोणती तरी निराळी संस्था हवी की नाही ? लोक आपले प्रतिनिधी निवडून देतात, तेव्हा विद्यमान घटनेच्या चौकटीत त्यांनी कायदे आणि नियम करावे, अशीच त्यांची अपेक्षा असते. पण संसद आणि तिच्यात बसणारे लोकप्रतिनिधी, घटनेत बदल करण्याचाही अधिकार जेव्हा घेतात तेव्हा, ते आपल्या मर्यादांचे अतिक्रमण करतात असे कां मानू नये ? ऑस्ट्रेलियामध्ये, घटनेत बदल करावयाचा असेल, तर त्या मुद्यावर संपूर्ण जनतेचे मतच (referendum) घेतले जाते. कारण, घटना हा मूलभूत असा कायदा (primary law) आहे. तो जसा विद्यमान आहे, तसा स्वीकारूनच संसदेने वागले पाहिजे. कारण, त्या मूलभूत कायद्यानेच तिला जन्म दिलेला असतो. या मूलभूत कायद्यात बदल करावयाचा असेल, तर परत लोकांकडे गेले पाहिजे. आपल्या देशात अशी पद्धती नाही. आपल्या संसदेला घटनेत परिवर्तन करण्याचे अधिकार आहेत. म्हणून तीस-बत्तीस वर्षांमध्ये सुमारे पन्नास वेळा तिच्यात बदल केला गेला आहे.

आपल्याला मर्यादित अधिकार आहेत अशी संसदेला जाणीव नसली म्हणजे ती अत्याचारीही बनू शकते. अथेन्स शहरातील सर्वांत शहाण्या गृहस्थाला—सॉक्रेटिसाला—मृत्यूदंडाची शिक्षा बहुमताने दिली होती, हे लक्षात घेण्यासारखे आहे. ही बहुमताची जुलूमशाही (tyranny of the majority) आहे. आपल्या देशाच्या इतिहासात आणिबाणीच्या काळात अशा जुलूमशाहीचे दर्शन घडले आहे. अधिकारावर असताना पंतप्रधानाने कोणतीही कृती केली तर तीबद्दल पंतप्रधानावर फौजदारी अथवा दिवाणी स्वरूपाचा कोणताही वाद उपस्थित करता येणार नाही, अशी दुरुस्ती घटनेत करण्याचा खटाटोप होऊन गला होता, हे लक्षात घेतले पाहिजे. लोकसभेचे आणि विधानसभांचे घटनासंमत आयुष्य पाच वर्षांचे असताना ते सहा वर्षांचे याच कालखंडात जे करण्यात आले होते, ते लोकप्रतिनिधींनीच केले होते हेही आपण आठविले पाहिजे. १९७१ साली, या लोकप्रतिनिधींना जनतेने जे निवडून दिले, ते लोकसभा आणि विधानसभा यांची

कालमर्यादा वाढवून देण्यासाठी निवडून दिले नव्हते. कारण, त्या वेळी लोकांसमोर हे प्रश्नच नव्हते. म्हणून, घटनादुरुस्तीचे अधिकार, लोकसभेला नसावेत असे माझे मत आहे. आपल्या देशासारख्या विशाल देशात, प्रत्येक घटना दुरुस्तीसाठी जनमतसंग्रह घेणे अत्यंत अडचणीचे असेल, तर त्यासाठी वेगळी व्यवस्था निर्माण करावी. ती कशी असावी याचा संकेत मी पुढे देणार आहे. पण संसदेने, विद्यमान घटनेची चौकट सांभाळूनच कायदे आणि नियम केले पाहिजे आणि तिने ही चौकट सांभाळली की नाही, हे विचारण्याचा अधिकार नागरिकाला असला पाहिजे आणि त्याला या बाबतीत निर्णय मागण्यासाठी कोणती तरी वेगळी व्यवस्था असली पाहिजे.

हे आणखी एका कारणासाठी आवश्यक आहे. आपण कार्यकारी सत्ता (executive power) आणि विधिसत्ता (legislative power) वेगवेगळ्या ठेवल्या असल्या, तरी सांसदीय लोकशाहीत कार्यकारी सत्तेचे मुख असलेल्या मंत्रिमंडळाचा विधिसत्तेवर फार मोठा अधिकार असतो. किंबहुना कार्यकारी सत्तेला मान्य असल्याशिवाय विधिसत्ता कोणताच कायदा करू शकत नाही. दैनंदिन राज्यकारभारासाठी आवश्यक असलेल्या कायद्यांच्याच बाबतीत केवळ नव्हे, तर राज्यव्यवस्थेला आधारभूत असलेल्या मूलभूत कायद्याच्या (primary law) बाबतीत कार्यकारी सत्तेची पसंती निर्णायक ठरते. म्हणून, लोकप्रतिनिधींच्या संसदेच्या अधिकारांना मर्यादा असल्या पाहिजेत. ती संस्था आपल्या अधिकाराचे अतिक्रमण तर करीत नाही ना, हेही बघितले पाहिजे.

हे बघण्याचे काम न्यायपालिकेकडे आहे. आम्ही लोकांचे प्रतिनिधित्व करतो असा अहंकार विधिमंडळाला असतो. पण विधिमंडळाची निर्मिती ज्या घटनेच्या तरतुदीतून झाली, त्याच घटनेच्या तरतुदीतून न्यायपालिकेचीही निर्मिती झाली, हे ध्यानात घेतले पाहिजे. आणि जर विधिमंडळाला आपल्या जन्मदात्री घटनेत फेरफार करण्याचे अधिकार मिळाले असतील, तर त्याच जन्मदात्रीने निर्माण केलेल्या न्यायपालिकेला त्या अधिकाराचा वापर विधिमंडळाने कसा केला हे तपासण्याचे अधिकार मिळाले आहेत, तेव्हा त्याबद्दल तक्रार करण्याचे कारण काय ? एका अपत्याला अवास्तव अधिकार आणि दुसऱ्याच्या बाबतीत मात्र त्यांचा संकोच, हा पक्षपात जन्मदात्रीला कां चिकटवावा ? तथापि संसदेने पारित केलेले कायदे घटनासंमत आहेत किंवा नाहीत हे तपासण्याचे अधिकार ज्या न्यायपालिकेला असतील, त्या न्यायपालिकेच्या सर्व अधिकाऱ्यांविषयी समाज–मानसात आदराची आणि विश्वासाची भावना असली पाहिजे, हे मात्र खरे. आजच्या न्यायमूर्तींच्या बाबतीत असा आदर आणि विश्वास हळुहळू क्षीण होत आहे, हेही खरे आहे. पण याचाही अधिकांश दोष कार्यकारी सत्तेकडे जातो. कारण त्यांच्या नेमणुकीचे

प्रभावी अधिकार कार्यकारी सत्तेकडे आहेत. कार्यकारी सत्तेनेच बांधील न्यायपालिकेचा (committed judiciary) वाद उपस्थित केला आहे. पण ही बांधीलकी कोणाशी ? शासनावर अधिरूढ झालेल्या लोकांच्या तात्कालिक गरजांशी की शाश्वत अशा न्यायमूल्यांशी ? एका अमेरिकन न्यायविदाचे वचन येथे उद्धृत करावेसे वाटते. तो म्हणतो, The court has no reason for existence if it merely reflects the pressures of the day. Our system is based on the faith that men set apart for this special function, freed from the influences of immediacy and from the deflections of worldly ambitions will become able to take a view of longer range than the period of responsibility entrusted to legislatures."

(न्यायालयांनी फक्त तात्कालिक परिस्थितीची दडपणे तेवढी प्रतिबिंबित केली तर त्यांच्या अस्तित्वाचे प्रयोजनच संपले. तात्कालिक आवश्यकतांच्या प्रभावापासून मुक्त असलेल्या व भौतिक आकांक्षांच्या हेलकाव्यांनी विचलित न होणाऱ्या ज्या व्यक्ती वेगळ्या काढलेल्या असतात, त्या विधिमंडळांना मिळालेल्या कालावधीपेक्षा अधिक दूरवरचा विचार करू शकतात, या विश्वासावर आपली न्यायव्यवस्था उभारलेली आहे.) अशा व्यक्तींची निवड करण्याची आजच्यापेक्षा वेगळी व्यवस्था असली पाहिजे, हे उघड आहे. अशी व्यवस्था करणे शक्य आणि सोपेही आहे. फक्त आपल्या अधिकारांचा त्याग करण्याची कार्यकारी सत्तेची इच्छा तेवढी हवी.

येथे असाही प्रश्न निर्माण होईल की, मग केव्हा तरी बनलेल्या घटनेत कालांतराने बदल आवश्यक आहे की नाही ? त्याचे उत्तर असे की, घटनेत बदल आवश्यक ठरतो. पण ते बदल करण्याचे अधिकार एक तर साक्षात् लोकांकडे असले पाहिजेत किंवा त्यासाठी वेगळी व्यवस्था निर्माण केली पाहिजे. ऑस्ट्रेलियात ते अधिकार लोकांकडे आहेत. आपण वेगळी व्यवस्था करू शकतो. त्या दृष्टीने आपल्या वरिष्ठ सभागृहाकडे हे काम सोपविता येईल. माझ्या "हिंदुत्व : जुने संदर्भ, नवे अनुबंध" या पुस्तकात यासंबंधी मी थोडेसे विवेचन केले आहे. त्यात असे म्हटले आहे की, या वरिष्ठ सभागृहाचे साधारणत: अडीचशे सभासद असावेत. त्यातील एकतृतीयांश सदस्य व्यवसायांच्या आधारावर (functional representation) निवडलेले असावेत आणि दोन तृतीयांश प्रत्यक्ष निवडणुकीने. या सभागृहाची मुदत दहा वर्षांची असावी. सामाजिक परिस्थितीत बदल होऊन त्या बदलाला अनुरूप असे प्रचलित कायदे आहेत किंवा नाहीत हे बघण्या-

साठी दहा वर्षांचा अवधी योग्य आहे. या सभागृहातील बहुमतावर लोकनियुक्त सरकारचे अस्तित्व अवलंबून असू नये आणि या सभागृहाचा कोणताही सदस्य मंत्रिमंडळाचा सदस्य राहू नये.

लोकशाही ही सतत विकसित होणारी व्यवस्था असेल, आणि आज असलेल्या वैगुण्यांना दूर करण्याच्या प्रयत्नांना वाव असेल, तर सध्याच्या सांसदीय पद्धतीत असा बदल करणे गैर ठरणार नाही. तात्पर्य असे की, संसदही सार्वभौम आहे, या प्रतिपादनाला पुष्कळच मर्यादा आणि परंतुके आहेत. ती ध्यानात न घेता, तिच्या सार्वभौमत्वाचा सतत उद्घोष करणे हे लोकप्रतिनिधी म्हणून प्राप्त झालेल्या अधिकाराच्या अनाठायी अहंकाराचे प्रकटीकरण आहे. संसदेपेक्षाही अधिक सार्वभौमत्व राज्यव्यवस्थेला आधारभूत झालेल्या घटनेला आहे, त्याहूनही अधिक लोकांना आहे आणि त्याहूनही अधिक ? पण तो वेगळाच विषय आहे.

१९-१२-८२

## चांगले राज्य, चांगल्यांचे राज्य

एखादे दिवशी हाती घेतलेल्या पुस्तकाचे वाचन संपून जाते. तास-अर्धा तास, वाचू म्हटले, तर वेळ शिल्लक असतो. पण नवे पुस्तक वाचावयाला घेण्याकडे मनाचा कल नसतो. अशा वेळी मी जुने वाचलेले पुस्तक हाती घेतो. असे पुस्तक माझ्या संग्रहातले असते. त्याची चिरमूल्यता मला पटलेली असल्यामुळे मी ते विकत घेतलेले असते. रघुवंश, शाकुंतल, किरातार्जुनीय, ज्ञानेश्वरी, सावरकरांची कविता, तांब्यांची कविता, मधुकर, जस्टिस ऑन ट्रायल, गोल्डन ट्रेझरी—अशी किती तरी.

परवा अशाच ‘ किंकर्तव्यमूढ ’ मनःस्थितीत असताना, महाकवी भारवीचे “ किरातार्जुनीय ” हाती घेतले. वाचलेलेच सर्ग पुनः वाचू लागलो.

दुर्योधनाच्या दुष्टतेसंबंधी, त्याच्या सत्तालालसेसंबंधी, द्रौपदीच्या त्याने केलेल्या विटंबनेसंबंधी, कपटद्यूत खेळून पाडवांना देशोधडीला त्याने लावले त्यासंबंधी, सर्वांना माहिती आहेच. पण पांडवांना वनात पाठविल्यानंतर त्याने १३ वर्षे कसे राज्य केले, यासंबंधी मात्र माहिती नाही. माझ्या अल्पवाचनात, महाभारतात ती माहिती मला आढळली नाही. पण भारवीच्या “ किरातार्जुनीया ”त ती माहिती आहे. “ किरातार्जुनीय ” हे एक काव्य आहे. त्यामुळे,

त्यातील माहिती इतिहासाच्या कसोटीवर उतरेल असे नाही. कल्पिताचा भाग त्यात पुष्कळच असू शकतो. त्यामुळे, दुर्योधनाच्या राज्याचे आणि राज्यव्यवस्थेचे त्याने जे वर्णन केले, ते काल्पनिक असू शकते. कदाचित् भारवी आपल्या एखाद्या समकालीन राजाच्या राज्यकारभाराचेही या निमित्ताने वर्णन करीत असेल. ते काहीही असले, तरी दुष्ट आणि मत्सरग्रस्त दुर्योधनाचे राज्य प्रजेच्या कल्याणाचे होते, हे भारवीने आवर्जून सांगितले आहे

प्रसंग आहे द्वैतवनातला. आपल्या पश्चात् दुर्योधन कसे राज्य करीत आहे, हे जाणून घेण्यासाठी युधिष्ठिराने आपला एक गुप्तचर कौरवांच्या राजधानीत पाठविला. तो परत येऊन युधिष्ठिरासमवेत बसलेल्या सर्व पांडवांना आणि द्रौपदीला दुर्योधनाच्या राज्यकारभाराचे वर्णन करून सांगतो. दुर्योधनाचा जो कारभार त्या गुप्तचराने पाहिला, त्याने तो फार प्रभावित झाला होता. दुर्योधनाच्या शत्रूसमोर दुर्योधनाचे गुणवर्णन करावे लागणार याची त्याला कल्पना होती. आपल्या मालकांना ते आवडेलच याची त्याला खात्री नव्हती तरी पण जे आपल्याला दिसले, ते सत्य स्वरूपात आपण कथन केले पाहिजे एवढी सत्यनिष्ठा त्याच्या ठायी होती. त्यामुळे, दुर्योधनाच्या राज्यकारभाराची प्रशंसा करताना त्याच्या मनाला कसलाही संकोच झाला नाही. कारण, "जे हितैषी लोक असतात, ते प्रिय असले तरी खोटे बोलत नाहीत." तो गुप्तचर युधिष्ठिराला म्हणाला, "महाराज, हेरांच्या नजरेने पाहणाऱ्या आपल्यासारख्या स्वामींना कर्तव्यनिष्ठ सेवकांनी कधीही फसवू नये, म्हणून मी आता जे सांगणार आहे, ते आपल्याला आवडले नाही तरी त्याबद्दल आपण मला क्षमा करावी. कारण हितकर आणि प्रिय असे निवेदन मिळणे दुरापास्त असते." तो पुढे म्हणाला, "जो राजाला सत्य माहिती देत नाही, तो कुमित्र होय. आणि जो राजा हितचिंतक मित्राचे ऐकत नाही, तो कुप्रभु होय." गुप्तचराची ही प्रस्तावना पांडवांनी मान्य केली आणि मग मोकळेपणाने, जे त्याने पाहिले होते, अनुभविले होते, ते तो सांगू लागला.

गुप्तचर म्हणाला, "आपण वनात असला, तरी आपणाकडून पराभव होईल अशी दुर्योधनाला सारखी भीती वाटते. कपटद्यूताने आपण हे राज्य मिळविले आहे, याची त्याला पूर्ण कल्पना आहे. परंतु जे कपटाने मिळविले, ते आता न्यायीपणाने वागून वश करण्याचा तो प्रयत्न करीत आहे. तो कुटिलमती आहे, हे आपणांस माहीत आहेच. परंतु, आपल्यावर मात करण्याच्या लालसेने, सद्गुण प्रकट करून तो आपली कीर्ती पसरवीत आहे. खरोखर थोर लोकांशी घेतलेले वैरही समृद्धीला कारणीभूत होत असते. दुर्योधनाने कामक्रोधादी षड्रिपूंवर विजय मिळविला आहे· आळस सोडून दिला आहे. रात्रंदिवस तो सारखा

उद्योगरत आहे. त्याचा अहंकार कुठल्या कुठे पळाला आहे. नोकरांना तो जणु काही ते आपले प्रिय मित्र आहेत असे भासवितो. मित्रांना जणु ते आपले बंधूच आहेत असे वागवितो आणि बंधूंचा, जणु काही तेच राजे आहेत असा आदर ठेवतो. त्याचा समजूतदारपणा निष्कपट असून त्याला दानाची जोड मिळाली आहे. त्याची दानशीलता सन्मानाची साथ घेऊन प्रकट होते. आणि सत्कार, गुणांचा विचार करूनच करण्यात येतो. स्वतःला पैसा मिळावा म्हणून नव्हे, क्रोध आला म्हणूनही नव्हे, तर कर्तव्यच्युती झाली म्हणूनच तो कुणालाही दंड करतो. आणि असे करताना हा आपला शत्रू आहे की पुत्र आहे असा भेदभाव करीत नाही. स्वतःच्या रक्षणाची त्याने पुरेपूर व्यवस्था केली आहे. मनातून तो भ्याला असला तरी वरून तो निर्भय असल्याचे दाखवितो. कोणी चांगले यशस्वी काम केले तर तो त्याला मोठे पारितोषिक देतो. त्याने दिलेली संपत्ती, त्याच्याविषयी लोकांची कृतज्ञताच सांगत असते. तो सामदामादी उपाय अशा कौशल्याने वापरीत आहे की, सर्व प्रकारची अर्थसंपदा त्याला प्राप्त होत आहे. त्याच्या राजदरबाराचे अंगण, मांडलिकांच्या हत्तींनी आणि रथांनी नित्य गजबजलेले असते."

"शेतीकडे त्याचे विशेष लक्ष आहे. कालव्यांची नीट व्यवस्था त्याने केली आहे. शेतकऱ्यांना फारसे कष्ट न करताही अमाप पीक होत आहे. या संपन्नतेने संपूर्ण कुरु देश कसा सुशोभित झाला आहे. दुर्योधनाची कीर्ति सर्वदूर पसरली आहे. दुसऱ्याचे दुःख दूर करण्यासाठी तो अत्यंत तत्पर आहे. सर्वत्र संरक्षणाची चोख व्यवस्था असल्यामुळे सर्व उपद्रव शांत झाले आहेत. आणि त्याच्या गुणांनी प्रसन्न झालेली पृथ्वी संतोषाने त्याला सर्व प्रकारचे धन अर्पण करीत आहे. महाशक्तिशाली नेते, मानधन पुरुष, त्याच्याकडून धन प्राप्त झालेले इतर लोक व युद्धात कीर्ति प्राप्त केलेले योद्धे हे सारे परस्परांत कलह न करता किंवा गटबाजी न करता एकोप्याने, आपले प्राण देऊन सुद्धा, दुर्योधनाचे ईप्सित साध्य करण्याची कामना करीत असतात. तो दुर्योधन विश्वासू गुप्तचरांकडून राजेरजवाड्यांच्या सर्व बारीकसारीक हालचालीवर नजर ठेवीत असतो. आपल्या मनातील हेतू तो कधीही सांगत नाही. आणि परिणामावरूनच लोकांना त्याच्या हेतूचे ज्ञान होते. त्याला आजपर्यंत कोणावरही धनुष्य उगारावे लागले नाही. कुणाकडे क्रोधाने त्याला भ्रुकुटिभंग करावा लागला नाही. सर्व मांडलिक राजे, फुलांची माळ गळ्यात घालावी, त्याप्रमाणे त्याचा अधिकार स्वीकृत करीत आहेत. त्याचे सर्व शत्रू नाहीसे झालेले आहेत. त्याचे राज्य अगदी स्थिरपद झाले आहे. सागरापर्यंत पसरलेल्या भूमीवर त्याचे निष्कंटक राज्य चालू आहे. पण एवढे असले तरी, आपणाकडून संभवणाऱ्या भीतीची मात्र चिंता त्याला

ग्रासतेच. लोक कधीमधी, सहज गोष्टी सांगत असताना, अर्जुनाच्या पराक्रमाचा उल्लेख करतात, किंवा कधी आपल्या (धर्मराजाच्या) नावाचा निर्देश करतात, तेव्हा गारुडयाने मंत्रोच्चार केला की नाग जसा फणा खाली टाकून अस्वस्थ होतो तसा तो अस्वस्थ होतो."

गुप्तचराकडून हा वृत्तांत ऐकल्यावर पांडवांच्या काय काय प्रतिक्रिया झाल्या हेही भारवीने सांगितले आहे. भीम आणि द्रौपदी यांनी, दुर्योधनाचे राज्य अधिक मजबूत होण्यापूर्वीच प्रतिकाराची कारवाई करावी, असे अत्यंत आवर्जून सांगितले. किरातार्जुनीयातील द्रौपदीचे भाषण इतके जळजळीत, इतके भावनोत्कट आहे की कुणाचेही थंड रक्त तापून जावे. पण युधिष्ठिराने त्यांचे ऐकले नाही.

किरातार्जुनीयाच्या पहिल्या दोन सर्गांतील हे वर्णन वाचून मी ते पुस्तक बंद केले. मनात विचार आला की, दुर्योधन एवढ्या चांगल्या रीतीने राज्यकारभार करीत असताना पांडवांनी राज्यासाठी लढाई कां करावी ? त्या राज्यावर त्यांचाही हक्क होता म्हणून ? की, राज्य तेवढे चांगले असून चालत नाही, ते चांगल्यांचे राज्य असायला हवे म्हणून ? की, राज्याचा चांगुलपणा, हा कपटनीतीच्या वापराने प्रक्षुब्ध झालेले जनमानस आपल्या बाजूला वळवावे या हेतूने उद्‌भूत झालेला असल्यामुळे, स्थायी स्वरूपाचे लोककल्याण त्यातून साधणार नाही म्हणून ? भारवीच्या युधिष्ठिराचे निदान असे आहे की, आज दुर्योधनावर खुष असलेले लोक सदा खुष रहावयाचे नाहीत. युधिष्ठिर म्हणतो, "दुर्योधन स्वभावाने उद्धट आहे. तो मांडलिक राजांचा अपमान केल्याशिवाय राहणार नाही. अहंकारी व्यक्तींनी कार्यवशात् थोडासा विनय धारण केला, तरी तेवढ्याने त्यांचा अहंकार दबत नाही. दर्पोद्धत राजे मग मूर्खासारखे वागतात. ते न्यायनीती सोडून देतात आणि एकदा न्यायनीती सुटली की लोक असंतुष्ट होऊ लागतात. लोकांना असंतोष आतल्या आत धुमसू लागला की त्यातून आग उसळल्याशिवाय राहात नाही. झाडाच्या शाखा एकमेकांना घासून अग्नी उत्पन्न झाला की तो सारे झाडच जाळून टाकतो. उद्धट माणसाच्या समृद्धीची परिणती नेहमी विपत्तीत होत असते." युधिष्ठिर एवढे सांगून थांबला. त्याच्या युक्तिवादावर विसंबून त्याच्या बंधूंनी, तेरा वर्षेपर्यंत वाट पाहण्याचे ठरविले. पुढचा कथाभाग सर्वपरिचित आहे. मला वाटते, युधिष्ठिराला हेच सांगावयाचे असावे की, दुष्टांचे चांगले राज्य सतत चांगले राहात नाही. राज्य चांगल्या लोकांचे असले पाहिजे. त्यातच लोकांचे स्थायी कल्याण असते.

२७-७-७५

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

# क्रांती, विकास, उन्नती

विशिष्ट काळात विशिष्ट शब्द आकर्षक असतात. ते वापरण्याचा मोह होणे त्यामुळे स्वाभाविक ठरते. ते शब्द वापरले नाहीत, तर गतानुगतिकत्वाचे (orthodoxy) आपण समर्थक तर ठरणार नाही ना, अशी भीती अनेकांना वाटत असावी, असे मला वाटते. त्यामुळेच ते, नवे फॅशनेबल शब्द वापरीत असावेत, असा माझा तर्क आहे. सेक्युलर, समाजवाद, क्रान्ती हे आजचे असे नवे, आकर्षक शब्द आहेत. या शब्दांचे आकर्षण असल्यामुळे, ते शब्द आपण वापरतो हे खरे. पण त्याचा जो रूढार्थ आहे, मान्यताप्राप्त असा जो आशय आहे, तो मात्र आपण मान्य करीत नाही. मग आपण त्या शब्दावर आपल्याला पसंत असलेल्या अर्थाचे पुट चढवितो. त्यामुळे मग वैचारिक गोंधळ निर्माण होतो. शब्द मूलार्थानेच (etymologically) वापरले जातात किंवा वापरावे लागतात, असे कुणीच म्हणणार नाही. परंतु शब्दांचे जे रूढार्थ आहेत, ते बदलविता येतील काय, शब्दार्थात अशी 'क्रान्ती' करता येणे शक्य आणि योग्य आहे काय, याविषयी मी साशंक आहे.

सेक्युलर, समाजवाद आणि क्रान्ती हे तिन्ही शब्द बाहेरून आलेले आहेत. एका विशिष्ट संदर्भात आलेले आहेत–त्यांचे विशिष्ट रूढार्थ आहेत. 'सेक्युलर' चा अर्थ ऐहिक असा आहे. धर्म–पंथ–उपासनादींशी जे संबद्ध नाही ते 'सेक्यु--लर'. युरोपखंडात राज्यावर धर्मगुरूंचा अधिकार चालत असे, परमेश्वर हाच सर्वश्रेष्ठ शास्ता आहे व त्या परमेश्वराचे पृथ्वीवरील अधिकारी असलेले धर्मगुरू हे त्याच्या वतीने राज्यकारभार करीत असतात, हे जे सांप्रदायिक राज्याचे (theocratic state) तत्त्व आहे, त्यानुसार युरोपातील राज्यांचा व्यवहार होता; त्याला प्रतिक्रिया म्हणून, 'सेक्युलर' राज्याची कल्पना पुढे आली. 'सेक्युलर'ला अ–धार्मिक म्हणावयाचे नसले, तर नका म्हणू; पण धर्मातीत किंवा धर्म–असंबद्ध असे म्हटलेच पाहिजे. पण आपण भारतीयांनी सेक्युलर म्हणजे 'सर्वधर्मसमभाव बाळगणारे,' असा अर्थ केला आहे. 'सेक्युलर' या शब्दाला न पेलणारा हा अर्थ आहे, असे मला वाटते. 'सर्वधर्मसमभाव' ठेवणारे राज्य चांगले की वाईट हा प्रश्न अलाहिदा आहे. पण ते राज्य 'सेक्युलर' नव्हे. 'सेक्युलर' शब्दात धर्मविरोध नसला, तरी धर्माच्या बाबतीत तटस्थता आहे. निरपेक्षता आहे. सर्वधर्मभावात, धर्ममान्यता आहे. एवढेच की ती सर्वांकरिता समान आहे. सर्वधर्मसमभाव असलेले राज्य, असा शब्दप्रयोग सुटसुटीत नाही. सुटसुटीत शब्दप्रयोग 'हिंदू राज्य' असा होऊ शकतो. पण तो स्वीकारला, तर प्रतिगामीपणाचा आरोप येण्याची भीती वाटते. म्हणून 'सेक्युलर' असा नवा

फॅशनेबल शब्दप्रयोग आपण करतो आणि त्याचा अर्थ 'सर्वधर्मसमभाव' असा करून, त्याच्या छत्राखाली राज्यातर्फे होणारी विठोबाची पूजा, समंत्र शिलान्यास, सरकारी श्रेष्ठींचे सरकारी श्रेष्ठी म्हणून–वैयक्तिक म्हणून नव्हे–देवदर्शन इत्यादी सारे 'सेक्युलॅरिझम्'शी सुसंगत ठरवून खपवून घेतो.

समाजवादाचेही तसेच आहे. समाजवादाच्या अनेकविध व्याख्यांचे अगदी संक्षिप्त सार असे की, उत्पादनाच्या आणि वितरणाच्या सर्व साधनांवर आणि प्रणालींवर समाजाची मालकी म्हणजे समाजवाद. असा समाजवाद चांगला की वाईट हा प्रश्न पुन: अलाहिदा. आपणास हा अर्थ मानवत नाही, पण 'समाजवाद' या शब्दाचा मोहही सोडवत नाही. मग "सर्वेऽपि सुखिन: सन्तु", "जो जे वांछील तो ते लाहो", गरिबांचे कल्याण, गरिबी हटाव, असे ऐसपैस त्याचे वर्णन स्वीकारून, आम्हीही काही मागे नाही, असे दाखविण्याची आमची धडपड असते.

'क्रान्ती' हाही असाच एक शब्द आहे. या आठवड्यात सुप्रसिद्ध विचारवंत श्री. दादा धर्माधिकारी यांची 'संपूर्ण क्रांती' या विषयावर नागपूर शहरात तीन अत्यंत विचारप्रेरक अशी भाषणे झाली. दादांचे वक्तृत्व अत्यंत विलोभनीय, भाषाप्रभुता स्पृहणीय, शैली विलक्षण परिणामकारक. त्यामुळे ती भाषणे लोकांना खूपच आवडली. माझ्या दुर्दैवाने मी फक्त पहिले एकच भाषण ऐकू शकलो, पण बाकीच्यांचे वृत्तपत्रीय वृत्तांत वाचले. वक्तृत्वाचे विलोभनीय कवच बाजूला सारून त्या सुंदर भाषणातील विचारांचाच तेवढा विचार केला, तर 'क्रान्ती' या शब्दावर त्याला न जुळणारा अथवा त्याची समग्रता व सर्वंकषता झांकाळून टाकणारा अर्थ तर दादा लादीत नाही ना, असा संशय मला आला. 'क्रान्ती' (revolution) हा शब्द पश्चिमेकडूनच आलेला आहे. 'रेवोल्युशन' म्हणजे एक पूर्ण चक्कर–असा त्याचा मूलार्थ आहे. पण तो रूढ नाही. क्रांती म्हणजे जबरदस्तीने व धडाक्याने केलेली उलथापालथ हा रूढार्थ आहे. इंग्रजी भाषेतही 'पूर्ण चक्कर' असा अर्थ जाऊन 'जबरदस्तीने आणि धडाक्याने केलेली उलथापालथ' हा अर्थ केव्हा आला कोण जाणे! कदाचित् बॅस्टिलचा तुरुंग फोडण्याच्या घटनेनंतरही आला असेल. पण आता तो त्या अर्थाने रूढ झाला आहे. क्रान्तीत विधायकता नसतेच असे कोणी म्हणणार नाही. पण विधायकता आहे आणि जबरदस्ती, वेग आणि धडाका नाही, तर ती क्रांती होणार नाही. 'क्रांती' हा संस्कृत भाषेतला शब्द आहे. त्याचा अर्थ ओलांडणे असा आहे. 'जवळ जाणे' असाही, ज्या 'क्रम्' धातूपासून क्रांती शब्द निघाला त्याचा अर्थ आहे! दादांनी, 'ऑल ॲडव्हान्स इज् ॲप्रोच–म्हणजे मानवाने परस्पराजवळ जाणे ही क्रान्ती होय, असा जो अर्थ आपल्या भाषणात सांगितला, त्या अर्थाने 'क्रांती'

शब्द वापरता येईल. परंतु, ज्या प्रक्रियेत जबरदस्ती नाही, धडक नाही, वेग नाही, ती क्रिया, क्रांतीचा जो रूढार्थ आहे, त्या अर्थाने क्रांती ठरू शकत नाही.

'क्रांती'ला हिंसा टाळता येणार नाही काय ? मार्क्स म्हणाला, टाळता येणार नाही. परंतु त्या हिंसेचा त्याला अभिमान नाही. जे जुन्या पठडीतले कम्युनिट आहेत, तेही हिंसेच्या प्रक्रियेला फार महत्त्व देत नाहीत. तिचा गौरव करीत नाहीत. व्यवहारात, युद्ध, छळ, खून, आतंक–असे हिंसाचार कम्युनिस्टांनी केले असले, तरी त्यांची भाषा हिंसेच्या समर्थनाची नाही; शांतीच्या प्रस्थापनेची आहे. ज्यांनी हिंसेचा सर्रास वापर केला ते फॅसिस्ट होत, आपण त्या गावचे नाहीत, असे या पठडीतल्या कम्युनिटांचे मत आहे. परंतु, सार्त्र, मार्क्युज, चे गुवेरा, फ्रान्झ फॅनॉन यांच्यासारखे जे नवे डावे विचारवंत–क्रियावंत आहेत, त्यांना हिंसा अपरिहार्यच नव्हे तर गौरवान्वितही वाटते. "जनतेने केलेली हिंसा, जनतेच्या पुढाऱ्यांनी शिकविलेली व संघटित केलेली हिंसा, जनतेला सामाजिक सत्यांचे आकलन करून देते आणि त्या सत्याची किल्लीही देते"–असे फॅनॉनने म्हटले आहे. सार्त्रचे म्हणणे असे आहे की, "विद्यमान सर्व संस्थांमध्ये आणि राजकीय संबंधांमध्ये हिंसा ओतप्रोत भरली आहे." मार्क्युजला सार्त्रचे म्हणणे मान्य आहे. तो म्हणतो, "क्रांतिकारी हिंसा आणि प्रतिक्रियात्मक हिंसा यांत फरक आहे. शोषितांची हिंसा आणि शोषकांची हिंसा वेगवेगळी आहे. नैतिक दृष्टीने दोन्ही हिंसा अमानवीय आणि वाईट आहेत. पण नैतिक मानदंडाने कधी इतिहास घडविला आहे काय ?" (In terms of historical function, there is a difference between revolutionary and reactionary violence, between violence practised by the oppressed and the oppressors. In terms of ethics, both forms of violence are inhuman and evil but since when is history made in accordance with ethical standards ?) क्रांतिकारी म्हणून इतिहासात ज्या व्यक्तींची नावे आहेत, त्यांनी हिंसेला त्याज्य मानले नाही, हे मला सांगायचे आहे.

आपण हिंसेचा त्याग अभिप्रेत धरायचा, उलथापालथ नाकारायची, मग त्या प्रक्रियेला 'क्रांती' का म्हणायचे ? परिवर्तनाला 'क्रांती' कशाकरिता संबोधायचे ? संदर्भपरिवर्तन, मूल्यपरिवर्तन, संबंधपरिवर्तन, हृदयपरिवर्तन हे क्रांतीचे चार आयाम दादांनी सांगितले. मला सुचवावयाचे आहे की, 'परिवर्तन' हे क्रांतीचे व्यवच्छेदकत्व होऊ शकत नाही. 'उच्छेद' हे क्रांतीचे व्यवच्छेदकत्व आहे. 'संदर्भपरिवर्तन' हे क्रांतीचे व्यवच्छेदकत्व नाही. 'संदर्भउच्छेद' हे व्यवच्छेदकत्व होईल. उच्छेदात परिवर्तन अंतर्भूत आहेच. पण क्रांतीत उच्छेदाचा अंश नसेल, तर ती क्रांती कशी होईल ? 'संपूर्ण क्रांती' ही परिभाषा मार्क्सवाद्यांची

आहे. अंगोपांगी परिवर्तन असा त्याचा अर्थ आपण घेणे बरोबर होईल काय, अशी माझी शंका आहे. माणसाचे साधे चालणे असले तरी तो जमिनीच्या प्रत्येक कणाला स्पर्श करीत चालत नाही. आपल्या दोन पदक्रमात चांगली अडीच फूट जमीन सोडीत, तो चालत असतो. साध्या 'गतींत' इतके वगळावे लागते. 'क्रांतींत' तर खूप सोडावे लागेल. कारण क्रांतींत वेग असतो, तो असला पाहिजे. शिवाय मधले नुसतेच सोडावे लागते असे नाही, तर वाटेत दिसणारे तुडवावे, तोडावे, पाडावे लागेल. आपल्याकडे अंगोपांगी परिवर्तनासाठी जो शब्द आहे, तो आहे विकास. दुधाचे दही होणे, कळीचे फूल होणे—हा विकास आहे. अंगोपांग स्पर्शिणारी ती प्रक्रिया आहे. ही प्रक्रिया गुणात्मक दृष्टीने श्रेयस्कर असेल किंवा नसेलही. साधा भौतिक विकास असेल. पण गुणात्मक विकास अभिप्रेत असेल, तर उन्नती हा शब्द का वापरू नये ? कारण उन्नतीत घसरणे नाही. गुणात्मकतया पुढेच जाणे आहे. नुसतेच जाणे नाही, नुसतीच प्रगती नाही, गुणात्मक प्रगती आहे, श्रेयस्कर प्रगती आहे. उन्नतीत केवळ भौतिक विकास नाही, आजच्या मूल्याहून श्रेष्ठ असे नैतिक मूल्य तीत अपेक्षित आहे. सर्वत्र अंगोपांगी 'उन्नती' हवी असेल, तर आपण सर्वांगीण उन्नती म्हणू शकतो. उन्नतीत जसे मूल्यपरिवर्तन आहे, तसेच हृदयपरिवर्तनही येऊ शकते. उन्नतीत संदर्भ–उच्छेद नाही, पण निकटच्या संदर्भात परिवर्तन अवश्य असते. शिवाय, संदर्भ–उच्छेदाची एवढी गरज कां ? संदर्भाचा उच्छेद हितकारीच असतो कां ?—असे प्रश्न कोणीही उत्पन्न करू शकतो. एकाच किंवा जुन्याच संदर्भबिंदूशी जखडलेले असणे ही उन्नती नव्हे. ती स्थिती झाली. उन्नती म्हणजे स्थितीच्या पुढे जाणे आहे. मानवाची काही उन्नती झाली असेल, तर ती स्थितीच्या संदर्भाने पुढे जाण्यात झाली आहे. संदर्भ सोडून उन्नतीची कल्पना वदतोव्याघात ठरेल. मूल्यपरिवर्तनासाठी जुन्या टाकाऊ ठरलेल्या मूल्यांचा संदर्भ लागतोच. अन्यथा नुसते परिवर्तन म्हणजे अवनतीही ठरू शकेल. क्रांतिकारकाला जुन्याचा जो वीट असतो, तो सहज समजून घेता येईल. कारण त्याला त्याचा विध्वंस करायचा आहे. पण समाजधारणेसाठी ज्यांचा अवतार असतो, असे पुरुष जुन्याशी असा संबंधविच्छेद श्रेयस्कर आणि समाजकल्याणकारक मानीत नाहीत. म्हणून महात्मा गांधींनी 'क्रांती'ची भाषा उच्चारली नाही. 'रामराज्या'ची परिभाषा मांडली. 'रामराज्य' म्हणजे शंबूकवध नव्हे. वंशपरंपरेने येणारी राजवंशीय सत्ताही नव्हे. आज कोणी ती आणील तर ती अवनती होईल. कारण स्थितीच्या ते खाली जाणे झाले. उन्नतीसाठी 'शंबूकवध' सोडावा लागेल, राजवंशीय सत्ता त्यागावी लागेल आणि तरीही रामराज्य स्वीकार्य ठरेल. भारताच्या संदर्भात मला वाटते, 'उन्नती'ला पोषक अशा परिभाषेची आवश्यकता आहे. ती

परिभाषा रूढ करण्याचे दायित्व विचारवंतांनी आणि समाजसुधारकांनी स्वीकारले पाहिजे. इतरत्र रूढ झालेल्या किंवा फॅशनेबल ठरलेल्या शब्दांवर आपल्या नव्या आशयाचे आवरण केवळ वैचारिक गोंधळ उत्पन्न करील. गतानुगतिकत्वाची जरठता (rigidity of orthodoxy) केव्हाही त्याज्यच होय. पण म्हणून फॅशनची अत्याचारिता (tyranny of fashion) स्वीकारली पाहिजेच काय ?

२–१०–७७

## माझ्या बहुजन–समाजासाठी

अमरावतीला मराठा महासंघाचे जिल्हा अधिवेशन नुकतेच पार पडले. तसे ते केवळ एका जिल्ह्याचेच अधिवेशन असल्यामुळे, त्यातील विचारमंथनाची खूप गांभीर्याने दखल घेतलीच पाहिजे असे नाही. तथापि, त्या अधिवेशनात जे विचार व्यक्त झाले, त्यांना व्यापक आशय आहे आणि ते छोटयाशा परिक्षेत्रातील विचार असले, तरी आपल्या बहुजन–समाजातील विचारांची एक वेगळी दिशा प्रकट करणारे आहेत, त्यामुळे ते मला महत्त्वाचे वाटले.

मी स्वत: अल्पजनसमाजातला आहे. पण बहुजन–समाजाविषयी मला खूप आस्था आणि जिव्हाळा आहे. त्याला कारण आहे. आपल्या भारत देशाच्या अस्मितेचा, सामर्थ्याचा आणि प्रतिष्ठेचा कणा, येथे बहुसंख्य असलेला हिंदू समाज आहे, अशी माझी ठाम धारणा आहे. हिंदूंच्या प्राचीन संस्कृतीविषयी मला अभिमान आहे आणि त्या संस्कृतीने स्थिरपद केलेली जीवनमूल्ये संपूर्ण विश्वासाठी कल्याणकारक आहेत, असा विश्वास माझ्या मनात रुजलेला आहे. ती शाश्वत जीवनमूल्ये टिकवून आणि नव्याचा त्या प्राचीनाशी समन्वय साधून हा समाज वाटचाल करील, तर तो या जगात वैशिष्टयपूर्ण असा समाज बनेल आणि केवळ परानुकरणपरायण आणि अस्मिता हरवून बसलेला तो बनणार नाही असे मला वाटते. हिंदू समाजाच्या उज्ज्वल भवितव्याविषयी मी अत्यंत आशावान् आहे. अशा त्या हिंदू समाजातील बहुसंख्य समाज म्हणजे "बहुजन समाज" असे मी समजतो. एका समाजाचेच "अल्पजन" आणि "बहुजन" असे गट पाडणे तत्त्वत: मला मान्य नाही. पण ते तसे पडलेले आहेत, हे अमान्यही करता येत नाही. सामान्यत: एखाद्या एकसंध समूहातून छोटासा गट आपले वेगळेपण घेऊन ते जोपासत असतो. हिंदू समाजाच्या आणि विशेषत: महाराष्ट्रातील हिंदू समाजाच्या बाबतीत मात्र विपरीत घडले. तेथे मोठा गट स्वत:ला वेगळा संबोधू लागला. त्याची काही

ऐतिहासिक कारणे असतील. पण त्यांच्या चर्चेत मी येथे शिरू इच्छित नाही. मला हे सांगावयाचे आहे की, हिंदू समाजाची अस्मिता, प्रतिष्ठा, गौरव, मानसन्मान, हे सारे, त्या समाजातील बहुसंख्य लोकांवर अवलंबून आहे. आणि हा बहुसंख्य समाज "बहुजनसमाज" असल्यामुळे, हिंदू समाजासंबंधीची माझी आस्था आणि जिव्हाळा स्वाभाविकच बहुजनसमाजाकडे संक्रमित झाला आहे. म्हणून या लेखाचे शीर्षक मी "माझ्या बहुजनसमाजासाठी" असे दिले आहे. मी "बहुजन समाजातला" नसलो तरी बहुजनसमाज माझा आहे !

अमरावती जिल्ह्यात झालेले अधिवेशन मराठा महासंघाचे होते; संपूर्ण बहुजन समाजाचे नव्हते, हे सहज मान्य करता येईल. पण जे स्वतःला "मराठा" मानतात, त्यांचीच बहुजन-समाजात बहुसंख्या आहे आणि ते बहुजन समाजाचे अग्रणीही आहेत. त्यामुळे त्यांचे विचार म्हणजे बहुजन-समाजाचे विचार असे मी मानतो. त्यांनी या अधिवेशनाला "बहुजन समाज महासंघाचे" अधिवेशन असे म्हटले असते आणि "बहुजन समाज" म्हणून ज्या जातींचा आणि जमातींचा उल्लेख होतो, त्या सर्वांच्या विचारांना प्रतिनिधित्व प्राप्त झाले असते, तर ते अधिक योग्य झाले असते. मी स्वतः "हिंदू महासंघवाला" असल्यामुळे, मला तर सामाजिक प्रश्नांच्या संदर्भात समस्त हिंदूंचेच अधिवेशन वांछनीय वाटते. पण ती बाब वेगळी आहे.

या अधिवेशनात, श्रीमती कमलाबाई मराठे यांनी एक अत्यंत मोलाचा विचार मांडला. त्या म्हणाल्या "आजपर्यंत आम्ही केवळ सत्तेसाठीच भांडत आलो. आता तरी आपण सत्ताविन्मुख समाजकारण करावयास शिकले पाहिजे." कमलाबाई माझ्या मनातील भावच बोलल्या. लोकशाही व्यवस्थेत बहुसंख्येला मान असल्यामुळे जे बहुसंख्य आहेत, त्यांचा वरचष्मा राहणार हे स्पष्टच आहे. तेव्हा राजकारणातील आपल्या स्थानासंबंधी बहुजनांनी चिंतित असण्याचे कारण नाही. "बहुजन समाज" याचा अर्थ आपली एक विशिष्ट जात, असा संकुचित अर्थ कोणी करीत असेल, तर तो "बहुजन" या संकल्पनेचाच अपमान करीत आहे, असे म्हटले पाहिजे. "बहुजन समाजात" मराठेतर ज्या अनेक जाती आहेत, त्यांना राजकारणातील आपल्या स्थानाबद्दल संतोष नव्हता हे खरे आहे. मराठा-कुणबी-देशमुख यांच्या व्यतिरिक्त किती तरी आमदारांनी अनेकदा माझ्याजवळ आपली नाराजी व्यक्त केलेली आहे. उपहासाने ते डी० एम० के० चे (देशमुख-मराठी-कुणबी यांचे) राज्य आहे असे म्हणत असत. महाराष्ट्रात बॅ० अंतुले यांचे मंत्रिमंडळ सत्तारूढ झाले तेव्हा बहुजनसमाजातील अनेक जातींच्या आमदारांना आनंद आणि समाधान वाटले, हे मी अनुभवले आहे. आणि ही गोष्ट मराठा समाजातील काही मान्यवरांना मी तेव्हा सांगितलीही होती.

विशिष्ट जिल्ह्यात, विशिष्ट जातीनेच राजकीय वर्चस्व गाजवावे ही गोष्ट इतरांना खटकली, तर त्यात नवल नाही. म्हणून, मराठा महासंघाने बहुजनातील सर्व जातींना बरोबर घेऊन चालले पाहिजे. तसे ते करणार नाहीत, तर फूट पाडून शेंडी आपल्या हाती ठेवणाऱ्यांचे फावणार आहे. दिल्लीत महाराष्ट्रातील राजकारण जे शिजते, त्याच्या खालचे इंधन याच चलाख व्यूहाचे असते.

पण मला राजकीय वर्चस्वाची अथवा त्या वर्चस्वाच्या अभावाची तेवढी चिंता वाटत नाही. मराठा समाजातील लोकांना मात्र ती चिंता ग्रासून आहे, असे जाणवते. या परिषदेतील अन्य वक्त्यांची भाषणे ही त्याच चिंतेने युक्त वाटली. श्रीमती मराठे यांनी मात्र तो समाज समाजकारणानुगामी व्हावा अशी अपेक्षा व्यक्त केली. समाजजीवनाची अशी कितीतरी क्षेत्रे आहेत की, ज्यात बहुजन समाजाने अग्रेसर झाले पाहिजे. आणि बहुजन समाजामध्ये मराठे आघाडीवर असल्यामुळे ते या सर्व क्षेत्रांमध्येही आघाडीवर हवेत. धार्मिक आणि आध्यात्मिक क्षेत्रात बहुजन समाजातील किती लोक अग्रेसर आहेत ? बहुजन समाजातील जो शिक्षित वर्ग आहे, तो आपल्या धर्माचा अभ्यास, त्याचे चिंतन, त्यासंबंधी प्रवचन आणि त्याद्वारे बहुजन समाजाचे उद्‌बोधन–ही कामे आपली नाहीत असेच समजतो. जणू काही त्यांना या धर्माशी कर्तव्यच नाही, अशी त्यांनी समजूत करून घेतलेली दिसते. हे कार्य ज्या ब्राह्मणवर्गाने केले, त्या ब्राह्मणवर्गाविषयी बहुजनसमाजात जो मत्सर आहे, तो आपण समर्थनीयही मानू. पण म्हणून आपल्या धर्मग्रंथापासून त्याने दूर जावे असे नाही. शिक्षित बहुजनसमाजवादी एकदम नास्तिकतेलाच कवटाळू पाहतो. निदान अज्ञेयवादी तरी बनतो. यात तो आपली व्यक्तिगत प्रतिष्ठा किती वाढवितो हे कोण जाणे, पण तो समाजापासून मात्र दूर जातो. उपनिषदे, भगवद्‌गीता, यांच्यावर अधिकारवाणीने प्रवचन करू शकणारी बहुजन समाजातील किती मंडळी आढळतील ?

प्राचीन ज्ञानाचे क्षेत्र सोडले आणि आधुनिक ज्ञानविज्ञानाकडे वळले, तरी स्थिती फारशी स्पृहणीय नाही. विद्यालये, महाविद्यालये किंवा विद्यापीठे, यात मानाची आणि प्रतिष्ठेची स्थाने मिळविणे म्हणजे ज्ञानसाधना नव्हे. ही स्थाने लोकशाही पद्धतीतील निवडणुकीने किंवा सरकारी कृपेने मिळत असतात. निवडणुकीत संख्येला महत्त्व आहे; आणि सरकारी कृपा प्राप्त करण्यासाठी विद्वत्तेची जरूर नसते. ज्या समाजाचा अल्पांश कां होईना, निखळ ज्ञानोपासनेत स्वतःला गुंतवून घेणार नाही, त्या समाजाला स्वयमर्जित प्रतिष्ठा कशी मिळणार ? "ब्राह्मणेन निष्कारणो वेदोऽध्येयः"–म्हणजे ब्राह्मणाने कारण नसतानाही वेदांचे अध्ययन केले पाहिजे, असा एक जुना दंडक होता. त्यानुसार निरपेक्षपणे पिढ्यान् पिढ्या ज्ञानाची उपासना झाली. नवी शास्त्रे निघाली, नवे संशोधन झाले आणि

हे खूप व्यापक प्रमाणावर झाले. आता हे काम एका छोटद्या जन्मजात वर्गाकडे सोपविणे योग्य नाही. म्हणून बहुजन समाजातील बुद्धिमंतांनीही पद आणि प्रतिष्ठा यांच्याकडे पाठ फिरवून ज्ञानाच्या साधनेत स्वतःच्या जीवित कर्तव्याचा शोध घेतला पाहिजे. अन्यथा ज्ञानसाधनेतील सामाजिक समतोल प्रस्थापित व्हावयाचा नाही.

सेवेच्या क्षेत्राच्या बाबतीत तर स्थिती आणखीच दयनीय आहे. कुष्ठ-रोग्यांची सेवा आमटे–पटवर्धनांनी करावी, मातृसेवा संघासारखी संस्था कमला-बाई हॉस्पेटांनी काढावी, वनवासींच्या कल्याणासाठी बाळासाहेब देशपांड्यांनी जशपुरात स्वतःला बंदिस्त करून घ्यावे आणि बहुजनसमाज केवळ तटस्थ रहावा, हे समाजाच्या सर्वंकष उपक्रमशीलतेचे चिन्ह नव्हे. बहुजन समाजातील किती तरी व्यक्ती डॉक्टर झाल्या आहेत. काही आपल्या नैपुण्याने खोऱ्याने पैसाही मिळवीत असतील. पण किती जणांना असे वाटते की, आपण पैसा न मिळविता, एखाद्या वनवासी क्षेत्रात जाऊन तेथील आपल्या अभागी बांधवांच्या उद्धारासाठी जीवन खर्च करण्यातील धन्यता अनुभवावी ? अमरावतीच्या अधिवेशनात एक वक्ते म्हणाले की, महासंघ नेहमीच दलितांच्या पाठीशी उभा आहे. पण आज दलितांवर खेड्यापाड्यात जे अत्याचार होतात ते कुणाकडून ? एक काळ असा होता की, सामाजिक अन्यायासाठी ब्राह्मण वर्गाला जबाबदार धरून आपले दलितप्रेम सार्थ करता येत असे. पण आता खेड्यात ब्राह्मण उरलाच नाही; आणि तरी अत्याचार होतात. दलितोद्धारासाठी अंतरीची तळमळ बहुजनांमध्ये निर्माण करण्याचे व्रत घेतलेला महात्मा, बहुजन समाजातूनच वर येण्याची आवश्यकता आहे, असे मला वाटते.

व्यापारी आणि औद्योगिक क्षेत्रासंबंधीही न बोललेलेच बरे. माझा मुद्दा हा आहे की, मराठा समाजालाच नव्हे तर संपूर्णच बहुजन समाजाला राजकीय आकांक्षेने ग्रासलेले आहे. राजकारण हे समाजजीवनाचे महत्त्वाचे अंग असले, तरी एकमेव अंग नव्हे, हे त्या समाजाला अजून पटलेले नाही. राजकारणाचे लक्ष्य सत्ताप्राप्ती हे असते. या लक्ष्याने साऱ्यांनाच जणू काही झपाटून टाकले आहे. विद्यापीठात असो की सहकारात असो, सर्व धडपड त्या त्या ठिकाणची सत्तापदे प्राप्त करण्यासाठीच असते. त्यामुळे स्वाभाविकच त्या त्या क्षेत्रातील उच्च श्रेणीच्या गुणवत्तेकडे दुर्लक्ष होते. मी नेहमीच सांगत असतो की, चलाखीने किंवा लॉटरीने एका व्यक्तीचे, फार तर एका कुटुंबाचे, कल्याण होईल. संपूर्ण समाजाचे कल्याण साधावयाचे असेल, संपूर्ण समाजाची उन्नती करावयाची असेल, तर स्पष्ट ध्येय, सद्‌गुणांची अभिलाषा आणि निखळ परिश्रम, या गुणांची आवश्यकता आहे. मला ज्या समाजाचा अभिमान आहे त्या समाजातील एक

मोठा वर्ग, समाजोन्नतीच्या कठिण मार्गापासून दूर राहील, आणि सत्तेच्या सोप्या मार्गाकडे, मृगजळाकडे हरिणांनी धावावे, तसा धावत राहील, तर त्या समाजाचा उत्कर्ष–जगातील अन्य समाजांच्या आणि राष्ट्रांच्या तुलनेतील उत्कर्ष–कसा साधला जाईल, असा मला प्रश्न पडतो आणि मग मी चिंतित होतो. कमलाबाई मराठे यांनी म्हटल्याप्रमाणे मराठा समाजाकडून सत्ताविन्मुख समाजकारणाची आज आवश्यकता आहे. "तरच मराठ्यांच्या गौरवशाली परंपरेचा वारसा सांगण्याच्या योग्यतेचे आपण होऊ" असे श्रीमती मराठे म्हणाल्या. मी मराठ्यांची गौरवशाली परंपरा हिंदूंची गौरवशाली परंपरा मानतो आणि समस्त हिंदूंनीच त्या गौरवशाली परंपरेचा वारसा सांगण्याला योग्य बनावे असे म्हणतो.

२–१–८३

## जातीचे कवच आणि शस्त्र

काही समाजशास्त्रीय दृष्टीने इतिहास लिहिणारे लेखक असे सांगतात की, परकीय धर्मवेड्या आक्रमकांचे राजकीय आणि सांस्कृतिक अशा दोन्ही प्रकारचे कठोर हल्ले होऊनही, ज्ञातिव्यवस्थेमुळेच हिंदू समाज टिकला. उदाहरण म्हणून ते सांगतात की, पहा, अरबस्थानातून इस्लामचा अभिनिवेश घेऊन जे आक्रमक बाहेर पडले, त्यांनी पारशी आणि बौद्ध धर्माचे बहुसंख्य लोक ज्या भागात होते, ते भाग पादाक्रांत करताच, त्या सर्वांचे इस्लामीकरण होऊन गेले. भारताच्या पश्चिम आणि पूर्व दिशेला, आशिया खंडात जे देश आहेत, त्याच्याकडे नजर टाका, म्हणजे वरील सत्याची कल्पना येईल; ज्यांना या इस्लामीकरणाच्या लाटेपासून वाचावयाचे होते, ते आपल्या देशातून परागंदा झाले. या विचाराची मंडळी पुढे असेही सांगतात की, भारतात, खास राजधानी दिल्लीत, शेकडो वर्षे इस्लामचे कट्टर पुरस्कर्ते असलेले आणि इस्लामीकरणासाठी राज्यसत्तेचा सर्व दृष्टींनी वापर करण्याचा संकोच नसलेले राज्यकर्ते असतानाही हा प्रदेश इस्लामबहुल झाला नाही. कारण, त्यांच्या मते ज्ञातिव्यवस्था. त्यांना सांगावयाचे असते की, ज्ञातिव्यवस्थेच्या कवचाने समाजाचे रक्षण केले.

इतिहासाचे अशा प्रकारचे 'समाजशास्त्रीय' विश्लेषण खरे की खोटे हे जाणकार मंडळीच सांगू शकतील. हा ज्ञातिव्यवस्थेच्या पुरस्कर्त्यांचाच केवळ दृष्टिकोण आहे, असेही मानता येईल. परंतु आता प्रायः कोणी ज्ञातिव्यवस्थेचे पुरस्कर्ते आपल्या देशात नाहीत. जातीचा अभिमान मात्र आहे. जातीचा भेदही

आहे. जातीच्या आधारावर काही गोष्टी आपण करावयाच्या ठरविल्या असल्या-मुळे जातीची भावनाही आहे. खरे म्हणजे, या गोष्टींसाठी जातीची आठवण ठेवावीच लागते. आपण एस० सी० आहोत की एस० टी० आहोत, की, ओ० बी० सी० आहोत, की व्ही० जे० आहोत की एन० टी० आहोत–हे सांगायचे म्हणजे जात ध्यानात ठेवणे अटळ आहे. बरे, या जातिप्रकारात जे मोडणारे नाहीत, त्यांनाही आपली जात ध्यानात ठेवावीच लागते. अमुक एक सवलत आपल्याला मिळणार की मिळणार नाही, हे ठरविण्यासाठी त्यांनाही जातीचे भान सतत ठेवावे लागते.

वर जे एस० सी०, एस० टी० आदि गट सांगितले, त्या गटांमध्ये शिरण्याचा ज्यांना खऱ्या अर्थाने हक्क नाही, त्यातील काही व्यक्ती व्यक्तिश: तसेच समूहश: देखील, त्या गटात शिरण्यासाठी आपली खरी जात विसरून नवीन जात धारण करतात. कोणी स्वत:ला तिरुमल म्हणवून घेतात, कोणी हलबा, कोणी धनगर तर कोणी ग्रामजोशी. वस्तुत:, या प्रकारात ही मंडळी आपली मूळ जात विसरत असतात. पण ते जाती तोडण्यासाठी नव्हे, तर नव्या जातीत प्रवेश घेण्यासाठी. कुणी त्यात सफल होतो, कुणाला तेवढे यश मिळत नाही. पण सर्वांना जात हे एक संरक्षक कवच आहे, असे वाटते आणि त्या कवचाचा जेव्हा केव्हा उपयोग करण्याचा प्रसंग येतो, तेव्हा ते तसा उपयोग केल्याशिवाय राहात नाहीत. आज आपण सारे बौद्धिक दृष्टीने जातिव्यवस्था, जातिप्रथा आणि जातिभेद यांच्या विरुद्ध झालो असतानाही, असे घडते.

ज्या सोयी सवलती आहेत, त्या पददलितांच्या उद्धाराचे प्रशंसनीय उद्दिष्ट समोर ठेवून दिल्या आहेत; जातीची भावना आणि जातीचा अभिमान बळकट करण्यासाठी नव्हे, हे सर्वच कबूल करतात. पण परिणाम मात्र उलटा घडतो. या कवचाचा आणखीही अनेक रीतींनी उपयोग केला जातो. जसा कवच म्हणून उपयोग तसाच शस्त्र म्हणूनही. काही दिवसांपूर्वी आपले विधान परिषदेचे माजी सभापती (आणि मी म्हणेन भावी सभापतीही) श्री० रा० सू० गवई यांनी पुण्याला एक निवेदन केले की, मुख्यमंत्री श्री० बाबासाहेब भोसले हे शेडयूल्ड कास्टच्या विरुद्ध आहेत. कारण त्यांनी महाराष्ट्राचे मुख्य सचिव श्री० पी० जी० गवई यांची त्या पदापरून नव्या कमी दर्जाच्या जागी बदली केली. श्री० गवई यांनी हा आरोप करताना मुख्य सचिव श्री० गवई यांच्या आरोपित पदावनतीचाच फक्त उल्लेख केला. कदाचित्, त्यांच्या स्वत:च्या उमेदवारीला बाबासाहेबांनी जो विरोध केला, त्याचाही क्षोभ त्यांच्या मनात असेल. पण भोसल्यांवर आरोप करताना, त्यांना जातीच्या शस्त्राचा वापर करावा लागला. श्री० गवई यांनी

केलेला आरोप खरा की खोटा, हे येथे सांगावयाचे नाही. पण मुद्दा, जातीचा उपयोग शस्त्रासारखा करण्यासंबंधी आहे.

तथापि, श्री० भोसले आणि श्री० गवई पडले वेगवेगळ्या पक्षातले. अलीकडे-पर्यंत त्या उभय पक्षांत मैत्र नांदत आलेले असले, तरी राजकारणात ते काही शाश्वत नसते. पण आपल्या शेजारच्या मध्यप्रदेशातील सरकारात जे दोन मंत्री आहेत, ते एकाच पक्षातले, आणि एकाच मंत्रिमंडळातले सहकारी आहेत. त्यांच्यात जेव्हा वितुष्ट झाले तेव्हा त्यातल्या श्री. वेदराम नावाच्या अनुसूचित जातीच्या मंत्र्याने मुख्यमंत्री श्री० अर्जुनसिंह यांच्यावर असाच आरोप केला. श्री० वेदराम याच्या बाबतीत मुख्य मंत्र्यांनी कसली तरी चौकशी सुरू केली म्हणतात. त्यावर श्री० वेदराम यांची प्रतिक्रिया अशी की, ते शेडचूल्ड कास्टचे असल्यामुळे त्यांच्या-विरुद्ध ती कारवाई करण्यात आली. येथे श्री० वेदराम यांनी जातीचा ढालीसारखा आणि शस्त्रासारखा उपयोग केला. वर्ष–दोनवर्षापूर्वी येथील धनवटे नॅशनल कॉलेजच्या प्राचार्यांच्या विरुद्ध जातिगत शिव्या दिल्याच्या तक्रारीवरून एक खटला भरण्यात आला होता. त्या खटल्यातून ते निर्दोष सुटले हा भाग वेगळा. मी स्वत: त्यांना ओळखतो. त्यांच्या मनात जातीची भावना अजीबात नसेल, अशी ग्वाही मी देऊ शकत नाही. पण जातीवरून शिव्या देण्याइतका असभ्यपणा त्यांच्या ठिकाणी नाही हे मी जाणतो. तरी पण त्यांच्या काही विद्यार्थ्यांनी त्यांच्यावर आघात करण्यासाठी जातीच्या शस्त्राचा उपयोग केलाच. खरोखरी आपल्या मनात आपल्या जातीचा अभिमानच नसेल, तर कोणी त्या जातीचा उल्लेख करून काहीही म्हटले तरी आपल्यास ते लागावयास नको. पण ते आपल्याला लागते हे खरे आहे.

माझ्यावरही असाच प्रसंग आला होता. मी काही संस्थांचा प्रमुख आहे. त्यांचे व्यवस्थापन करताना काही अप्रिय निर्णय घ्यावे लागतात. असाच एक अप्रिय निर्णय एका सेवकाच्या बाबतीत मी घेतला. आम्हा उभयतांचा एक साधारण मित्र रदबदलीसाठी आला. बोलता बोलता तो म्हणाला की, "तो तुमच्या जातीचा नसल्यामुळे एवढ्याशा अपराधासाठी तुम्ही कारवाई केली, असे त्याचे म्हणणे आहे." मला क्षणभर काही सुचले नाही. आपण या दृष्टीने विचार कधी करीत नाही, आणि तरी आपल्या एका सहकाऱ्यानेच असा आरोप करावा, याचे मला वाईट वाटले. पण लगेच मला सुचले आणि मी म्हणालो, "तो म्हणतो ते कदाचित् खरेही असेल. पण जेव्हा आम्ही त्याला नोकरी दिली, तेव्हा त्याची जात कोणती होती? त्या वेळी त्याची व माझी जात वेगळी असतानाही, आणि अमुक जातीला इतके प्रमाण दिलेच पाहिजे असे आमच्यावर बंधन नसतानाही, जर आम्ही त्याला नोकरी देऊ शकतो, त्याला कायम करू

शकतो, त्याची पदोन्नती करू शकतो, तर आम्ही त्याच्यावर कारवाई का करू शकणार नाही ?" आम्ही दोघेही एकाच जातीचे असतो, तर तो असे म्हणू शकला नसता. श्री. रा. सू. गवई आणि प्रा. कवाडे एकाच जातीचे आहेत म्हणून बरे, नाही तर प्रा. कवाडे यांचा पहिला आरोप, जातीचे शस्त्र घेऊनच झाला असता.

कवच किंवा शस्त्र म्हणून जातीचा उपयोग करण्याची वृत्ती सार्वत्रिक आहे. परवा शेजारच्या जिल्ह्यातील काही सरकारी सेवक एका विशिष्ट भिन्न-जातीय अधिकाऱ्याच्या विरुद्ध एक तक्रार घेऊन माझ्याकडे आले. ते वारंवार सांगत होते की, "आपल्या लोकांवर अन्याय करण्याचा त्याचा स्वभाव आहे. 'आपल्या' लोकांना तो फार त्रास देतो. वगैरे ". सुरवातीला मला वाटले की, "आपल्या आपल्या" म्हणताना ते त्यांच्या आणि माझ्या समान अशा सामाजिक किंवा राजकीय समान् जवळिकीच्या संदर्भात बोलत असावेत. पण नंतर माझ्या लक्षात आले की, ते जातीच्या आधारावर मला 'आपल्यातला' समजत होते. मी म्हणालो, या आधारावर माझी सहानुभूती आपणास मिळू शकणार नाही. मला आपण माफ करा." आणि पुढे त्यांना विचारले, "तुम्ही सारे शिकलेले लोक दिसता. तुम्ही असा जातीचा विचार का करता ?" तर त्यांनी उत्तर दिले, "सर्वच जण करतात, मग आम्ही का करू नये ?"

तर असे हे वर्तुळ चालू आहे. आपल्या देशातील इतक्या थोरथोर लोकांनी जातिव्यवस्थेविरुद्ध, जातिभेदांविरुद्ध लिहिले, बोलणे केले, प्रचार केला, पण जात जाण्याऐवजी अधिक दृढमूल तर होत नाही ना असा मला संशय येतो. आता आपण जातिगत विटाळ पाळीत नाही, हे खरे. पण आपल्या अंतःकरणात, आपल्या विचारात जात असतेच आणि ती केवळ तळाशी नसते, तर अगदी पृष्ठ-भागावर विराजत असते. कदाचित तळापासून वरपर्यंत ती आपले सर्व विचार-विश्व आणि भावनाविश्व व्यापून असेल. एका अनिष्ट गोष्टीने, एवढा प्रभाव गाजवावा याचे खरोखरीच नवल वाटते. आणि मी मग जेव्हा विचार करतो, तेव्हा असे वाटते की या अनिष्टाविरुद्ध जे आपण लढत आहोत आणि पूर्वीही लढलो, त्याची व्यूहनीती (Strategy) बदलली पाहिजे. जातीवर समोरून खूप शक्तीनिशी आपण हल्ले केले आहेत. त्यांचा परिणाम म्हणून ती थोडी मागे हटली आणि आपल्या मनातील संरक्षित जागी जाऊन लपून बसली असे मला वाटते आपल्या 'पुरोगामी' म्हणजे समोरून केलेल्या हल्ल्याचा तिच्यावर तेथे काही परिणामच होत नाहीसा दिसतो. असे वाटते की, तिच्यावर 'प्रतिगामी' हल्ला आवश्यक आहे. म्हणजे तिच्या पिछाडीला जाऊन हल्ला केला पाहिजे. तिला जरा 'बेसावध' पकडले पाहिजे. म्हणजे जातीला विसरण्याला शिकविले

पाहिजे. फळ्यावर काढलेल्या रेघेला स्पर्श न करता, ती लहान करण्याचा एक उपाय आहे. तो म्हणजे तिच्यापेक्षा मोठी रेघ तिच्या वर काढणे. जातीच्या संकुचितपणावर तिच्याहून मोठ्या तत्त्वाशी आपली भावनिक अस्मिता जोडणे हा एक उपाय असू शकतो. जातिभेदाचा प्रश्न मुख्यत: हिंदू समाजापुरताच आहे; म्हणून 'हिंदू' म्हणून भावनिक अस्मिता जागविणे हा या जातीच्या कवचाला फाडण्याचा आणि शस्त्राला बोथट करण्याचा उपाय असू शकतो. जात आज निरनिराळ्या कारणास्तव जी आपल्या वैचारिक आणि भावनिक विश्वात प्रभावशाली बनली आहे, तिला त्या स्थानावरून हुसकावून लावण्यासाठी, तिच्याहून विशाल आणि व्यापक अशा वैचारिक आणि भावनिक विश्वाशी आपण स्वत:ला जोडून घेतले पाहिजे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने ही व्यूहनीती स्वीकारली आणि त्या द्वारे जातीला विसरायला शिकविले. परिणामी, ज्या एका समूहात जातीची भावना क्षीण झालेली दिसते, तो संघाचा समूह आहे. त्या समूहातील प्रत्येक व्यक्ती, अपेक्षित पातळीवर पोचली आहे, असा दावा करणे अतिरंजितपणाचे होईल. परंतु तेथील सर्वसामान्य कार्यकर्त्यांचे विचार आणि भावना यांचे विश्व जातीच्या संकुचितपणापासून वर उठले आहे. याहून अधिक मूलगामी आणि जास्त परिणामकारक व्यूहनीती असूच शकणार नाही असे नाही. कोणी ती समोर आणील, तर त्याचे स्वागतच होईल मात्र जातीचा कवच म्हणून किंवा शस्त्र म्हणून उपयोग करणे थांबले पाहिजे. सोयीसवलती या तात्पुरत्या काळाच्या कुबड्या आहेत, असेच ज्यांना त्या मिळतात त्यांनी आणि ज्यांना त्या मिळत नाहीत त्यांनीही समजले पाहिजे. कोणत्याही अस्मितेला कुबड्यांचा अभिमान वाटू नये आणि कुबड्या न वापरणाऱ्यांच्या मनात कुबड्याधारकांविषयी असूया असू नये.

८-८-८२

## राजधानी, खलधानी की लोकधानी

दिनांक २ आणि ३ ऑगस्टला आपल्या देशातील राजधानीला म्हणजे दिल्लीला जाण्याचा योग आला. निमित्त होते, 'ब्यूरो ऑफ पार्लमेंटरी स्टडीज अँड ट्रेनिंग' या संस्थेने इंडियन पार्लमेंटरी ग्रुपच्या सहकार्याने आयोजिलेल्या एका चर्चासत्राचे. या चर्चासत्रासाठी महाराष्ट्र विधान परिषदेने आपले प्रतिनिधी म्हणून पाठविलेल्या दोन सदस्यांमध्ये माझा समावेश होता. माझे दुसरे सहकारी होते उस्मानाबादचे श्री. बी. एन. देशमुख. विधानसभेचेही दोन प्रतिनिधी होते.

एक होते माजी मंत्री श्री. गोविंदराव आदिक आणि दुसरे होते शिवराम राजे भोसले. चर्चासत्राचा विषय होता " संसदेचे आणि विधिमंडळाचे विशेषाधिकार."

पण या लेखात, त्या चर्चासत्राची किंवा चर्चासत्रातील विषयाची मी चिकित्सा करणार नाही. पुढे केव्हातरी त्या विषयावर काहीशा विस्ताराने लिहिण्याचा माझा मानस आहे. आज मात्र नाही. आज मी दिल्लीसंबंधी, किंबहुना " राजधानीसंबंधी " लिहिणार नाही. दिल्लीला मी प्रथमच गेलो, असे नाही. १९६४ सालापासून वर्षातून निदान एकदा जात आलो आहे. १९७० ते १९७५ या काळात तर वर्षातून दोनदासुद्धा गेलो आहे. त्यानंतर ते प्रमाण कमी झाले. आणिबाणीतील तुरुंगवासाच्या काळात तेथे जाणे शक्यच नव्हते. गेल्या दोन वर्षांतही जाणे घडले नाही. सांगायचे तात्पर्य असे की, दिल्ली मला नवीन नाही.

मी जेव्हा जेव्हा दिल्ली पाहिली, मग ती सभासंमेलनात असो, सचिवालयात असो, राजकीय पक्षाच्या कार्यालयात असो, की, उगाच कॅनॉट सर्कलच्या कुठल्या तरी बिंदूवर उभा राहून, येणाऱ्याजाणाऱ्या संथमंथर अथवा शीघ्रगती वर्दळीत असो, मला सारखे असे वाटत असे की, आपल्या देशाची राजधानी दिल्ली नसावी. कसलीच कारणपरंपरा मी सांगू शकत नाही; पण असे वाटते की, इंग्रजांनी आपली राजधानी कलकत्त्यावरून दिल्लीला आणली नसती, तर त्यांचे राज्य आणखी काही काळ टिकले असते ! (म्हणजे इंग्रजांनी, तसे बरेच केले म्हटले पाहिजे ! त्यांना लवकर जावे लागले ! )

विलासात, कटकारस्थानात, बेफिकीरीत आणि बेइमानीतही मग्न होणे हा दिल्लीचा स्वभाव असावा असे मला वाटते. राजधानी म्हटली की कुठल्या ना कुठल्या क्षेत्रात संपत्ती आलीच. या संपत्तीच्या आगमनाच्या प्रमाणात संस्कृतीचा स्तर वाढला नाही, तर विलासिता येते, असा माझा एक सिद्धान्त आहे. दिल्ली त्याचे एक उदाहरण आहे. दिल्लीचा हा स्वभाव आजचा नाही. दिल्लीच्या लाल किल्ल्यात रोज ' लाईट अँड साऊंड '—म्हणजे ध्वनिप्रकाशाचा एक कार्यक्रम असतो. दिल्लीला जाणाऱ्याने तो एकदा पहावा, अशी माझी शिफारस आहे. लाल किल्ल्याचा म्हणजेच दिल्लीचा दोन–अडीच शतकांचा इतिहास ध्वनिप्रकाशाच्या माध्यमाने तेथे रोज साकारला जात असतो. त्यातले एक दृश्य आहे, नादीरशहाच्या स्वारीच्या वेळचे. नादीरशहाच्या लष्करातील घोडदळाच्या टापांचे प्रखर ध्वनी येत असतात; तर इकडे मद्याच्या सुरया चषकांमध्ये, आणि चषक घशांमध्ये ओतले जाण्याच्या ध्वनीत, नर्तिकांच्या पायातील नूपुरांचा धुंद ध्वनी मिसळत असतो. नादीरशहाचे घोडदळ राजधानी दिल्लीच्या जसजसे जवळ येत असते, तसतसा टापांचा आवाज तीव्रतर होत जातो. पण मद्यचषकांचे आणि चरणनूपुरांचे आवाज काही क्षीण होत नाहीत. इतरांना

सोडाच, पण राजालाही आपल्या ‘राजेपणाची’ फिकिर नसते. कारण संपत्ती जवळ असते. तिच्या सोबतीला आलेली विलासिता तिला चिकटून राहते. पुढे काय घडते, हे मी सांगण्याचे कारण नाही.

डॉ. राममनोहर लोहिया यांनी दिल्लीवरील आपल्या लेखात “दिल्ली म्हणजे एक वेश्या आहे,” असे म्हटल्याचे मी वाचले आहे. डॉ. लोहियांच्या विधानाचा अर्थ असा की, जो नवा आक्रमक स्वामी येतो, त्याला दिल्ली आपली ‘निष्ठा’ विकते. ती त्याच्यावर प्रेम (की नाटक) करू लागते. त्याच्याशी रममाण होते. पण मग तिलाच त्याचा कंटाळा येतो आणि मग ती दुसऱ्या स्वामीशी तितक्याच ‘निष्ठेने’ आणि लाडाने वागते. आपला स्वामी सतत बदलविणारी आणि जो स्वामी आला, त्याच्याशी पूर्वीच्याच रंगेलपणाने वागणारी कुणी असेल, तर तिला वेश्या म्हणू नये तर काय म्हणावे ?

गेल्या आठवड्यातील माझ्या दिल्लीच्या मुक्कामात मी, मला ज्याच्याविषयी आदर वाटतो, अशा एका थोर राजकीय नेत्याला भेटायला गेलो. ते आता सत्तास्थानावर नाहीत. त्यांनी दिल्लीबद्दल एक किस्सा सांगितला. ते जेव्हा दिल्लीला केन्द्रीय मंत्रिमंडळात मंत्री म्हणून प्रथम गेले होते, तेव्हा त्यांच्याकडे एक नबाब आले. त्या नबाबांनी त्यांना दिल्लीची ही गोष्ट सांगितली. गोष्ट अशी :

मोगलांच्या काळात बादशहांचा मुक्काम आग्र्याला असे. म्हणजे आग्रा राजधानी. अर्थात दिल्ली उपराजधानी बनली. दिल्लीचा एक मुख्य काझी होता. म्हणजे मॅजिस्ट्रेट आणि न्यायाधीश दोन्ही. स्वाभाविकच त्याचा मोठा दरारा होता. एकदा त्याचा कुत्रा मरण पावला, तर सारी दिल्ली त्याच्या समाचाराला आली. पुढे काझी म्हातारा झाला. त्याच्याकडे कोणताच सरकारी अधिकार राहिला नाही आणि खूप वर्षे जगून तो मरण पावला; तेव्हा त्याच्या मृत्यूबद्दल शोक व्यक्त करायला एक काळे कुत्रेही आले नाही.

नबाब म्हणाला, “दिल्ली अशी आहे”. पण हे काही दिल्लीचे वैशिष्टच नसावे. जेथे अधिकार असेल, तेथे लाळघोटयांची, आशाळभूतांची, खुशामतखोरांची आणि खरे खोटे सांगून अधिकारवंताचे कान भरणाऱ्यांची गर्दी असणारच. अधिकारवंत हलक्या कानाचा असला की, मग काही विचारूच नका ! भर्तृहरीने जी सात शल्ये सांगितली आहेत, त्यातले एक ‘नृपांगणगत:खल:’ हे आहे. राजाच्या अंगणात दुष्टांचा भरणा रहावा हे स्वाभाविकच होय. ते राजाचे मित्र नसतात. अधिकारवंताचे हितचिंतक नसतात. ते स्वत:चेच मित्र आणि हितचिंतक असतात. पण हे समजावयाला अधिकारवंत विवेकी असला पाहिजे. संकुचित मनाचे आणि हलक्या कानाचे अधिकारवंत, या खुशामतखोरांना आणि आशाळभूतांनाच हितचिंतक समजून स्वत:साठी खड्डा खणीत असतात.

असा अविवेकी, संकुचित किंवा खुनशी राजा अथवा सत्ताधारी असेल, तर राजधानीचे रूपांतर खलधानीत व्हावयाला वेळ लागत नाही. दिल्ली अशी खलधानी अनेकदा झाली आहे. जणू काही तिचा तो स्वभाव बनला आहे.

पण आता तर कोणी राजा राहिलेला नाही. म्हणजे आपल्या देशात नाही. आपण लोकशाही व्यवस्था स्वीकारली आहे. आपले गणराज्य आहे. त्यामुळे आता कोणताही राजा "सार्वभौम" नाही. सार्वभौम आहे जनता. आणि तिचे मुनीम म्हणजे प्रतिनिधी, तिच्या वतीने राज्यकारभार चालवीत आहेत. निदान संविधानाच्या पुस्तकात असेच लिहिले आहे. म्हणजे आता 'राजधानी' नाही, ती 'लोकधानी' झाली आहे. पण या लोकधानीचे रूप बदलले आहे काय? नाही; ते जुन्या राजधानीसारखेच आहे. तोच बडिवार आहे. तीच शानशौकत आहे. तीच ऐष आणि तीच चैन आहे. 'सार्वभौम' जनतेचे मुनीम म्हणून जे आले आहेत, ते स्वतःलाच सार्वभौम समजत आहेत. दर पाच वर्षांनी नम्रता, विनय आणि सेवाभाविता त्यांच्या अंगात येते हे खरे आहे. पण सत्तेच्या स्पर्शाने अंगात बाहेरून आलेले ते, अंगातले भूत मंत्रोच्चाराने जावे तसे निघून जाते आणि हा पूर्ववत् 'राजधानीतला' राजा बनून वागू लागतो. त्याच्या अवतीभोवती संपत्तीचे नर्तन असते. त्या संपत्तीने आलेल्या विलासितेच्या नूपुरांचा मधुरध्वनी चोहोबाजूंनी येत असतो. सारे वातावरणच 'मोहक' असते. या वातावरणातील गडदपणा सर्वांच्या वाटचाला सारखाच येतो असे नाही. ज्यांच्या वाटचाला फिकेपणा येतो ते, ज्यांच्या वाटचाला गडदपणा आला त्यांचा, मत्सर करू लागतात; त्यांच्याविरुद्ध कटकारस्थाने करतात. कारस्थानांचा सल्ला देणाऱ्या खलांनी अंगणे भरलेली असतात. मग कुणी तरी औरंगजेब शहाजहानला, तो पिता असला तरी, तुरुंगात टाकतो. कुणी अल्लाउद्दीन जलालुद्दीनला, चुलता असला तरी, ठार करतो. मथुराही दिल्लीच्या जवळच. कंस सख्ख्या बहिणीला तुरुंगात टाकतो. आणि दिल्ली अशी अस्थिर बनते. एवढे क्रौर्य ज्यांना जमत नाही, परवडत नाही, ते दारूच्या चषकात, कॅबेरेंच्या कैफात स्वतःला झोकून देतात. नादीरशहांच्या अश्वदलाच्या खुरांचे आवाज त्यांच्या कर्णरंध्रात शिरत नाहीत. मग नादीरशहा आपलाच आहे, अशी ते समजूत करून घेतात. नादीरशहा दिल्ली लुटतो, पिटतो, उपभोगतो. दिल्लीला त्याची खंत नसते.

अशी दिल्ली आपल्या देशाची राजधानी नसावी, लोकधानीही नसावी, असे मला वाटत असे. महमद तघ्लकालाही वाटले होते, अन् त्याने राजधानी बदलविण्याचे ठरविले. तो 'वेडा' ठरला. पण आता असे वाटणेही क्षीण होत आहे. (तघलकाचे नशीब पाहून मात्र नाही!) दिल्ली नाही तर मग काय? नागपूर? हैद्राबाद, बंगलोर? –पण तेथे तरी काय उजेड आहे? परवा, काही

आमदार मला म्हणाले, मुख्य मंत्री बॅरिस्टर अंतुले यांच्या चेंबरच्या दारापर्यंत पोचणेसुद्धा अशक्य झाले आहे, अशी गर्दी तेथे असते ! राजाच्या दर्शनासाठी एवढी प्रजा आतुर झाली असते. यात राजाला आपला गौरव वाटतो की नाही, हे माहीत नाही. पण प्रजेला यात काहीही वाटत नाही. आणि तीच चिंतेची बाब आहे. राजाच्या राजेशाहीची नाही, लोकशाहीच्या लाचारीची !

१०-८-८०

## अंधार, न्यूयॉर्कचा आणि सभ्यतेचाही

संपत्ती, सुखाची साधने, श्रम कमी करणारी उपकरणे, विज्ञानाने केलेले चमत्कार आणि त्या चमत्कारांनी भरलेले व भारलेले जीवन म्हणजे सभ्यता काय ? अनेक लोक असेच मानतात. सुंदर घर आहे, घरी मोटारगाडी आहे, टेबलावर जेवण आहे, कृत्रिम धाग्याची चमकदार वस्त्रे आहेत, फ्रिज आहे, टेलिफोन आहे की आपण म्हणणार की हे घर मोठे सुसंस्कृत आहे, सभ्य आहे. याच्या उलट अंगावर चिरकुटे असली, राहण्यास झोपडी असली, विज्ञानाच्या चमत्कारांचा घरात अभाव असला, तर आपण म्हणणार हे अडाणीपणाचे, संस्कृतिहीनतेचे निदर्शक आहे. पण सभ्यता आणि संस्कृती हा काही शरीराचा किंवा भौतिकाचा धर्म नाही. ती आहे मनाची अवस्था. नवनवीन प्रसाधन-साधनांनी शरीराची कुरूपता झाकता येते; त्याचप्रमाणे, सभ्यतेच्या मुखवटयांनी मनाचा महारोगही झाकला जाऊ शकतो. पण अपघाताने हा मुखवटा गळून पडला किंवा मुखवटयाचे ओझे सहन न झाल्यामुळे तो फेकून दिला किंवा अंधारात मुखवटा काढला तर आता कोण बघणार अशी निश्चिंतता आली, तर —तर आतली सगळी हिडीसता, सगळा रोगटपणा प्रकट झाल्याशिवाय राहत नाही. वैभवाच्या शिखरावर असलेल्या अमेरिकेतील सर्वात मोठ्या शहरात न्यूयॉर्कमध्ये एक दिवस विजेचे दिवे विझले आणि त्याबरोबरच सभ्यतेचाही प्रकाश मालवला. एक दिवस तेथे अंधार पडला आणि सभ्यता त्यात लोपून गेली.

गोष्ट आहे १३ जुलै १९७७ ची. त्या दिवशी संपूर्ण न्यूयॉर्क शहर अंधारात बुडून गेले. शहराला वीज पुरविणारी यंत्रे एकाएकी नादुरुस्त झाली. न्यूयॉर्कचा हा पहिला अंधार नव्हता. बारा वर्षांपूर्वी, १९६५ च्या नोव्हेंबरात असाच अंधार तेथे झाला होता. पण त्याचे परिणाम असे भीषण घडले नव्हते. सभ्यतेच्या वस्त्रांची अशी लक्तरे बनली नव्हती. १९६५ च्या अंधाराचा अनुभव घेतलेल्या न्यूयॉर्कवासियांच्या मनात, पुन: असला प्रसंग कधी यावयाचा नाही

अशी पक्की खात्री होती. कारण, सरकारने तसाच बंदोबस्त केला होता. पण अघटित घडले. न्यूयॉर्क अंधारात गडप झाले. 'ओ कॅलकटा' नावाच्या नग्न नाटकात काम करणाऱ्या पात्रांना, प्रेक्षकांकडून कपडे उसने घेऊन, घरचा रस्ता सुधारावा लागला. कपडे ठेवलेल्या खोलीपर्यंतही ते जाऊ शकले नाहीत. रात्री ९ वाजून ३४ मिनिटांनी दिवे जाण्याची ही घटना घडली आणि लवकरच लोकांच्या लक्षात आले की, विजेचा प्रकाश निदान चोवीस तास तरी यावयाचा नाही.

न्यूयॉर्कच्या महापौरांनी लगेच आणिबाणी घोषित केली. पोलिसांची जादा कुमक मागविली आणि दवाखान्यांना जनित्रे पुरविली. पण महापौरांच्या आणिबाणीच्या घोषणेचा झोपडपट्ट्यांमध्ये राहणाऱ्या काळ्या निग्रोंवर काही परिणाम झाला नाही. ख्रिसमस असल्याच्या आनंदात ते घराबाहेर पडले आणि हाती येईल ते लुटण्याला त्यांनी आरंभ केला. सळाखी आणून त्यांनी दुकानांची लोखंडी दारे फोडली आणि लुटालूट सुरू केली. या लूटमारीत स्त्रिया, पुरुष आणि बालकेही होती. कापड दुकाने, टी. व्ही. सेट, जडजवाहीर, दारू यांच्या दुकानांवर हल्ला करून त्यांनी त्यांचा फडशा पाडला. एका दुकानातून पन्नास नव्या कोऱ्या मोटारगाड्या चोरण्यात आल्या. व्यवस्थेसाठी असलेला एक पोलिस अधिकारी म्हणाला, 'ती जनावरांची रात्र होती. आम्ही चार पाच जणांना पकडले तर त्यांची जागा शंभरांनी घेतली.' त्या चोवीस तासात अग्निशामक दलाने लहानमोठ्या १०३७ आगी विझविल्या. एखाद्या ठिकाणी आग लागली असेल व अग्निशामक दलाचे लोक आग विझविण्यात गुंतले असतील, तर त्याचा फायदा घेऊनही लोकांनी लूट केली. सर्वात चिंतेचा भाग हा होता की, लुटारूंना आपण काही वाईट करीत आहोत असे वाटत नव्हते. 'टाईम' साप्ताहिकाने लुटारूंच्या काही नोंदी घेतल्या आहेत. त्यातली एक अशी : कोलंबिया विद्यापीठाजवळ एक सायकलचे दुकान लुटले जात असता, बाहेर उभ्या असलेल्या मुलाने म्हटले, "मी आपल्या आईवडिलांबरोबर 'शॉपिंग' करायला आलो आहे." दुसऱ्याने आपण काय काय चोरले हे अभिमानाने सांगितले. तो म्हणाला, "४०० डॉलरचा एक स्टिरिओ, ६०० डॉलरचा एक डायनिंग सेट, काही टेनिस शू, जवाहिऱ्याच्या दुकानातील थोडासा माल हे सारे मी अर्ध्या तासात गोळा केले. सगळ्यांची किंमत ३२०० ते ३५०० डॉलर होते." तिसरा एक ३० वर्षांचा तरुण म्हणाला, "आम्ही गरीब आहोत, श्रीमंत बनण्याचा आमचा हा मार्ग आहे."

ही लुटालूट करणाऱ्यांमध्ये काळे निग्रो आणि गोरे स्पॅनिश या लोकांचा भरणा होता. त्यांच्या या कृतीविरुद्ध प्रतिक्रियाही तीव्र उमटली. लुटीच्या अपराधावरून ज्यांना पकडले, त्यांची वकीली करावयाला एकही वकील तयार झाला नाही. पण मुख्य प्रश्न असा आहे की, अंधाराचा फायदा घेऊन लुटालूट करण्याचे

कारण काय ? यांत्रिकता कितीही विकसित केली किंवा झाली, तरी कधी ना कधी तिच्यात दोष उत्पन्न होणारच. पण संधी आल्याबरोबर माणसातील पशुता अशी बाहेर का यावी ? सभ्यतेची आवरणे कुजक्या कापडासारखी टरटरा का फाटावी ? 'एल् दिआरिओ' नावाच्या स्पॅनिश साप्ताहिकाने याची चिकित्सा अशी केली : " १९६५ लाही अंधार झाला होता. पण तेव्हा असे काही झाले नाही. तो अंधार हिवाळ्यातील एका शांत रात्री घडून आला होता. हा अंधार उन्हाळ्यातील घामट रात्री घडून आला. यामुळे, थोडा फरक तर पडलाच. परंतु या बारा वर्षांत याहूनही अधिक बदल झाला आहे. कायदा व अधिकार यासंबंधीचा आदर कमी झाला आहे. अनेकदा चोर सुटलेले आहेत. झोपडपट्टीत गुन्हेगारी व हिंसा वाढली आहे. काळ्यांमध्ये बेकारीचे प्रमाण ४० टक्के आहे. १९६५ मध्ये ते २० टक्के होते." हार्वर्डचे एक समाजशास्त्रज्ञ लिहितात, " काळ्यांच्या संख्येपैकी अर्धे मध्यमवर्गीयात आले आहेत. आर्थिक सुबत्तेचा यांना फायदा मिळाल्यामुळे बाकीचे अर्धे असंतुष्ट आहेत. रोज टेलिव्हिजनवर ते एक समृद्धीचे आणि सुबत्तेचे चित्र पहात असतात. पण ती समृद्धी व सुबत्ता त्यांच्या वाट्याला आलेली नसते. ज्या समाजरचनेने आपली ही स्थिती केली, त्या समाज-रचनेविषयी त्यांना कसलीच आस्था राहिलेली नाही." दुसरा एक समाजशास्त्रज्ञ म्हणाला, " मध्यमवर्गीयांचे परधनाविषयीचे जे मूल्य आहे, ते गरीब काळ्यांना मान्य नाही."

निग्रो व स्पॅनिश लोकांच्या पुढाऱ्यांनी या प्रसंगाच्या निमित्ताने अमेरिकन राष्ट्राला इषारा दिला आहे. त्यांच्यातले एक शिक्षणतज्ज्ञ म्हणाले, " झोपड-पट्टीत राहणाऱ्या लोकांना या स्थितीत आपण आणून सोडले आहे की, ते हिंस्र पशूसारखे वागू लागले आहेत." तर दुसरे एक सुप्रसिद्ध गोरे मानसशास्त्रज्ञ म्हणाले, " सभ्यतेची नियंत्रके जेव्हा कुचकामी ठरतात, तेव्हा माणसे रानटी बनतात " हडसन इन्स्टिटच्यूटचे डायरेक्टर म्हणाले, " नैतिक मूल्यांची त्यांना जाणीवच नाही. 'दबलेला राग उफाळून आला' ही कल्पना मूर्खपणाची आहे. या प्रकारच्या विचारसरणीमुळे तर अशा गोष्टी वारंवार घडतील." ही सगळी मते वाचल्यानंतर आपलेही मन गोंधळून जाईल. लुटालूट करणारे लोक गरीब होते, हे खरे. पण साऱ्याच गरीब लोकांनी लूटमार केली नाही. काहींनी करावी आणि काहींनी करू नये, याचे कारण काय ? या प्रश्नाचा विचार करू लागलो की, शेवटी याच निष्कर्षाप्रत यावे लागते की, हा मनुष्याच्या नैतिकतेचा प्रश्न आहे. अमेरिकेतील गरीब, भारतातील मध्यमवर्गीयांपेक्षा अधिक श्रीमंत असेल. पण अमेरिकेत जो श्रीमंत वर्ग आहे, त्याची श्रीमंती पाहून तो जळफळत असला पाहिजे व या मानसिक जळफळाटाचा संधी येताच असा उद्रेक झाला असला

पाहिजे. सर्वांची समान आर्थिक स्थिती, हे मृगजळ नसले, तरी पुस्तकी प्रतिपादन आहे. आर्थिक स्थितीत फरक राहणारच. परंतु, ही खाई फार मोठी राहील, तर ती माणसांची जनावरे बनविण्याला हातभारच लावील. म्हणून संपत्तीचा संग्रह केलेल्यांनी ही खाई कशी बुजविता येईल, याचा विचार केला पाहिजे. दारिद्र्याच्या परिसरात, जे आपल्या श्रीमंतीचे अभद्र प्रदर्शन करीत असतात, तेही या लुटारूइतकेच गुन्हेगार आहेत, असे का मानू नये ? संस्कृतीचा संबंध मनाच्या पातळीशी असेल, तर अभद्र प्रदर्शनवाले श्रीमंतही खालच्या पातळीवरच आहेत, असे कां समजू नये ?

उपाशीपोटी, सभ्यता, संस्कृती यांचे भान राहात नाही, हे खरे आहे. पण पोट भरले असले की, सभ्यता व संस्कृती येते, हीही गोष्ट खरी नाही. काळ्या निग्रोंमध्ये बेकारी असेलही. पण उपाशी मरण्याची अथवा भीक मागण्याची त्यांच्यावर पाळी आली आहे, असे नाही. या लोकांनी चोरलेल्या वस्तूंत खाण्याचे पदार्थ नाहीत. मोटारी, टी० व्ही०, स्टिरिओ, जवाहीर आहे, हे लक्षात घेतले पाहिजे. म्हणून हा प्रश्न केवळ पोट भरण्याचा नाही. हा प्रश्न आहे जीवनाची मूल्ये समाजातील व्यक्तींच्या मनावर बिंबविण्याचा. त्या मूल्यांचा ठसा समाजमनावर असेल, तर गरीबही आपल्या समोरचे ताट दुसऱ्याला देईल. पण जीवनाला असले कोणतेच मूल्य आधारभूत नसेल, तर जीवन म्हणजे आपले घर एक संग्रहालय बनविण्याची स्पर्धा ठरेल. काही लोक उजागरीने हवी ती वस्तू गोळा करण्याच्या मागे धावतील, तर काहींना चोरून, लूटमार करून ती गोळा करावी लागेल. वाटेल त्या मार्गाने " संग्रह करणे " हेच जीवनप्रयोजन ठरले की, मग मार्गांचा विधिनिषेध का राहील ? अशा समाजरचनेत ज्याच्या जवळ जितके जास्त, तितकी त्याची प्रतिष्ठा मोठी ठरते. त्याच्याजवळ इतका संग्रह कसा झाला, हे कोणी ध्यानात घेत नाही. जीवनमूल्यांचा ऱ्हास या मनोवृत्तीतून होत असतो. आपल्या भारतातही धनवंतांची केवढी प्रतिष्ठा असते ! हे धन त्याने कसे मिळविले, याची चौकशी कोणी करीत नाही. कार्ल मेनिंजर नावाच्या अमेरिकन विचारवंताने लिहिले आहे की, " The truth of the matter is that most Americans today exist without purpose and without significance. They have no articulate philosophy, they do not live within any frame of reference."—

(" अधिकांश अमेरिकन लोक कोणत्याही प्रयोजनाशिवाय आणि वैशिष्ट्याशिवाय जगत आहेत. त्यांच्याजवळ कोणतेही सुसंबद्ध असे जीवनतत्त्वज्ञान नाही. जिचा संदर्भ ठेवून जीवन जगावे, अशी कोणतीही चौकट त्यांच्याजवळ नाही "). अमेरिकेच्या न्यूनावर मेनिंजरने नेमके बोट ठेवले आहे. ज्यांच्याजवळ

जीवनाचे तत्त्वज्ञान आहे, बऱ्यावाईटाचे मापदंड सांगणारी ऐतिहासिक व पारंपारिक चौकट आहे, त्यांनी त्या तत्त्वज्ञानाची व त्या चौकटीची किती आस्थेने जोपासना केली पाहिजे, हे काय वेगळे सांगावे ?

७–८–७७

## फटकळ !

आपल्या ठिकाणी नसलेला एखादा 'गुण' दुसऱ्याच्या ठिकाणी आढळला तर आता माझी वृत्ती त्याचे कौतुक करण्याची बनली आहे. एक काळ असा होता की, जे आपण करीत नाही, किंवा जे करणे आपल्याला जमले नाही, त्यासंबंधी नालस्ती, निदान उपेक्षा करण्याकडे माझा कल असावयाचा. मी सिगरेट पीत नाही. दुसरे कुणी पीत असले की मला त्रासही होतो. पण आता मी सिगरेट पिणाऱ्याचा तिरस्कार करीत नाही. मात्र पूर्वी मला त्याच्या ठिकाणी काही तरी नैतिक न्यून आहे, असे वाटत असे. प्रेमवीराला थिल्लर समजून त्याची कुचेष्टा करण्यात मला मौज वाटत असे. शेक्सपियरने त्याला पागलांच्या पंक्तीत बसविल्याचा ग्रांथिक दाखला माझ्या रसवंतीवर सदैव तयार असे. किमान् एका व्यक्तीवर छाप पाडून, तिला आपलेसे करण्याची जी किमया प्रेमिकाजवळ असते, ती कशी म्हणून माझ्या अभिनिविष्ट नजरेत भरायचीच नाही. पण आज माझी ती एकांडी वृत्ती बदलली आहे. हा बदल कधी, कसा व का झाला हे मी सांगू शकणार नाही. मला नकळतच तो बदल झाला असावा आणि झाल्यानंतरच मला तो जाणवला असावा. काळचाचे पांढरे केस झाल्याचे एकदम कळते तसा किंवा निद्रावलेल्या डोळ्यांवर पापण्यांची झाकणं अलगद पडतात तसा.

माझ्या या बदललेल्या मनोवृत्तीतून फटकळ माणसाविषयी मला पूर्वी जो आदर आणि अभिमान वाटावयाचा आणि गुळमुळीत बोलणाऱ्या माणसाचा जो संताप यावयाचा तो आता पार कमी झाला. एका काळी फटकळ माणसाबद्दल मला केवढा आदर वाटावयाचा ! या आदरभावनेला आत्मगौरवाची भावना वेलांटून होती, हे मला फार उशीरा कळलं. पण तेव्हा स्वतःच्या आणि दुसऱ्यांच्या फटकळपणाबद्दल मला विलक्षण अभिमान होता. " I call spade a spade–मी फावड्याला फावडे म्हणतो."

" Tit for tat–जशास तसे."

" I don't like mincing words–शब्दांची दिखाऊ नजाकत मला मंजूर नाही "–अशा वाक्यांच्या फैरी झाडण्यात मला खूप मौज वाटावयाची.

आणि मग आपण त्याला कसे सडकले, या विचाराने छाती फुगावयाची. केवळ स्वत:विषयीच नव्हे तर जे इतर असे वागावयाचे, तेही समानधर्मा वाटून त्यांच्याविषयीचा अभिमान जागृत व्हावयाचा. अलेक्झांडरला ऊन सोड म्हणणारा डायोजेनिस, देहान्ताशिवाय दुसरे प्रायश्चित्त नाही, असे सांगणारे रामशास्त्री ही माझी आराध्यदैवते होती. (आपल्या दंभासाठी अशी नावे मागे असली म्हणजे बरे वाटते, नाही ?) परंतु, पुढे जेव्हा 'किंचित् किंचित् बुधजनसकाशादवगतं', तेव्हा हा सारा दिमाख गळला. आणि मग जाणवले की फटकळपणात विकाराचे प्रदर्शन आहे, विचाराचे नाही; फटकळपणा ही रानटी नसली तरी असंस्कृत स्थिती आहे; माणसाला ती शोभणारी नाही.

माझे, राजकारणात आकंठ बुडालेले एक मित्र आहेत. त्यांना एखादी गोष्ट करावयाची नसली किंवा टाळावयाची असली तर ते म्हणतात, "मैं, कोशिस करूंगा." एवढा पर्यायोक्त उद्गार माझ्या तोंडून निघण्यासाठी, मला वाटते, मला दुसरा जन्म घ्यावा लागेल. खरेच आपण करणार नसलो तर मला असे वाटावयाचे की सांगून टाका ना की, आपल्याला ते जमावयाचे नाही, किंवा अशा करण्यावर आपला विश्वास नाही. मला माझ्या या मित्राच्या 'कोशिस करूंगा'चा मोठा संताप यावयाचा. पण आता वाटते, त्याचेच बरोबर आहे. कुणाचे चांगले करण्याची माणसाची कुवत मुळातच कमी. मग कुणाला वाईट वाटेल असे कां बोला ? आपण जे ठरवू तेच जरी करणार असू, तरी कुणाला थोडा वेळ तरी आनंद कां न द्या ? अन् उद्या आपला विचार बदलला तर आनंदात अधिक भर घालणारे आपण कां न बना ? "साहेब, आमचे हे काम करून द्याल का ?" कुणी काकुळतीने विचारतो. आपण ते करणार नसलो, करू शकणार नसलो, हे सत्य असले तरी, 'कोशिस करूंगा'ने त्याला किती समाधान मिळते ! आणि सुसंस्कृत समाजशील माणसाने का फक्त आपल्याच समाधानाचा विचार करावा ?

मला एक जुनी गोष्ट आठवते. एकदा एका राजाला स्वप्न पडले. त्यात त्याला दिसले की, आपले सारे दात पडले आहेत. निजून उठल्यावर जेव्हा त्याला त्या स्वप्नाचे स्मरण झाले, तेव्हा त्याला फार वाईट वाटले. कुठल्या तरी अशुभाचे ते सूचक असावे, असे वाटून तो बेचैन झाला. त्याने एका ज्योतिषाला बोलावून स्वप्नाचा अर्थ विचारला. तो ज्योतिषी म्हणाला, "महाराज, स्वप्न फार वाईट आहे. ते सांगते की, आपल्या देखत आपले सगळे नातेवाईक मरतील." ज्योतिषाच्या या भविष्यकथनाने राजा अधिकच खिन्न झाला. त्याला आपले जेवणही गोड वाटेना. राज्यकारभारावरचेही त्याचे लक्ष उडाले. काही दिवसांनी त्याच्या राजधानीत बाहेरगांवचा एक नामांकित ज्योतिषी आला.

मंत्र्यांनी त्याची राजाशी गाठ घालून दिली. राजाने त्याला आपले स्वप्न सांगितले व त्याचा अर्थ त्याला विचारला. तो म्हणाला, "महाराज, हे स्वप्न फार शुभ आहे. आपण आपल्या सर्व नातलगांपेक्षा जास्त दिवस जगणार आहात." गोष्टीतल्या त्या राजावर या भविष्यकथनाचा अनुकूल परिणाम झाला असला पाहिजे अशी मला खात्री आहे. आणि खरे म्हणजे दोन ज्योतिषांनी राजाला काय वेगळे सांगितले होते? पण 'तुमचे नातलग तुमच्या देखत मरतील' यापेक्षा 'तुम्ही आपल्या नातलगापेक्षा अधिक दिवस जगाल' हे भविष्यकथन केवढे उत्साहप्रद आहे! राजाचीच काय पण तुमची-आमची सगळ्यांची तब्येत सुधारून जाईल.

आपली संस्कारित वाणी, आपली विदग्ध भाषा, आपला संस्कृतिसंपन्न व्यवहार हा 'फावड्याला फावडे' म्हणण्याच्या प्रकाराचा नसतो. 'तो मेला' असे म्हणण्याऐवजी 'त्याला देवाज्ञा झाली', 'तो पंचत्वात विलीन झाला', 'चैतन्यात चैतन्य मिळाले'-अशी तीच अर्थ सांगणारी सुसंस्कृत वचने आपण वापरतो. 'बांगडी फुटली', 'कुंकू मिटले' अशा वचनांतील अभद्रता आपण टाळतो. 'बांगडी वाढली', 'कुंकू वाढले' असे भद्रवचन बोलतो. मंगलप्रसंगी यज्ञ वा होम करताना 'गोवऱ्या' आणावयाला आपण सांगत नाही; 'शोभन्या' आणा असे सांगतो. जात असलो तरी 'आम्ही येतो' असे म्हणतो. तोंड वेडेवाकडे करून 'भाजी खारट झाली' असे सांगून गृहिणीला खजील करण्याऐवजी, "आज भाजीत लावण्य जरा जास्त आहे" अशा वाक्चातुरीने गृहिणीच्या चेहऱ्यावर स्मिताची रेषा उमटविणाऱ्याचे कोण कौतुक करणार नाही? संस्कृतात पर्यायोक्त नावाचा एक अलंकार आहे. तो भाषेतील अशाच खुमारीवर आधारलेला आहे. "तुम्ही कोठले?"-असे सरळसोट विचारण्यापेक्षा "आपल्या जन्माने कोणते गाव अलंकृत झाले आहे?", "आपल्या विरहाने कुठले लोक तळमळत आहेत?" असे विचारणे कुणाला आचरटपणाचे वाटेल. असेही म्हणता येईल की हे जरा फारच झाले! पण त्यांतले तत्त्व घेण्यासारखे आहे. सरळसोट विचारण्यात कसली आली आहे चतुरता आणि विदग्धता?

ज्यांना एखादी संस्था चालवावयाची आहे, एखादे संघटन चालवावयाचे आहे, त्यांना वाणीतील मार्दवाचे आणि भाषेतील चातुर्याचे भान ठेवावेच लागते. संघटनेच्या कार्यात तर, खूप निरलस, निरपेक्ष काम करणाऱ्या पण वाणीतून सुगंधापेक्षा काट्यांचीच भेदक फेक करणाऱ्या व्यक्तीपेक्षा, तुलनेने कमी काम करणारी पण माधुर्याने ओथंबलेले बोलणे असणारी व्यक्ती अधिक उपयुक्त असते. ज्याला माणसे जोडावयाची असतात, त्याला आपली वाणी सांभाळावीच लागते. साधा दुकानदार पण आपले गिऱ्हाईक सांभाळण्यासाठी किती व्यवस्थित बोलतो

तो. एखादा वाण त्याच्याजवळ नसला तरी तोंडून नकार निघत नाही. दुसरेतिसरे प्रकार तो दाखवीतच असतो. माझे एक मित्र चांगले कार्यकर्ते आहेत. आळस त्यांना माहीतच नाही निःस्पृहता वादातीत आहे. हिंमतीची त्यांचे दुष्मनही वाहवा करतात. पण जीभ अशी फटकळ की तोंड उघडल्याबरोबर चाबकाचे फटकारे मारीतच ती फिरते. त्याच्यासंबंधी बोलताता दुसरे एक मित्र म्हणाले, " अमुक अमुक ना ! अगदी गाईसारखा आहे. तोंड सोडून, त्याचं सगळं चांगलं आहे." त्याच्या या स्वभावाचा परिणाम असा झाला की, ज्यांच्यासाठी तो एवढा धडपडत होता, त्या सहकाऱ्यांनाच तो नकोसा झाला.

एखादा चाणाक्ष गृहस्थ माझ्याशी बोलायला येतो. तो एकदम मुख्य बात सांगणार नाही. अप्रिय सांगायचे असले तर तो आणखीही अवांतर गोष्टी काढील. " कसे काय, नवीन काम कसे आहे ?" " आता तुम्ही एक्सपर्ट झाला असाल ?" " तुमचे सहकारी तुमच्या मागेही तुमची तारीफ करतात बुवा !" " क्वचितच असे भाग्य कुणाच्या वाट्याला येते." अशा पायघड्या घालीत तो तुम्हाला घेऊन चालतो. माझ्या लक्षात येते की गृहस्थांना दुसरे काहीतरी सांगायचे आहे. ते त्याने लवकर सांगून मोकळे व्हावे असेही वाटते. कधीकधी मी अधीरही होतो. संतापही येतो की गृहस्थ सरळ सांगत कां नाही ?– पण नंतर पटते की, असे करण्यातच सुसंस्कृतता आहे, माणुसकी आहे. अप्रिय गोष्ट का एकदम सांगायची असते ? आई आजारी आहे, हे सांगायला गेलेल्या नोकराने कुत्र्याच्या आजारापासून कशी सुरवात केली आणि मग घोडा आणि मग आई आजारी आहे हे कसे कौशल्याने सांगितले याविषयीची गोष्ट आपल्याला आठवत असेलच. या व्यवहाराचे मर्म मला आता कळावयाला लागले आहे. याचा अर्थ तो व्यवहार मला जमणार आहे, असा नाही. जमणार नाहीच आणि जमतही नाही. त्याचे परिणाम मी भोगीत असतो. पण असा चाणाक्ष व्यवहार करणाऱ्यांबद्दल माझ्या मनात आदर वसत आहे. विकार आवरण्याची त्यांची केवढी क्षमता आहे ! शब्दाच्या निवडीचे केवढे औचित्य ते सांभाळीत असतात ! जे सांगावयाचे ते रोखून धरण्याचा त्यांचा केवढा संयम आहे ! त्यांचे हे चतुर आडंबर म्हणजे चलाखी किंवा लबाडी आहे असे कुणी म्हणतील ! म्हणोत बिचारे ! माझे मत मात्र आता वेगळे बनले आहे. मुलायम शब्दांची फुले उधळीत आणि आश्वासनांच्या लहरींनी अंतःकरणे डोलवीत ज्यांची वाणी प्रकट होते, त्यांचा दासानुदास व्हावे असे मला वाटू लागले आहे !

## तुरुंगातले दिवस

" आइये, आयजीसाहब. आपकी हम क्या खिदमत (सेवा) करें. गांजा,

शराब, चरस...चाहे वह चीज मांगिये. यहां सब मिलेगा. हां, लेकिन पान नहीं मिलेगा"

गोंदियाच्या अॅडव्होकेट बापटांनी इन्स्पेक्टर जनरल ऑफ प्रिझन्स नागपूर तुरुंगास भेट द्यायला आले असता, वरील सलामीने त्यांचे स्वागत केले. क्षणभर आयजी चमकले. केवळ आयजीच नव्हे तर त्यांच्या बरोबरचे इतर जेल-अधिकारी आणि आठ नंबरच्या बरॅकमधील आम्ही स्थानबद्धही. पण बापटांचा धडाकेबाज खाक्या एव्हाना आमच्या परिचयाचा झाला होता. बापट चिडण्याचे कारणही होत. बापट पानांचे शौकिन होते आणि त्यांची पाने तुरुंगाधिकाऱ्यांनी तुरुंगातून परत पाठविली होती.

बापटांच्या रागावण्याचा आशय सर्वांच्या ध्यानात यायला वेळ लागला नाही. तुरुंगाच्या परकोटाची भिंत कितीही मजबूत आणि भयप्रद असो, तेथील दरवाजे आणि कुलुपे कितीही धडकी भरविणारी असोत, येणाऱ्या-जाणाऱ्यांची कशीही कडक तपासणी असो, आतल्या माणसाला हवी ती वस्तू मिळायची नाही असे व्हायचे नाही. "स्मगलिंग इन्" आणि "स्मगलिंग आऊट" सर्रास चालू असे. केवळ याच तुरुंगात नाही, सर्वच तुरुंगातला हा अनुभव होता. आणि नागपूर-तुरुंगात तर चांगले शंभर खरेखुरे स्मगलर होते ! पण त्यांच्याविनाही स्मगलिंग चालू असे. तुरुंगात दारू बंद असली, तरी दारूने झिंगलेले वार्डर ही नव्हाळी नव्हती. दाराच्या आडून गांजाच्या चिलमीवर नारळाच्या दोरीची गाठ जाळून, तिचा मनसोक्त झुरका घेणाऱ्या कैद्यांचे दर्शन दुर्मिळ नव्हते. या वस्तूंचा घाऊक पुरवठा आणि किरकोळ वितरण करणारे कैदी आमच्या नजरेतून निसटले नाहीत. या प्रसंगानंतर बापटांनाही पानांची अडचण गेली नाही. कुणी विचारील की पानावर बंदी का ?-तर त्याचे समाधानकारक उत्तर कुणाकडूनही मिळणार नाही. तुरुंगात सुपारी चालत असे. तंबाखूला मोकळीक होती. विडीला मान्यता होती. पूर्वी १९४८ साली आम्ही जेव्हा तुरुंगात होतो, तेव्हा विडीला मनाई होती. त्यामुळेच की काय, त्या वेळी "विडी" हे तुरुंगातले सर्वात जास्त मोलाचे चलन होते. विडीच्या मोबदल्यात कोणतीही सेवा उपलब्ध होई. पण आता विडीला सरकारमान्यता मिळाली आहे. तंबाखू-सुपारीबरोबर तुरुगाच्या कॅन्टीन-मध्ये ती विराजते आहे. कैदी ती विकत घेऊ शकतात. पण विडयाच्या पानाला मात्र बंदी आहे. कां ?-पण याचे उत्तर कोण देणार ?

सुरवातीला तुरुंगात आम्हाला पोळया विस्तवावर शेकून मिळत नसत. तव्यावर इकडून तिकडे परतविली की झाले. या पद्धतीत पोळया हमखास कच्च्या रहात. गव्हाबद्दल तर बोलायलाच नको, रेशनच्या दुकानातून जो येईल तो. रेशनच्या दुकानात कसा गहू असतो, हे महाराष्ट्रातील नागरी जनतेला सांगायला

नको. शिवाय, "जेल क्वालिटी" ही सर्वच पदार्थांची एक वेगळी जात आहे. आमच्याच बरॅकमध्ये एक बागायतदार शेतकरी स्थानबद्ध होते. मोकळे असताना बाजारात भाजीपाला विकण्यासाठी ते अधूनमधून जात. एकदा हलक्या प्रतीचा, जून-जरड झालेला भाजीचा ढीग आपल्या दलालाकडे पाहून त्यांनी विचारले, "दलालसाहेब, हा कचरा कशाला येथे गोळा करून ठेवला ?" दलाल उत्तरले, "आता जेलचा खरीददार येईल ना ! तो घेऊन जाईल सारा माल !" तर अशी ही "जेल क्वालिटी". गहू कसाही असो, पण पोळी नीट शेकलेली, भाजलेली असावी, असा आम्ही आग्रह धरला. विस्तवावर पोळी का शेकायची नाही याचे सयुक्तिक कारण कोणीच देऊ शकत नसे. "इथे अशी पद्धत नाही", एवढेच उत्तर मिळे. चार-पाच महिने आम्ही सतत लकडा लावला तेव्हा कोठे पोळी शेकण्याची मंजुरी मिळाली आणि त्यासाठी जादा इंधनही मंजूर झाले. गव्हाच्या प्रतीतही १९७६ च्या एप्रिलपासून सुधारणा झाली. कालांतराने आम्हाला कळले की, पोळी न शेकण्याची प्रथा ब्रिटिशांच्या काळापासूनची आहे. शेकल्यामुळे पोळी फुगते आणि तिचा पापुद्रा वर येतो. त्या पापुद्र्यातून चिठ्ठीचपाटी कोणी धाडू नये म्हणून पोळी शेकण्यावर बंदी आली ! खरे कारण कुणास ठाऊक ? पण जी पद्धत एकदा सुरू झाली, ती नियमाच्या व रूढीच्या बंद्या गुलामांनी अजूनही चालू ठेवली आहे. कारण, आम्हा राजकीय स्थानबद्धांना जरी पोळ्या शेकून मिळू लागल्या, तरी इतर कैद्यांच्या "भिशीत" (स्वैपाकघरासाठी तुरुंगाचा खास शब्द) तव्यावर परतविलेलीच पोळी तयार होते.

दि. ११ ऑक्टोबर १९७५ ला रात्री ९ च्या सुमाराला मला घरी अटक झाली. रात्री ११॥ च्या सुमारास मला तुरुंगात पोचविण्यात आले. तोपर्यंत नागपूर-तुरुंगात स्थानबद्धांची संख्या दोनशेच्या आसपास असावी. सकाळी उठल्यानंतर वातावरणाचा आवाका घेऊ लागलो. गेल्या तीन महिन्यांत स्थानबद्धांनी बरीचशी व्यवस्था स्वत:कडे घेतली होती. चहावर स्थानबद्धांची देखरेख सुरू झाली होती. स्वैपाकावरही आमचे नियंत्रण बसू लागले होते. वितरण आम्हीच करीत असू. सुरवातीचे सगळे मूग जाऊन, त्याची डाळ बनली होती. त्यामुळे पाणी इकडे, मूग तिकडे-असे "जेल क्वालिटी" वरण बंद झाले होते. चण्याच्या डाळीचे वरण खाण्याऐवजी तिचे पीठ बनून पिठले तयार होऊ लागले होते. रविवारी खिचडी-पिठल्याचा बेत ठरल्यासारखाच झाला होता. साधारणत: संघाच्या शिबिराच्या वळणावर व्यवस्था चालू झाली होती. जमाते-इस्लामी, आनंदमार्गी, एक-दोन सर्वोदयवादी, पाच-सात समाजवादी, तेवढेच मार्क्सवादी- हे सारे या योजनेत बसले होते. अधिकांश संख्या संघाच्या कार्यकर्त्यांची असल्यामुळे व्यवस्था त्यांच्याकडे आली होती. रोज सकाळी खामगावचे प्रा० सहस्रबुद्धे

ज्ञानेश्वरीवर प्रवचन करीत. आठवडयातून तीन दिवस महाभारत चाले. इतर दिवशी भाषणे होत. पुढे रोजच भाषण सुरू झाले. ब्रिज, व्हॉलीबॉल, चौसर, बुद्धिबळ हे खेळ चालत. शिवाय योगासनाचे वर्गही चालत. सुरवातीस सायंकाळी ६ लाच बरॅकला कुलूप लागे. पुढे रात्री ८ पर्यंत बरॅक खुली राहू लागली. १९७६ चा उन्हाळा आला आणि बाहेर झोपायला परवानगी मिळाली, तेव्हापासून बरॅकला कुलूप लागणे बंद झाले. यार्डाला मात्र कुलूप लागे. त्यामुळे यार्डात कुठेही आणि केव्हाही भटकता येत असे. अशा रीतीने भौतिक मोकळीक वाढत गेली. पण मानसिक गुदमरणे वाढले. पहिले पाच-सहा महिने कार्यक्रम नीट वाटला. मग सत्याग्रह सुरू झाला, तो दोन महिन्यांचा काळही गडबडीत निघून गेला. पण २६ जानेवारी १९७६ नंतर सत्याग्रह संपला. त्याचे कोणतेच फलित दिसेना. लगेच काही दिसावे, अशी अपेक्षा करणे चूक होते. पण अपेक्षा होती, हे नाकारता येणार नाही.

कार्यक्रम पूर्वीसारखेच चालू होते. काही कार्यक्रमांची त्यांत भरही पडली. पण ते सारे आता साचेबंद वाटत होते. एक प्रकारचा बंदिस्तपणा – ज्याला हिंदीत घुटन म्हणतात ती – निर्माण झाला होता. वातावरण कुंद होते. त्यात मोकळेपणाची सुखद झुळूक सोडण्याचे काम केले 'ग्रास पार्लमेंटने'. ग्रास पार्लमेंट ही शब्दावली आपोआपच तयार झाली. तुरुंगाच्या आवारातील एका हिरवळीवर काही लोक एकत्र येत. गप्पा करीत. वर्तमानपत्रात आलेल्या न आलेल्या बातम्यांची चर्चा करीत आणि त्यांचा अन्वयार्थ लावीत. यातून तयार झाली ग्रास पार्लमेंट. प्रारंभी तुरुंगात आम्हाला रेडिओ ठेवण्याची परवानगी नव्हती. सातआठ महिन्यानंतर ती मिळाली. त्यामुळे बी० बी० सी० आणि व्हॉइस ऑफ अमेरिका यांच्याकडून बातम्यांचा भरघोस पुरवठा होई. भारतीय आकाशवाणीवरच्या बातम्या ऐकल्या जात. पण त्यांच्यावर स्थानबद्धांचा विश्वास कमी. या ग्रास पार्लमेंटचे कुणाला बोलावणे नाही की, सूचना नाही. सकाळी ९ ला यायचे, १० ला जायचे. येताना औत्सुक्य असे, जाताना उत्साह. कारण ग्रास पार्लमेंट ही उत्साहप्रद बातम्यांची जननी असे. बातमी खरीच असली पाहिजे असा या पार्लमेंटचा आग्रह नव्हता. बातमी नवीन असली की काम फत्ते. बातम्या तयार करणारेही मग तयार झाले. "आणीबाणीच्या विरुद्ध विनोबाजी सत्याग्रह करणार", "संजय गांधीने आपल्या आईच्या थोबाडीत मारली", "बाळासाहेब देवरसांना वाटाघाटीसाठी दिल्लीत नेण्यात आले", "एकनाथजी रानडे व श्रीमती इंदिरा गांधी यांची भेट झाली" – या ग्रास पार्लमेंटमधील ठळक बातम्या. अशाच किती तरी छोटयामोठया. रोजच उत्साह आणणाऱ्या बातम्या असत, असे नाही. पण उत्साहाची बातमी आली की झोपेच्या कांपोजच्या गोळयांचा त्या दिवशी

खप एकदम कमी होत असे. आणि तिकडे भारतीय आकाशवाणीवरून 'लोक-सभेची मुदत वाढविण्यात आली', 'मिसाच्या १६ (अ) कलमाची मुदत वाढविण्यात आली', अशी बातमी आली किंवा संघावर अथवा जेपींवर पंतप्रधानांचा कडाडून हल्ला आला की कांपोजच्या गोळ्यांचा खप खूप वाढत असे.

या ग्रास पार्लमेंटची निवडणूक खूप गाजली. लोकसभेची दुसऱ्यांदा मुदत वाढल्याची बातमी आली आणि तुरुंगातले वातावरण एकदम उदास बनले. आपण आता कधी सुटणारच नाही, इंदिरा गांधी सत्तेवर आहेत तोपर्यंत निवडणुकी नाहीत अशी भविष्यवाणी छातीवर हात ठेवून होऊ लागली. नैराश्यातून उद्‌भवणारे साहसी विचार लोक उघडउघड बोलू लागले. वातावरण विलक्षण मानसिक ताणाचे बनले. पण ग्रास पार्लमेंटच्या निवडणुकीने ते पार बदलून टाकले. इंदिरा पार्लमेंटची निवडणूक रद्द झाली असली, तरी ग्रास पार्लमेंटची निवडणूक होणार, अशी घोषणा झाली. एक राष्ट्रपती नियुक्त झाले. एकजण निवडणूक आयुक्त बनले. पार्लमेंटच्या बरखास्तीची राष्ट्रपतींनी घोषणा केली. निवडणूक–आयुक्तांनी निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर केला. अध्यक्ष व सचिव अशा दोन पदांची निवडणूक जाहीर झाली. पार्लमेंटच्या कार्यक्रमात हिरीरीने भाग घेणारे निवडणुकीच्या रिंगणात उतरले, तर त्यांचा नक्षा उतरविण्यासाठी, सुटकेसाठी आतुर आणि उताविळ झालेल्या एका खेडुताला उभे करण्याचा दुसऱ्यांनी घाट बांधला. चौरंगी सामना झडला. प्रचाराची धमाल उडाली. पोस्टरे चिकटली. वृत्तपत्रे निघाली. "मिसा टाईम्स" आणि दैनिक "बेधडक" ही भित्तिपत्रे (Wall papers) खूप गाजली. दिवसातून दोनदोन आवृत्त्या निघू लागल्या आणि यार्डायार्डाच्या भिंतीवर फडकू लागल्या. एका उमेदवाराची घोषणा होती : "ग्रास पार्लमेंटसाठी बातम्या तयार करणारा नवा अधिकारी नेमू". खेडूत उमेदवाराचे घोषणापत्र एकशब्दी होते. तो शब्द होता 'रिलीज्'. निवडून आल्यास ताबडतोब रिलीज्. एक दिवस हाईड पार्कसारखा जाहीर छोटया छोटया सभांचा कार्यक्रम झाला. भाषणे, टोमणे, अडथळे यांनी परिसर गजबजून गेला. ठरल्या दिवशी निवडणूक होऊन आमचा खेडूत गडी बहुसंख्य मते मिळवून निवडून आला. ग्रास पार्लमेंटच्या दिग्गजांची जिरविण्यात आली. कोण आले कोण पडले, यापेक्षाही या आठ दिवसरात्री वातावरणाने विषादाची काळोखी होती–नव्हतीशी करून टाकली. बरॅकमध्ये बसून अंदाज करणाऱ्यांना या निवडणूक निकालाने धक्काच दिला. जणू काही भवितव्यताच या निवडणुकीच्या द्वारे भावी संकेत देत होती !

कांपोजच्या गोळ्यांवरून आठवली तुरुंगातील वैद्यकीय व्यवस्था. या व्यवस्थेला 'अव्यवस्था' म्हणणे अधिक योग्य. येथे डॉक्टरपेक्षा कंपौण्डरांचा

रुबाब जास्त असे. जेलच्या नोकरीत सहसा कुणी चांगला डॉक्टर येत नाही, आला तरी टिकत नाही असे म्हणतात. आजारी स्थानबद्धांना जादा फळे आणि दूध शिफारसण्याचा या डॉक्टरांना अधिकार असे, व ते या बाबतीत बरेच उदार होते हे मान्य केले पाहिजे. नासिकचे तुरुंग–डॉक्टर खूपच उदार होते असे तेथून दात बसविण्याकरिता आलेले स्थानबद्ध सांगत. (नासिक किंवा ठाणे येथील तुरुंगातील स्थानबद्धांना दात बसविण्याकरिता किंवा त्यापूर्वी ते पाडण्याकरिता, नागपूर तुरुंगात आणीत असत व तेथून त्यांना सरकारी रुग्णालयात घेऊन जात. स्थानबद्ध मुंबईच्या दवाखान्यातून पळून जाऊ नयेत म्हणून अशी 'चोख' व्यवस्था महाराष्ट्र सरकारने केली होती.) आमच्या बरोबरच्या स्थानबद्धांमध्ये बाहेर उत्तम प्रॅक्टीस असलेले डॉक्टर होते म्हणून बरे निभले. स्थानबद्ध आपला आजार बहुधा जेलच्या डॉक्टरांना सांगतच नसे. चिकित्सा स्थानबद्ध डॉक्टरांकडून करून घ्यायची आणि औषध तुरुंग डॉक्टराकडे मागायचे. याला त्या डॉक्टरांची हरकत नव्हती. डॉक्टरसमोर उभे राहून "इतक्या कांपोज, इतक्या युनिएंझिम, इतक्या कोसॅव्हिल, इतक्या बी कॉम्प्लेक्स"–एवढे म्हणायचे आणि आपले औषध घेऊन जायचे. तुरुंगाच्या डॉक्टरांच्या बाबतीत एक किस्सा सर्वत्र परिचित आहे. कंपौण्डरला सोयीचे जावे म्हणून विशिष्ट आजारासाठी बाटल्यात औषध भरून आणि त्या बाटल्यावर नंबर टाकून ठेवतात. आजारी कैद्यांना आजारानुरूप फक्त नंबर सांगितला की कंपौण्डरने त्या नंबरच्या बाटलीतील औषध द्यायचे, अशी तेथे पद्धत असते. एकदा नऊ नंबरचे औषण आजारी कैद्यास द्यायचे होते. कंपौण्डर म्हणाला नऊ नंबरचे औषध शिल्लक नाही. डॉक्टर म्हणाले, "मग थोडे सहा नंबरचे आणि थोडे तीन नंबरचे दे!" या किश्श्यातील अतिशयोक्ती उघड आहे? पण जेल डॉक्टरांची बेपर्वाईही लपलेली नाही.

आमच्या एका सहवासियाच्या बाबतीत घडलेला प्रसंग वरील किश्श्याच्याच वळणाचा आहे. त्याचा हात दुखत होता, म्हणून त्याने डॉक्टरांना 'रिलॅक्झिल' च्या मलमाची ट्यूब मागितली. डॉक्टर म्हणाले, "रिलॅक्झिल सध्या नाही हो." टेबलवर दुसरी एक ट्यूब पडली होती. आमच्या मित्राने विचारले, "डॉक्टरसाहेब, ही कसली ट्यूब आहे?" डॉक्टर उत्तरले, "ही टूथपेस्ट आहे." मित्र म्हणाला "मी घेऊ का?" डॉक्टर म्हणाले, "घेऊन जा." बरॅकमध्ये येऊन त्याने ही गंमत सांगितली. नाही रिलॅक्झिल तर टूथपेस्टच सही! आम्ही मनसोक्त हसलो.

तुरुंगात आजारी पडण्यासारखी असह्य शिक्षा नसावी. आजारी माणसाच्या सभोवती इतकी माणसे असूनही त्याला आपण एकाकी आहोत असे वाटते. माणसाचे धैर्य सुटण्याचा प्रसंग आजारपणातच येतो. आजार जरा लांबला तर

आपले काय होईल या विचाराने तो कासावीस होतो. मी स्वत:चाच अनुभव सांगतो. मला फ्लू झाला. डॉक्टरांनी मला टेरामायसीनच्या गोळ्या दिल्या. चोवीस गोळ्या खाल्ल्यावर माझा ताप गेला, पण मला कमालीची अशक्तता वाटू लागली. अन्नावरची वासना उडाली. चक्कर आल्यासारखे वाटू लागले. एका सायंकाळी तर असे वाटले की आपले आता संपले. तसा मी स्वत:स मोठा धीराचा समजतो. मृत्यूची खूप भीती बाळगावी असा माझा स्वभाव नाही, संस्कारही नाहीत. सहसा, तर्कावर मी भावनेला मात करू देत नाही. पण त्या वेळी मला वाटले की, मरण आपल्या मुलाबाळांत यावे. असे एकाकी मरण येऊ नये. एकाकी मरण ! चारशे माणसे अवती भोवती होती. बरॅकमध्ये ३२ सहृदय मित्र होते. आणि तरीही एकाकीच ! पण मन तेव्हा भलतेच हळवे बनले होते. आता तो प्रसंग आठवून मी जेव्हा त्याची चिकित्सा करतो तेव्हा मी स्वत:लाच म्हणतो, अरे, घरी तरी मृत्यूपासून कोणी तुला वाचवील काय ? पण हे झाले तर्कशास्त्र. माझ्या भावनेपुढे त्यावेळी ते लुळे पडले होते.

मरणाच्या वार्तांनी तुरुंग कसा दु:खमय बनून जायचा. अमक्याचे वडील वारले, तमक्याची आई गेली. तिसऱ्याचा मुलगा अपघातात गेला. पावणेदोन वर्षात असे घडणारच होते. पण, ज्याचे असे नातलग मरण पावायचे, तो मात्र तुरुंगात असायचा. मग पॅरोलसाठी धावपळ व्हायची आणि पॅरोल लवकर मिळायचा नाही. अशा वेळी त्या दु:खी जिवाची तगमग सर्व स्थानबद्धांच्या चेहऱ्यांवर अंकित व्हायची. खामगावच्या मूर्तिकार संन्यालचे वडील नागपुरात वारले. अंत्ययात्रेला जाता यावे म्हणून संन्याल खूप तळमळला. पण त्याला सोडणे होते मुंबईच्या गृहखात्याच्या आणि बुलढाण्याच्या कलेक्टरच्या हातात. संन्याल अंत्ययात्रेला जाऊ शकला नाही. त्याच्याबरोबर सारा तुरुंग सुतकी बनला. देऊळगावराजाचे जनार्दनपंत काळे तर वडिलांच्या तेरवीसही जाऊ शकले नाहीत. त्यांच्या पॅरोलच्या अर्जाचा विचार करण्यासाठी तेरा दिवसात सरकारला सवडच झाली नाही. निदान मृत्यूच्या कारणासाठी तुरुंगाच्या अधिकाऱ्यांना पॅरोलचा अधिकार दिला असता, तर काही बिघडले नसते. पण तसा नियम नव्हता. अशा प्रसंगी तुरुंगाचे अधिकारी खूप मदत करायचे पण त्यांचे हात कुठपर्यंत पोचणार ? मिसान्तर्गत स्थानबद्धांचे पॅरोल-अर्ज पूर्वी हायकोर्ट ऐकत असे. पण सुप्रीम कोर्टाच्या निर्णयानंतर हायकोर्ट हतबल झाले आणि पॅरोल मिळणे दुर्मिळ झाले. सर्वांना सारख्या कामासाठी पॅरोल अशी सरकारची नीती नव्हती. एकाला मावसभावाच्या मुलीच्या लग्नासाठी तीन दिवसांचा पॅरोल मिळाला, तर माझ्या सख्ख्या भावाला – जो माझ्या बरोबरच नागपूर तुरुंगात होता – माझ्या मुलीच्या लग्नासाठी तीन तासांचाही पॅरोल मिळाला नाही.

माझ्या मुलीचे लग्न मी तुरुंगात असतानाच जुळले होते. वाङ्निश्चय करण्याचे ठरले. पुरेशा अगोदर मी पॅरोलसाठी अर्ज दिला. त्यापूर्वी वाङ्निश्चयाकरिता एका स्थानबद्धाला तीन दिवसांचा पॅरोल मिळालेला होता. काही दिवसांपूर्वीच नागपूरच्या एका स्थानबद्धाला याच कामासाठी आठ तासांचा का होईना पॅरोल मिळाला होता. त्यामुळे मला आशा होती. पण सरकार चूप. हो नाही की नाही नाही. माझ्या मुलाने मुंबईला माझ्या मित्राला टेलिफोन करून चौकशी करण्यास सांगितले व त्याच्याकडून कळले की पॅरोल मिळणार नाही. हे सारे वाङ्-निश्चयाच्या दिवशी. घरी सर्व तयारी झाली होती. पाहुणे मंडळी आली होती. दुपारी तीन वाजता मुलगा रडवेला चेहरा घेऊन तुरुंगाच्या फाटकाशी आला आणि त्याने मला ती निराश–वार्ता सांगितली. गेट जेलरने सौजन्य दाखविले म्हणून मुलगा तो निरोप तरी मला सांगू शकला. परततानाचे त्याच्या मुद्रेवरील माझ्या नजरेने टिपलेले कारुण्य अजूनही माझ्या स्मृतिसंपुटात साठलेले आहे. त्या दिवशी मला झोपेसाठी कांपोजलाच शरण जावे लागले.

कांपोजची गोळी खरेच संकटप्रसंगी मित्रासारखी मदतीला यायची. दिवस नानाविध कार्यक्रमात भरकन् निघून जायचा, पण रात्री सुप्त मन जागे व्हायचे. नाना प्रकारचे विचार येत. विकार उद्भवत. पापण्या मिटलेल्या असत, पण झोप मात्र शिरलेली नसे. जणू काही पापण्यांच्या तटबंदीनेच झोप बाहेर रोखून धरली ! शेली नावाच्या इंग्रज कवीने रात्रीला "अफूच्या कांडीने सर्वांना स्पर्श करणारी" (Touching all with the opiate wand) असे म्हटले आहे. पण तुरुंगात रात्र अनेकदा वैरिणी बनून जायची. अफूच्या कांडीचा स्पर्श तर दूरच राहिला; चटके देणारी ती आग बनायची. झोप ती चोरून न्यायची. निद्रेला वर्डस्वर्थ कवीने 'ताज्या विचारांची आणि आनंदी जीवनाची प्रेमळ माता' (Dear mother of fresh thoughts and joyous health) म्हटले आहे. पण ती निद्रा प्रयत्न करूनही यावयाची नाही. वैर मांडल्यासारखी वागायची. योगासनाच्या वर्गात शिकलेला योगनिद्रेचा प्रयोग निष्फळ ठरावयाचा. मन निश्चित आणि निर्विचार करायचा जो जो प्रयत्न करावा, तो तो चिंता आणि विचार मनात गर्दी करावयाचे. अशा वेळी मदतीला यायची कांपोजची गोळी. प्रत्येक तुरुंगातील कांपोजच्या गोळ्यांच्या वापराचे या काळातील आकडे गोळा केले तर राजकीय कैद्यांच्या मनोव्यथेचा काहीसा अंदाज लागू शकेल. दिवस उजाडला की पुन्हा आम्ही धैर्याचे मेरू म्हणून मिरवीतही असू. या मनो-व्यथेचे मुख्य कारण असावे, अनिश्चितता. जन्मठेपेची शिक्षा झालेल्या कैद्यालाही हे माहीत होते की १३–१४ वर्षांनी तो सुटणार आहे, पण स्थानबद्धांच्या बाबतीत कोणताच तर्क चालेना. मधूनच चार–सहा सुटत. सुटण्याची आशा

पल्लवीत होई. तुरुंगातला वाक्प्रचार होता 'प्रक्रिया सुरू झाली'. पण महिने लोटून जात. प्रक्रिया तेथेच बंद पडे. दि. १८ जानेवारी १९७७ ला निवडणुका जाहीर झाल्या. त्या आठवड्यात १०० लोक सुटले. पण ३०० तसेच लोंबकळत राहिले. शंभर का सुटले आणि तीनशे का सुटले नाहीत याची कोणीच मीमांसा करू शकत नसे. सुटलेल्या शंभरात नागपूर महापालिकेचे चार सदस्य होते. उरलेल्या तीनशेत तीन होते ! ते चार का सुटले व हे तीन का राहिले – याला लहरीपणाशिवाय दुसरे कारण नाही.

आमच्या सुटकेसाठी नवससायास, व्रतवैकल्ये बाहेर होत, हे आत येणाऱ्या प्रसादावरून कळत असे. पण व्रतवैकल्ये आतही चालत. नवनाथाची पोथी कारागृहातून सुटकेसाठी उपयुक्त म्हणून तिचे पारायण करणारे चार–दोन लोक होतेच. ज्योतिषांची व हस्तसामुद्रिकांचीही चलती होती. इंदिरा गांधींची, आणीबाणीची, संघाची, संघबंदीची–अशा साऱ्या कुंडल्या मांडून झाल्या. पण सारी भाकिते खोटी ठरली. प्लँचेट तर पाणचट होईपर्यंत वापरले गेले. एकदा तर आमच्या तुरुंगात फाशी गेलेल्या इसमालाच प्लँचेटवर बोलावण्यात आले. पण या सर्व मृतात्म्यांनी दिलेल्या तारखा फोल ठरल्या. माझा मुळातच या 'विद्यांवर' विश्वास नाही. तरी पण प्लँचेट ही काय चीज आहे हे जाणून घ्यावे म्हणून एका प्लँचेटवाल्याला एका रात्री आमच्या बरॅकमध्ये बोलावले. त्याने येऊन सर्व तंत्र वापरले. पण आत्म्यांचा असहकार काही संपेना आणि ते काही बोलेनात. अखेरीस तो म्हणाला, "श्रद्धावन्तांनाच यात सफलता मिळते !"

मृतावरून गोष्ट आठवली. आमच्या तुरुंगवासात दोघा कैद्यांना फाशी देण्यात आले होते. फाशीघाट आमच्या बरॅकजवळच होता. त्याचे सरकारी नाव "अमरधाम". तशी पाटीच तेथे होती. पण फाशीघाट हेच प्रचलित नाव. फाशी देत असताना तुरुंगाच्या अधिकाऱ्यांना कसे वाटत असेल, हे तेच सांगू शकतील. पण आम्हा स्थानबद्धांना बरे वाटत नसे. फासावर गेलेले अट्टल खुनी होते. एकाने पाच जणांचा खून केला होता. त्याची बायको देखील त्याचे तोंड पहावयास तयार नव्हती. पण फाशीच्या आदल्या दिवशी त्याच्या कोठडीकडे जाऊन जेव्हा आम्ही त्याला पाहिले, तेव्हा तो आम्हास कीव करावी असाच एक जीव वाटला. त्याच्या मुद्रेवर असहायता दाटली होती. आम्हा सर्वांना त्याने हात जोडून नमस्कार केला, तेव्हा आम्हीही हेलावून गेलो. ज्या दिवशी त्याला फाशी दिले, तो संपूर्ण दिवस आपण स्मशानातच आहो असे वाटले. सगळा तुरुंग त्या दिवशी घाणेरडा आणि अपवित्र वाटला. एका प्रेताशी जखडल्यासारखा.

बी. बी. सी. आणि व्हॉईस ऑफ अमेरिका बातम्यांचा पुरवठा करी. पण खरे समाधान होई भूमिगत साहित्य वाचून. सर्व प्रकारचे भूमिगत साहित्य येत

असे. सर्वांना एकाच वेळी बातमी मिळावी, सत्याग्रहाचे वृत्त कळावे, म्हणून सत्याग्रहाच्या काळात आम्ही एक नियतकालिकच सुरू केले. त्याचे नाव ' भेट '. नातलगांच्या भेटीइतकीच या ' भेटी 'चीही लोक आतुरतेने वाट पाहात. सत्याग्रहपर्वात आठवड्यातून तीनदा ' भेट ' निघे. पुढे दर आठवडी ती निघू लागली. पुढे पुढे भूमिगत साहित्य खूप वाढले. मग त्यांचे सामूहिक वाचन सुरू झाले. मी स्वत: ' वाचनप्रतिष्ठान ' नावाची संस्थाच काढली व चालविली. एम्. एन्. रॉय यांच्या ' सायंटिफिक् पॉलिटिक्स 'च्या वाचनास तीनच श्रोते लाभले. पण ' थँक यू मिस्टर ग्लॅड 'ला तुडुंब गर्दी लाभली होती. ' डेमोक्रॅटिक मॅनिफेस्टो ', ' क्रुश्चेव्ह रिमेम्बर्स ', ' द लास्ट पेज 'मधील काही प्रकरणे, जयप्रकाशजींचे ' स्वगत ', यांचे वाचन दीर्घकाळपर्यंत लोकांच्या स्मरणात राहील. भूमिगत व्यवस्थेमुळे, बाहेरच्या लोकांना जे साहित्य मिळत नसे, ज्या बातम्या कळत नसत, त्या सर्व आत पोचत. बाहेरच्यांना आतल्यांच्या मनोधैर्याची काळजी नसे. त्यामुळे कटाक्षाने सारे साहित्य पाठविले जाई.

असे हे तुरुंगातले दिवस. खूप दिवस आठवणीत राहतील असे. पाहता पाहता अठरा महिने निघून गेले. पण अनुभवांची खूप श्रीमंती देऊन गेले. इथे सारे कसे उघडेनागडे होत असे. गांधारीपुढे गेलेल्या दुर्योधनाने लंगोटी तरी लावली होती. पण काही तथाकथित हिंमतबाजांच्या चारित्र्यास आणीबाणीतील तुरुंगवासाने ती लंगोटीही लाभू दिली नाही. हिंमतीचे अनेक हिमालय मुंग्यांच्या वारुळाच्या उंचीचे ठरले. धैर्याचे मेरू म्हणून ज्यांनी नेतृत्व करावे, ते मातीची ढेकळे ठरले. तर एरवी छोटी वाटणारी माणसे प्रसंगी कशी आकाशचुंबी बनून जात हेही अनुभवास आले. आज बाहेर आल्यावर ती माणसे आपला सामान्य उद्योग करतात. पण त्यांची भेट झाली की माझा माथा त्यांच्यापुढे नम्र होतो. आत्मपरीक्षणाचीही खूप संधी मिळाली. अनुभवांची ही समृद्धी ज्यास लाभली, तो या तुरुंगवासाबद्दलही कृतज्ञच राहील.

म. टा. दिवाळी १९७७

## स्नेहांकिता

एकाच पुस्तकाने एखाद्या लेखकाला अजरामरत्व प्राप्त होत असेल, तर ' स्नेहांकिता 'ने ते स्नेहप्रभा प्रधान यांना मिळावयाला हवे. अंत:करणातील मुदुतम भावनेच्या द्रवांत भिजून जणु काही, शब्द या पुस्तकाच्या पानावर अवतरले आहेत असे वाटावे, इतक्या विलक्षण जिव्हाळ्याने पुस्तकाचे पान न् पान

ओथंबलेले आहे. त्यातील प्रतिपादन अंतःकरणाला हलवून आणि हेलावून सोडणारे आहे. त्याचा प्रांजळपणा मनावर आपला ठसा उमटविणारा आहे.

"स्नेहांकिता" हे आत्मनिवेदन आहे. एक आत्मकथा आहे. ही आत्मकथा स्नेहप्रभा प्रधान यांच्या समग्र जीवनाची नाही. मुख्यत्वेकरून डॉ. वि. ना. शिरोडकर यांचा प्रवेश त्यांच्या जीवनात झाल्यापासूनची आहे. सुमारे १८ वर्षांची आहे. एक सुप्रसिद्ध नटी आणि दुसरे जगद्विख्यात स्त्रीरोगतज्ज्ञ यांच्या प्रेमाची व मैत्रीची ही कथा आहे. एक नटी, दुसरे स्त्रीरोगतज्ज्ञ. त्यांच्या मैत्रीबद्दल शंका-कुशंकांचे जाळे लोकांनी विणले नसते तरच नवल. जेथे डॉक्टरांच्या पत्नी कमलाबाई ही मैत्री समजून घेऊ शकल्या नाहीत, तेथे इतरांनी गैरसमज करावेत यात काय आश्चर्य ?

"आत्मकथन म्हणजे आरोपीच्या पिंजऱ्यात उभे राहून आयुष्याची उलटतपासणी करणे नव्हे," असे लेखिकेने एका ठिकाणी म्हटले आहे. पण पिंजऱ्यातील आरोपीची छाया संपूर्ण लिखाणभर पडलेली आहे. अजाणता कां होईना, आरोपांच्या आणि संशयांच्या कल्मषाला धुवून टाकण्याचा प्रयत्न त्यांच्याकडून झाला आहे. तो सफल झाला आहे असे फार तर त्याचे एक वैशिष्टच म्हणता येईल. आत्मनिवेदनात आत्मप्रतिपादन असल्यामुळे, त्यांत आत्मसमर्थनही थोडेबहुत आले तर ते स्वाभाविकच होय.

डॉ. शिरोडकर व स्नेहप्रभा प्रधान यांची मैत्री म्हणा वा प्रेम म्हणा अलौकिक आहे. प्लेटॉनिक प्रेम केवळ काल्पनिक नसेल, तर त्याचे ते उदाहरण आहे असेही म्हणता येईल. दोन्ही व्यक्ती आपापल्या क्षेत्रात कीर्तीच्या शिखरावर आहेत. पैसा, मानमरातब यांपैकी दोघांनाही काही कमी नाही. मित्रमैत्रिणीही काही कमी नसतील. कारण पैसा व कीर्ती यांचेभोवती मैत्रीचे मुखवटे चढवून पिंगा घालणारे थोडेथोडके नसतात. पण दोघांच्याही जीवनात एक पोकळी आहे. समृद्धीच्या प्रचंड ढिगाऱ्यात दारिद्र्य सापडावे, तसे सभोवतीच्या माणसांच्या गलबल्यात दोघेही एकाकी आहेत. एकटेपणाची भयंकर भीती स्नेहप्रभा प्रधानांच्या मनात घर करून बसली आहे. या भीतीचे निराकरण व्हावे म्हणून त्यांनी लग्न केले. पण त्यात त्यांची फसगत झाली. मनाच्या अशा विकल आणि व्याकुळ अवस्थेत डॉ. शिरोडकर त्यांच्या जीवनात आले, आणि ते त्यांचे "आईवडिल, भाऊबहीण, सर्वस्व" बनले. त्यांच्या "भुकेलेल्या आणि तहानेलेल्या मनाला" अन्नपाणी लाभले.

स्नेहप्रभाबाई घटस्फोटित महिला होत्या. त्यामुळे त्यांचे एकाकीपण समजले जाऊ शकते. पण डॉ. शिरोडकर कुटुंबवत्सल होते. मुलगा, मुलगी, पत्नी ही



मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ........

सारी नाती विद्यमान होती. तरी देखील त्यांच्या जीवनात एक पोकळी होती. "नि:स्वार्थपणे प्राणांतिक प्रेम करणाऱ्या व्यक्तीची त्यांना गरज होती" त्यांच्या मनाची ही व्याकुळता त्यांच्या पत्रांमधून व्यक्त झाली आहे. मुलगी म्हणून, आई म्हणून, मित्रमैत्रीण म्हणून बरोबरीच्या नात्याने वागणाऱ्या स्त्रीची त्यांना गरज होती. त्यांच्या व्यवसायामुळे रूपसंपन्न, धनसंपन्न अशा देशी–विदेशी तरुण स्त्रियांचा त्यांना भरपूर सहवास लाभत होता. पण तरीही त्यांच्या जीवनाची ती गरज अपूर्ण होती. ती गरज, ती पोकळी, स्नेहप्रभाबाईंनी भरून काढली आणि म्हणूनच त्यांची मैत्री तुटून जाण्याचे अनेक प्रसंग आले असतानाही, ती तुटू नये यासाठी स्वत:कडे कमीपणा घेऊनही त्यांनी स्नेहप्रभाबाईंची अजीजी केली.

मैत्रीच्या या भावनेत वासनेचे अस्तित्व नसेल काय ? या प्रश्नाचे उत्तर स्नेहप्रभाबाईंनी ठामपणे नकारात्मक दिले आहे. त्या लिहितात, "वासनातृप्ती-साठी डॉक (डॉ. शिरोडकर) माझ्याकडे खास येत नव्हते. ती माझी 'जात' नाही, हे ओळखण्याला त्यांना फार काळ लागला नव्हता. बदनामीला मी भीक घालणार नाही, पण चोरटेपणाने मिळालेल्या चांगुलपणाचीही मला हाव नाही. इतरांना समृद्ध दिसणाऱ्या या थोर पुरुषाच्या आयुष्यात काही तरी कमी होते. माझ्या आयुष्यात मला तर त्यांची क्षणाक्षणाला गरज होती. तरी निरनिराळ्या व्यक्तींच्या फोनवरील शिव्या, अश्लील आरोप, लहानांकडून पाणउतारा या गोष्टींना टाळण्यासाठी मी मैत्री मोडण्याचे प्रयत्न करीत होते. माया अपुरी होती म्हणून नव्हे. ती अमर्याद होती म्हणून." दुसऱ्या एका ठिकाणी त्या लिहि-तात, "जिच्यात वासना हा दुर्गुण नव्हे, व्यसन नव्हे, पण सुसंस्कृत आचार–विचारातून शुद्ध होऊन सुंदर झालेली मनाची गरज आहे, तिला केवळ शरीराचे मीलन तृप्त करू शकत नाही. डॉक जे १०–१५ मिनिटे माझ्याकडे घालवत होते, ती वेळ सकाळची, भाऊगर्दीची आणि नोकर–चाकरांच्या कामाची. अशा वेळी डॉक बॅचलर जरी असते, तरी असले शरीरसंबंध मला कबूल झाले नसते." वासनेच्या अस्तराशिवाय स्त्रीपुरुषांच्या प्रेमाची जे कल्पनाच करू शकत नाहीत, त्यांना हे प्रेम समजले नसेल, तर त्यात काय नवल ?

स्नेहप्रभाबाईंचे डॉक्टर शिरोडकरांवरील प्रेम आणि किशोर साहूंवरील प्रेम अथवा एकाकीपणातून सुटका करून घेण्यासाठी दुसऱ्यांदा विवाहबद्ध होताना केलेले प्रेम यांची जात वेगळी आहे. यापूर्वीही त्यांनी प्रेम केले होते, पण "त्या प्रेमाला फक्त पंख होते, पाय नव्हते. तारुण्याची शोभा होती, समजुतीचा प्रगल्भ-पणा नव्हता. विस्तार होता पण खोलपणा नव्हता. तीव्रता होती पण सबूर नव्हती. स्वप्नाळूपणा होता पण परिस्थितीची सत्यता मान्य करता येत नव्हती." डॉ. शिरोडकरांशी त्यांची जेव्हा ओळख झाली, तेव्हा त्यांच्या मनाची ही अवस्था

संपली होती. प्रगल्भता आली होती. स्वत: शिरोडकरांचेही वय तेव्हा ५३–५४ वर्षांचे होते. त्यांचे प्रेम स्नेहप्रभाबाईंना आईच्या प्रेमासारखे वाटले. त्यांचे प्रेम "वासनाविन्मुख झाल्यामुळेच ते उलटचा सुलटचा वाऱ्यांचे आघात सोसू शकले, इतर मोहांच्या मिठीतून वेळोवेळी सुटून माझ्याकडे धावले आणि माझेही प्रेम शिव्याशाप सहन करून त्यांचे स्वागत करीत राहिले."

या अ-लौकिक प्रेमात गैरसमजाचे अनेक प्रसंग आले. स्वत: स्नेहप्रभाबाईंना त्यांच्या प्रेमाला चोरटेपणाचा कलंक नको होता. पण शिरोडकरांना आपल्या पत्नीपासून ही मैत्री लपवावयाची होती. शिरोडकरांचा लपंडाव नटीचे जीवन जगणाऱ्या आणि पुरुषाशीं वागण्याचा सराव असलेल्या स्नेहप्रभाबाईंना कळला नाही. कळला, तर तो लगेच उमगला नाही. कमलाबाई मुंबईत नसताना होत असलेल्या नियमित गाठीभेटीत, त्या आल्यानंतर जेव्हा खंड पडला आणि 'त्यातल्या त्यात वेळ काढून मी येत जाईन' असे जेव्हा त्यांचे डॉक म्हणाले, तेव्हा त्यांना धक्का बसला. "मानलेली नाती प्रिय असली, तरी क्षणार्धात मातीमोल होतात," हे त्यांना तेव्हा उमगले. फार वर्षांनी आपल्याला लाभलेले बालपण, डॉक्टर शिरोडकरांच्या गाडीच्या चाकाखाली चेंगरून गतप्राण झाले असे त्यांना वाटले. परंतु, क्रमाक्रमाने त्यांनी डॉक्टरांना समजून घेतले. डॉक्टर न्यूनगंडाने पछाडलेले होते, याचा त्यांना बोध झाला. ते एका देवदासीचे पुत्र होते. 'बिनबापाचा' म्हणून झालेली हेटाळणी त्यांनी सहन केली होती. आता नव्या कीर्तीच्या धवलतेवर त्यांना लहानसाही बदनामीचा बिंदू नको होता. स्नेहप्रभा प्रधान नावाच्या नटीशी त्यांची मैत्री आहे, हे आपल्या पत्नीला कळले, तर संभाव्य परिणामांनी ते भयपीडित होते. याची त्यांनी स्वत:च कबुलीही दिली. डॉक्टरांच्या या प्रांजळपणाने आणि लीनतेने स्नेहप्रभाबाईंचा गैरसमज दूर झाला. त्या लिहितात, "मनाच्या चाळणीतून तकलादू हक्काच्या विषम भावना, किडे गळून पडावेत त्याप्रमाणे, गळून पडू लागल्या. मागे राहिले ते निर्हेतुक, निष्कलंक, निर्मळ, निखालस प्रेम–एक उदात्त अनुभव–हक्क गाजविण्याचा नव्हे तर हक्कविहीन होण्याचा. मारून मुटकून नव्हे तर स्वेच्छेने. ज्या दिवसापासून माझ्यात असे परिवर्तन सुरू झाले, त्या दिवसापासून मी फक्त एकच प्रेम अनुभवले. आई मुलावर करते ते. त्याच्या गुणदोषांसह तो कुठेही रमला तरी त्याचे सतत शुभचिंतन करणारे."

या उदात्त भावनेमुळेच डॉ. शिरोडकर चोरटेपणाने प्रेम करीत राहिले, तरी स्नेहप्रभाबाईंना त्याचा तिटकारा आला नाही. डॉक्टरांच्या शेवटच्या आजारात स्नेहप्रभाबाईंना त्यांना खूप भेटावेसे वाटले, पण आपल्या भेटीने कमलाबाईंनी अकांडतांडव केले असते आणि त्याचा परिणाम डॉक्टरांच्या प्रकृतीत

अधिक बिघाड होण्यात झाला असता म्हणून त्यांनी ते संयमाने टाळले. स्वत:ची तडफड सहन केली. आपले मन मारले. चोरटेपणाने भेटीसाठी डॉक्टरांनी युक्त्या सुचविल्या. पण त्यांनी त्या नाकारल्या. ही भेटीची गोष्ट कमलाबाईंना कळली असती, तर त्यांच्या क्रोधाचा परिणाम डॉक्टरांना भोगावा लागेल ही भीती त्यांना होती. त्यामुळे, डॉक्टरांची सारी आर्जवे वाया गेली. "मी माझा स्वाभिमान, जिद्द सारे काही गमवायला तयार होते. पण डॉकच्या जीवाला धोका पोहोचण्याची तिळमात्र संधी मला नशीबाला द्यायची नव्हती. माझ्या कोणत्याही वागण्याने त्यांच्या आयुष्यातील एक क्षणही मला गमवावयाचा नव्हता."

स्नेहप्रभाबाईंना डॉक्टर शिरोडकर यांच्याविषयी असलेल्या प्रीतीची खोली अशी होती. तथापि, त्यांच्या मृत्यूची वार्ता कळल्यानंतरही त्या अंत्ययात्रेला कां गेल्या नाहीत, हे मात्र कळत नाही. शेवटच्या क्षणीही कमलाबाईंनी क्षमा केली नसती ही शंका त्यांना होती. पण कमलाबाई कशाही वागल्या असत्या, तरी आता त्यापासून डॉक्टरांना त्रास होण्याचा संभव नव्हता. कदाचित, डॉक्टरांच्या मनांतील भीतिगंड त्यांच्या मृत्यूनंतर स्नेहप्रभाबाईंच्या अंतकरणात संक्रमित झाला असावा ! कमलाबाई शेवटी तरी आपल्याला बोलावतील अशीही आशा त्यांच्या मनात असावी. ते बोलावणे आले नाही. पण अशा वेळी बोलावण्याची वाट तरी कशाला पहावयाची ?

अशी ही अठरा वर्षांच्या प्रेमाची कथा आहे, एका प्रगल्भ प्रेमाची. "जेथे वासना पवित्रेतेने न्हाऊन निघतात," अशा प्रेमाची. 'परिणते यत् स्नेहसारे स्थितम्' असे भवभूतीने ज्याचे वर्णन केले आहे त्या प्रेमाची. त्याने दिलेल्या आनंदाची आणि नियतीने निर्माण केलेल्या अपूर्णतेच्या वेदनांची. 'सर्वस्वी तुझाच' आणि 'सर्वस्वी तुझीच' बनून गेलेल्यांच्याही वाट्याला अशी वेदना कां यावी ? स्नेहप्रभा प्रधान यांचे उत्तर आहे, नियती ! "लिखितमपि ललाटे प्रोञ्छितुं क: समर्थ:" अशा ललाटीच्या लिखिताची ही क्रीडा आहे. त्या लिहितात, "वेसण घातलेल्या बैलाप्रमाणे साऱ्या आयुष्यभर विधी नेईल, तेथे आपण जात होतो. आपले स्वातंत्र्य मुलामा दिलेली केवळ गुलामगिरी होती हे अटळ सत्य त्याला कळल्यामुळे त्याच्या डोळ्यावरची पट्टी निसटून पडते. पण हाय ! तो जेव्हा खरा जागा होतो, तेव्हाच त्याला कायमचे निद्राधीन व्हावे लागते." स्नेहप्रभा प्रधान यांचा हा मानव जीवनाविषयीचा निष्कर्ष सर्वांनाच पटेल असे नाही. परंतु त्यामुळे 'स्नेहांकिता'च्या गुणवत्तेला यत्किंचितही न्यून येत नाही. मध्येच डॉक्टरी व्यवसायाविषयी व त्यात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांविषयी उपदेशवजा एक नीरस प्रकरण आहे. पण तोही

अपवाद गुणसमुच्चयात लोपून जातो आणि शेवटी ठसा राहतो तो अंतःकरण हेलावून सोडणाऱ्या सांद्र आर्ततेचाच.

२१-३-७३

## खरेच का शिक्षणाचा खेळखंडोबा थांबवायचा आहे ?

खरेच का शिक्षणाचा खेळखंडोबा थांबवायचा आहे, असा प्रश्न विचारणे एरव्ही अप्रस्तुत ठरले असते; पण आज तो प्रश्न अप्रस्तुत नाही. कारण शिक्षण-क्षेत्रात सुधारणा करण्याच्या दृष्टीने काही कमी विचारमंथन आपल्या देशात झालेले नाही. या विचारमंथनातून काही चांगली रत्ने अवश्य बाहेर पडली. पण त्यांना आमच्या राज्यकर्त्यांचा असा काही परीसस्पर्श घडून आला की," विनायक प्रकुर्वाणो रचयामास वानरम् " या संस्कृत भाषेतील उक्तीची आठवण व्हावी.

हा खेळखंडोबा राज्यकर्त्यांनी केलेला आहे. शिक्षणाचे सार्वत्रीकरण कुणाला नको आहे ? कोण असा करंटा आहे की, ज्याला आपला समाज अशिक्षित आणि अडाणी राहावा असे वाटेल ? पण सार्वत्रीकरणाच्या नावाखाली, शिक्षणाचे नाव घेत आपली तुंबडी भरणाऱ्यांचे अमाप पीक आमच्या माय-बाप सरकारने उभे केले. त्यामुळे सगळीकडे गोंधळ माजला. तोही चालला असता. पण खरे शिक्षणच लोकांना नको अशी स्थिती उत्पन्न झाली आहे. हवी आहे त्यांना पदवी आणि पदवीने मिळणारी नोकरी किंवा लग्नाच्या बाजारातील किंमत ! बहुसंख्य विद्यार्थ्यांना शिकावेसे वाटत नाही आणि बहुसंख्य शिक्षकांना शिकवावेसे वाटत नाही. विद्यार्थ्यांना हवे आहे फक्त सर्टिफिकेट, डिग्री ! नक्कल करून, परीक्षकाला लाच देऊन किंवा आणखी काही लांड्यालबाड्या करून परीक्षा उत्तीर्ण केल्याचा दाखला मिळाला की बहुसंख्य विद्यार्थी खुष. आणि आपल्या महाविद्यालयात शिकविण्याचे दिवस वर्षातून ९० झाले काय अन् ५० झाले काय, जोपर्यंत सर-कारी तिजोरीतून आपल्या खात्यात पैसा जमा होत आहे, तोपर्यंत बहुसंख्य शिक्षकही खुष. ज्यांना या परिस्थितीची वेदना आहे, ते अल्पसंख्य आहेत.

आजच मला एका पालकाने सांगितले की, त्यांचा सहावीतला मुलगा त्यांना म्हणाला की, आज त्यांचा " कॉमन चाट "चा कार्यक्रम आखलेला आहे, त्यामुळे तो आज शाळेत जाणार नाही. " कॉमन चाट " हा शब्द मी पहिल्यांदाच ऐकला आणि मीच चाट पडलो ! सप्टेंबर अखेरपर्यंत नव्या शिक्षणसंस्थांना परवानगी देणारे सरकार विद्यमान आहे आणि देणगी देऊन प्रवेश घेणारे

विद्यार्थीही आहेत. त्यांना माहीत आहे की, परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी वर्गात बसलेच पाहिजे, शिकलेच पाहिजे, असे नाही. महाविद्यालयात शिक्षणाशिवाय बाकी सर्व भानगडी करावयाच्या असतात; शिकण्यासाठी खाजगी शिकवणी वर्गात जायचे असते, ही कल्पना मनात ठसली आहे. नियम खूप कडक आहेत. पण कुणासाठी ? ज्यांना पाळायचे आहेत किंवा ज्यांना पाळण्याशिवाय गत्यंतर नाही त्यांच्यासाठी ! प्रामाणिकपणे, शिक्षणाच्या तळमळीने नवी संस्था काढायची असेल, तर नियमांच्या अडचणींचे डोंगर तुमच्यापुढे उभे आहेत. पण तुमच्याजवळ वेगळी ताकद असेल आणि ज्या ताकदीचा शिक्षणाशी दूरान्वयानेही संबंध नसेल, तर तुम्हाला पाहिजे ती संस्था केव्हाही काढता येईल. नियमांची ऐशीतैशी करूनसुद्धा इतक्या मोठ्या संख्येत एका वर्षात आपल्या राज्यात डी. एड्. कॉलेजे कशी निघालीत, हे मुंबईच्या सचिवालयातील दीर्घिकांमध्ये जाऊन विचारा म्हणजे त्या संस्थेच्या स्थापनेचा ' रेट ' तुम्हाला कळून येईल ! हे सारे सरकारचे पाप आहे, राजीव गांधी ते निस्तारू पाहात आहेत. त्यांना खरेच हे निस्तारावयाचे आहे की आपण एक चर्चेचे दालन मोकळे करून दिले, याचे समाधान उपभोगावयाचे आहे. हे खरे म्हणजे तेच सांगू शकतील. पण काही लोकांना तरी असे वाटते की, त्यांच्या सरकारला खरेच ही परिस्थिती सुधारावयाची आहे आणि म्हणून ते चर्चेत सहभागी होत आहेत आणि खूप चांगल्या सूचनाही करीत आहेत.

मी स्वत: अशा दोन कार्यक्रमांना उपस्थित राहिलो. एक दिनांक ४ ला गडकरी सभागृहात " विचार " या संस्थेने आयोजित केला होता. तो परिसंवासंवादाच्या रूपाचा होता. त्यात काही मौलिक सूचनाही आल्या. पण मौलिकतेपेक्षा आवेशाची आतषबाजी त्या ठिकाणी अधिक होती. दुसरा कार्यक्रम दि. ६ व ७ ला आदर्श विद्या प्रसारक संघाने आयोजित केला होता. ते दोन दिवसांचे चर्चासत्र होते. त्यांनी सुमारे ७० जणांना निमंत्रण देऊन बोलाविले होते. पैकी साठ जण आले होते. प्रत्येकाला सरकारी पुस्तिकेचा सारांश देण्यात आला होता. सत्रात गटवार चर्चा झाली. नंतर गटांच्या चर्चेचे जे निष्कर्ष होते, ते सर्वांसमोर ठेवण्यात येऊन त्यावर चर्चा झाली. या चर्चासत्राच्या उद्‌घाटनाला आणि समारोपाला मी भाषण केले. त्या भाषणांमध्ये मी जे विचार मांडले त्यांचाच येथे संक्षेपाने निर्देश मी करणार आहे. माझ्या उद्‌घाटनाच्या भाषणानंतर त्यातील मुद्यांना धरून, तसेच शासकीय पुस्तिकेतील प्रस्तावही नजरेसमोर ठेवून, गटवार चर्चा झाली. त्या चर्चेचे संकलन, आदर्श विद्या प्रसारक संघाचे पदाधिकारी योग्य ठिकाणी पाठविणार आहेत. पुढेही सरकारी आणि गैरसरकारी स्तरावरही चर्चा चालू राहणार आहे, म्हणूनच मी माझे मुद्दे मांडणार आहे.

(१) पहिला मुद्दा सरकारी नियमांचा. चांगले घडविण्यासाठीच सरकारने नियम केले. पण सारी व्यवस्था आता नियम जरड (rule–rigid) झाली आहे. तेव्हा सरकारने ती मुक्त केली पाहिजे. याचा अर्थ सरकारने या क्षेत्रातून पाय काढता घ्यावयाचा असा नाही. त्यांच्या मातहत चालणाऱ्या शाळा आणि महाविद्यालये राहतीलच. पण कुणालाही कोणतेही विद्यालय काढण्याचा आणि चालविण्याचा अधिकार आणि मोकळीक असली पाहिजे. सरकारला जे आदर्श शुल्क किंवा वेतनमान वाटते, ते त्याने आपल्या संस्थांमध्ये ठेवावे. इतरांना ते ठरविण्याची मोकळीक द्यावी. रामकृष्ण मिशनला निःशुल्क शिकवावयाचे असेल, तर तसे करण्याची त्यांना मोकळीक हवी किंवा एखाद्या संस्थेला २०० रुपये महिना फी आकारावयाची असेल, तर तिला तो आकारू द्यावी. लोक उगाच २०० रुपये फी द्यावयाचे नाहीत. ज्यांना ऐपत आहे, त्यांच्याकडून काही शाळा तर देणगीरूपाने याहीपेक्षा जास्त पैसे वसूल करतात. नुकसान मात्र सरकारचे म्हणजे जनतेचे होते.

(२) हे घडवावयाचे तर सरकारलाच आहे. पण सरकार त्यापासून दूर असले पाहिजे. राष्ट्रीय स्तरावर शिक्षणाचे नियंत्रण आणि मार्गदर्शन करणारे एक स्वायत्त मंडळ असावे आणि त्या मंडळाच्या जिल्हा पातळीपर्यंत शाखा असाव्यात. शिक्षण देणे ही सरकारची जबाबदारी आहेच. म्हणून सरकारने आपले अनुदान या मंडळाला द्यावे. मंडळ गुणवत्तानुरूप संस्थांना अनुदान देईल.

(३) परीक्षांचे संचालनही हे मंडळच करील. आणि परीक्षांना कुणालाही बसता येईल. सर्व विषयांची एकदम परीक्षा घेतली पाहिजे असे नाही.

(४) परीक्षेसाठी विद्यार्थी तयार करण्याची मान्यता जशी संस्थांना राहील तशीच वैयक्तिक शिक्षकांनाही असावी. खाजगी रीत्या चांगले शिक्षण देणारे शिक्षक असतातच. त्यांच्याजवळ शिक्षण घेतलेल्यांना परीक्षेला बसण्याची मान्यता असावी. अशा शिक्षकांची मान्यताप्राप्त शिक्षक म्हणून नोंद असावी.

(५) साक्षरतेच्या प्रसारासाठी राजकीय पक्षांचे सहकार्य घ्यावे. निवडणूक पद्धतीतून उमेदवारांच्या निवडणूक–चिन्हांची भानगड काढून टाकावी. मतपत्रिकेवर त्याचे नाव तेवढे लिहिलेले असावे. मतदाराला उमेदवाराचे नाव वाचण्याइतपत क्षमता असावी. सरकारने आताच जाहीर करावे की, ५ किंवा १० वर्षांनंतर उमेदवाराचे निवडणूक चिन्ह राहणार नाही. सारे राजकीय पक्ष आपल्या मतवरदारांना साक्षर करण्याची मोहीम हाती घेतील. ३८ वर्षांच्या स्वातंत्र्यानंतर आपल्या देशात साक्षरतेचे प्रमाण फक्त ३६ टक्के आहे. या पद्धतीने दहा वर्षांच्या आत ते ७५ टक्क्यांच्या वर जाईल.

(६) शिक्षण (Education) आणि कसब (Training) यात फरक केला पाहिजे. शिक्षणाने व्यक्ती खऱ्या अर्थाने सुसंस्कृत झाली पाहिजे. सभ्य बनली पाहिजे. तिचे मन उदात्त आणि बुद्धी तर्कप्रवण झाली पाहिजे. "शिक्षणाचे आव्हान" या पुस्तिकेत ४/८ या परिच्छेदात जे उद्दिष्ट दिले आहे, ते मान्य करावयास हरकत नाही. शिक्षणाचे तेच उद्दिष्ट असले पाहिजे. पण सर्वसामान्य लोकांना कसबाची, ट्रेनिंगची गरज आहे. ट्रेनिंग उपजीविकेसाठी आवश्यक आहे. शिक्षण उपजीविकेसाठी फारसे उपयोगी नाही. अर्थात् प्रत्येकच प्रकारच्या ट्रेनिंग-मध्ये शिक्षणाचा अंतर्भाव राहीलच. पण ट्रेनिंगचे मुख्य उद्दिष्ट वेगळे राहील, हे हे ध्यानात ठेवले पाहिजे.

(७) सातव्या वर्गाचे शिक्षण सर्वांना साधारणत: समान प्रकारचे राहील. ते मातृभाषेतूनच दिले गेले पाहिजे. ते देण्याचा व घेण्याचा कुणालाही अधिकार असला पाहिजे. या शिक्षणातील पहिल्या चार वर्षांमध्ये मातृभाषा, प्राथमिक स्वरूपाचे गणित आणि सामाजिक नीती हेच तीन विषय असावेत. उर्वरित तीन वर्षांमध्ये हिंदीची जोड देण्यात यावी.

(८) सातवी नंतर एक शाखा शिक्षणाकडे, तर दुसरी शाखा कसबाकडे जाणारी राहील. दुसऱ्या शाखेने कोणती कौशल्ये शिकवावीत हा तपशीलाचा भाग आहे. ही कौशल्ये शिकविणाऱ्या शाळा पुरेशा प्रमाणात निघतील याची काळजी सरकारने घ्यावी. स्वत:च्याही शाळा काढाव्यात. त्यांना कर्जरूपाने शिष्य-वृत्ती द्याव्यात. शिक्षणाकडे वळणारी जी शाखा आहे ती पुढे तीन वर्षांची म्हणजे दहावीपर्यंत राहील. या भागात अभिजात भाषेच्या अध्ययनाची व्यवस्था राहील. विषय अनेक राहतील. पण सर्वच विषयांत उत्तीर्ण होण्याची अट राहणार नाही. निकाल विषयवार राहील. पुढे ज्या विषयात शिक्षण घ्यावयाचे असेल, त्या विषयात विद्यार्थी उत्तीर्ण झाला असेल, तर तो वरच्या वर्गात जाऊ शकेल.

(९) १० वी नंतर काही २ वर्षांचे तर काही ३ वर्षांचे डिप्लोमा (किंवा पदविका) अभ्यासक्रम राहतील. कारकुनी, बँकिंग, इंजीनियरिंगच्या विविध शाखा, कृषिशास्त्राच्या विविध शाखा, पशुवैद्यक, सामान्य वैद्यक, प्रशासन, शिक्ष-कांचे प्रशिक्षण – असे किती तरी पदविका अभ्यासक्रम सुचविता येतील, जे सारे नोकरीसाठी किंवा उपजीविकेसाठी उपयुक्त राहतील. प्राथमिक शाळेतील शिक्षक, तहसिलदार किंवा बीडीओच्या दर्जाचे महसूल–प्रशासनिक अधिकारी, मेंटेनन्स इंजीनियर, सुपरवायझर, ओव्हरसीयर, ड्राफ्ट्समन, इलेक्ट्रिशियन, कॉम्प्यूटर ऑपरेटर, बँकेतील वा अन्य कार्यालयातील कारकून, हिशेबनीस – आदि विविध प्रकारच्या नोकऱ्यांमध्ये पदविका अभ्यासक्रम पूर्ण केलेले विद्यार्थीच प्रवेश करू शकतील. पदवीधरांना ही क्षेत्रे वर्जित राहतील. या क्षेत्रासाठीही कर्जाऊ शिष्य-

वृत्त्या द्याव्यात. यापैकी जे स्वतंत्र व्यवसाय करतील त्यांना राष्ट्रीयीकृत बँकांनी अग्रक्रमाने पतपुरवठा करावा. पदविकेचा अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर अधिक ज्ञानाची ज्याला जिज्ञासा आहे, त्याला पदवीच्या अभ्यासाकडे जाण्याला अनुमती असावी. केवळ अनुमतीच नव्हे तर पुरेशी व्यवस्थाही. आजच्या कनिष्ठ महाविद्यालयांचे रूपांतर अशा पदविका विद्यालयांमध्ये सहज करता येईल. पदवीचा नोकरीशी संबंध तोडावयाचा असेल, तर ही योजना प्रामाणिकपणे राबवावी.

हे उघडच आहे की, ही सर्व ट्रेनिंगची योजना आहे. पण या योजनेतही सामाजिक नीतिमत्तेच्या मूलतत्त्वांच्या (fundamentals of social ethics) शिक्षणाची व्यवस्था असावी. या शिक्षणाच्या परीक्षेची एक वेगळी पद्धती हवी.

ज्यांना हे उपजीविकेसाठी ट्रेनिंग नको असेल, ज्यांना उच्च ज्ञानाची पिपासा लागलेली आहे, ते ज्ञान मिळवून नवे संशोधन आदि करण्याची ज्यांची प्रवृत्ती आहे, ते १० वी नंतर पाच वर्षांच्या पदवी अभ्यासक्रमासाठी जातील. यात प्रवेश घेणाऱ्यांची, प्रवेशापूर्वी कसून परीक्षा घेतली जाईल. गुणवंतांनाच फक्त शिष्यवृत्ती मिळेल. त्यांचा अभ्यासक्रम पुरेसा व्यापक आणि सखोल राहील, त्यांना अनिवार्य उपस्थितीची अट राहणार नाही. त्यांचे शुल्क विषयवार राहील. महाविद्यालयाबाहेर असणाऱ्या विद्वान पुरुषांजवळ शिकण्याची सोय त्यांना उपलब्ध असावी. या मंडळींना आणि त्यांच्या शिक्षकांना सुटचा कमी राहतील. ते सतत ज्ञानोपासनेत गढलेले राहतील.

शिक्षकांच्या संख्येची समस्या सोडविण्यासाठी, वरच्या, विशेषत: पदव्युत्तर वर्गातील आणि संशोधनकार्य करणारे विद्यार्थी, खालच्या वर्गांना शिकवितील. शिकविण्याने शिकलेले ज्ञान पक्के होते, हे जाणकारांना वेगळे सांगण्याची गरज नाही. यामुळे वर्गातील विद्यार्थ्यांची संख्याही कमी राहू शकेल.

शिक्षकाचा व्यवसाय पवित्र आहे. जेथे वेतनमानावर त्यांची नियुक्ती होते, तेथे त्यांना चांगले वेतन असावे. पण ते किती असावे, हे सरकारने ठरविण्याची गरज नाही. १० वी नंतर दोन वर्षांचा प्रशिक्षणाचा पदविका अभ्यासक्रम पूर्ण केलेल्याला प्राथमिक शिक्षणाच्या पहिल्या चार वर्षांकरिता शिक्षक म्हणून पात्र समजण्यात यावे. या चार वर्षांकरिता शक्यतोवर शिक्षिकांचीच निवड करावी. ज्याने दहावीनंतर तीन वर्षांचा प्रशिक्षण पदविका अभ्यासक्रम पूर्ण केला आहे, त्याला ५ ते ७ या वर्गांकरिता पात्रताप्राप्त शिक्षक समजण्यात यावे. ८ ते १० या वर्गांकरिता मात्र पदवीधारक शिक्षकालाच योग्य समजण्यात यावे. म्हणजे ज्ञानसंपन्न व्यक्ती या कामाला उपलब्ध होतील. त्यांच्याकरिता सेवांतर्गत प्रशिक्षणाची व्यवस्था असावी.

सर्वच शिक्षकांकरिता मोकळे वातावरण असू द्यावे. त्यांचा शिकवणीचा अवधी प्रतिदिन कमीतकमी पाच तासांचा असावा. तास म्हणजे साठ मिनिटांचा तास. याशिवाय त्यांना खाजगी शिकवणीही करू द्यावी.

शैक्षणिक योजनेचे आणि परीक्षेचे युनिट जिल्हा असावे. स्वायत्त शिक्षण मंडळ हे युनिट तयार करील. त्यात सरकारचेही प्रतिनिधी राहतील. पण सरकारचे त्यावर नियंत्रण राहणार नाही. आपल्या जिल्ह्यातील शिक्षणाचा दर्जा इतरांसारखा राहील, याची ते युनिट काळजी घेईल. दर्जा समान असावा. पुस्तके एकरूप असण्याचे कारण नाही. विषयही आपल्या आवश्यकतेप्रमाणे अनिवार्य व ऐच्छिक ठेवता येतील.

या आणि अशा काही सूचना मी आपल्या भाषणात केल्या. केंद्रात जनता पक्षाचे सरकार असताना त्यावेळचे शिक्षण मंत्री श्री. प्रतापचंद्र चंदर यांचेकडे, अगोदर त्यांचेशी बोलून, यासंबंधी एक आराखडा मी पाठविला होता. पण त्याचे पुढे काहीच झाले नाही. नवे सरकार, काही तरी नवे करण्यासाठी उत्सुक आहे, शिक्षणक्षेत्रातील खेळखंडोबा थांबविण्याची त्याची प्रामाणिक इच्छा आहे, असे जाणवल्यामुळे त्याच्या विचारासाठी हे सादर केले आहे. एका लेखाच्या मर्यादेत, सर्वच मुद्यांचे तपशीलवार वर्णन शक्य नाही. त्यासंबंधी असलेल्या शंकाचे आणि प्रश्नांचे समाधान चर्चेतूनच होईल. अशी चर्चा करावयास माझी तयारी आहे.

१३–१०–८५

## यज्ञ आणि यज्ञचक्र

'यज्ञ' शब्द फार प्राचीन आहे आणि आज यज्ञप्रक्रिया आणि राजसूयासारखे विशाल यज्ञ कोणी करीत नसले, तरी यज्ञीय भाषा आणि प्रतिमा आम्हा भारतीयांच्या जीवनात खोलवर ठसा उमटवून आहेत. त्याचे 'बलिदान' झाले, असे आपण जेव्हा म्हणतो, तेव्हा यज्ञीय भाषेचाच आपण प्रयोग करीत असतो. त्याने 'आहुती' दिली, तो सर्वांचा 'अध्वर्यू' आहे.–अशा वाक्यप्रयोगातील 'आहुती', 'अध्वर्यू' हे शब्द यज्ञीय प्रक्रियेतील आहेत. गृहस्थाला 'यजमान' असा पर्याय आपल्या भाषेत रूढ आहे. 'यजमान' याचा अर्थ यज्ञ करणारा असा आहे. 'सहकार स्वाहाकार बनला,' यातही यज्ञीय प्रतिमाच अध्याहृत आहे. सांगायचे तात्पर्य असे की, यज्ञ संस्था लुप्त व्हायला आली असली तरी यज्ञीय प्रतिमा आपल्या व्यवहारात या ना त्या प्रकाराने जिवंत आहेत.

'यज्ञ' किती प्राचीन आहे, हे कदाचित् कोणीच सांगू शकणार नाही. एवढे मात्र नक्की की, वेदांच्या संहिता तयार होण्याच्या पूर्वीपासून तो आहे. वेदमंत्राच्या संहिता यज्ञप्रक्रिया समोर ठेवून तयार केल्या आहेत, असा एक पक्ष आहे. तो चूक की बरोबर हा वाद बाजूला ठेवला, तरी संहितीकरणाच्या काळाच्या अगोदरपासून यज्ञ प्रचलित होते, हे सहज मान्य होण्यासारखे आहे. सायनाचार्यादी भारतीय भाष्यकारांनी 'यज्ञ' समोर ठेवूनच मंत्रांचा अर्थ लावलेला आहे, हे सर्वश्रुतच आहे. यज्ञात पशुहिंसा होत होती, याविषयीही वाद नाही. 'क्रत्वन्तर्वर्तिनी हिंसा न अधर्मसाधनम्'—म्हणजे यज्ञान्तर्गत हिंसा हे अधर्माचे साधन नव्हे, हे वचन त्या हिंसेचे समर्थन करणारे आहे. ते आपणांस मान्य असो की नसो, यज्ञात हिंसा होती हे खरे आहे. यूपबंधन, आप्रीकरण, विशसन या यज्ञीय क्रिया बळीच्या वधाचाच संकेत देतात. प्रत्येकच यज्ञात पशुहिंसा होत होती असे मात्र नव्हे. पण पशुहिंसा वर्ज्य नव्हती. पुढे ज्ञानकांडाचा प्रभाव वाढून कर्मकाण्ड गौण ठरले आणि पशुहिंसा त्याज्य वाटू लागली. भगवान बुद्धाने पशुहिंसेवरूनच यज्ञावर टीका केली.

पशुहिंसा वर्ज्य झाली, तरी यज्ञ हे नाव कायम राहिले. वाजपेय, अग्निष्टोम, राजसूय, सोम—यासारख्या श्रौत विधींचा विनियोग असलेल्या समारंभांना यज्ञ हे अभिधान प्रारंभापासूनच लागू होते. पण भगवद्गीतेच्या काळी ज्ञानयज्ञ, स्वाध्याययज्ञ, द्रव्ययज्ञ, तपोयज्ञ, योगयज्ञ, अशा प्रकारचे शब्दप्रयोग रूढ झाले होते. ज्ञानयज्ञात किंवा स्वाध्याययज्ञात किंवा तपोयज्ञात हिंसेचा संबंध असणेच शक्य नाही. याचा अर्थ असा की हिंसा हे यज्ञाचे व्यवच्छेदक लक्षण उरले नाही. हिंसा नसतानाही, एखाद्या विशिष्ट विधीला 'यज्ञ' ज्याअर्थी म्हणत, त्याअर्थी हिंसेव्यतिरिक्त यज्ञाची उपयुक्तता आणि श्रेष्ठता लोकमानसात बिंबलेली असली पाहिजे. आणि या विधींना 'यज्ञ' म्हणणे शक्य होण्यासाठी 'यज्ञा'शी त्यांचे साम्य असले पाहिजे. भारतीय विचारांच्या आणि कल्पनांच्या विकासाचा इतिहास व प्रक्रिया ध्यानात घेतली, तर आपणास असे आढळून येईल की, संज्ञा किंवा नाव बदलविण्याचा येथे आग्रह नाही. नाव बदलविण्यापेक्षा आशयात परिवर्तन करण्याची प्रवृत्ती आहे. स्मशानात वास करणारा दिगंबर रुद्र (=भीषण) याच प्रवृत्तीने शिव (=पवित्र) आणि शंकर (=कल्याणकारी) बनला. याच रीतीने रौद्ररूपिणी काली जगज्जननी झाली. या प्रवृत्तीचा एक फायदा असतो, तो हा की नवी वाटचाल करतानाही प्राचीनाशी आपला सांधा जुळलेला राहतो. संस्कृतीचे सातत्य या रीतीने टिकून राहते. जुने आहे तसेच धरून ठेवले तर कालांतराने जुनाटपणा येतो, आणि ते मग निष्प्राण बनणे अपरिहार्य असते. परंतु, जुन्याशी संबंध ठेवूनही नव्या वाटा

चोखाळण्यात प्राचीनत्वाशी संबंध राहून गतिशीलताही येते. भारताच्या या विकासपरंपरेची ज्याने ओळख करून घेतली नाही, त्याला त्याच्या सांस्कृतिक इतिहासाचे नीट आकलन होणे जड जाते. या परंपरेप्रमाणे 'यज्ञ' हा शब्द कायम राहिला; पण त्याचा आशय अधिक व्यापक बनत गेला. या व्यापकतेतून, स्वाध्याययज्ञ, ज्ञानयज्ञ, तपोयज्ञ इत्यादी यज्ञप्रकार तयार झाले.

'यज्ञ' या शब्दाचा स्वीकार व्हावा यासाठी 'यज्ञ' या शब्दाच्या आशयात कोणती समाजकल्याणाकरक अथवा व्यक्तिकल्याणकारक अंगे आहेत? मला वाटते अशी दोन अंगे आहेत. पहिले हे की, हे समुच्चयात्मक कर्म आहे. यज्ञ एकट्याने होत नाही, एकट्याकरिताही होत नाही. प्राचीन श्रौत यज्ञात संपूर्ण समाजच कोणत्या ना कोणत्या प्रकारे गुंतला जाई. यज्ञविधी इतके किचकट असत आणि ते इतके प्रदीर्घ काळ चालत की, अनेकांचे त्यात सहकार्य असल्याशिवाय यज्ञ संपन्नच होऊ शकत नसे. ब्राह्मणांनी आपले वर्चस्व स्थापन करण्याकरिता यज्ञ शोधून काढले, असे म्हणणे हा बालिशपणा आहे. तसे असते तर क्षत्रियांमध्ये यज्ञ करण्याची अहमहमिका लागली नसती. मूर्ख क्षत्रियांच्या गळ्यात ब्राह्मणांनी चलाखीने यज्ञाचे लोढणे अडकविले होते, असे म्हणावे, तर अनेक यज्ञांत ब्राह्मणच यजमान असत. तेव्हा यज्ञसंस्थेचा अशा दूषित दृष्टीतून विचार करणे योग्य नाही. समूहाला आकर्षित करणारी आणि त्याच्या कल्याणाची ती संस्था होती. म्हणून ती टिकली आणि तिचे रूप बदलले तरी ते अभिधान आपल्या सांस्कृतिक जीवनात रूढ झाले. 'यज्ञा'च्या आशयातला दुसरा भाग 'ममत्वाचा अभाव' हा आहे. 'अग्नये इदं न मम', 'सोमाय इदं न मम'— म्हणजे ही आहुती अग्नीला अर्पण आहे, यात माझे काही नाही. ही आहुती सोमाला अर्पण आहे, यात माझे काही नाही—या मंत्रात 'माझे काही नाही' हे महत्त्वाचे आहे. अग्नि आणि सोम यांचे ऐवजी 'समाज' शब्द घातला तर आपण अगदी समाजवादी बनून जाऊ! मनुष्याला स्वार्थ शिकवावा लागत नाही. दुसऱ्याकरिता समर्पण शिकवावे लागते. 'समूहाकरिता समर्पण म्हणजे यज्ञ'— हा यज्ञाचा अर्थ हळूहळू रूढ झाला. म्हणून श्रीमदभगवद्गीतेत म्हटले आहे— "सहयज्ञाः प्रजाः सृष्ट्वा पुरोवाच प्रजापतिः। अनेन प्रसविष्यध्वमेष वोऽस्त्विष्टकामधुक्" ।। याचा अर्थ असा की ब्रह्मदेवाने यज्ञासह प्रजा उत्पन्न केली आणि तो त्यांना म्हणाला की, या यज्ञाच्या योगाने तुम्ही वृद्धी पावा. हा तुमची इच्छा पूर्ण करील." मानवसृष्टीबरोबरच यज्ञ आला. मानवांना मानवांचा समाज म्हणून जगावयाचे असेल, तर यज्ञभावनेने त्याने जगले पाहिजे. म्हणजे प्रत्येकाच्या जीवनात असा काही भाग असला पाहिजे, की ज्याचे फळ स्वतःकरिता न ठेवता तो समाजाला द्यावयाला तयार आहे ही समाजशरणता म्हणजे

यज्ञ. हे माझे नाही, समाजाचे आहे, अशा भावनेने आणि वृत्तीने जगणे म्हणजे यज्ञ. अशा भावनेने कोणतेही काम करणे म्हजे यज्ञ. स्वाध्याय केवळ माझ्याकरिता नाही, समाजाकरिता आहे, असे समजून केलेला स्वाध्याय हा स्वाध्याययज्ञ. हे द्रव्य माझे नाही, समाजाचे आहे असे समजून केलेला द्रव्याचा विनियोग हा द्रव्ययज्ञ. या यज्ञाने संतुष्ट झालेले 'देव' तुम्हाला हवे ते देतील, असे भगवद्गीतेचे सांगणे आहे. असा यज्ञ केल्यानंतर उरलेले जे खातात किंवा उपभोगितात, त्यांना पाप लागत नाही, असे गीतेचे आश्वासन आहे. आणि जे असे इतरांना न देता सर्व स्वत:च्या भोगासाठी ठेवतात ते चोर आहेत असा गीतेचा फटकारा आहे. 'भुञ्जते ते त्वघं पापा ये पचन्त्यात्मकारणात्'–म्हणजे, "जे स्वत:करिता फक्त अन्न शिजवितात, ते अन्न भक्षण करीत नाहीत, पाप भक्षण करतात," असा गीतेचा इशारा आहे. 'नार्यमणं पुष्यति नो सखायं केवलाघो भवति केवलादी' जो अर्यमा किंवा सखा याचे पोषण करीत नाही, एकटाच भोजन करतो, तो केवळ पापी समजावा, असे ऋग्वेदाच्या १० व्या मंडलात म्हटले आहे. हा जो यज्ञ आहे, तो अग्नीत तीळ, तांदूळ किंवा तूप टाकणारा अथवा धुराने घर भरून टाकणारा नव्हे, हे उघड आहे.

समूहार्थ समर्पणभावाचा हा यज्ञ एकट्यादुकट्या व्यक्तीपुरता मर्यादित असू नये असे आपल्या धर्माचे सांगणे आहे. म्हणून त्यांनी या प्रक्रियेला 'यज्ञचक्र' म्हटले आहे. चक्रात साखळीसारखी परस्परसंबद्धता आहे, तशीच गतीही आहे. चक्र कसे चालते, याचे एक उदाहरण देतो. समजा रस्त्यावर अपघात होऊन आपण पडलो आहोत, कुणी तरी आपल्याला उचलतो, डॉक्टरकडे घेऊन जातो, उपचार करवितो आणि समाधानाने निघून जातो. त्याने यात जो वेळ आणि शक्ती खर्च केली व शेवटी समाधानाचा अनुभव घेतला, हा यज्ञच होय. कारण, या 'खर्चातून' काही फायदा व्हावा, अशी त्याची भावना नाही. 'न मम'चा हा आविष्कार आहे. या व्यक्तीचे अपघातग्रस्ताने आभार मानले तर ती कृतज्ञताबुद्धी झाली. पण ते यज्ञचक्राचे प्रवर्तन नव्हे. त्या व्यक्तीने, ज्याप्रमाणे काहीही संबंध नसताना संकटात सापडलेल्यांसाठी कष्ट घेतले, तसे संकटग्रस्तानेही दुसऱ्या कोणत्या तरी संकटग्रस्तांसाठी कष्ट घेणे–जसे संकट एकावर आले, तसेच दुसऱ्यावर येईल, असे नाही, तर जसे आणि जे संकट येईल, त्यावेळी संकटग्रस्तासाठी धावून जाणे–हे यज्ञचक्रप्रवर्तन आहे. ही प्रवृत्ती समाजातील प्रत्येक व्यक्तीच्या अंगी बाणली पाहिजे, तो त्याचा स्वभाव झाला पाहिजे, असे आपल्या धर्माचे सांगणे आहे. म्हणून भगवद्गीता म्हणते 'एवं प्रवर्तितं चक्रं नानुवर्तयतीह य: अघायुरिन्द्रियारामो मोघं पार्थ स जीवति" –याप्रमाणे जगाच्या धारणार्थ सुरू झालेले चक्र जो पुढे चालवीत नाही, त्याचे आयुष्य पापरूप असून त्या इंद्रियलंपटाचे जिणे व्यर्थ होय.

आजही स्मृत्युक्त यज्ञ कोठेकोठे होतात. आर्यसमाजी लोकही यज्ञ करतात. पण ते नुसते एक कर्मकांड ठरू नये, असे वाटत असेल, तर त्याची समुच्चयात्मकता, संपूर्ण समाजाच्या कल्याणार्थ त्याचे प्रयोजन आणि त्या प्रयोजनात नि:स्वार्थतेने सहभागी होण्यासाठी व्यक्तीची प्रवृत्ती आणि प्रेरणा या यज्ञाच्या वैशिष्टयांचे विस्मरण किंवा त्यांची उपेक्षा होता कामा नये.

१७-७-७७

## लेखक आणि समाजपरिवर्तन

दिल्ली येथे दिनांक २६ मार्चपासून सुरू झालेले सहा दिवसांचे लेखक शिबिर नुकतेच समाप्त झाले. हे शिबिर भारत सरकारतर्फे आयोजित करण्यात आले होते. म्हणजे ते शासनपुरस्कृत होते. या शिबिराचे उद्घाटन अर्थमंत्री श्री. यशवंतराव चव्हाण यांनी केले. अलिकडे जी सर्व क्षेत्रांत बांधीलपणाची (Committedness) लागण लागली आहे, तिच्यापासून हे शिबिरही अलिप्त नव्हते. ते अलिप्त राहू नये, अशीच सरकारची इच्छा होती आणि श्री. चव्हाण यांच्या उद्घाटनाच्या भाषणातून ती प्रकटही झाली. ते म्हणाले, "समाजातील अग्रगण्य बुद्धिवादी आणि विचारवंत म्हणून लेखकांवर एक विशेष जबाबदारी आहे. त्यांनी अन्याय्य आणि पक्षपाती परंपरांच्या जुन्या बुरुजांवर हल्ले चढविले पाहिजेत; नव्या, उदार कल्पनांचे स्वागत करणारे वातावरण समाजात निर्माण केले पाहिजे. आणि न्याय व करुणा यांच्या आधारावर समाजाची रचना होण्याच्या क्रियेला सर्वसामान्यपणे चालना दिली पाहिजे." पुढे म्हणाले, "सृजनशील लेखक विद्यमान सामाजिक व आर्थिक संदर्भापासून पूर्णत: दूर राहूच शकत नाही. सामान्य माणसाच्या जीवनाच्या चित्रणातूनच, लेखक परिवर्तन घडवून आणतील आणि नव्या सामाजिक व आर्थिक संस्थांच्या विकासाला पोषक असा प्रभाव पाडतील."

श्री. चव्हाण यांच्या वरील प्रतिपादनात तसे आक्षेपार्ह काहीही नाही. कोणताही लेखक सभोवतालच्या परिस्थितीकडे कानाडोळा करू शकत नाही, हे खरे आहे. परंतु त्या परिस्थितीने अभिभूत होऊन तो तीतच रमू लागला, तर तो चांगला लेखकही होणार नाही आणि त्याच्या लेखनाने त्याला अभीष्ट असलेले परिवर्तनही घडून यावयाचे नाही. खरे लेखक, त्यांच्या सभोवती जी परिस्थिती

आणि वातावरण आहे त्यांचीच तेवढी दखल घेऊन थांबत नाहीत. परंतु जे आज नाही, पण असावयाला हवे, असे त्यांना वाटते, तेही त्यांच्या नजरेत असते. विद्यमान परिस्थितीची कलात्मक चिकित्सा होत असताना, कलात्मक आदर्शवाद प्रत्येक चांगल्या कलाकृतीत असतो. हे केवळ कोरे, वास्तवतेशी संबंध नसलेले आदर्शवादी साहित्य नसते. तसे ते केवळ वास्तववादीही नसते. एखाद्या सुंदर फुलझाडाची मुळे जमिनीत गेलेली असतात व त्यातून ते जीवनरस घेत असते, त्याप्रमाणे खरे जिवंत साहित्य वास्तव जीवनातून रस घेत असते. परंतु मुळे जमिनीत असली म्हणून रसिकांना मोहविणाऱ्या सुगंधाची पखरण करणारी फुले काही जमिनीत लागत नाहीत. ती वर आकाशात असतात. वास्तववाद आणि आदर्शवाद यांचेही असेच आहे. आदर्शात जिवंतपणा असेल, तर त्याचा वास्तवाशी संबंध असणे अपरिहार्य आहे. पण साहित्यिकाने आपल्या समोर कोणता आदर्श ठेवावा, हे शासनाने सांगण्याची आवश्यकता नाही आणि शासनाने सांगितले तरी ते साहित्यिकांनी मानण्याचेही कारण नाही. अर्थात् शासनाच्या धोरणांची जे साहित्यिक री ओढणार नाहीत, ते शासनाच्या दृष्टीने प्रतिगामी ठरतील. ते उपक्षिलेही जातील. कारण, शासनाला, त्याने उराशी कवटाळलेल्या कल्पनांचा उदोउदो करणारे साहित्यिक हवे असतात. नेहमीच्या आपल्या निष्ठाबद्ध अनुयायांकडून होणाऱ्या प्रशंसेपेक्षा बुद्धिवंतांकडून, लेखकांकडून असा उदोउदो झाला, तर शासनाधिकाऱ्यांच्या बौद्धिक अहंकाराला संतोष लाभतो. पण जगाचा इतिहास असा आहे की, शासनाने फेकलेल्या तुकड्यावर संतोष मानून लाचारी पत्करणारे जसे लेखक निघाले आहेत, तसे त्यांची पर्वा न करणारेही निघाले आहेत. शासन स्वत:ला पुरोगामी मानणारे असले म्हणजे त्याला खुषमस्कऱ्या साहित्यिकांची गरज नसते असे नाही. सरंजामशहाइतकेच तथाकथित पुरोगामी शासनही स्वीकारलेल्या चाकोरीहून वेगळी चाकोरी चालणाऱ्याचा छळ करावयाला कमी करीत नाही.

रशियाला कोण "प्रतिगामी" देश म्हणेल? 'प्रतिगामी' ही शिवी देण्याचा कोणाचा अधिकार असेल तर तो रशियाचा असे मानणारेही जगात काही कमी सापडावयाचे नाहीत. काहींची तर ती स्वर्गभूमी आहे. पण तेथे "डॉ. झिवॅगो" या कादंबरीच्या लेखकाची काय अवस्था झाली! स्टॅलिनची हुमकूशाही अत्यंत निर्दय व विचारस्वातंत्र्याचा गळा दाबणारी होती, असा स्टॅलिनच्या मृत्यूनंतर अधिकारावर आलेल्या ज्या सत्ताधीशांनी डांगोरा पिटला त्यांच्याच कारकीर्दीत बोरिस पास्टरनाकच्या वाटयाला डुकराचे जिणे आले. कारण एकच कीं, त्या लेखकाने सरकारी आदर्शाला आपला आदर्श मानला नाही. जे रशियात घडले, ते इतरत्रही घडू शकते, कारण जेथे सरकारला विचारांचे मोकळेपण नको

असते, बांधीलपणा हवा असतो; सृजनशीलता नसली तरी चालते, प्रचार हवा असतो, तेथे खऱ्या साहित्यिकांच्या वाट्याला अवहेलना न आली तरच नवल! जे साहित्यिक सरकारी म्हणा अथवा दुसऱ्या कोणत्याही म्हणा, प्रचाराला बांधलेले असतील, त्यांच्या सृजनशीलतेवर आपोआपच बंधने येणार. उत्तम साहित्यातूनही प्रचार होतो, नाही असे नाही. पण त्याची जातकुळी वेगळी असते. ते माणसाचे मन उदात्त करते आणि मनाच्या त्या उदात्तीकरणातून ते त्याला परिवर्तित करते. श्री. चव्हाण यांनी म्हटल्याप्रमाणे त्याला वास्तवतेची जाणीव अवश्य राहते, पण ज्या भूमिकेवरून साहित्यिक वास्तवतेची दखल घेतो, ती अगदी वेगळी असते. सरकारी अधिकाऱ्याची भूमिका आणि त्यांची भूमिका एक राहणे कधीच शक्य नाही. श्री. चव्हाण यांनी आपल्या भाषणाच्या प्रारंभी असे विधान केले की, "मी आपणाशी वाङ्मयीन कल्पना आणि आदर्श याच्या भूमिकेवरून बोलणार नाही; तर अगदी वास्तवतेच्या भूमिकेवरून बोलणार आहे. हीच भूमिका कायम आपणा सर्वांना आज तात्काळ काळजी करण्यासारखी आहे." (Today I porpose to speak to you not on a literary plane of ideas and ideals, but on a more earthly plane and hence of more intimate concen to us.) पण परिस्थिती काळजी करण्यासारखी असली, तरी त्या परिस्थितीत शासक जी भूमिका घेतील, ती साहित्यिक कधीच घेऊ शकणार नाहीत. साहित्यिकांच्या आणि शासनाच्या सभोवतीची वस्तुस्थिती तीच असली, तरी साहित्यिकांची तिच्याकडे पाहण्याची दृष्टी वेगळी राहील. कदाचित्, सरकारला आपल्या दृष्टीचेच साहित्यिक हवे असतील आणि ते त्या शिबिरात मोठ्या संख्येने जमलेही असतील. पण सर्व साहित्यिकांची तशी दृष्टी असणे शक्य नाही. म्हणूनच जवळ जवळ ६० साहित्यिक आणि कलावंत यांनी दिल्लीच्या या सरकार–पुरस्कृत शिबिरावर बहिष्कार टाकला. हे सरकार–पुरस्कृत शिबिर म्हणजे साहित्यिकांच्या क्षेत्रात राजकारण्यांचा आणि नोकरशाहीचा हस्तक्षेप होय, असा त्यांनी आरोप केला. त्यांनी आपल्या विचारविनिमयाच्या अंती जे निवेदन तयार केले, त्यात सरकारने बुद्धिवंत आणि शासन यांच्यात खरा संवाद होण्याची स्थिती उत्पन्न करण्यासाठी पावले उचलावीत, असे आवाहन केले; पण गेल्या दोन दशकांपासून, शासनाभिमुख, ठराविक बुद्धिमंतच साहित्यिकांच्या निरनिराळ्या समित्या व सांस्कृतिक मंडळे यावर प्रभाव गाजवीत आहेत, अशी आपली व्यथाही व्यक्त केली; आणि आपल्या मनोदेवतेशी प्रामाणिक राहण्यासाठी ते सारे या सरकारी शिबिरापासून दूर राहिले.

परंतु, जे त्या शिबिरात सामील झाले होते, त्यांच्यापैकी सर्वांनीच सरकारी धोरणांना बांधून घेतले असे दिसत नाही. या शिबिरात भाषण करताना तामीळ

कवी आणि लेखक श्री. सुब्रमण्यम म्हणाले, "लेखकाला परिवर्तनाचे साधन बनविणे म्हणजे त्याचे मौलिक स्वातंत्र्य आणि विवेचक चैतन्यच हिरावून नेणे होय." ते पुढे म्हणाले, "अनेकदा लेखकाला भीती वाटते की, त्यांचे लेखन लोकांना आणि विशेषत: सरकारी अधिकाऱ्यांना आवडणार नाही. म्हणून तो कलावंत स्वत:ची सर्व शक्तीही प्रकट करीत नाही."

डॉ. जसवीरसिंग अहलुवालिया हे पंजाबी कवि म्हणाले, "परिवर्तनाच्या प्रक्रियेत लेखकाचा उपयोग फक्त त्याच्या वाचकांच्या भावनेच्या स्तरावरच होऊ शकतो. तो त्यांच्या प्रतिसादावर परिणाम करू शकतो. विद्यमान समस्यांच्या संबंधातील त्यांच्या जाणिवांना अधिक उत्तेजित करू शकतो. पण त्यानेही आपले वाङ्मय हे राजकारणाचे हस्तक होऊ देऊ नये. परिवर्तनाचा पुरस्कार करणारे वाङ्मय परिवर्तनाच्या कार्यक्रमांचा पुरस्कार करणारे बनू नये."

वरील विवेचनावरून हे लक्षात येते की, या शिबिरावर बहिष्कार घालणाऱ्या किंवा शिबिरात भाग घेणाऱ्या लेखकांच्या मनात साहित्याच्या प्रयोजनासंबंधी मतभेद नाहीत. साहित्याचे हे प्रयोजन सरकारला मान्य आहे काय ? लोकशाही सरकारला ते मान्य झाले पाहिजे. आम्ही म्हणतो तेच इष्ट परिवर्तन आणि आम्ही सांगतो तो कार्यक्रम, हीच त्या परिवर्तनाची प्रक्रिया मान्य करून साहित्यिकांनी लिहिले पाहिजे आणि जे असे लिहितील, तेवढेच सरकारी कृपेचे पात्र ठरतील, ही सरकारची धारणा असेल, तर ती हुकूमशाही प्रवृत्ती झाली. खरा साहित्यिक हालअपेष्टा पत्करील; पण खुषमस्कऱ्या बनणार नाही. म्हणून बांधीलपणाच्या या दावणीतून सरकारने साहित्यिकांना आणि लेखकांना मोकळे सोडलेलेच बरे.

२-४-७२

## चंद्र कवेत आला !

स्वर्गातून देवता भूमीवर उतराव्यात, तसे तीन चंद्रयाना-यात्री चंद्राची परिक्रमा पूर्ण करून पृथ्वीतलावर अवतीर्ण झाले. मानवाने विज्ञानाच्या क्षेत्रात जे अनेक चमत्कार आणि पराक्रम गाजविले, त्यातील हा सर्वात अद्भूत आणि अलौकिक चमत्कार आणि पराक्रम समजला पाहिजे. आकाशातील चंद्र आता मानवाच्या कवेत आला आहे. शास्त्रज्ञ लोक चंद्राला पृथ्वीचा उपग्रह समजतात. चंद्राचा पृथ्वीशी असलेला हा शास्त्रीय संबंध मानवाने अनुभवाच्या टप्प्यात आणलेला आहे. आकाशाशी धरणीमातेचे नाते जोडण्याचा क्षण आता समीप

आला आहे. ते नाते आता कविकल्पना राहणार नाही; प्रत्यक्षात उतरणारी ती वस्तुस्थिती बनणार आहे. ॲपोलो–८ या चंद्रयानानंतर दोन–तीन प्रयोगान्ती सुमारे ५–६ महिन्यांनी ॲपोलो–१० किंवा ११ मानवाला घेऊन चंद्रपृष्ठावर पदक्षेप करील अशी शक्यता निर्माण झाली आहे. ज्या वेळापत्रकाप्रमाणे ॲपोलो–८ ने पृथ्वीच्या वातावरणाचा भेद केला, चंद्राच्या गुरुत्वाकर्षण–कक्षेत परिक्रमा केल्या आणि त्या गुरुत्वाकर्षणाला भेदून आणि पृथ्वीच्या कक्षेत येऊन ठरलेल्या वेळी ते पॅसिफिक महासागरात उतरले, त्या वेळापत्रकाचा बिनचूकपणा साधण्यातील यश लक्षात घेता, येत्या मे किंवा जून महिन्यात मानव चंद्रावर उतरणार, याविषयीचा विश्वास बळावला आहे. हे अद्‌भुत धाडस करून एका नव्या युगाचा प्रारंभ करणारे तीन अंतराळवीर फ्रँक बोरमन्, जेम्स लॉवेल आणि विल्यम्स अँडर्स यांच्याकडे सारे जग सानंद अभिमानाने पाहत आहे; त्यांचे अभिनंदन करीत आहे. त्यांच्या या अभिनंदन–गौरवात कोण सामील होणार नाही ?

या तिन्ही चंद्रयानयात्रींनी, यापूर्वी कोणत्याही मानवाने पाहिले नाही इतक्या जवळून चंद्राचे निरीक्षण केले. पण चंद्र प्रत्येकाला वेगळाच भासला. एकाला तो नसलेपणाचा निवारक विस्तार वाटला, तर दुसऱ्याला अंतराळाच्या वाळवंटातील ती हरितभूमी वाटली, तर तिसऱ्याला देवीच्या व्रणांनी खडबडीत बनलेल्या माणसाच्या चेहऱ्याप्रमाणे त्याचा पृष्ठभाग वाटला. पण त्यांचे चंद्रदर्शन एवढ्यावरच थांबले नाही. अँडर्सला एकदा तो मानवांची पदचिन्हे धारण करणाऱ्या समुद्रकिनाऱ्यावरील मळकट वाळूसारखा वाटला, तर लॉवेलला, आपल्या भाराखाली काहीतरी दडपून ठेवण्याच्या प्रयत्नात, तेथील पर्वताने उडविलेल्या शुभ्र धुळीच्या लोटांचा समुच्चय त्यावर दिसला. हे चंद्रयान जेव्हा अधिक जवळ गेले, तेव्हा लॉवेलला त्या चंद्रलोकीच्या पर्वतातून किरण फुटत असलेले दिसले. लॉवेलची दुर्बिण आपल्या हातात घेऊन अँडर्स पाहू लागला तेव्हा त्याला चंद्रावर पृथ्वीवरून येणारा प्रकाश दिसला. चंद्रयानयात्रींच्या दर्शनानुभवातील ही विविधता पाहून चंद्रावरील कलंकासंबंधी कल्पना करणाऱ्या एका संस्कृत वचनाची अभावितपणे आठवण येते. तो कवि कल्पना करतो :—

अंकं केऽपि शशंकिरे, जलनिधेः पंकं परे मेनिरे,
सारंगं कतिचिच्च संजगदिरे, भूच्छायमैच्छन् परे
इन्दौ यद् दलितेन्द्रनीलशकलश्यामं दरीदृश्यते
तत् सान्द्रं निशि पीतमन्धतमसं कुक्षिस्थमाचक्ष्महे

म्हणजे, चंद्राच्या ठिकाणी इन्द्रनील मण्यासारखे जे काही काळसर दिसते, तो डाग आहे असे काही समजतात; तर दुसरे समुद्रातून बाहेर पडताना त्याचा

गाळ त्याला चिकटला आहे असे मानतात, तर तिसरे चंद्राचे वाहन असलेले ते हरिण आहे अशी कल्पना करितात, तर चौथे ती पृथ्वीची सावली आहे असे सुचवितात. पण आम्हाला मात्र चंद्राने रात्रीचा जो घनान्धकार प्राशन करून आपल्या पोटात साठविला आहे, त्याचे दर्शन घडते. चंद्राच्या जवळ पोचणारे चंद्रयात्रीही चंद्र नक्की कसा आहे, हे सांगू शकत नाहीत. तेव्हा चंद्रापासून दूर असलेल्या कवींनी चंद्रासंबंधी किंवा त्याच्या पृष्ठभागावरील काळ्या ठिपक्यांविषयी कल्पना लढवाव्यात यांत काय आश्चर्य ? पण कल्पनाविलासाचा तो काळ आता लवकरच संपणार आहे. चंद्र खरा कसा आहे हे कळणार आहे. नागपूरवरून न्यूयॉर्कला जाणे जसे आज सहजसुलभ झाले आहे, तसे पृथ्वीवरून चद्रावर प्रवासाला जाण्याचा काळ मानवाच्या दृष्टिक्षेपात आला आहे. मानवाच्या विक्रमाचा हा केवढा गौरवास्पद आविष्कार ! सगळ्यांचीच छाती अभिमानाने फुगविणारा, सगळ्यांचीच शरीरे आनंदाच्या वीचींनी आप्लावित करणारा ! या अद्‌भुत पराक्रमाने वाईट वाटलेच तर ते कविजनांना वाटेल; कारण त्यांच्या कल्पनाविलासाचे एक स्फूर्तिस्थानच नाहीसे होईल. चंद्र सिताबर्डीच्या टेकडीसारखा निष्पर्ण, निर्जीव आणि असुंदर असेल, तर कोण सुंदरीच्या मुखड्याला मुखचंद्र म्हणण्याचे धाडस करील ?

२९–१२–६८

REFBK-0024960

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
३९६०
अ.क्र. २४९६०
संदर्भ शाखा (स्थळ प्रत)



माधव गोविंद उपाख्य बाबूराव वैद्य

जन्म : ११ मार्च १९२३, तरोडा, तह. हिंगणघाट, जि. वर्धा.

शिक्षण : एम्. ए. (संस्कृत)

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे कार्यकर्ते, नागपूरच्या हिस्लॉप कॉलेजमधील संस्कृत विषयाचे नामवंत प्राध्यापक, नागपूर विद्यापीठ कार्यकारिणीचे सदस्य, महाराष्ट्र विधान परिषदेचे नाम-नियुक्त सभासद, दै. 'तरुण भारत' या लोकप्रिय वृत्तपत्राचे संपादक व 'नरकेसरी प्रकाशन संस्थे'चे प्रबंध संचालक इत्यादी बहुविध नात्यांनी महाराष्ट्राच्या सांस्कृतिक, सामाजिक, शैक्षणिक व राजकीय क्षेत्रात मौलिक कार्य करणारे समाज-सेवक.

■ ■

समाजहिताशी संबंधित कोणत्याही प्रश्नाचा सर्वांगीण विचार करणे व सत्यान्वेषी वृत्तीने त्या प्रश्नाची निर्भीड चिकित्सा करणे हा मा. बाबूरावांचा प्रकृतिधर्म.

■ ■

ह्या प्रकृतिधर्माचा प्रत्यय देणाऱ्या त्यांच्या वेचक साहित्याचा हा संग्रह. दै. 'तरुण भारता'तून गेल्या वीस वर्षांत त्यांनी लिहिलेल्या विचारगर्भ अग्रलेखांतून व लेखांतून निवडलेले मोजके साहित्य या संग्रहात आढळेल. कोणत्याही प्रकारच्या अभिनिवेशापासून अलिप्त असलेले व राष्ट्रीय हितसंबंधाविषयी सदैव दक्ष असलेले लेखकाचे विवेकी प्रतिपादन व तर्काधिष्ठित प्रसन्न शैली ह्यांचा वेधक समन्वय म्हणजे 'मा गो वा'

---

प्रा. मा. गो. वैद्य यांची
अन्य प्रकाशित पुस्तके

१. हिंदुत्व : जुने संदर्भ, नये अनुबंध
२. हिंदुसंघटन : शक्यता, आवश्यकता आणि सफलता